

भाग २

म. ग्रं. सं. ठाणे
विषय
सं. नं.

संग्रहालय, ठाणे.
जिल्हा वाचनालय शाखा.
क्रमांक ८०९


लेखक

सूचना—पुस्तक आठ दिवसांवर ठेवूं नका. पुस्तकाची खराबी करूं नका.

RLFBK-0006999



अनुवादक :
... धर धरणीधर देशमुख
... इंदुमती देशमुख



संग्रहालय ठाणे
दा. क्र.


# श्रीमेहेरबाबा

यांचे

# अध्यात्मपर लेख व संदेश

## भाग २ रा

REFBK-0006999



अनुवादक :

डॉ. प्रो. चक्रधर धरणीधर देशमुख
एम्.ए., पीएच. डी. (लंडन)
विदर्भ महाविद्यालय, अमरावती

व

सौ. इंदुमती देशमुख, एम्.ए., बी.टी.
प्राध्यापक : डिप्. टी. इन्स्टिटयूट फॉर वुइमेन,
अमरावती (विदर्भ.)

Circle Publication

आवृत्ति पहिली

२५ फेब्रुआरी, १९४८

मुद्रक :

द. ना. ठाकूर,

महेश्वर प्रेस, अमरावती.

प्रकाशक :

आदि के. इराणी,

मेहेरबाबा जागतिक आध्यात्मिक कें

किंग्ज रोड, अहमदनगर.

# प्रस्तावना

श्रीसद्गुरु मेहेरबाबांच्या स्फूर्तिप्रद व अध्यात्मपर लेखांपैकी बऱ्याचशा लेखांचा मराठी अनुवाद पहिल्या भागांत प्रसिद्ध झालाच आहे. सम्पूर्ण लेखसंग्रह तीन भागांत प्रकाशित होईल. हा दुसरा भाग जनताजनार्दनास सादर समर्पण करण्यास आम्हांस फार आनन्द वाटत आहे. मूळच्या ‘ Meher Baba ’ मासिकांत व इतरत्र इंग्रजी भाषेंत प्रसिद्ध झालेल्या लेखांचा व सन्देशांचा क्रम अनुवादामध्ये कित्येक कारणांमुळे ठेवता आला नाही. परिशिष्ठ नं. १ मधील प्रवचनें श्रीमेहेरबाबांनी मेहेराबादला फळीवरून दिली आहेत; व परिशिष्ठ नं. २ मधील प्रश्नोत्तरें श्री. सी. बी. परडॉमच्या पुस्तकांतील झुरिचमधील भेटींच्या वृत्तांतांतून व Meher Baba The Awakener ह्या पुस्तकांतून घेतलीं आहेत. ह्या दोन्हीं परिशिष्ठांतील अनुवाद श्रीमेहेरबाबांच्या मराठी चरित्रांत (ले. डॉ. प्रो. च. घ. देशमुख) पूर्वी आलेला आहे. श्रीसद्गुरु मेहेरबाबांच्या प्राच्य व पाश्चिमात्य देशांत दिलेल्या अनेक दिव्य संदेशांचाहि अनुवाद ह्या भागांत प्रकाशित झाल्यामुळे त्याला एक विशेष वैशिष्ट्य आलें आहे. सर्व कार्य श्रीगुरुकृपेनेच तडीस गेलें आहे. हा भागही श्री सद्गुरु मेहेरबाबांच्या जन्मदिवशींच जनताजनार्दनास समर्पित करण्यांत आम्हाला आनंद वाटतो.

श्रीसद्गुरु मेहेरबाबांचे लेख प्रत्यक्ष अनुभूतीवर अधिष्ठित असून, त्यांच्यांत मानवतेस जागृत करण्याचें सामर्थ्य ओतप्रोत भरलेलें

असल्यामुळे, त्यांचें श्रेष्ठतम महत्त्व चिरकाळ टिकणारें आहे. त्यांचा अनुवाद इतर सर्व भारतीय व जागतिक भाषांमधून व्हावयास पाहिजे.

ह्या लेखसंग्रहाचें प्रकाशन करण्याबद्दल, श्री. आदि. के. इराणी, पब्लिकेशन कमिटी, मेहेरबाबा जागतिक आध्यात्मिक केंद्र, अहमदनगर व तो लेखसंग्रह सुबक रीतीने छापून देण्याबद्दल 'महेश्वर प्रेस, अमरावती' यांचे व त्याचप्रमाणे या ईश्वरार्पित कार्याला इतर अनेक प्रकारची मदत करणारे श्री. पु. गो. निजसुरे व इतर सर्व मित्रमंडळी यांचे आम्ही कृतज्ञतापूर्वक आभार मानतों.

अमरावती,<br>
२५ फेब्रुआरी, १९४८

चक्रधर धरणीधर देशमुख<br>
सौ. इन्दुमती देशमुख

# शुद्धिपत्रक

| पृष्ठ | ओळ | अशुद्ध | शुद्ध |
|---|---|---|---|
| १२ | ४/५ | तर्काधिचारांचे | तर्काविचारांचे |
| १३ | १८ | हृदय मनुष्याला ज्या | हृदय हे ज्या प्रवृत्ती मनुष्याला |
| १४ | १९ | कस्ते. | करतो. |
| २० | ७ | अवश्यभाव | अपरिहार्य |
| २२ | २६ | पूणावस्था | पूर्णावस्था |
| ३० | २२ | स्वातत्र्य | स्वातंत्र्य |
| ३६ | १४ | सार्पेक्ष | सापेक्ष |
| ४३ | ६ | ज्ञाना ो | ज्ञानाने |
| ४३ | १० | रेवेचें मो | सेवेचें मोल |
| ४३ | १३ | रेवा | सेवा |
| ४५ | १९ | गर्मित | गर्भित |
| ५० | १ | शक्य हेंहि | शक्य नाही हेंही |
| ५० | २ | विका शील | विकासशील |
| ५० | ६ | कांहा अशी | काही अंशी |
| ५० | ११ | उपन्न | उत्पन्न |
| ५० | २२ | हो ते | होत असते. |
| ५२ | १० | ठ ां मुळे | ठशांमुळे |
| ५३ | १२ | सतुलन | संतुलन |
| ५३ | २० | शृखलेमधे | शृंखलेमधे |
| ५४ | २ | वस्त | वस्तु |
| ५४ | २२ | ए ा | एका |
| ५५ | ६ | रिस्थितीच्या | परिस्थितीच्या |
| ५५ | १४ | वेतो | घेतो |
| ५६ | २३ | मावलीचा | भावलीचा |
| ५६ | २३ | Graiuty | Gravity |
| ५७ | २३ | पवळ | जवळ |

| | | | |
|---|---|---|---|
| ५७ | १व६ | मावली | भावली |
| ८५ | ४ | त्यचा | त्याचा |
| १०२ | ९ | निर्मिति | निर्मिति |
| ११३ | ४ | सख्या | संख्या |
| ११७ | १२ | उपधियुक्त | उपाधियुक्त |
| १२१ | १ | आध्यातम | अध्यातम |
| १२७ | १ | आहत, | आहेत, |
| १३० | १७ | घाटाळ्यामध्ये | घोटाळ्यामध्ये |
| १३१ | ३ | हात | होते |
| १३१ | १४ | जाणिवमध्य | जाणिवेमध्ये |
| १३४ | १७ | आध्यामिक | आध्यात्मिक |
| १३८ | २ | हातात; | होतात; |
| १४२ | १९ | संस्कारांची | संस्कारांची |
| १४६ | ४ | असली. | असली |
| १४६ | १७ | जीआत्मे | जीवात्मे |
| १४६ | १८ | ्ल | स्थूल |
| १४६ | २१ | जगतांत; | जगतांत |
| १४६ | २१ | स्थूल | स्थूल |
| १५० | २२ | मनुष्यलाहि. | मनुष्यालाहि |
| १५७ | ६ | मुबलब | मुबलक |
| १५८ | २ | पोहोचल | पोहोचले |
| १६१ | २३ | ता क्षण | तो क्षण |
| १६७ | १२ | कांहीाह प्रयाजन | कांहीहि प्रयोजन |
| १६८ | १८ | भयरहिंत | भयरहित |
| १६९ | ६ | गांठलेंचे | गांठलेंच |
| १८० | २ | कच | एकच |
| १८१ | १० | निर्लेष | निर्लेप |

| | | | |
|---|---|---|---|
| १८३ | १८ | असतें. | असावे लागतें |
| १८६ | ३ | हनि | हीन |
| १९५ | २ | त्या तत्त्वाची जाणीव | ( त्या तत्त्वापासून अल ग झाल्याचा अनुभव कधीच आलेला नसल्यामुळे ) त्या तत्त्वाची स्पष्ट जाणीव |
| २११ | २१ | करसच | एकरसच |
| २१३ | १० | ा रा | द्वारा |
| २१३ | १८ | ी | तरी |
| २१३ | १९ | पूर्ण | पूर्णपणें |
| २१६ | १९ | जावन | जीवन |
| २१८ | १७ | हाऊ शकत. | होऊं शकते. |
| २३२ | ६ | कराते | करीत |
| २३२ | ११ | उन्नाति | उन्नति |
| २३७ | २३ | आकाक्षा | आकांक्षा |
| २४१ | ५ | ऐश्वय | ऐश्वर्य |
| २४१ | १० | प्रक्रियेमध्य | प्रक्रियेमध्ये, |
| २४५ | १४ | पूणतस | पूर्णतेस |
| २५१ | ३ | अंतःकरणत | अंतःकरणांत |
| २५१ | १४ | सवश्रेष्ठ | सर्वश्रेष्ठ |
| २५२ | ८ | लोम | लोभ |
| २५९ | १ | परिशिष्ट—ब | परिशिष्ट—नं. २ |
| २६३ | ११ | म्हणाले ? | म्हणाल ? |
| २६५ | १ | भितीमुळे | भीतीमुळे |
| २६६ | ४ | चाल | चालू |

# श्री मेहेरबाबा





यांच्या

विश्ववंद्य, बोधप्रद व अध्यात्मपर लेखांचा

आणि

दिव्य व स्फूर्तिदायक संदेशांचा

हा अनुवाद

जनताजनार्दनास

समर्पित असो.



चक्रधर धरणीधर देशमुख

सौ. इंदुमती देशमुख



श्रीमेहेरबाबा

# अनुक्रमणिका

## विभाग १ ला


| क्रमांक | विषय | पृष्ठांक |
|---|---|---|
| १ | ज्ञानप्राप्तीचे मनोरम मार्ग | ११ |
| २ | पूर्णता | २० |
| ३ | आत्मजीवन | २८ |
| ४ | निःस्वार्थ सेवा | ३८ |
| ५ | सृष्टीचा प्रारंभ व अंत | ४७ |
| ६ | साधकाचीं लक्षणें ( भाग १ ला ) आंतरिक जीवनाच्या सत्यविस्तारांत प्रवेश | ६२ |
| ७ | साधकाचीं लक्षणें ( भाग २ रा ) कांहीं दिव्य गुणविशेष | ७० |
| ८ | साधकाचीं लक्षणें ( भाग ३ रा ): सेवातत्परता | ७८ |
| ९ | साधकाचीं लक्षणें ( भाग ४ था ): श्रद्धा | ८७ |
| १० | अवतार | ९६ |
| ११ | सत्याची अनंतता | १०५ |
| १२ | स्वार्थाचें मूळ व पर्यवसान | ११५ |
| १३ | ईश्वर व व्यक्ती | १२५ |


## विभाग २ रा


| क्रमांक | विषय | पृष्ठांक |
|---|---|---|
| १ | उत्क्रांति, जन्मपरंपरा व मोक्षमार्ग | १३७ |
| २ | हिंदुस्थानांत रचनात्मक नेतृत्वाची आवश्यकता | १५२ |
| ३ | नवयुगनिर्मितीच्या पूर्ववेदना | १५८ |
| ४ | प्रार्थनेचें रहस्य | १६३ |
| ५ | नाममाहात्म्य | १६६ |

| | | |
|---|---|---|
| ६ | ईश्वर आणि धर्म | १६७ |
| ७ | ईश्वर आणि प्रेम | १६९ |
| ८ | ईश्वरासाठीच जगा व ईश्वरासाठीच मरा | १७१ |
| ९ | परमात्माच सत्य वस्तु आहे | १७३ |
| १० | प्रेमाची प्रेरक शक्ति | १७५ |
| ११ | अखिल जीवनाची एकता | १७७ |
| १२ | सात उदात्त तत्त्वें | १८० |
| १३ | मानवतेस आध्यात्मिक स्वातंत्र्य मिळविण्यास मदत करा | १८२ |
| १४ | नवीन कालचक्र | १८८ |
| १५ | न्यूयॉर्कला संदेश | १९३ |
| १६ | कॅलिफोर्नियास संदेश | १९६ |
| १७ | हॉलीवुडला संदेश | २०० |
| १८ | भारतभूमीस संदेश | २०३ |
| १९ | कोठून व कुठे ? | २०५ |
| २० | चालू महायुद्धाचें आध्यात्मिक रहस्य | २०७ |
| २१ | नवमानव | २१५ |
| २२ | आध्यात्मिक कार्यकर्त्यांचें कर्तव्य | २२६ |
| २३ | आध्यात्मिक आकांक्षेची ज्वाला | २३६ |
| २४ | मानवाचा आध्यात्मिक वारसा | २३८ |
| २५ | प्रच्छन्न संपत्ति | २४१ |
| | परिशिष्ट नं. १—फळीवरील कांही प्रवचनें | २४३ |
| | परिशिष्ट नं. २—प्रश्नोत्तरें | २५९ |

... ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. ६८८१

# १ : : ज्ञानप्राप्तीचे मनोरम मार्ग

आध्यात्मिक ज्ञानाचे जे निरनिराळे मार्ग आहेत, त्यांचें ज्ञान उत्तम प्रकारें होण्याकरता, भौतिक वस्तू आणि आत्मा, यांतील प्राथमिक भेद प्रथम समजून घेणें आवश्यक आहे. भौतिकाचें अगर स्थूलाचें ज्ञान करून घेण्यासाठी आपणांस स्थूल साधनें आहेत; आणि आत्म्याचें ज्ञान करून घेण्याकरिता, आध्यात्मिक साधनें आहेत. निरनिराळ्या इंद्रियसंवेदनां (sensations) वर मन अगर बुद्धि, यांच्या द्वारां ज्या क्रिया होतात, त्यायोगाने जड सृष्टीचें ज्ञान होतें. परंतु, आत्म्याचें ज्ञान मात्र केवळ आत्म्याच्याच द्वारां होऊं शकतें. हें उच्चतम प्रकारचें ज्ञान (ज्यामध्ये दुसऱ्या कोणत्याहि साधनाचा उपयोग न करतां, आत्मा स्वतःच्या स्वरूप-ज्ञानाचा आनंद अनुभवतो) फार क्वचित् अनुभवण्यास मिळतें; आणि तें मिळविण्यास फार कठीणहि आहे. परंतु या ज्ञानाप्रत जाण्याचा दुय्यम दर्जाचा मार्ग, म्हणजे मनाच्या द्वारां आत्म्यास जाणण्याचा प्रयत्न न करतां, त्याला हृदयाच्या द्वारां जाणण्याचा प्रयत्न करणें, हा होय.

मनाच्या द्वारां आत्म्याचें ज्ञान होऊं शकत नाही.

भौतिक वस्तूवर विचार आणि क्रिया करण्याची मनाला संवय असते; आणि त्यांचें बौद्धिक ज्ञान मिळविण्याची प्रेरणा वासना आणि तृष्णा, यापासून मिळविलेली असते. आणि म्हणून, मन जेव्हा

भौतिकासंबंधीचे मनाचे तर्क-विचारांचे साचे आणि दृष्टि-कोण आत्म्याच्या ज्ञाना-करिता अपुरे आहेत.

आध्यात्मिक प्रश्नांकडे वळतें, तेव्हा त्या प्रश्नासंबंधीं तें त्याला परिचित असलेल्या विचारपद्धतींनेच चालतें; आणि तसें करतांना, भौतिक वस्तूंच्या बौद्धिक ज्ञाना-करिता जी विचारपद्धति, व जे कल्पनांचे सांचे (conceptions) मनाने वापरले असतील, त्यांचाच उपयोग तें आत्म्याच्या ज्ञाना-करिताहि करतें. आत्मज्ञानाकरिता वापरलेली ही पद्धति विफल होणार, हें तर ठरलेलेंच असतें; कारण, **भौतिक वस्तूंच्या ज्ञानाकरिता विकसित झालेल्या सर्व कल्पना आत्मज्ञानाकरिता अपुऱ्या पडतात.** त्या पद्धतींनी आत्मज्ञान करून घेऊं पाहणें, म्हणजे डोळ्यांनी ऐकण्याचा अगर कानांनी पाहण्याचा प्रयत्न करण्यासारखें आहे. हृदयाच्या सहकार्याशिवाय मन आत्म्याचें ज्ञान करून घेऊं पाहील, तर त्याकरिता भौतिक वस्तुविष-यक कल्पनांचाच मन उपयोग करतें; आणि यामुळे आत्मा हा मनाचा विषय नसतांना देखील, तो तसा आहे, असें वाटतें.

मन आणि हृदय यांचा संघर्ष.

इंद्रियसंवेदनांत उद्भवून अनुमान आणि निष्कर्ष यांच्या योगाने निर्णयाकडे जाणाऱ्या मनाच्या पद्धतीशीं तुलना करतां, हृदयाची रीत हा एक साधा आणि प्रत्यक्ष प्रमाणाचा मार्ग आहे. जीवनांतील असंख्य अनुभवांतून जातांजातां, मनुष्याचें लक्ष जेव्हा आध्यात्मिक ज्ञान

करून घेण्यावर केंद्रित होतें, तेव्हा विविध मूल्यें (values) प्रगतिशील आणि स्वयंस्फूर्त रीतीनें त्याच्या अनुभूतींत उतरतात; व हीं सर्व मूल्यें हृदयालाच अंतःप्रज्ञेनें प्रतीत होतात. बहुतेक लोकांच्या जीवनांत, मन आणि हृदय हीं परस्परांच्या विरुद्ध जातात; आणि या दोहोंतला संघर्ष गुंतागुंत उत्पन्न करतो. हृदयाला जीवनाची एकता प्रतीत होते; आणि तें प्रीति, त्याग आणि सेवा यांच्याद्वारां साफल्य शोधतें. हृदयाची प्रवृत्ति कोणतीहि गोष्ट घेण्यापेक्षा देण्याकडे अधिक असते. आंतरिक जीवनांतील विविध अंतःप्रज्ञां (intuitions) मधून अभिव्यक्त होणाऱ्या गूढ मानसिक ओढीपासूनच हृदयाला स्वतःची संचालक प्रेरणा प्राप्त होते; आणि भौतिक वस्तूंचें समर्थन करतांना ज्या बौद्धिक प्रमाणांची मनाला आवश्यकता वाटते, त्यांची गरज हृदयाला वाटत नाहीं. मन वस्तुनिष्ठ (objective) दृष्टीनेच जगाचा विचार करतें; व म्हणून तें नानात्व आणि पृथक्त्व यांनी अगदी ओतप्रोत भरून, माणसामाणसांत भेद उत्पन्न करतें; आणि त्यांना ते स्वार्थी आणि अधिकारलोलुप बनवून, त्यांच्या अहं-केंद्र प्रवृत्ती (ego-centric tendencies) चें पोषण करतें. परंतु हृदयाला आंतरिक अनुभवांत प्रीतीची दीप्ति दिसते आणि त्यामुळे आत्म्याच्या एकतेचें त्याला ईषत् दर्शन होतें. म्हणून, हृदय मनुष्याला ज्या निःस्वार्थ, उदात्त आणि उदार बनवितात, अशा दानशील प्रवृत्तींतून अभिव्यक्त होण्याचा प्रयत्न करतें. याप्रकारें, 'आंतरिक आवाज' (inner voice) आणि जीवनाच्या भासमान व भ्रमात्मक अशा वरवरच्या बाजूंवर अधिष्ठित असलेल्या बुद्धीची निवेदनें, यांच्यामध्ये अवश्यतः संघर्ष होतोच.

प्रेमाच्या विमोचना ( release ) पूर्वी, प्रथम पूर्ण करावीं लागणारीं आश्वासनें मागून किंवा अटी घालून, मन हृदयाच्या क्षेत्रावर आक्रमण करतें. परंतु, प्रेम स्वयंस्फूर्त नसेल, तर तें प्रेमच नव्हे.

मन आश्वासन—लोलुप असून निश्चयात्मकतेच्या शोधांत असतें.

प्रेम करण्यापूर्वी, तुह्माला प्रेमविषयासंबंधीं खात्री करून घ्यावीशी वाटत असेल, तर तो केवळ स्वार्थाचा बाजार आहे. उदाहरणार्थ, पुष्कळ लोकांना माझ्यावर प्रेम करण्याकरता, माझ्या ईश्वरत्वाबद्दल खात्री करून घ्यावीशी वाटते. म्हणजे, माझ्या आध्यात्मिक गौरवाचें प्रमाण म्हणून मी कांहीतरी चमत्कार करून दाखवावे, अशी त्यांची इच्छा असते. परंतु, अशा प्रकारच्या प्रमाणांनी उच्चतम प्रकारच्या प्रेमाच्या ओघाला मदत न होतां, उलट अडथळेच होतात. उच्चतम प्रेमामध्ये प्रीतिविषयाकडून कांही मिळेल, अशी यत्किंचितहि अपेक्षा नसते.

जेव्हा मन अशा शंकानिवृत्ती ( coviction ) चा आणि पुष्टिविधानां ( corroborations ) चा, आध्यात्मिक ज्ञानाला मदत म्हणून, इंद्रियग्राह्य प्रमाणें आणि चमत्कार, यांच्या द्वारां शोध

बौद्धिक विश्वास सहज-प्रेमाला अवरुद्ध करतो.

करतें, तेव्हा तें हृदयाच्या अधिकारक्षेत्रावर आक्रमण करतें. या वस्तुजगतामध्ये, जेव्हा कांहीं निश्चित आणि प्रत्यक्ष परिणाम घडवून आणावयाचे असतात, अगर कांही निश्चित पदार्थप्राप्ति हवी असते, तेव्हा पुष्टिविधानें ( corroborations ) आणि संशयविच्छेद किंवा निश्चयात्मकता ( conviction ) यांचें महत्त्व असतें. एखाद्या मनुष्याची चमत्कार आणि इतर कांही इंद्रिय-

ग्राह्य प्रमाणें, यायोगें ईश्वराच्या अस्तित्वाविषयीं बौद्धिकदृष्ट्या अगदीं खात्री झालेली आहे, अशी जरी आपण कल्पना केली, तरी अशा निश्चयात्मकतेमुळे, त्याच्या हृदयाचें द्वार खुलेलच, असें म्हणतां येणार नाही. अशा या रुक्ष ( cold ) रहस्योद्घाटना ( revelation ) मुळे, ईश्वरावर जी निष्ठा तो ठेवील, तिच्या मुळाशीं भीति किंवा कर्तव्याची भावनाच राहील. परंतु, ज्याला कोणतेंहि बंधन नाही, असें विमुक्त प्रेम कोणत्याहि बुद्धिगम्य वस्तूवर आधारलेल्या प्रमाणांतून उद्भूत होणें शक्य नाही. आणि जेथे प्रेम नाही, तेथे जीवनाचा आनंदहि नाही आणि सत्तासौंदर्य ( beauty of being ) हि नाही. वास्तविक पाहातां, ईश्वराच्या प्रीतिसागरस्वरूपाचें आकलन मनाला होणें शक्य नाही. ईश्वराच्या स्वरूपाचें आकलन प्रीतीनेच होतें; चमत्कारांचा बौद्धिक शोध करून ईश्वर सापडत नाही. याच कारणासाठी, जे मला अगदी जवळचे आणि अत्यंत प्रिय वाटतात, त्यांच्यासाठी मी चमत्कार करीत नाही. चमत्कार करून माझ्या ईश्वरत्वाची खात्री पटविण्यापेक्षा, मला अनुयायी नसले तरी परवडतील. माझ्यावर प्रेम करतांना, लोकांना आजवर त्यांना अज्ञात असलेले आध्यात्मिक अनुभव येतील, हें खरें. आणि हे अनुभव त्यांच्या हृदयाच्या अधिकाधिक विकासाला मदत करतील, हेंहि खरें. परंतु, बौद्धिक प्रमाण मिळविण्याची मनाची तृष्णा शमविण्यासाठी चमत्कार केले जात नाहीत; आणि चमत्कारच ध्येय आहेत, असें समजण्याची भूल कधीहि होऊं देऊं नये.

जेव्हा एखाद्या कार्याचें वास्तविक महत्त्व लक्षांत न घेतां, मनुष्य त्याच्या परिणामाकडे नजर ठेवतो, तेव्हा तो आध्यात्मिक समस्या

केवळ मनाच्या द्वारां सोडविण्याचा प्रयत्न करीत असतो; आणि असें, करतांना तो हृदयाच्या यथोचित क्रियाशीलतेमध्ये ढवळाढवळ करतो. मनाला सर्व प्रकारच्या वस्तु हव्या असतात.

आत्म्याचें दर्शन हृदयाच्या द्वारांच होऊं शकतें.

आणि त्यासाठीच तें इंद्रियग्राह्य प्रमाणें आणि पोषक विधानें शोधतें. परंतु ही मनाची मागणी स्वयंस्फूर्त प्रेमांत अडथळे आणते. स्वयंस्फूर्त प्रेम खऱ्या आध्यात्मिकतेवर अवलंबून असतें; व त्याबरोबरच ते आध्यात्मिकतेचा विकासहि करतें. केवळ मन किंवा बुद्धि, यांच्या द्वारां तुम्हाला प्रेम करतांच येणार नाही. बुद्धीच्या द्वारां, तुम्हाला प्रीतीचें शास्त्र ( theory ) मिळेल; खरी प्रीति नव्हे. कांही प्रकारच्या योग्यांना जें मनाच्या द्वारां ज्ञान मिळतें, तें केवळ बौद्धिक आणि शुष्क असतें. प्रीतिजीवनांतील स्वभावसिद्ध आध्यात्मिक आनंद ह्या ज्ञानांत राहणार नाही. प्रेम आणि आनंद, या दोनच गोष्टी जीवनांत महत्त्वाच्या आहेत. बुद्धिगम्य व शुष्क वस्तुज्ञानामध्ये, प्रेम आणि आनंद हीं दोन्हीहि नसतात. खऱ्या मूल्यांचे बौद्धिक ज्ञान होण्यांत खरी आध्यात्मिकता नाही; तर ती त्या मूल्यांच्या अनुभूतीं ( realisation ) त आहे, हें आंतरिक अनुभूतिजन्य ज्ञान, म्हणजेच यथार्थ आध्यात्मिक ज्ञान होय; आणि तें मनापेक्षा हृदयावरच अधिक अवलंबून आहे. केवळ बौद्धिक ज्ञान आणि वस्तूबद्दलची माहिती ( information ), हीं सारख्याच योग्यतेची आहेत. असें ज्ञान वरवरचें व उथळ असल्याने जीवनाच्या पृष्ठभागावरच राहातें. त्यामुळे अंतिम सत्य मिळत नसून, केवळ त्याचा आभास होतो. जीवनसागराची सखोल गंभीरता केवळ हृदयाच्या मापा ( plumber ) ने मापली जाईल.

बहुतेक मनुष्यांच्या मनावर असंख्य तृष्णा कुरघोडी करतात. अशा प्रकारचें जीवन हें आध्यात्मिक दृष्टीने सर्वांत कनिष्ठ दर्जाचें मानवी जीवन होय. उच्चतम प्रकारचें मानवी जीवन हें वासनांपासून मुक्त असतें; आणि तृप्ति आणि संतोष, हे त्यांतील स्वभावविशेष असतात. प्रत्येकजण सुख शोधीत असतो; परंतु फारच थोड्यांना तें लाभतें. कारण, वासनांपासून पूर्ण मुक्तता झाल्यानंतरच अक्षय सुखाचा उदय होतो.

चेतना मनातीत (supramental) झाल्यावरच तृष्णेपासून मुक्ति मिळूं शकते.

बाह्यत: हीं अत्युच्च वासनारहित स्थिति निष्क्रियतेची व प्राप्त करून घेण्यास सुलभ वाटेल. परंतु एखाद्याने जर जाणीवपूर्वक व निद्राधीन न होतां, कोणतीहि इच्छा न आणतां अगदी स्वस्थ बसण्याचा प्रयत्न केला, तर त्याला समजून येईल की, असें निरिच्छपणाने स्तब्ध बसणें अतिशय कठीण आहे; आणि प्रचंड आध्यात्मिक क्रियाशीलतेनेच अशी स्तब्धता ठेवणें शक्य आहे. वास्तविक पाहतां, जीवन मनोभारापासून विमुक्त झाल्याखेरीज पूर्ण वितृष्ण. स्थिति दुष्प्राप्य आहे. वासनाराहित्याचा आनंद उपभोगण्याकरिता, मनुष्याला मनातीत व्हावें लागतें.

तथापि, तृष्णाभाराक्रान्त जीवन आणि वितृष्ण जीवन, या दोन टोकांमध्ये, मन आणि हृदय यांमध्ये सुसंवादिता (harmony) ठेवणारी व्यवहारपद्धति बसविणें शक्य आहे. अशी संवादिता जेथें असेल, तेथे जीवनाचें ध्येय मन ठरवीत नाही. तर हृदय जें ध्येय ठरवील, तें मिळविण्याकरिता मन केवळ मदत करतें. हृदयप्रणीत निर्णय व्यवहारांत कार्यरूप

मन आणि हृदय, यांमध्ये सुसंवादिता स्थापित करण्याचे उपाय.

करण्याकरता स्वीकारितांना, मन आपल्या कोणत्याहि अटी पुढे करीत नाही. दुसऱ्या शब्दांत सांगायचें, म्हणजे विश्वस्वरूपा-संबंधींच्या बौद्धिक समस्यांच्या बाबतींतील स्वतःच्या रुळलेल्या न्यायाधीशाच्या भूमिकेचा मन त्याग करतें आणि हृदयप्रणीत आज्ञा बिनतक्रार पाळतें.

मन हा विद्येचा कोश (treasure-house) आहे; परंतु हृदय आध्यात्मिक ज्ञानाचा कोश आहे. विज्ञानशास्त्रें ( science ) आणि धर्म ( religion ) या दोहोंमध्ये जो संघर्ष उत्पन्न होतो, तो ज्ञानाच्या या दोन्ही बाजूंच्या सापेक्ष महत्त्वाची गुणग्रहणशीलता नसल्याने होतो. केवळ मनाच्या साहाय्याने खऱ्या मूल्यांचें ज्ञान मिळविण्याचा प्रयत्न करणें फोल आहे. ग्राह्य काय, हें तुम्हाला मन सांगूं शकत नाही; बुद्धिव्यतिरिक्त इतर साधनांच्या द्वारां इष्ट ठरविलेलीं ध्येयें अगर वस्तु कशा साध्य कराव्यात, हेंच केवळ मन सांगूं शकेल. बहुतेक लोकांच्या बाबतींत, वासनांना ज्या गोष्टी इष्ट वाटतात, त्यांचाच मन स्वीकार करतें; परंतु असें करणें म्हणजे आत्म्याचें जीवन त्यागणें होय. म्हणून, मनाने हृदयाशीं सहकारानेच वागावयास हवें. सहज अंतःप्रज्ञेपुढे, बौद्धिक माहितीच्या स्वरूपाचें ज्ञान गौणच समजलें पाहिजे. आणि मनाला कोणत्याहि तऱ्हेची लुडबुड करूं न देतां, जीवनाचें ध्येय ठरविण्याकरिता, हृदयाला पूर्ण स्वातंत्र्य दिलें पाहिजे. व्यावहारिक जीवनांत मनाला स्थान आहे; परंतु, हृदयाचें निर्णय स्पष्ट झाल्यानंतरच त्याचें कार्य सुरू होतें.

जीवनाचें ध्येय ठरविण्याकरिता हृदयाला पूर्ण स्वातंत्र्य असलें पाहिजे.

आध्यात्मिक ज्ञान, हें हृदय आणि मन यांच्या संवादितेंतून उत्पन्न होतें. या समस्वरतेसाठीं, त्यांच्या कार्यांचा संकर करून टाकला पाहिजे, असें नाहीं. सुसंवादिता म्हणजे संकरक्रिया नव्हे, तर सहकारक्रिया. त्यांच्या क्रिया एकाच स्वरूपाच्या नसतात; व त्या बरोबरीच्या श्रेणीच्या (co-ordinate) हि नसतात. मन आणि हृदय हीं समतोल पाहिजेत. परंतु ही समतोलता मनाविरुद्ध हृदय रोखून किंवा हृदयाविरुद्ध मन रोखून लाभणार नाही. मन व हृदय या दोहोंच्या मध्ये यंत्रसम ताण पडून त्यांचा समतोलपणा होत नाहीं; तर तो त्यांच्या विवेकयुक्त व सम्यक् व्यवस्थापनेने होतो. इकडेतिकडे न झुकतां, मन व हृदय हीं आपापलीं कार्यें सुव्यवस्थित करूं लागलीं, म्हणजे तीं समतोल झालीं, असें म्हणावयास हरकत नाहीं. असा समतोलपणा त्यांच्यांत आला, म्हणजेच त्यांच्यांत संवादिता (harmony) येते. आध्यात्मिक ज्ञानाने प्रकाशित, गंभीर व खंडरहित अशा एकत्वाच्या जीवनाकरिता, मन आणि हृदय यांच्या संवादितेची आत्यंतिक आवश्यकता आहे.

हृदय आणि मन यांची संवादिता त्यांच्या परस्पर-सहकारानेच होते.

# २ : : : पूर्णता

पूर्णतेचें स्पष्ट ज्ञान करून घेण्याकरिता, तिचे दोन भाग करावे लागतातः–(१) **द्वैतातीत जाणिवेच्या परात्पर स्थितीचा आंतरिक अनुभव देणारी आध्यात्मिक पूर्णावस्था,** आणि (२) या द्वंद्वयुक्त जगामध्ये जी व्यक्त केली जाते आणि दृष्टोत्पत्तीस येते, ती **भौतिक पूर्णता.** प्रत्येक संबद्ध सत्ता (relative existence) बहुगुणरूपात्मक व्यक्त जगताचा एक भाग आहे; आणि त्यामध्ये अंशभेद असणें अवश्यंभाव आहे. आपण जेव्हा या प्रकटीभूत विश्वांतील पूर्णतेकडे पाहातों, तेव्हा द्वैतमय जगतांतील इतर वस्तूप्रमाणेच त्या पूर्णतेंतहि न्यूनाधिक्य असतेंच, असें दिसून येतें. चांगलें आणि वाईट, दुर्बलता आणि सबलता, पुण्य आणि पाप, हीं सारीं द्वैतामधील द्वंद्वें आहेत. परंतु या सर्व अवस्था भिन्नभिन्न अंशाने एकाच सत्ते (reality) च्या अभिव्यक्ति आहेत.

पूर्णतेचे दोन प्रकार.

याप्रमाणे, वाईट किंवा अशुभ, म्हणजे केवळ वाईट अगर अशुभ नसून, ते चांगल्याची किंवा शुभाची निम्नतम स्थिति आहे.

दुर्बलता म्हणजे सामर्थ्याचा अभाव नाही, तर सबलतेचा निम्नतम अंश आहे; आणि पाप केवळ पाप नाही, तर सद्गुणांचा आणि पुण्याचा निम्नतम अंश आहे. दुसऱ्या शब्दांत सांगावयाचे, म्हणजे वाईटहि चांगल्याची अत्यल्पावस्था आहे; दुर्बलता ही सबलतेची अत्यल्पावस्था आहे; आणि पाप अगर दुराचार, ही पुण्य अगर सदाचाराची अत्यल्पावस्था आहे. द्वंद्वांच्या या अवस्थांत, निम्नतम व उच्चतम अवस्था आणि या दोहोंमधील अंश (degrees) हि असतात; आणि पूर्णताहि याला अपवाद नाही. मानवतेचें सर्व क्षेत्र पूर्णता आणि अपूर्णता, या दोन अंत्य टोकांत (extremes) अंतर्गत असतें; आणि पूर्णता आणि अपूर्णता या दोहोंतहि वैषम्य, अन्योन्य संबंध आणि तुलना यांना जागा असते. म्हणून, द्वैताच्या राज्यांतील पूर्णता म्हणजे सापेक्ष पूर्णता असते; आणि अपूर्णतेच्या तुलनात्मक दृष्टीने पाहिलें, तरच आपणांस सापेक्ष पूर्णता ही पूर्णतेसारखी भासेल.

द्वैताच्या राज्यांत आपणांस सापेक्ष पूर्णताच मापडते.

द्वैतविषयक पूर्णता म्हणजे कोणत्याहि एखाद्या गुणाची किंवा योग्यतेची उत्तमता (excellence) होय. आणि या प्रकारांत, एका बाबतींतील पूर्णतेंत दुसऱ्या बाबतींतील पूर्णता समाविष्ट होऊं शकत नाही. उदाहरणार्थ, विज्ञानशास्त्रांत प्रवीण असलेला मनुष्य गायनशास्त्रांत प्रवीण असेलच, असें नाही. त्याचप्रमाणे, गायनशास्त्रांत पारंगत असलेला मनुष्य विज्ञानशास्त्रांत पारंगत असेलच असें नाही. एका दृष्टीने पाहतां, गुन्हे करण्यांत

आध्यात्मिक पूर्णता उत्तमतेहून भिन्न समजली पाहिजे.

देखील प्रावीण्य दाखवितां येतें. खुनी माणसाचा तपास लागेल, अशी यत्किंचितहि खूण न ठेवतां खून केला, तर तिला गुन्हे करण्यांतील पूर्णता म्हणतां येईल. म्हणून गुन्हे करण्यांत अगर पाप करण्यांत देखील एक प्रकारची प्रावीण्यरूप पूर्णता असूं शकते. परंतु, या प्रकारची गुणाची अगर शक्तीची उत्तमता अगर पूर्णता द्वैतमय क्षेत्राच्या पलीकडील आध्यात्मिक पूर्णतेहून भिन्न समजली पाहिजे. द्वैताच्या सृष्टींतील कोणत्याहि प्रकारचें प्रावीण्य अगर उत्तमता बुद्धीच्या कक्षेमध्ये अंतर्गत आहे; कारण, नित्याच्या सीमित अनुभवांत आलेल्या एखाद्या चांगल्या गोष्टीला कल्पनेंत उच्चतर वाढविल्याने अशा पूर्णतेचें आकलन करतां येतें. परंतु, आत्मज्ञ लोकांची जी पूर्णता असते, ती द्वैतातीत असल्यामुळे, बुद्धीच्या कक्षेपलीकडे असते. या पूर्ण स्थितीला द्वैताच्या दुनियेंत कोणतीहि उपमा नाही. जेव्हा मनुष्य अध्यात्मदृष्ट्या पूर्ण बनतो, तेव्हा ईश्वराशिवाय या जगांत कांहीहि नाही, आणि जें जें द्वैतमय जगतांत दिसून येतें, आणि जें जें बुद्धिग्राह्य आहे, तें सारें भ्रममय आहे, हें तो जाणतो. आध्यात्मिक पूर्णतेस पोहोचलेल्या मनुष्याच्या दृष्टीने, केवळ ईश्वर हाच सत्य असतो. पदार्थविज्ञान (science), कला, संगीत, दुर्बलता, सामर्थ्य, बरें आणि वाईट – हीं सारीं त्याला स्वप्नाप्रमाणे होत. अविभाज्य अस्तित्वाची अनुभूति म्हणजेच मनुष्याची पूर्णावस्था होय.

आध्यात्मिक पूर्णता असलेला मनुष्य नेहमीं आपलें ज्ञान आणि शक्ति दुसऱ्या आत्म्यांच्या आध्यात्मिक उन्नतीकरिताच उपयोगांत

आणतो. त्याचें दुसऱ्याविषयींचें ज्ञान त्यांच्या बाह्य रूपावर, अगर त्यांच्या म्हणण्यावर अवलंबून नसतें. विचार प्रथम उद्भवतो; आणि त्याची शब्दमय अभिव्यक्ति नंतर होते. परंतु, इतरांचे मनोव्यापार त्याला

आध्यात्मिक पूर्णतेंत सर्व प्रकारची उत्तमता सुप्तावस्थेंत अंतर्हित असते.

प्रत्यक्षपणें (directly) दिसत असल्यामुळे, त्याला विचारांच्या अभिव्यक्तीसाठी थांबावें लागत नाही. शब्दांची आवश्यकता त्याला नसतेच. त्याची इच्छा असल्यास, कोणत्याहि गोष्टीच्या अभिव्यक्तीपूर्वी देखील, तो ती जाणूं शकतो. परंतु, आध्यात्मिक दृष्ट्या त्याची जरूरी असेल, तरच तो असें करतो. त्याचप्रमाणे एखाद्या गोष्टींत विशेष प्रावीण्य मिळविणें आवश्यक असेल, तर तो तें सहज मिळवूं शकतो. कृष्ण आध्यात्मिक दृष्ट्या पूर्ण होता. आणि तो इतर सर्व बाबतींतहि पूर्ण होता. जर त्याला आवश्यक वाटलें असतें, तर मद्यपी, पापी, धूर्त, ठग अगर खुनी इत्यादि रूपांतहि तो आपली कुशलता दाखवूं शकला असता; परंतु त्यामुळे जगाला धक्का बसला असता. जरी तो सर्व बाबतींत निपुण होता, तरी तें नैपुण्य प्रकट करणें, त्याच्या आध्यत्मिक जीवनकार्याकरिता आवश्यक नव्हतें. दुसऱ्या आत्म्यांची आध्यात्मिक उन्नति करण्याकरिता, ज्या जीवनपद्धतीचा अवलंब करणें आवश्यक असेल, अशा कोणत्याहि प्रकारच्या जीवनपद्धतींत, आध्यात्मिक पूर्णता प्राप्त झालेले आत्मे आपलें प्रावीण्य प्रकट करूं शकतात. परंतु, केवळ त्या बाबतींतील आपलें नैपुण्य दाखवावयाचें, म्हणून ते तसें करीत नाहीत. आध्यात्मिक जरूरी असेल, तरच ते आपल्या कर्मकौशल्याचा उपयोग करतात; केवळ दुसऱ्यांचें कुतूहल

पुरविण्याकरिता करीत नाहीत. आपला या गुणोत्कर्षाचा व कार्यक्षमतेचा उपयोग करतांना ते अनासक्त राहतात. ज्याप्रमाणें हातमोजे घातलेला मनुष्य, हात खराब होऊं न देतां, मातीला स्पर्श करूं शकतो, त्याचप्रमाणे आध्यात्मिक दृष्ट्या पूर्ण झालेला मनुष्य भौतिक जगतांतील कार्य त्यांत बद्ध न होतां करूं शकतो.

पूर्णता सर्वांगीण असायला पाहिजे.

पूर्णता म्हणजे व्यक्तित्वाचा पूर्ण विकास आहे. म्हणून पूर्णता सर्वांगीण असावयास हवी. केवळ एकाच विषयांत असलेलें प्रावीण्य म्हणजे खरी पूर्णता नव्हे. ती केवळ एका शक्तीचा किंवा क्षमतेचा एकांगी विकास आहे. अशा अपुऱ्या निपुणतेच्या द्वारां, मनुष्याला सततचंचल अवस्थांतरांशीं आणि जीवनाच्या विविध परिवर्तनांशीं व्यवस्थापन ( adjustment ) किंवा जुळणी करून घेतां येत नाही. जीवनांत सतत होणाऱ्या परिवर्तनामध्ये, तो मनाचा गतिमान समतोलपणा ( moving equilibrium ) ठेवूं शकत नाही. ज्या शक्तींचा उत्कर्ष त्याच्या ठिकाणीं झाला असेल, त्यांच्या अभिव्यक्तीला अवसर मिळेल, अशी निसर्गतःच त्याला परिस्थिति प्राप्त झाली, तर तो तात्पुरता सुखी असतो, आणि विश्वाबरोबर समस्वर असल्याचा आनंद त्याला मिळतो. परंतु ज्या ठिकाणीं त्याची क्रियाक्षमता ( capacity ) अनुपयुक्त आहे, असें प्रतिकूल वातावरण जर त्याला मिळालें, तर विफलतेची भावना उत्पन्न होऊन, त्याच्या मनाचा तोल जातो. म्हणून सर्वांगीण पूर्णता म्हणजेच खरी पूर्णता होय.

याचा अर्थ असा कीं, पूर्णता द्वंद्वाच्या पलीकडे असली, तरी सर्व द्वंद्वांचा तिच्यांत समावेश होतो. जर तुम्ही द्वंद्वसापेक्ष ठरीव प्रमाणा (standard) ने पूर्णतेचें खरें यथार्थ आकलन करूं पाहाल, तर तुम्ही त्या पूर्णतेला सीमित कराल; व पूर्णतेचें खरें ज्ञान करून घेण्यास तुम्ही असमर्थ ठराल. पूर्णतेंत द्वंद्वां (opposites)चा अंतर्भाव होतो; आणि ती द्वंद्वातीतहि आहे. म्हणूनच पूर्णपुरुष कोणत्याहि कायद्याने अगर मर्यादित ध्येयाने बांधलेला नसतो. तो स्वत: बऱ्यावाईटांच्या पलीकडे असतो. परंतु, चांगल्या लोकांना त्याचा नियम (law) चांगलें फल देतो; आणि जे वाईट असतात, त्यांना 'जशास तसें', म्हणजे वाईट फल देतो. अर्जुनाने दुष्ट कौरवांचा शारिरीक आणि मानसिक सर्वनाश केला, असें बाह्य दृष्ट्या दिसलें व वरवर भासलें, तरी तो सर्वनाश कौरवांच्या आध्यात्मिक मुक्तीकरिताच होता, हें कृष्णाने आपला भक्त अर्जुन याला सिद्ध करून दाखविलें. परिस्थितीमध्ये जी आध्यात्मिक आवश्यकता (spiritual demand) असेल, तिला अनुसरून पूर्णावस्थाहि संहारक अगर उद्धारक रूपांत अभिव्यक्त होते. पूर्ण पुरुषांचें हृदय लोण्याहून मऊ आणि पोलादाहूनहि कठोर असतें. पूर्णतेची अभिव्यक्ति द्वंद्वांच्या एकाच विरुद्धपक्षां (opposite) मध्ये सीमित राहूं शकत नाही. म्हणजे, द्वंद्वाच्या दुसऱ्या विरुद्धपक्षांतून देखील पूर्णता प्रकट होण्याची शक्यता नसते, असें नाही. वस्तुस्थितीच्या अंतर्गत नियमा (logic) नुसार, पूर्णावस्थाहि द्वंद्वांतील कोणत्याहि पक्षामधून प्रकट होऊं शकते. म्हणूनच पूर्णावस्था द्वंद्वातीत असून, सर्व संभाव्य परिस्थितींना यथाविधि सामना (response) देण्याला समर्थ असते. पूर्णावस्थेमध्ये, सत्याचा केंद्रबिंदु न सुटतां, परिस्थितीमध्ये जरूर असलेलें

*पूर्णावस्था द्वंद्वामधून व्यक्त होते व ती द्वंद्वातीतहि आहे.*

अनुवर्तन ( adaptibility ) शक्य होतें. आणि सर्वांगीण पूर्णता प्राप्त न झालेला मनुष्य ज्या परिस्थितींत किंकर्तव्यमूढ बनेल, अशाहि निरनिराळ्या कठीण परिस्थितींत, पूर्ण पुरुष अचल शांति ठेऊन, समस्वरतेचा व सुसंवादिते ( harmony ) चा अनुभव घेतो.

मानवी क्रिया द्वंद्वांनी परिमित असतात; आणि पूर्णता त्यांच्या पलीकडे आहे. परंतु, म्हणून पूर्णतेमध्ये कांही मानुषी भाव (human touch) नसतो, अशी कल्पना करूं नये. सामान्य मनुष्य वास्तविकपणें दुःखी असतो; पण तो स्वतःला आणि इतरांना सुखी करण्याकरिता हंसतो. परंतु, ज्याचें अंतःकरण आनंदातिशयाने ओतप्रोत भरलेलें असतें, अशा पूर्ण पुरुषाला देखील विनोदबुद्धि ( sense of humour ) असते. दुसऱ्या शद्बांत सांगावयाचें, म्हणजे पूर्णता ही अमानुष बनण्यांत नसून, अतिमानव ( super-human ) बनण्यांत आहे. मनुष्यामध्ये जो प्रच्छन्न विवेक (rationality ) असतो, त्याचा प्रकर्ष म्हणजेच पूर्णता होय.

पूर्णता मनुष्याची परमोन्नत अवस्था आहे.

ईश्वराचें ईश्वरी स्थितींतच राहाणें म्हणजे पूर्णता नव्हे; व मनुष्याचें मानवी स्थितींत राहाणें हीहि पूर्णता नव्हे. मनुष्य जेव्हा ईश्वर बनतो, किंवा ईश्वर मनुष्य बनतो, तेव्हाच पूर्णस्थिति सिद्ध होते. मर्यादित मनुष्याला आपल्या ससीमतेची जाणीव असते; व म्हणून, तो अपूर्ण आहे, हें उघडच आहे. परंतु स्वतः अनंताशीं एकरूप असल्याचा बोध जेव्हा त्याला होतो, तेव्हा तो पूर्ण होतो. जेव्हा आपण सीमित

मनुष्याचें ईश्वर बनणें अगर ईश्वराचें मनुष्य बनणें म्हणजेच पूर्णावस्था आहे.

(finite) असल्याचा भ्रम दूर करून, अंतर्गत दिव्यतेच्या प्राप्तीने त्यास ईश्वरत्व (godhood) प्राप्त होतें, तेव्हांची ही घटना आहे. अनंत म्हणजे जें सान्ताचें विरोधी आहे, सान्तापासून दूर आहे आणि अवश्यतः सान्ताशिवाय दुसरेंच आहे, असें मानलें, तर सान्तांत आणि सान्तामधून स्वतःचें प्रतिष्ठापन करण्यास असमर्थ ठरलेलें तें अनंत वस्तुतः सीमितच होतें. दुसऱ्या शब्दांत सांगायचें, म्हणजे अशा अनंतास पूर्ण म्हणतां येणार नाही. सान्ताने मर्यादित न होतां, सान्तांत आणि सान्तामधूनच अनन्ताने आपल्या असीम जीवनाचा अनुभव घेतला पाहिजे. ईश्वर मनुष्यरूपांत व्यक्त झाला, म्हणजेच त्याची पूर्णता अभिव्यक्त होते. मनुष्याच्या सीमित देहरूपामध्ये ईश्वराचें ज्ञानपूर्वक अवतरण म्हणजेच अवतार होय; आणि हें त्याच्या पूर्णतेचेंच गमक आहे. आपली सीमा उल्लंघून स्वतःच्या अनन्तत्वाची सान्त जाणीव करून घेतें, किंवा अनन्त आपल्या कल्पित पृथक् स्थितीचा किंवा दूरत्वाचा त्याग करून मनुष्य बनतें, तेव्हा त्यांना पूर्णतेची उपलब्धि होते. दोन्हीहि स्थितींत सान्त आणि अनन्त, हे परस्परांपासून बहिष्कृत होऊं शकत नाहीत. सान्त आणि अनन्त, यांचा ज्ञानपूर्वक व सुखद संयोग म्हणजेच पूर्णता. पूर्ण स्थितीमध्ये, सान्ताने सीमित न होतांहि, अनन्त सान्तामधून अभिव्यक्त होतें; आणि सान्तहि स्वतः अनन्ताचीच अभिव्यक्ति असल्याचें पूर्ण ज्ञान प्राप्त करून, स्वतःच्या ससीमतेच्या भावाचें अतिक्रमण करतें.

---

# ३ : : : आत्मजीवन

खऱ्या कर्मयोगांत किंवा श्रेष्ठतम क्रियाशील जीवनामध्ये, भौतिक आणि आध्यात्मिक बाजूंचें बरोबर व्यवस्थापन (adjustment) झालेलें असतें. या प्रकारच्या जीवनांत, चेतना ऐहिक आणि भौतिक वस्तूंच्यामुळे बद्ध होत नाही. परंतु रोजच्या अस्तित्वाला टाळून दूर पळण्याच्या चेतनेच्या प्रयत्नास प्रतिबंध करण्यांत येतो. मनाला भोगविलासांत बुडूं दिलें जात नाही, तीक्ष्ण वासनांची शिकार त्याला बनूं दिलें जात नाही, किंवा आध्यात्मिक आनंदांत त्याला डुंबत राहूं दिलें जात नाही; तर आध्यात्मिक विवेकाच्या दृष्टिकोणानें जीवनाच्या समस्या सोडवून, त्यांच्याशीं मन सामना करतें.

कर्मयोगी जीवनाच्या समस्यांशीं सामना करतो.

भौतिकता आणि आध्यात्मिकता, ह्या जीवनाच्या दोन बाजूंचें व्यवस्थापन त्यांना सारखेंच महत्त्व देऊन होऊं शकत नाही. म्हणजे, भौतिकांतून कांही आणि आध्यात्मिकतेंतून कांही घेऊन आणि दोहोंमधला कांटा समतोल करून त्यांचें सम्यक् व्यवस्थापन होत नाही.

प्रकृति ( matter ) पेक्षा आत्म्याची अभंग श्रेष्ठता नेहमीच राहाणार. परंतु ही श्रेष्ठता भौतिक वस्तूंचा त्याग करून व त्या टाळून व्यक्त होत नाही; तर आत्म्याच्या अभिव्यक्ती-साठी, त्यांचा योग्य साधन म्हणून उप-योग करून, व्यक्त होते. तेव्हा, विवेकसम्मत व्यवस्थापनेमध्ये, भौतिक वस्तूंनी आत्म्याच्या अभिव्यक्तीचें साहाय्यक उपादान हीच भूमिका घेतली पाहिजे. त्यांनी कोणत्याहि तऱ्हेने स्वतःच्या हक्कांबद्दल निरंकुश बनावयास नको. गायकाच्या गायनाला पूर्ण व्यक्तता देत असेल, तोंपर्यंतच वाद्याची किंमत आहे. परंतु, जर गायकाच्या गीताला वाद्य साहाय्यक होत नसेल, तर तें त्याच्या दृष्टीने केवळ विघ्नच आहे. त्याचप्रमाणे, भौतिक वस्तूंमुळे विधायक जीवनप्रवाहाला स्वतंत्र आणि योग्य अभिव्यक्ति मिळत असेल, तरच त्यांना महत्त्व आहे. परंतु अशा अभिव्यक्तीच्या आड त्या येत असतील, तर त्या विघ्नच आहेत.

भौतिकाचा उपयोग आत्म्याच्या अभिव्यक्तीला अनुकूल साधन म्हणून केला गेला पाहिजे.

मनाच्या नाना तृष्णांमुळे, भौतिक वस्तूंना स्वतःचेंच असें महत्त्व मिळतें. म्हणून, मद्यप्याला मदिरा हेंच सर्वस्व वाटतें; लोभी मनु-ष्याला वित्तसंचयापलीकडे जगांत दुसरें कांही महत्त्वाचें आहे, असें वाटतच नाहीं; व विषयी मनु-ष्यास इंद्रियसुखांचा पाठलाग हेंच जीवनाचें अंतिम लक्ष्य आहे, असें वाटतें. नाना तृष्णांच्या द्वारां भौतिक जगाला वृथा उठाव मिळून, त्यांच्यामुळे आत्म्याची अभिव्यक्ति

आध्यात्मिकतेस भौतिकतेच्या त्यागाची जरूरी नसून, भौतिक-तेस स्वाधीन करून घेण्याची आवश्यकता असते.

कशी विकृत होते, हें या उदाहरणांवरून दिसून येईल. आत्म्याचा गौरव स्थापन होण्याकरिता, भौतिकतेचा त्याग करावयास नको, तर आत्म्याच्या जरूरीकरिता तिचा उपयोग करून घ्यावयास पाहिजे. सर्व वासनांपासून मुक्त होऊन आत्म्याला खऱ्या पदाची जाणीव झाली असेल, तेव्हाच हें शक्य होतें. हें साध्य होईल, तेव्हा मनुष्य ऐहिक वस्तूंचा उपयोग करील, परंतु त्यांत बद्ध होणार नाही. जेव्हा आवश्यकता असेल, तेव्हा तो या ऐहिक गोष्टींचा आत्म्याच्या जीवनाचें साधन म्हणून उपयोग करील. परंतु, तो त्या गोष्टींमुळे मोहित होत नाही, त्यांचें त्याला आकर्षण वाटत नाही, अगर त्यांच्यासाठी तो अस्वस्थहि होत नाही. कारण, जीवनासाठी त्यांचें स्वतःचें असें खरें महत्त्व कांहीच नाही, हें तो जाणतो. मनांत कोणतीहि तृष्णा न ठेवतां, तो ऐहिक जगतांत व समाजांत वावरतो; आणि त्यांपासून अलिप्त असल्यामुळे, तो भौतिक संसाराला त्याच्या आध्यात्मिक जीवनाचें क्षेत्र बनवितो.

एकदां भौतिक आणि आध्यात्मिक बाजूंची खरी जुळणी झाली, म्हणजे ईश्वरत्वाच्या अभिव्यक्तिकरता उपयोगितां येणार नाही, असा कोणताहि जीवनाचा भाग राहत नाही. दैनंदिन जीवन आणि त्याची गुंतागुंत, यांपासून दूर जाण्याची किंवा त्याला विमुख होण्याची यापुढे आवश्यकता राहात नाही. संसाराचा, व भौतिक जगताचा संबंधविच्छेद करून आणि पर्वतगुहांमध्ये जाऊन, जें आत्मस्वातंत्र्य मिळविलें जातें, तें खरें नसून, निषेधक व नकारात्मक स्वातंत्र्य आहे. जेव्हा

आत्मा जेव्हा ऐहिक जगताचा शास्ता बनतो, तेव्हाच त्याचें विधायक स्वातंत्र्य अभिव्यक्त होतें.

असा बाह्यत्याग तात्पुरता असतो आणि तो भौतिक अनुभवांचें मनन व अनासक्तीचें वर्धन करण्याकरता म्हणून केलेला असतो, तेव्हा तो लाभदायक असतो. असला तात्पुरता त्याग जीवनाच्या शर्यतींत थोडा वेळ श्वास घेण्यासाठी घेतलेल्या विश्रान्तीप्रमाणे असतो. परंतु, जेव्हा भौतिक वस्तूंच्या भीतीने आणि आत्मविश्वासाच्या अभावामुळे हा त्याग केला जातो, तेव्हा खरें स्वातंत्र्य मिळण्यास त्याची कांही मदत होत नाही. खरें स्वातंत्र्य नेहमी प्रतिष्ठापनात्मक ( positive ) असतें; आणि तें भौतिकतेवरील आत्म्याच्या अबाधित शासनाधिकारांतूनच व्यक्त झालें पाहिजे. हेंच खरें आत्मजीवन ( life of the spirit ) होय.

आध्यात्मिकतेचा विस्तार सर्व जीवनावर असतो.

आत्मजीवन म्हणजे अनंततेची अभिव्यक्ति होय; आणि म्हणून त्याला कृत्रिम मर्यादा नसतात. केवळ एखाद्या नादा ( fad ) च्या मागें सर्व उत्साह खर्च करणें, म्हणजे कांही खरी आध्यात्मिकता नव्हे. आध्यात्मिकतेचा कोणत्याहि मता ( ism ) शीं संबंध नाही. भौतिक जगताशीं आध्यात्मिकतेचा कांही संबंध नाही, असें समजून व त्याच्याशीं विलग्न होऊन, जेव्हा आध्यात्मिकतेचा शोध करण्यांत येतो, तेव्हा तो शोध व्यर्थ होय. जीवनाच्या एखाद्या विशिष्ट भागावर जोर द्यावयाची अगर त्याला महत्त्व देण्याची सर्व पंथ आणि संप्रदाय यांची प्रवृत्ति असते. परंतु, खऱ्या आध्यात्मिकतेचा दृष्टिकोण सर्वसमावेशक ( totalitarian ) असतो. जीवनाच्या कोणत्यातरी अंगाबद्दल विशिष्ट आणि संकुचित आस्था बाळगणें, हें कांही आध्यात्मिकतेचें खरें सार नव्हे.

परंतु जीवनाच्या विभिन्न परिस्थितींतहि विवेकपूर्ण आणि ज्ञानसंमत वर्तन, हीच खरी आध्यात्मिकता आहे. तिचा विस्तार अखिल जीवनावर असून, जीवन तिच्यांत अंतर्गत आहे. सर्व भौतिक वस्तु दैवी लीलेला पोषक बनूं शकतात; आणि जेव्हा त्या अशा गौण अगर अंकित बनतात, तेव्हा त्या आत्म्याच्या प्रकाशनास सहायक होतात.

शरीर हें आध्यात्मिक जीवनांत विघ्नच आहे, असें नाहीं.

आत्म्याच्या जीवनांत ज्या मानाने भौतिक वस्तु भाग घेऊं शकतील, त्यावर त्यांचें मोल अवलंबून राहील. त्या स्वतः चांगल्याहि नाहीत किंवा वाईटहि नाहीत. त्यांच्या द्वारां आत्म्याची भौतिकांत अभिव्यक्ति होत असेल, अगर त्या अभिव्यक्तींत विघ्न येत असेल, त्याप्रमाणे त्या बऱ्या अगर वाईट ठरतात. उदाहरणार्थ, आत्मजीवना (life of the spirit) मधील स्थूल देहाचें स्थान घ्या. आत्मा आणि स्थूल शरीर यांत विरोध स्थापित करणें, ही भूल आहे. या दोहोंत असें वैमनस्य कल्पिल्याने शरीर अनिवार्यतेने निंद्य ठरलें जातें. परंतु, जेव्हा शरीर स्वतःच्याच हक्कांचा परिपोष करतें, तेव्हाच तें आध्यात्मिक सफलतेंत विघ्न ठरतें. शरीराला आध्यात्मिक उद्दिष्टाकरिता दुय्यम साधन समजणें, म्हणजेच त्याचें खरें कार्य ओळखणें होय. युद्ध करावयाचें असेल, तर योद्ध्याला घोड्याची आवश्यकता लागेलच. परंतु, जर घोडा योद्ध्याच्या इच्छेप्रमाणे पूर्णपणे चालणार नाही, तर मात्र त्याला तो एक अडथळाच होईल. त्याचप्रमाणे, आपल्यांत साठवलेल्या सर्व संभाव्यतां ( possibilities) ची प्राप्ति जर आत्म्याला करून घ्यावयाची असेल,

तर आत्म्याला भौतिकाचें अवगुंठन घ्यावें लागतें. मात्र कधी कधी, आत्म्याच्या आधीन राहाण्याचें नाकारून, शरीर त्याच्या मार्गांतील विघ्न बनूं शकतें. जेव्हा शरीर आत्म्याला वश राहाण्यास तयार असतें, तेव्हा तें या भूतलावर स्वर्ग आणण्याचेंहि साधन बनून, ईश्वरत्वाच्या अभिव्यक्तीचें वाहन बनूं शकतें. आणि जेव्हा अशा रीतीने तें आध्यात्मिक सिद्धींत साहाय्यक बनतें, तेव्हा शरीराला पृथ्वीवरील ईश्वराचें मंदिर म्हणणें यथार्थ ठरेल.

विज्ञान, कला आणि राजकारण, हीं आध्यात्मिक सिद्धीला सहायक होऊं शकतात.

ज्या अर्थी, आत्म्याच्या जीवनाकरिता स्थूल शरीर आणि भौतिक वस्तु उपयुक्त होऊं शकतात, त्या अर्थी, खरी आध्यात्मिकता या गोष्टींबद्दल विरोध अगर वैषम्य बाळगूं शकत नाही. वास्तविक पाहातां, आध्यात्मिकता त्यांच्यांत आणि त्यांच्यामधूनच स्वप्रकाशन करण्याचा प्रयत्न करते. यासाठीच पूर्ण मनुष्य सुंदर वस्तु, कलाकृति, विज्ञान-शोध आणि राजकारणी लोकांचें यश, यांकडे तुच्छतेने पाहत नाही. जेव्हा सुंदर वस्तु केवळ अहंकार, मत्सर आणि ग्रहणशील लालसा वाढविण्याचीं साधनें बनतात, जेव्हा कलाकृतींचा उपयोग अहंभावना व मनुष्याच्या इतर दुर्बल प्रवृत्ति वाढविण्याकडे होतो, आणि विज्ञानाचे शोध परस्पर संहाराचीं साधनें बनतात, तेव्हा सौंदर्य, कला आणि विज्ञान हीं तुच्छ आणि उपहासास्पदच मानलीं पाहिजेत. आध्यात्मिक दृष्टि नसेल, तर राजनीतिविषयक उत्साह निरंतर सामाजिक आणि आंतरराष्ट्रीय गोंधळच माजवील. परंतु, या सर्व गोष्टींचें सुयोजकतेने अध्यात्मीकरण होऊं शकतें. सुंदर

वस्तु शुचिता, सुख आणि स्फूर्ति, यांचें मूलस्थान बनूं शकतात. कलाकृति लोकांची चेतना उन्नत आणि उदात्त करूं शकतात. विज्ञानांतील शोध मानवतेचीं दुःखें आणि अडचणी, यांपासून मुक्तता मिळवून देऊं शकतात; आणि राजकारणांतील क्रिया अखिल मानवजातींत खरी विश्वबंधुता स्थापन करूं शकते. तेव्हा, ऐहिक अगर भौतिक क्षेत्रास विमुख होणें, म्हणजे आत्म्याचें जीवन नसून, दैवी कार्यांत त्यांचा उपयोग करून घेणें, हें आहे; आणि त्यामुळे, आध्यात्मिक पूर्णता प्रत्येकाच्या टप्प्यांत येऊन, सर्वांस प्रीति, शांति, सुख आणि सौंदर्य, यांचा लाभ होऊं शकतो.

अनासक्ति म्हणजे उदासीनता नव्हे.

तथापि, जो हें आत्म्याचें जीवन जगेल, त्याने भौतिक जगतांत राहूनहि व त्यांच्याविषयीं उदासीनता किंवा बेफिकिरी न बाळगतां, त्यांबद्दल अनासक्त राहिलें पाहिजे. अनासक्ति म्हणजे गुणग्रहणशीलतेचा अभाव, अशी गैरसमजूतहि करून घेऊं नये. वस्तूंची ससारता आणि असारता, यांचा यथोचित मूल्यनिर्णय अनासक्तीमध्ये साधूं शकतो, इतकेंच नव्हे, तर तो केवळ अनासक्तीमध्येच साध्य होतो. वासना भ्रम उत्पन्न करते, आणि योग्य दृष्टिकोण साधूं देत नाही. ती मनाला घेरून टाकून आसक्ति वाढविते, आणि बाह्य वस्तूंवरील अवलंबन कायम करते. परंतु, अनासक्ति ही योग्य दृष्टिकोण मिळवून देऊन, चेतनेला बाह्य वस्तूंवर व भौतिक जगतावर अवलंबून न ठेवतां, त्यांचें खरें मोल समजून घेण्यास मदत करते. वस्तूंचें खरें महत्त्व ओळखणें, म्हणजे

त्या एकाच जीवनाच्या अभिव्यक्तीचे भाग आहेत, हें समजणें; आणि त्यांच्या दृश्यमान आवरणामधून त्यांचें सत्यस्वरूप पाहाणें, म्हणजे वस्तूंची कल्पित पृथकता आणि स्वतंत्रपणा, यांच्या भ्रमाच्या भूतापासून स्वतःस मुक्त करून घेणें होय. याप्रमाणे, आसक्तिरहित **सर्वसमावेशकता आणि बंधरहित गुणग्रहणशीलता, हेंच आत्म्याचें जीवन** (life of the spirit) **आहे.** आध्यात्मिक जीवन विधायक स्वतंत्रते (positive freedom) चें जीवन आहे. आत्म्याचें वस्तुजगतांत प्रविष्ट होणें व तसेंच आपला अधिकार कायम ठेवून वस्तुजगद्द्वारां प्रकट होणें, हीच आध्यात्मिक स्वतंत्रता होय.

आध्यात्मिकतेमध्ये सर्व गोष्टींचा समावेश होतो.

जोंपर्यंत या पार्थिव सत्तेतील वस्तु आणि घटना सर्वग्राही (comprehensive) आध्यात्मिकतेच्या विशाल भरतीच्या उत्तुंग वीचिप्रवाहांत सापडल्या नाहीत, तोंवरच त्या परक्या (foreign) भासतात. परंतु, एकदा त्यांना जीवनाच्या योजनेंतील स्वतःचें स्थान मिळालें, कीं प्रत्येक वस्तु सृष्टीच्या तालस्वरमय संगीतांत तन्मयतेने भाग घेत असल्याचें, आढळून येतें. असें झालें, म्हणजे आध्यात्मिकतेच्या अभिव्यक्तीला दुसरें कोणतें तरी निराळें क्षेत्र आवश्यक भासत नाही. त्याचप्रमाणे, लोकांच्या शारीरिक, बौद्धिक आणि भावनाविषयक साधारण गरजांची आस्था ठेवल्याने आध्यात्मिकतेची अधोगतीहि होत नाही. **आत्म्याचें जीवन एकतामय व स्वयंपूर्ण जीवन आहे. विशिष्ट आणि संबंधरहित क्षेत्रांत सीमित राहणें त्याला सम्मत नाही.**

आत्म्याचें जीवन हें आध्यात्मिक ज्ञान आणि दैवी प्रेम, यांची अविरत अभिव्यक्ति आहे. ईश्वराची हीं दोनहि अंगें सर्वव्यापकतें (universality) त अनिरुद्ध आणि समावेशकते (inclusive) मध्ये अनिवार्य आहेत. तेव्हा, दिव्य प्रेम व्यक्त होण्याकरिता, एखाद्या विशिष्ट प्रसंगाचीच अपेक्षा नसते. तें आपल्या अभिव्यक्तीसाठी कांही खास क्षणांची वाट पाहत नाही, किंवा विशेष रूपाने उदात्त अशा गंभीर परिस्थितीच्या शोधांत राहत नाही. एखाद्या अविवेकी माणसाला महत्त्वहीन आणि उपेक्षणीय वाटून त्याच्याकडून कदाचित दुर्लक्षिल्या जातील, अशा घटनांत व परिस्थितींमध्येहि, दैवी प्रेमाला स्वतःच्या अभिव्यक्तीचें क्षेत्र सापडतें. साधारण मनुष्याचें प्रेम योग्य परिस्थिति असेल, तरच व्यक्त केलें जातें; तें प्रेम कांही खास परिस्थितीला प्रत्युत्तर म्हणून केलें जातें आणि त्या परिस्थितीशीं सापेक्ष असतें. परंतु, अंतरांतून प्रस्फुटित होणाऱ्या ईश्वरी प्रेमाला बाह्य परिस्थितीची उत्तेजना लागत नाही. म्हणून, ज्यांनी केवळ मानवी प्रीतीच चाखली आहे, त्यांना अग्राह्य वाटणाऱ्या परिस्थितींत देखील, दैवी प्रेम निःसृत होऊं शकतें. सद्गुरूच्या निकटवर्तीयांपैकी जर कोणांत आनंद, सौंदर्य, चांगुलपणा इत्यादींचा अभाव दिसला, तर आपल्या दिव्य प्रीतीचा त्यांच्यावर वर्षाव करण्याकरता आणि आध्यात्मिक अगर भौतिक दारिद्र्यांतून त्यांना मुक्त करण्याकरता, सद्गुरूला ही सुसंधीच सापडते. म्हणून, भौतिक जगतांतील परिस्थितीला त्याचें दैनंदिन प्रत्युत्तर म्हणजेच त्याच्या रचनात्मक आणि विधायक व गतिशील ईश्वरत्वा-

ईश्वरी प्रेम हें परिस्थितीमध्ये प्रचंड व रचनात्मक फरक घडवून आणतें.

( dynamic and creative divinity ) ची अभिव्यक्ति होय. ती सर्व जगतावर आपला प्रसार करते; आणि ज्यांना ती स्पर्श करते त्या सर्वांना ती आध्यात्मिक बनविते.

आध्यात्मिक ज्ञान आत्म्याच्या जीवनाचा दुसरा पूरक भाग आहे; आणि संसारी दृष्टीचें तारतम्य ( wordly wisdom ) आणि आध्यात्मिक समजूतदारपणा (spiritual understanding), यांत फरक आहे. संसारी दृष्टीचें तारतम्य, म्हणजे डोळे बंद करून भौतिक जगतांतील आचारविधींचा स्वीकार करणें होय. परंतु, आध्यात्मिक ज्ञान हें जगरूढींचा असा डोळे मिटून स्वीकार करूं शकत नाही. भौतिक जगताचे आचारविधि अगर रूढी, म्हणजे बहुधा संसारासक्त लोकांच्या कार्यांचा सामुदायिक परिणाम असतात. संसारासक्त लोक एखादी गोष्ट बरोबर आहे म्हणून ठरवितात; आणि त्याच प्रवृत्तीच्या इतर लोकांना ती बरोबर आहे, असें वाटायला लावतात. तेव्हां, अशा अंधानुकरणानें केलेली कृति शहाणपणाची असतेच असें नाही. गुणदोषविवेचनशून्य अनुकरण, हें आत्म्याचें जीवन होऊं शकत नाही; तर आत्मजीवनाचें अधिष्ठान मूल्यांच्या खऱ्या ज्ञानांत असलें पाहिजे.

कर्मयोगी हा स्वार्थजनित अस्ताव्यस्त क्रियाशीलता टाळतो; व त्याचप्रमाणे, नितान्त निरिच्छाजनित दृश्यमान क्रियाशून्यताहि टाळतो. तो जिच्यांत स्वार्थपर हेतूंची थोडीहि भेसळ नाही, अशा निःस्वार्थ सेवेचें जीवन घालवितो; आणि जीवनाच्या सर्व कलांमध्ये ( phases ) तो ईश्वरत्वाची अभिव्यक्ति करतो.

कर्मयोगी हा अस्ताव्यस्त क्रिया व त्याचप्रमाणें क्रियाशून्यता दूर ठेवतो.

सेवा जरी निःस्वार्थी असली, तरी ती आध्यात्मिक ज्ञानानेंच निर्दिष्ट झाली पाहिजे. अज्ञानमूलक अबुद्ध सेवेपासून बहुधा घोटाळा, गुंतागुंत व जटिलता ( complication ) उत्पन्न होते. सामाजिक संस्थांमध्ये, पुष्कळसे चांगले लोक सार्वजनिक कार्यांत अविरत गुंतलेले असतात. परंतु त्या कार्यांचा शेवट पुढे काय होतो ! त्या कार्याने एक प्रश्न सुटला, तरी त्यामुळेच अदृष्टपूर्व आणि ज्यांवर आपली सत्ता चालत नाही, असे दहा समस्यारूप

अबुद्ध सेवेमुळे घोटाळा आणि जटिलता उत्पन्न होते.

उपपरिणाम उद्भवतात. सामान्य जगांतील माणसें वाईटाचा प्रतिकार त्याला विरोध करून करतात; परंतु हें करतांना दुसऱ्या एखाद्या वाईटाचे ते जन्मदाते बनतात, हें त्यांना समजत नाही. समजा, एका माणसाच्या अंगावर त्पुष्कळशा मुंग्या चढल्या आहेत, आणि त्यांतली एक त्याला चावली, तर साहजिकच तिला मारून तिचें शासन त्याला करावेसें वाटेल. परंतु असें करतांना, जर तो त्या मुंगीला आपल्या हाताने मारूं लागला, तर ज्या त्याला चावल्या नाहीत, अतएव निरपराधी आहेत, अशाहि कित्येक मुंग्यांना तो मारील. म्हणून, एका मुंगीविरुद्ध न्याय मिळवितांना, दुसऱ्या कित्येक मुंग्यांविरुद्ध अन्याय करण्याच्या क्रियेंत तो ओढला जातो. निःस्वार्थ सेवेच्या कलेमध्ये प्रवीण न बनतां, जो—मनाच्या उदारतेने कां होईना—सामाजिक कार्याच्या आवर्तात सापडतो, त्याची उपरिनिर्दिष्ट उदाहरणांतील मनुष्याप्रमाणेच स्थिति होते. तो कितीहि निःस्वार्थी असला, तरी त्याच्या क्रियेपासून सुसंवादिता किंवा सुसंगत व्यवस्था (harmony) उत्पन्न होण्याऐवजी घोटाळा, अस्ताव्यस्तता आणि गुंतागुंतच उत्पन्न होते. कारण, गुंतागुंत न करतां, खरी परिणामकारक सेवा कशी करावी, हें तो शिकलेला नसतो. कोणतीहि क्रिया विश्वाला केवळ वरदानच ठरण्याकरता, तिचा उद्भव जीवनाच्या अत्युत्कृष्ट ज्ञानांतूनच झाला पाहिजे. जे माझ्या सान्निध्यांत येतात, त्यांनी जीवनाचें खरें ज्ञान करून घेतलें पाहिजे. गुंतागुंत उत्पन्न करणार नाही, अशा प्रकारची सेवा करण्याची सवय त्यांनी स्वतःस लावली पाहिजे.

जेव्हा निःस्वार्थ सेवा केली जाते, तेव्हा ती कोणत्याहि परिणामा-

ंच्या अगर बक्षिसाच्या आशेने अगर बुद्धीने केलेली नसली, तरी त्या सेवेचें फल कर्मयोग्याला मिळतेंच. त्याने अबुद्धपणे ( unintelligently ) जरी एखादें निःस्वार्थ सेवाकृत्य केलें, तर त्यापासून देखील, त्याला थोडाफार आध्यात्मिक फायदा होतोच.

निःस्वार्थ सेवा ज्ञानावरच अधिष्ठित असली पाहिजे.

परंतु, त्याच्या अबुद्ध क्रियेपासून इतरांना होणारें निष्कारण दुःख त्याला टाळतां येत नाही. तथापि जेव्हा त्याच्या स्वार्थरहित सेवेला ज्ञानाची बैठक असते, तेव्हा त्याला स्वतःला तर त्यापासून आध्यात्मिक फायदा होतोच, परंतु त्या क्रियेशीं ज्या ज्या लोकांचा संबंध आला असेल, त्या सर्वांचें तो भौतिक आणि आध्यात्मिक कल्याणहि करतो. म्हणून, स्वार्थरहित सेवाहि, तत्संबंधी सर्व लोकांना निर्मळ वरदान होण्याकरिता, ज्ञानावरच अधिष्ठित असली पाहिजे.

कित्येक वेळां, सामान्य लोकांना जी सेवा म्हणून वाटते, ती विशेष परिस्थितींत, सद्गुरूच्या दृष्टीने हानिप्रद ठरण्याचा संभव असतो. सद्गुरूला परिस्थितीचें अचूक ज्ञान असतें; आणि त्याला तिच्या आध्यात्मिक गरजांचेंहि गंभीर आकलन झालेलें असतें.

वरपांगी व दिखाऊ सेवा कधी कधी वस्तुतः हानिकारकच असूं शकते.

सामान्यतः, भुकेल्यांना अन्न देणें ही अपरिहार्य आणि आवश्यक सेवा होत असली, तरी कांही विशिष्ट परिस्थितींत त्याच्या कल्याणाच्या दृष्टीनेच, भुकेलेल्याला अन्न न देणें हेंच योग्य ठरेल. दान म्हणून अन्नासाठी भीक मागण्याची प्रवृत्ति अनावश्यक आणि अस्पृहणीय संस्कार उत्पन्न करते; आणि अशा प्रवृत्तीने जो मनुष्य

तुमच्याकडे येतो, त्याला भीक देऊन त्याचें तें संस्कारांचें ओझें वाढवावयाला तुम्ही मदत करता. म्हणून, जरी वरवरच्या दृष्टीला तुम्ही त्याचें चांगलें करीत आहां, असें वाटलें, तरी वास्तविक पाहतां, तुम्ही त्याला अधिकच बंधनांत टाकीत असतां, आणि जेव्हा तुम्ही समजूतदारपणानें अगर ज्ञानानें नव्हे, तर केवळ संवयीने, आपली दानशीलता दाखवितां, तेव्हा त्या दान मागणाऱ्याला आपल्या उपकाराच्या ओझ्याखाली चिरडून टाकण्याची तुमची इच्छा नसली, तरी तुमच्या क्रियेचा वास्तविक परिणाम तसाच होईल.

वरील अन्नदानाच्या उदाहरणास जें लागू आहे, तेंच इतर अनेक स्थावर आणि जंगम वस्तूंच्या दानासंबंधी म्हणतां येईल. **संकुचित दृष्टीने पाहतां, एखादी गोष्ट दुसऱ्याची सेवाच वाटली, तरी उच्चतर दृष्टीने तीच गोष्ट त्याच्याकरिता खात्रीपूर्वक हानिकारक ठरूं शकेल.** ज्याप्रमाणे निरोगी मनुष्याला जें अन्न पौष्टिक असेल, तेंच रोगी माणसाच्या दृष्टीने विषान्न ठरण्याचा संभव आहे. तद्वत् लोकांना जें सामान्यतः चांगलें असतें, तें एखाद्या विशिष्ट मनुष्याच्या बाबतींत वाईट ठरण्याचा संभव असतो. म्हणून, सुबुद्ध (intelligent) दानासाठी, परिस्थितीच्या आध्यात्मिक गरजांचें चांगलें ज्ञान हवें.

अविवेकशून्य सेवेपासूनहि आध्यात्मिक लाभ होतोच.

सारांश, लोकांनी सेवा करण्याच्या बाबतींत अधिक सावधान आणि विवेकपूर्ण व्हावें. परंतु, त्यांनी निःस्वार्थी सेवा करण्यांत निरुत्साही होऊं नये. परिस्थितीच्या आध्यात्मिक गरजा सद्गुरूलाच अचूक आकलन करतां येतात, हें खरें. परंतु, ज्यांना हें

आकलनसामर्थ्य स्वतःमध्ये असल्याची खात्री नाही, त्यांनी जर आपल्याकडून न कळत कुसेवा (disservice) घडेल या भीतीने, आपली निःस्वार्थ सेवा करण्याची स्वयंस्फूर्त प्रेरणा दडपून टाकली, तर ती परिस्थिति कीव करण्याजोगी होईल. हे आधींच दाखविल्या गेलें आहे कीं, निःस्वार्थी सेवा जरी अबुद्धपणे (unintelligently) घडली, तरी तिचादेखील आध्यात्मिक लाभ होतोच.

सेवा पूर्ण अनासक्तीने केली पाहिजे.

आध्यात्मिक दृष्टीने पाहतां, परिस्थितीच्या आध्यात्मिक गरजांचें योग्य आकलन करण्यामध्ये चूक होण्यापेक्षा, सेवेमध्ये चुकीचे हेतू (false motives) येण्याचाच धोका अधिक असतो. जर तुम्ही दुसऱ्यावर उपकार करण्याकरिता सेवा केली असेल, आणि ती केल्याबद्दल तुम्हाला अभिमान वाटत असेल, तर तुम्ही केवळ तुमची सेवा ग्रहण करणाराचेंच आध्यात्मिक नुकसान करता, असें नसून स्वतःचीहि हानी करून घेता. सेवा करतांना, तिच्यामध्ये रममाण होऊन तुम्हाला त्यांत अभिमान वाटत असेल, तर तुमच्या कार्याबद्दल तुम्हाला आसक्ति उत्पन्न होऊन, तुम्ही स्वतःला बंधनांतच टाकीत आहांत. एखादा मनुष्य ज्याप्रमाणे स्वतःस लोखंडाच्या साखळीने बांधून घेऊं शकतो व सुवर्णशृंखलेनेहि बांधून घेऊं शकतो, त्याचप्रमाणे तो आपल्या दुष्कृत्यांवरील आसक्तीने व सत्कृत्याबद्दलच्याहि आसक्तीने स्वतःस बांधून टाकूं शकतो. म्हणून, कर्मबंधापासून मुक्त राहण्याचा उपाय म्हणजे सेवेमध्ये अनासक्त राहाणें, हाच आहे. सेवा करतांना ‘ मी

कोणावर तरी उपकार करीत आहे, ' हा विचार प्रथम मनांत येतो. परंतु ' सेवेची ही संधि मिळाल्याने माझ्यावरच उपकार होत आहे ', या प्रतिविचारानें प्रथमचा विचार नाहीसा करतां येतो. या प्रतिविचाराने अनासक्तीची प्रवृत्ति वाढविणें सोपें होऊन, सत्क्रियांच्यामुळे उत्पन्न होणाऱ्या बंधनापासून मुक्तता होते. तेव्हा, व्यापक ज्ञानाने प्रकाशित झालेली सेवा निःस्वार्थी असते, एवढेंच नव्हे तर ती सेवापात्राच्या आध्यात्मिक गरजांनुसार असते;व ती सेवा पूर्णपणें अनासक्त राहून केली जाते. अशा सेवेनेच साधक आपल्या ध्येयाकडे द्रुतगतीने अग्रसर होतो.

सत्यानुभूतीनंतरच खऱ्या सेवेस प्रारंभ होतो.

सेवेचें मोल ती किती कल्याणप्रद होते, यावर अवलंबून असतें. दुसऱ्याच्या शारीरिक गरजा भागविणें ही सेवा आहे; दुसऱ्यांची बुद्धि विकसित करणें ही सेवा आहे; लोकांची हृदयाची भूक भागविणें ही सेवा आहे; व समाजाची सौंदर्यपिपासा तृप्त करणें ही सेवा आहे. परंतु, हे सारे सेवेचे प्रकार सारख्याच निःस्वार्थीपणाने केले असले, तरी एकाच मोलाचे होत नाहीत. सेवेच्या द्वारां कोणत्या प्रकारचें हित उद्दिष्ट राहील, हें मनुष्याच्या दृष्टिकोणावर अवलंबून राहील; आणि ज्याला अंतिम आणि परम कल्याणाविषयीं निर्मल दृष्टी प्राप्त झाली आहे, तोच महत्त्वाची आणि अमोल सेवा करूं शकेल. ज्यांना तें अंतिम सत्य सापडलें नाही, त्यांना या प्रकारची उच्चतम सेवा करणें अशक्य आहे. त्यांच्या सेवेला आध्यात्मिक ज्ञानाच्या परासीमेस पोहोंचलेल्या लोकांच्या सेवेइतकें

मोल येणें शक्य नाही. एका अर्थाने, खऱ्या सेवेला सत्यानुभूतीनंतरच प्रारंभ होतो.

परंतु साधकांच्या आणि इतर सज्जनांच्या अंतःकरणांतील सेवा-वृत्तीचा निर्मितिक्षम विनिर्देश करून त्या वृत्तीला सद्गुरूच्या कार्यानुकूल बनविली, तर तिचा आध्यात्मिक उद्दिष्टांकारिता उपयोग होऊं शकतो.

सद्गुरूंच्या सेवेमुळे प्रबुद्धावस्था सुलभ होते.

सद्गुरु आपल्या अनन्त चेतनेच्या निश्चयात्मक स्थितींत अखिल विश्वाची सेवा करतो; आणि जे सद्गुरूची सेवा करतात, तेहि या जागतिक कार्यांत त्यास मदत करतात. त्यांच्या सेवेला सद्गुरूंचें ज्ञान आणि अन्तःप्रज्ञा यांची जोड असते. सद्गुरूंच्या कार्यांत स्वखुषीने भाग घेण्याने सेवेचें मोल वाढतें, एवढेंच नव्हे तर आध्यात्मिक विकसनाची संधीहि वाढते. श्रेष्ठत्वाच्या दृष्टीने पाहातां, सद्गुरूच्या आज्ञेने जी सेवा केली जाते, तिचें मोल फक्त प्रत्यक्ष सद्गुरूने केलेल्या सेवेलाच दुय्यम ठरतें.

बहुतेक लोकांची सेवेची कल्पना जगताच्या कर्मक्षेत्रांतील कोणत्या तरी निश्चित स्वरूपाच्या इष्ट फलप्राप्तीच्या कल्पनेशीं अविभाज्य रीतीने गुंतलेली असते. म्हणून, केवळ मानवी दुःखांचें

सेवा फलासक्तीपासून अलिप्त असली पाहिजे.

निवारण करणें, निरक्षरता दूर करणें, किंवा वैयक्तिक अगर सामाजिक जीवनास खुरटविणाऱ्या अडचणी आणि गैरसोयी दूर करणें म्हणजेच सेवा होय, असें त्यांना वाटतें. साधक, राजकारणी लोक, समाजसुधारक आणि इतर सज्जन, यांच्या सेवेचा

ह्याच प्रकार असतो. या सेवेला आध्यात्मिक महत्त्व बरेंच असलें, तरी अशी सेवा स्वभावतःच अंतरहित असते. या क्षेत्रांत, एखाद्या मनुष्यानें कितीहि मिळविलें, तरी आणखी मिळवायचें, असें कितीतरी रहातेंच. म्हणून सेवावृत्ति जोंवर फलप्राप्तीच्या कल्पनेशीं संबद्ध आहे, तोंवर त्या सेवावृत्तीमध्यें अपूर्णत्वाची जाणीवहि राहाणारच. कधींहि न संपणाऱ्या परिणामांच्या मागे लागून, अनंततेची अनुभूति कधीच प्राप्त होणार नाही. सेवेच्या द्वारां कांहीं निश्चित फळ मिळविण्याची इच्छा करणारांच्या अंतःकरणांवर त्याचें एक नित्याचें ओझें होऊन बसतें.

उलटपक्षीं, अंतिम सत्याच्या ज्ञानानंतर होणारी सेवा ही ' मी ' ( self ) च्या खऱ्या स्वरूपाच्या अध्यात्म-ज्ञानाची स्वयंस्फूर्त अभिव्यक्ति आहे. त्या सेवेमुळेहि जगतांत अत्यंत महत्त्वाचे परिणाम घडून येतात. परंतु त्या सेवेमध्ये परिणामांच्या आशेची गुंतागुंत नसते.

ईश्वरानुभूती नंतरची सेवा आणि ईश्वरानुभूतीच्या पूर्वीची सेवा यात फार अंतर आहे.

ज्याप्रमाणे सूर्य प्रकाशतो, तो आपला स्वभाव म्हणून प्रकाशतो, त्याला त्यांतून कांहीं मिळवायचें असतें, म्हणून तो प्रकाशतो असें नव्हे, त्याचप्रमाणें, ईश्वरप्राप्त मनुष्य आत्मसमर्पणाचें जीवन चालवितो, ते फलाशेने नव्हे, तर अंतिम सत्यांत गर्भित असलेल्या दिव्य जीवनाचा तो मूळ स्वभावच आहे. त्याचें जीवन म्हणजे कांहीं तरी मिळविण्याच्या आशेने केलेली बाह्य धडपड नव्हे. फलप्राप्तीनें समृद्ध आणि संपन्न होण्याची धडपड तो करीत नाहीं; कारण अनन्ततेच्या अनुभूतीने त्याच्यांत परिपूर्णता आधींच अधि-

ष्ठित झालेली असते. त्याच्या सत्ताविस्तारा ( being ) ची अजस्र भरती त्याच्याच इतर जीवरूपांना हितकर होते; आणि तो इतरांची भौतिक आणि आध्यात्मिक स्वरूपाची खरी उन्नति करतो. परंतु त्याचा स्वतःचा आनंद त्याच्या अंतरंगातील ईश्वरत्वावर अधिष्ठित असतो; व म्हणून, वस्तुतः त्याचीच रूपें असलेल्या इतर लोकांच्या अपूर्णत्वामुळे अगर दुःखामुळे त्याचा तो आनंद कमी होत नाही, किंवा त्याची चेतना कांहीतरी अप्राप्त वस्तूंच्या कल्पनेने व्यथित होत नाही. अंतिम सत्यानुभूतीपूर्वीची सेवा आणि त्या नंतरची सेवा, यांत आकाशपाताळाचें अंतर आहे. सद्गुरूचें जिवन हें सेवेचें जीवन आहे; त्याचींच दुसरी स्वरूपें असलेल्या इतर जीवांकरिता, सद्गुरूचें चारित्र हें नित्य-वरदान आहे. परंतु, सत्यानुभूति झालेल्या मनुष्याच्या जीवनाची स्वभाव बनलेली अशा प्रकारची सेवा सत्यानुभूति नसलेल्या लोकांच्या जीवनांतील सेवेपेक्षा अवश्यमेव निराळी आणि श्रेष्ठतम असते.

## ५ : : : सृष्टीचा प्रारंभ व अंत

जोंपर्यंत मानवी मनास अंतिम सद्वस्तूचा प्रत्यक्ष व यथार्थ अनुभव येत नाही, तोंपर्यंत सृष्टीचा आदि व अंत स्पष्ट करण्याचा त्याचा प्रत्येक प्रयत्न निष्फल होतो. त्याच्याकरिता, भूतकाल गूढ रहस्याने वेष्टित राहून, भविष्यकाल हा मोहरबंद पुस्तकासारखा पूर्णपणें अगम्य असतो. मायामोहास विवश झालेलें मानवी मन विश्वाच्या पुरातन व भावी स्थितीबद्दल फार तर तर्क किंवा काल्पनिक अंदाज बांधूं शकतें. परंतु त्यास या सर्व बाबतींतील अज्ञानहि समाधानकारक वाटत नाहीः व त्यांचें यथार्थ व अंतिम ज्ञान मिळविण्यासहि तें असमर्थ ठरतें. 'कोठून? व कोठे?' हे दोन चिरस्थायी व तीक्ष्ण प्रश्न मानवी मनांत दिव्य (divine) व्यग्रता निर्माण करतात.

कोठून? व कोठे?

सृष्टीचें आदिकारण शोधीत असतां, मानवी मनास असीम पुच्छगति (infinite regress) अग्राह्य होते; व त्याचप्रमाणे

त्याला ध्येयशून्य व अंतरहित परिवर्तनहि अग्राह्य असतें. उत्क्रान्तीला

आदि व अंत.

मूलकारण नसेल, तर ती अज्ञेय होते; व उत्क्रांतीला समाप्ति नसेल, तर ती पूर्णपणें दिशारहित व अर्थशून्य होते. 'कोठून? व कोठे?' या प्रश्नांतच सृष्टीचा आदि व अंत गृहीत धरलेला आहे. **उत्क्रांतीचा प्रारंभ हा कालाचाहि प्रारंभ आहे; व उत्क्रांतीचा शेवट हा कालाचाहि शेवट आहे.** उत्क्रान्तीला आदि व अंत आहे; कारण कालाला आदि व अंत आहे.

या बदलणाऱ्या जगाच्या आदि व अंतामध्ये बरीचशी युगचक्रें (cycles) आहेत; व त्या सर्व युगचक्रांतून सृष्टीच्या उत्क्रांतीचें सातत्य (continuity) कायम राहतें. उत्क्रांतीच्या खऱ्या समा-

महाप्रलय

प्तीला महाप्रलय म्हणतात; व त्यावेळीं, जगाला प्रारंभीची नसणेपणाची शून्यस्थिति प्राप्त होते. महाप्रलयाची मनुष्याच्या गाढ निद्रेशीं तुलना करतां येईल. अनुभवास येणारें नानाविध विश्व जसें गाढ निद्रेमध्ये पूर्णपणे अंतर्धान पावतें, त्याचप्रमाणे मायानिर्मित सृष्टींतील अखिल वस्तुजात महाप्रलयाच्या वेळीं नाहीसें होऊन, शून्यस्वरूप बनतें—जणु काय तें विश्व कधीच उत्पन्न झालें नव्हतें !

परंतु वास्तविक पाहातां, उत्क्रांतीच्या अवस्थेंत सुद्धा, हें अखिल

सत्य कालातीत व केवळ आहे

विश्व केवळ कल्पनेचा आभासच आहे. वस्तुतः, सद्वस्तु ही एकच अविभाज्य व अनंत असून तिला आदि किंवा अंत नाही. ह्या कालातीत सत्याच्या दृष्टीने, सर्व कालप्रवाह हा केवळ

कल्पना किंवा मनोभास असून, पूर्वी होऊन गेलेल्या लक्षावधि वर्षांना व पुढे येणाऱ्या लक्षावधि वर्षांना एका क्षणाचेंहि वास्तविक महत्त्व नाही—जणु काय या सर्वांना कधी अस्तित्वच नव्हतें !

तेव्हा, नानाविध व विकासशील विश्व हा सद्वस्तूंतून निर्माण होणारा खरा परिणाम नाही. तो जर सद्वस्तूचा खरा परिणाम मानला, तर सद्वस्तु एक तर सापेक्ष वस्तु होईल, किंवा मिश्र वस्तु होईल. परंतु, सद्वस्तु या दोहोंपैकी एकहि नाही. अंतिम सत्य एकमेव व केवल आहे.

सद्वस्तु व शून्य

एकमेव सद्वस्तूमध्ये सर्व अस्तित्वाचा समावेश होतो. ती सद्वस्तूच सर्व कांही आहे, पण तिला शून्य ( nothing ) रूपी छाया आहे. सर्वसमावेशक ( all-inclusive ) अस्तित्वाच्या बाहेर दुसरी कोणतीहि खरी वस्तु राहूं शकत नाही. परंतु, जेव्हा तुम्ही अस्तित्वाच्या कल्पनेचें विश्लेषण करतां, तेव्हा त्यांतून, अर्थबोधाकरिता, नसणे-पणाची किंवा शून्याची कल्पना उत्पन्न होते. 'असत्' किंवा शून्याच्या कल्पनेमुळे तुम्हाला 'सत्' ची कल्पना स्पष्टपणे विशद करण्यास मदत होते. याप्रमाणें, 'सत्' चा किंवा अस्तित्वाचा 'असत्' किंवा शून्य हा परिपूरक भाग आहे. परंतु शून्याला स्वतःचेंच निराळें व स्वतंत्र अस्तित्व मानतां येत नाही. स्वयमेव ( in itself ) तें कांहीच नाही; व तें स्वयमेव कशाचेंहि कारण होऊं शकत नाही. हें नानाविध व परि-वर्तनशील विश्व केवळ शून्यांतून उत्पन्न होणें शक्य नाही; व तसेंच

तें एकमेव सत्यांतूनहि उत्पन्न होणें शक्य नाही, हेंहि स्पष्ट झालेच आहे. तेव्हा या नानाविध व विकासशील विश्वाच्या उत्पत्तीचें कारण या दोहोंच्या संयोगांत आहे.

सद्वस्तु व शून्य, यांच्या संयोगांतून या नानाविध व विकासशील विश्वाचा उदय होतो. जेव्हा 'असत्' किंवा शून्य एकमेव सद्वस्तूच्या पार्श्वभूमीवर पाहिलें जातें, तेव्हा विश्वाची उत्पत्ति होते.

सद्वस्तु व विश्व.

परंतु, विश्व कांही अंशी सद्वस्तूंतून उत्पन्न होतें, किंवा त्यांत थोडा सत्यांश आहे, असा याचा अर्थ नाही. विश्वाचें अस्तित्व असल्याचा केवळ भास मात्र होतो; व या भासमान अस्तित्वाच्या मुळाशीं शून्याच्या पाठीमागे असणारी एकमेव सद्वस्तु आहे. एकमेव सद्वस्तूंत जेव्हा शून्याची भर पडते, तेव्हा हे नानाविध व विकासशील विश्व उत्पन्न होतें.

परंतु त्यामुळे, एकमेव, अनंत व केवल सत्यामध्ये कोणताहि बदल होत नाही. तें केवल सत्य न्यूनाधिक होऊं शकत नाही. तें होतें तेंच स्वयंपूर्ण व स्वयंभू असें कायम राहून, 'असत्' मधून उत्पन्न होणाऱ्या सृष्टीशीं त्याचा कांहीहि संबंध राहत नाही; व तें सदैव निर्लेप राहतें. 'असत्'चें गणितशास्त्रांतील शून्याशीं साम्य आहे. त्याला स्वतःची कांहीहि किंमत नाही. पण त्याचा दुसऱ्या अंकाशीं योग झाला, म्हणजे त्यांतून महत्त्वपूर्ण अनेकत्ववाचक संख्या उत्पन्न होते. त्याचप्रमाणे, जेव्हा 'असत्' (nothing) चा 'सत्'शीं योग होतो, तेव्हा हें नानाविध व विकासशील विश्व उत्पन्न होतें.

सर्व उत्क्रांति कल्पनेच्या साम्राज्यांतच होत असते. जेव्हा सद्वस्तूंत

मराठी ... क्र. ८०९९

कल्पित चंचलता उत्पन्न होते, तेव्हां जाणिवेचीं अलग अलग केंद्रें असणारें हें अनेकविध जग निर्माण होतें; व त्यामुळे 'अहम्' व 'अनहम्', किंवा 'मी' व परिस्थिति, हा जीवनाचा मूलभूत भेद उत्पन्न होतो. परंतु, हा मर्यादित 'मी' अविभाज्य संपूर्णतेचा केवळ कल्पित अंश असून स्वतः अपूर्ण व मिथ्या असल्यामुळे, जाणीव त्याच्याशीं नेहमीकरिता एकत्व पावूं शकत नाही व अस्वस्थ होते; व 'अनहम्' किंवा अनात्म वस्तूंशीं (not-self) तादात्म्यतेचें नातें जोडण्याकरिता, जाणिवेंत निरंतर व्याकुलता सुरूं होते. परिस्थितीच्या ज्या भागाशीं आत्मीयता निर्माण करण्यास जाणिवेला यश मिळतें, तो भाग 'माझें' या संबंधाने 'मी' शीं संबद्ध होतो; व 'अनहम्' च्या ज्या भागाशीं आत्मीयता उत्पन्न करण्याचा जाणिवेचा प्रयत्न विफल होतो, तो भाग 'मी' स मर्यादित करून त्याला विरोध करणारी अपरिहार्य परिस्थिति बनतो.

'मी' व त्याची परिस्थिति, ह्यामधील कल्पित भेदामुळे विकासशील द्वैताचा उदय होतो.

अशा रीतीने, बंधनांत टाकणाऱ्या द्वैताचा अंत न करतां, जाणीव त्या द्वैताचें फक्त रूपांतर करते. जोंपर्यंत जाणिवेवर दूषित कल्पनेचा प्रभाव असतो, तोंपर्यंत तिला द्वैतातीत होण्यांत यश मिळत नाही; व 'अनहम्' किंवा परिस्थितीस आत्मसात् करण्याचे जे जे नानाविध प्रयत्न जाणीव करते, त्यांतून मूलद्वैताच्या जागीं त्याचीच नवीन असंख्य रूपें निर्माण होतात. परिस्थितीच्या कांही भागांचा स्वीकार किंवा तिरस्कार करणें क्रमशः इच्छा व घृणा या रूपांनी व्यक्त होतो; व या रीतीनें, सुख व दुःख,

द्वंद्वांदोलन

चांगलें व वाईट, या द्वंद्वांची उत्पत्ति होते. परंतु, इच्छा किंवा घृणा यांनी द्वैताचा अंत न होतां, जाणीव द्वंद्वांच्या दोन परस्पर-विरुद्ध टोकांमध्ये निरंतर व पर्यायाने झोके खात राहते. व्यक्ति-जीवनाच्या सर्व इतिहासामध्यें, हें द्वंद्वांमधील जाणिवेचें आंदोलन सतत चालूंच असतें.

संस्कारजन्य नियति

व्यक्तिजीवनाचा विकास अनेक जन्मांत गोळा झालेल्या संस्कारांनी निश्चित होत असतो; व हा सर्व कल्पनासृष्टींतील खेळ असला, तरी त्यांतील संस्कारजन्य नियति (determinism) यंत्रसम व अपवादरहित असते. क्षणकाल टिकणाऱ्या कृती व अनुभवहि मनोदेहावर ठसे उमटवितात. ह्या ठशांमुळे मनोदेहांत वास्तविक बदल होतो; व व्यक्तीच्या अनेक जन्मांत मनोदेह एकच व तोच राहत असल्याने, व्यक्तीचें संचित संस्कारहि अनेक जन्मांत टिकून राहतात. हे संचित संस्कार जेव्हा मनोदेहांत केवळ सुप्त स्थितींत न राहतां, व्यक्त होऊं लागतात, तेव्हा ते वासनांच्या रूपाने मानसिक अनुभवांत येतात. संस्कारांच्या दोन अवस्था आहेत. एक निष्क्रिय व सुप्त अवस्था, व दुसरी सक्रिय अभिव्यक्तीची अवस्था. मर्यादित ‘ मी ’ चे सर्व अनुभव व क्रिया गोळा झालेल्या व उदयास येत असलेल्या (active) संस्कारांनी निश्चित होतात. सिनेमांतील पडद्यावर एक लहानशी क्रिया दर्शविण्याकरिता जशी कित्येक फूट फिल्म फिरावी लागते, त्याचप्रमाणे मर्यादित ‘ मी ’ ची साधी एक क्रिया निश्चित करण्याकरिता, अनेक संस्कार खर्च होतात. याप्रमाणे, अनुभवांत व्यक्त व तृप्त झाल्यामुळे, ह्या संस्कारांचा व्यय होतो.

कच्चे संस्कार मनोदेहांतच खर्च होऊन जातात; त्याहून अधिक बलवान संस्कार सूक्ष्मदेहांत वासनारूपाने किंवा काल्पनिक अनुभवाच्या (imaginative experience) द्वारां खर्च होतात; व प्रबलतम संस्कार स्थूल देहाच्या शारीरिक क्रियेच्या द्वारां खर्च होऊन जातात.

संस्कारांचा असा सतत व्यय चालूंच असला, तरी संस्कारांचा लोप होत नाहीं; कारण, **नवीन संस्कार केवळ नवीन क्रियांनीच उत्पन्न होतात, असें नसून, ते खर्च होऊन जाण्याच्या प्रक्रियेंतहि अवश्यमेव उत्पन्न होतात.** याप्रमाणे, संस्कारांचा ढीग सारखा वाढतच जातो; व व्यक्ति तें ओझें फेकून देण्यास असमर्थ होते.

विशिष्ट क्रिया व संस्कार यांनी ठेवलेल्या संस्काररूपी ठशांमुळें, मन तशाच प्रकारच्या क्रियांकरिता व अनुभवांकरिता ग्रहणशील (susceptible) होतें. पण एका विशिष्ट मर्यादेनंतर स्वाभाविक प्रतिक्रिया होऊन, या ग्रहणशीलतेचा निरोध व विरोध होतो; व प्रवृत्तीची दिशा अगदी उलटून, विरुद्ध संस्कारांना कार्यक्षम होण्यास वाव मिळतो.

परस्परविरोधी द्वंद्वांच्या द्वारां संतुलन.

कित्येक वेळां, हे द्वंद्वांचे परस्परविरोधी भाग एकाच कल्पनाशृंखलेमध्ये गोवल्या जातात. उदाहरणार्थ, एखाद्या मनुष्याला त्याच्या जीवनाच्या पूर्वार्धांत, ऐहिक वैभवाचा—कनक, कामिनी व कीर्ति इत्यादि सर्व प्रिय वस्तूंनी संपन्न असलेला सुप्रसिद्ध लेखक

असल्याचा–अनुभव येतो; व त्याच जन्माच्या उत्तरार्धांत, ह्या सर्व प्रिय वस्तू त्याला सोडून गेल्या असल्याचा अनुभव येतो. कधी कधी असें दिसतें कीं, एकाच जन्माच्या कल्पनाशृंखलेंत, दोन्हीहि परस्पर विरुद्ध द्वंद्वांचा समावेश झालेला नाही. उदाहरणार्थ, एखाद्या माणसाला आपण स्वतः जन्मभर युद्धांत नेहमी विजयी होणारा असा प्रबळ भूपति असल्याचा अनुभव येईल. परंतु असें झाल्यास, त्या राजाला आणखी एक दुसरा जन्म घेऊन पराभव सोसावा लागतो; व कल्पनाशृंखलेची पूर्ति करून ह्या जन्मांतील अनुभवाचें संतुलन ( balancing ) करणें भाग पडते. **संस्कारांची मानसिक नियति (psychological compulsion) ही आत्म्यास अधिक आवश्यक असणाऱ्या अर्थपूर्णतेस ( teleological need ) पोषक असते.**

उदाहरण.

कल्पना करा, की एका मनुष्याने या जन्मांत एखाद्या माणसाला ठार मारलें आहे; व ह्यामुळे त्याच्या मनोदेहांत ठार मारण्याचा संस्काररूपी ठसा उमटला. चेतना जर या संस्काराच्या प्रारंभिक प्रवृत्तीनेच पूर्णपणे नियंत्रित झाली, तर तो मनुष्य अनंत कालपर्यंत लोकांची हत्याच करीत जाईल; व प्रत्येक वेळीं तसेंच कर्म करण्याची त्याची वृत्ति प्रबल होत जाईल. व जर अनुभवाच्या अर्थपूर्ण नियमाने ( logic of experience ) ह्या प्रवृत्तीला आवश्यक असलेला अवरोध झाला नसता, तर या पुनरावृत्तिरूपी नियतींतून सुटणें अशक्यच झालें असतें. पण लवकरच विरोधद्वंद्वांतील एका टोकाच्या पक्षा ( opposite ) ची अपूर्णता मनुष्याच्या ध्यानांत येतें; व तो आपला नष्ट

झालेला समतोल पुन्हा प्रस्थापित करण्याकरिता, न कळत विरुद्ध पक्षाचा आश्रय घेतो. याप्रमाणे, ज्याने नरहत्या करण्याचा अनुभव घेतला, त्याच्यांत स्वतःस ठार मारून घेण्याची आवश्यकता व मानासिक ग्रहणशीलता उत्पन्न होते. दुसऱ्याला मारीत असतांना जी संपूर्ण परिस्थिति ( total situation ) असते, त्या परिस्थितीचा मारणें हा एक भाग असून, त्याला त्या परिस्थितीच्या एका अंगाचेंच—म्हणजे मारण्याचेंच—रहस्य अवगत झालेलें असतें. व त्या संपूर्ण परिस्थितीचें जें मारल्या जाण्याचें दुसरें पूरक अंग असतें, त्याचें मर्म त्याला अज्ञातच राहतें. कारण, दुसऱ्याचे मारल्या जाणें एका अर्थानें त्याच्या अनुभवांत आलें असलें, तरी तो त्याचा स्वतः मरण्याचा अनुभव नसतो; व त्याचें मर्म त्याला अपारिचितच असतें. म्हणून, त्याच्या अनुभवाची पूर्ति करण्याची आवश्यकता उत्पन्न होऊन, ज्या द्वंद्वपक्षाचा त्याला स्वतःस अनुभव आला असेल, त्याच्या विरुद्ध पक्षाचा स्वानुभव तो स्वतःवर ओढवून घेतो, म्हणजे चेतनेमध्ये, ही नवीन उणीव भरून काढण्याची प्रवृत्ति उत्पन्न होते. आपल्या स्वतःच्या अनुभवांत संपूर्ण परिस्थितीचा समावेश करण्याकरिता, उपरिनिर्दिष्ट खुनी माणसामध्ये, स्वतः ठार मारल्या जाण्याच्या अनुभवाची ग्रहणशीलता उत्पन्न होते.

या ठिकाणीं हा प्रश्न उपस्थित होतो की ‘ दुसऱ्या जन्मांत त्याला ठार मारण्याकरिता कोणता माणूस येईल ’ ? तो माणूस पूर्वजन्मीं ठार झालेला मनुष्यच असूं शकेल; किंवा त्या मनुष्याप्रमाणेच समान संस्कार असलेला दुसराहि मनुष्य असूं शकेल. निरनिराळ्या व्यक्तींत क्रियाप्रतिक्रिया होऊन, परस्परांत सांस्कारिक संबंध व बंधनें

उत्पन्न होतात; व जेव्हा माणूस दुसरा जन्म घेतो, तेव्हा तो सांस्कारिक पूर्वसंबंध असलेल्या लोकांत किंवा त्याच्यासारखेच संस्कार असलेल्या दुसऱ्या लोकांत जन्म घेतो. परंतु, विकासशील द्वैताची अवरोधरहित क्रीडा होईल, अशीच व्यवस्था जीवनांत आढळून येते.

विणकराच्या धोट्याप्रमाणे दोन विरुद्ध टोकांमध्ये भ्रमण करून, मानवी मन जीवनरूपी कापडातील ताण्याबाण्यांची रचना करीत असते. रेखागणितांतील रूपकाचा उपयोग करावयाचा म्हटल्यास, जीवनाचा विकास सरळ रेषेंत न होतां, नागमोडी वळणाने होत असतो. नदींतील जलप्रवाहास दोन तटांचा जो उपयोग आहे, तोच उपयोग जीवनसरितेस दोन परस्परविरुद्ध पक्षांचा—म्हणजे द्वंद्वांचा—आहे. नदीला तट नसतील, तर तिच्यांतील जलराशी मार्गांतच बाजूंना इतस्ततः विखरल्या जातील; व नदी आपल्या उद्दिष्ट ठिकाणी पोंहचूं शकणार नाही. त्याचप्रमाणे, जीवनौघ ( life–force ) हि द्वंद्वपक्षांत समाबद्ध झाला नसता, तर तोहि अनंत रीतींनी उधळला गेला असता.

जीवनाची अग्रगति परस्परविरोधी द्वंद्वामधून द्वंद्वांतीत स्थितींत प्रवेश करते.

परंतु, जीवनसरितेचे हे दोन तट एकमेकांना समांतर नसून, मुक्तिरूपी बिंदूमध्ये अखेरीस एकमेकीस मिळणाऱ्या रेषांप्रमाणे आहेत. ज्या मानाने मनुष्य ध्येयाच्या जवळ जातो, त्या मानाने त्याच्या मनाचें आंदोलन कमी होत जातें; व ध्येयप्राप्ती झाल्यावर, तें पूर्णपणें स्थिर होतें. ज्या भावलीचा गुरुत्वाकर्षणमध्य ( centre of grauity ) तिच्या

महाप्रलय व मुक्ति.

जुडाशीं असतो, अशा भावलीचें इकडून तिकडे डोलत राहणें हळु-हळू कमी होत जाऊन, अखेरीस बसण्याच्या स्थितींत स्थिर होतें. मनाच्या आंदोलनाचीहि तशीच प्रवृत्ति असते. भावलीला धक्का दिल्यास, ती एका बाजूकडून दुसऱ्या बाजूकडे कांही कालपर्यंत डोलत राहते. परंतु, ह्या डोलण्यांतील अंतर हळूंहळू सारखें कमी होत जातें; व अखेरीस भावली अगदी स्थिर होते. सृष्टिविकासाच्या द्वंद्वपक्षांतील आंदोलन पूर्णपणे थांबणें म्हणजे **महाप्रलय** होय. परंतु, विकासशील व्यक्तीच्या अध्यात्मजीवनांतील द्वंद्वांतर्गत आंदोलन थांबणें म्हणजे **मुक्ति** होय.

चैतन्याच्या भूमिका

द्वैतांतून अद्वैतांत पाऊल टाकणें म्हणजे केवळ **अंशभेदाचा** फरक नाही. त्या दोहोंत **गुणतः फरक** असल्यामुळे, त्यांच्यांतील भेद अनंत आहे. द्वैतावस्था ईश्वरत्वाच्या अभावाची अवस्था असून, अद्वैतस्थिति ईश्वरावस्था आहे. हा असीम भेद म्हणजेच सहावी व सातवी भूमिका यांमधील अगाध दरी आहे. खालील सहा भूमिकांतहि एकमेकामध्ये एकप्रकारची दरी किंवा अंतर आहे. परंतु, हें अंतर जरी फार असलें, तरी तें अनंत नाही; कारण या सहाहि **भूमिकांमध्ये द्वैतबद्ध अनुभवाचें द्वंद्वांदोलन आहे.** पहिल्या व दुसऱ्या भूमिकेमधील, दुसऱ्या व तिसऱ्या भूमिकेमधील व याप्रमाणें सहाव्या भूमिकेपर्यंत जो भेद आहे, तो फार मोठा असला तरी सीमा-रहित नाही. यावरून हें स्पष्ट होतें, कीं द्वैतबद्ध सहाहि भूमिकांमधून कोणतीहि एक भूमिका इतर भूमिकांपेक्षा सातव्या भूमिकेच्या अधिक प्रबळ नाही. म्हणजे, सहा भूमिकांतील कोणतीहि भूमिका व सातवी

भूमिका, यांमधील अंतर सहाव्या व सातव्या भूमिकेमधील अंतराप्रमाणेंच अनंत आहे. सहा भूमिकांमधील प्रगति ही कल्पनेमधील प्रगति आहे. परंतु सातव्या भूमिकेंत कल्पना विराम पावते; व त्या भूमिकेवरच व्यक्तीची सत्यप्रकाशित जागृति राहते.

तरीहि, सहा भूमिकांतून प्रगति करणें हें अपरिहार्य आहे. सत्याची अनुभूति होण्याकरिता, कल्पनेची पूर्ण परिसमाप्ति झाली पाहिजे. जेव्हा शिष्याला सद्गुरु लाभतो, तेव्हा त्याला सर्व सहाहि भूमिकांचें उल्लंघन करावें लागते. सद्गुरु शिष्याला एक तर उघड्या डोळ्यांनी भूमिकांमधून घेऊन जातो; किंवा त्याच्या डोळ्यांवर आवरण टाकून घेऊन जातो. जर त्याने शिष्याला आवरणामधून नेले, तर त्या शिष्याला उल्लंघित भूमिकांची जाणीव राहत नाही; व सहाव्या भूमिकेपर्यंत इच्छा राहतात. पण जर त्याने शिष्याला उघड्या डोळ्यांनी नेले, तर त्याला उल्लंघित भूमिकांची जाणीव राहते;व पांचव्या भूमिकेनंतर इच्छा राहत नाही. सद्गुरु जर एखाद्या विशिष्ट कार्याकरिता आला असेल, तर तो बहुधा शिष्यांना आवरणांतूनच नेतो; कारण, उघडे डोळे असणाऱ्या शिष्यापेक्षां डोळ्यांवर आवरण असलेला शिष्य बहुधा अधिक कार्यक्षम असण्याचा संभव असतो.

भूमिकांमधील प्रगति

भूमिकांचें उल्लंघन होत असतांना संस्कार उकलले जातात. संस्कारांचें उकलणें व ते खर्च होऊन जाणें, या दोहोंमधील फरक काळजीपूर्वक ध्यानांत ठेवला पाहिजे. संस्कारांचा व्यय होत असतांना ते गतिमान होऊन कृतींत किंवा अनुभवांत उतरतात. ह्यामुळे संस्कारापासून विमोचन न होतां, नवीन संस्कारांच्या निरंतर

संचयाने खर्च झालेल्या संस्कारांची जागा भरून निघून संस्कार-समुच्चय अधिकच वाढतो, कारण खर्च होण्याच्या प्रक्रियेंतूनही दुसरे नवीन संस्कार उत्पन्न होतात. परंतु संस्कार उकलले जातांना, अनंतत्वप्राप्तीच्या उत्कंठारूपी प्रखर ज्वालेमुळे, पूर्वसंस्कार कच्चे होत जाऊन नष्ट होतात.

*आध्यात्मिक वेदना*

अनंततेच्या उत्कंठेमुळे तीव्र आध्यात्मिक वेदनांचा अनुभव येतो. अध्यात्मभूमिकांचें उल्लंघन करीत असतांना होणाऱ्या वेदनांची व साधारण दुःखाच्या तीव्रतेची तुलनाच होऊं शकत नाही. साधारण दुःख हा संस्कारांचा परिणाम असून, आध्यात्मिक वेदना हा संस्कार उकलण्याचा परिणाम आहे. शारीरिक दुःखाची पराकाष्ठा झाली म्हणजे मनुष्य बेशुद्ध होतो व त्या दुःखापासून सुटतो; पण आध्यात्मिक वेदनांपासून अशी स्वाभाविक सोडवणूक होऊं शकत नाही. तरीही आध्यात्मिक वेदना शुष्क व कंटाळवाण्या भासत नाहीत, कारण त्यांत एक प्रकारच्या आनंदाचें मिश्रण असतें.

*अनंतत्वप्राप्तीची उत्कंठा*

अनंतत्वप्राप्तीची उत्कंठा तीव्र होत जाऊन परासीमा गांठते व नंतर ती हळू हळू शांत होऊं लागते. परंतु ती शांत होत असतांना जाणीव अनंतत्वप्राप्तीची लालसा टाकून देत नाही; तर ती त्या ध्येयाला चिकटूनच राहते. ही शांत पण सुप्त उत्कंठेची स्थिति अनंतप्राप्तीची प्रवेशिका आहे. ह्या स्थितींत आलेली उत्कंठा इतर सर्व वासनांना छिन्नमूल करण्यास साधनीभूत झालेली असते; व ती स्वतःहि अनंताच्या अगाध शांतीमध्ये तृप्त होऊन विलीन होण्यास उत्सुक झालेली असते.

अनंतप्राप्तीची उत्कंठा तृप्त होण्यापूर्वी, जाणिवेला सहाव्या भूमिकेंतून सातव्या भूमिकेमध्ये प्रवेश करावा लागतो; म्हणजे तिला द्वैतांतून अद्वैतांत पदार्पण करावें लागतें. कल्पनासाम्राज्यांत भटकत

शांतिलाभ

राहण्याचें टाकून, जाणिवेला कल्पनेची परिसमाप्ति करावी लागते. सद्गुरूला एकमेव सद्वस्तूच सत्य असून ' असत् ' किंवा शून्य तिची केवळ छाया असल्याचें ज्ञान असतें; व त्याच्याकरिता, कालप्रवाह हा अनंततेमध्ये समाविष्ट झाला असतो. अंतिम सत्याच्या कालातीत स्थितीचा अनुभव घेऊन, तो स्वत: कालाच्या पलीकडे जातो; व स्वत:च्या अस्तित्वविस्तारांत तो कालप्रवाहाच्या प्रारंभाला व अंताला दोहोंनाहि समाविष्ट करतो. त्याच्यामध्ये नानात्वपूर्ण जगतांतील क्रियाप्रतिक्रियारूप कालांतर्गत घटनांमुळे किंचित्हि चंचलता उत्पन्न होत नाही.

साधारण मनुष्याला सृष्टीचा आदि किंवा अंत ठाऊक नसतो. म्हणून त्याच्या ज्ञानाच्या व नियंत्रणाच्या बाहेरील घटनांच्या गतीमुळे तो व्याकुळ होतो. त्या घटनांचें यथार्थ व वास्तविक मूल्य

साधारण मनुष्य

न कळल्यामुळें, त्याच्यावर त्यांचा प्रभाव पडतो. तो कालप्रवाहांत फसतो. प्रत्येक गोष्टीकडे तो संस्कारांच्या तृप्तीच्या किंवा अतृप्तीच्या दृष्टीनेच पाहतो. म्हणून तो विश्वांतील घटनांमुळे अतिशय प्रक्षुब्ध होतो.

ह्या उलट, सद्गुरु हा द्वैत व द्वैतमूलक संस्कार या दोहोंपासून मुक्त असतो; व म्हणून तो बंधरहित असतो. संसारांतील वादळ व आघात यांमुळे तो व्यथित होत नाही. विश्वांतील विधायक व

सद्गुरु

संहारक प्रक्रियांच्या कोलाहलास तो वाजवीपेक्षा अधिक महत्त्व देत नाही. सत्याच्या तीर्थभूमींत सद्गुरूने प्रवेश केला असतो; व सृष्टींतील क्षणिक मूल्यांमध्ये फार तर अंशतःच प्रतिबिंबित होणाऱ्या अनंत रहस्यपूर्णतेचें ही तीर्थभूमि माहेरघरच असते. त्याच्या स्वरूपांत अखिल अस्तित्व समाविष्ट असून, अभिव्यक्त सृष्टींतील सर्व घटना त्याच्याकरितां केवळ क्रीडासमान असतात.

---

# ६ : : : साधकाचीं लक्षणें

## भाग १ ला

## आंतरिक जीवनाच्या सत्यविस्तारांत प्रवेश

ईश्वरानुभतीच सर्व मनुष्यांची अंतिम भवितव्यता असली, तरी त्या महिमामय भवितव्यतेच्या सिद्धीकरिता फारच थोड्या जणांची तयारी झालेली असते. संसारांत गुरफटलेल्या लोकांचें मन संस्कारांच्या घनराशींनी तमाच्छादित झालें असतें; व हे संस्कार अतिदुर्बल झाल्याशिवाय साधकास पथप्रवेशसुद्धा मिळूं शकत नाही. संस्कारराशींना विखरून क्षीण करण्याची सामान्य रीत म्हणजे धर्माच्या बाह्य विधिनियमांचें व निर्दिष्ट व्रतवैकल्यादि आचारांचें निष्ठेने पालन करणें. परंपरागत किंवा धर्मशास्त्रविहित कडक विधिनिषेधांचें बाह्य अनुसरण ह्मणजे कर्मकांड किंवा 'शरीयत' असून, त्यांत रोजच्या प्रार्थना, तीर्थ-

धर्मविहित नियमानुसार बाह्य अनुवर्तनाचें महत्त्व व त्याच्या सीमा

यात्रा, शास्त्रविहित कर्तव्यें व तत्कालीन सामान्य नैतिक चेतने ( Moral Consciousness ) ने स्वीकारलेल्या नीतिसंहितें-तील नियमांचें पालन—या सर्वांचा समावेश होतो. नियमबद्ध बाह्य आचार, तद्विशिष्ट रीतीने आध्यात्मिक संयमाला उपयोगी असतो; परंतु त्यांत तोटे नाहींत असें नाहीं. असा कडक आचार मनुष्याला रूक्ष, कर्मठ व यंत्रसम करतो; व सूक्ष्म रीतीने त्याचा अहंकारहि वाढवितो. तरीहि, बऱ्याचशा लोकांची नियमांच्या बाह्य अनुवर्तनावरच आसक्ति जडली असते, कारण स्वतःच्या मनोदेवतेला गप्प करण्याचा तो सर्वांत सुलभ उपाय असतो.

आंतरिक जीवनाच्या सत्यविस्तारांत पाऊल

बाह्य कर्मनिष्ठतेचें शिक्षण घेण्यांत आत्मा बहुधा अनेक जन्म काढतो; परंतु ह्या बाह्य कर्मनिष्ठतेचा कंटाळा येऊन आंतरिक जीवनाच्या सत्यविस्तारा ( Realities ) विषयीं रुचिसंपन्न होण्याची वेळ कधी तरी पण निश्चयाने येतेच. संसारी मनुष्य जेव्हा ह्या श्रेष्ठतर शोधास प्रारंभ करतो, तेव्हा तो साधक बनला असें समजावें. ज्याप्रमाणे कीडा स्वतःच्या देहाचें रूपांतर ( Metamorphosis ) करून नवीन जीवनांत प्रविष्ट होतो, त्याच प्रमाणे 'शरीयत' किंवा बाह्य नियमनिष्ठता ( कर्मकांड ) पार करून, 'तरीकत' किंवा मुक्तिपथा ( मोक्षमार्ग ) मध्ये प्रवेश करतो. या उच्चतर अवस्थे-मध्ये पोहोचल्यावर, विशिष्ट नियमांच्या बाह्य अनुसरणाने आत्म्याला तृप्ति होत नाहीं; तर ज्या गुणविशेषांनी आंतरिक जीवनास आध्यात्मिक सौंदर्य येतें, ते गुणविशेष मिळविण्यास साधक प्रवृत्त होतो.

आंतरिक जीवनाच्या सत्यविस्तारा ( The realities of inner life ) च्या दृष्टीनें पाहतां, बाह्य नियमनिष्ठतेला रूढिसंमत व औपचारिक महत्त्व भासलें, तरी ती सारशून्य असते; व असें कडक बाह्यानुवर्तन टाकून देणारें जीवन कित्येक-वेळां आध्यात्मिकतेने संपन्न असूं शकतें. परंपरागत रूढींचें औपचारिक बाह्यानुसरण करीत असतांना, मनुष्याचें जीवन, बहुधा नेहमीच, सत्य व शाश्वत मूल्यांपासून घसरून, मिथ्या व भ्रामक मूल्यांवर आधारलें जाण्याचा संभव असतो. रूढिसंमत गोष्टी आध्यात्मिक दृष्ट्या नेहमीच निर्दोष असतात असें नाही. उलटपक्षीं, बऱ्याचशा रूढि बहुधा सर्वसाधारण व अज्ञानी लोकांच्या विचारांमुळे अस्तित्वांत येत असल्यामुळे, त्यांच्यांतील अंतर्गत मूल्यें भ्रमात्मकच असतात. भ्रमात्मक मूल्येंच साधारणतः रूढिसंमत बनतात, कारण त्यांची वाढ सर्वसाधारण मनोवृत्तीच्या साच्यांत झालेली असते. परंतु परंपरागत रूढींमध्ये भ्रमात्मक मूल्यांशिवाय दुसरें कांहीच अभिव्यक्त होत नाहीं, असा याचा अर्थ नाहीं.

रूढींची सत्यसंमतता

कित्येक लोक केवळ लोकविलक्षणता अनुभविण्याकरताच लोकाचाराविरुद्ध वर्तन करतात. स्वतःचे व्यापार व व्यवहार विचित्र ठेवल्यामुळे, त्यांना इतरांहून स्वतः निराळे असल्याचा अनुभव येतो; व ह्या भेदभावनेंत ते रममाण होतात. परम्पराविरुद्ध आचार हा बहुधा, तो रूढ पद्धतीच्या उलट असतो, इतक्याच कारणानेंहि आकर्षक बनतो. सर्वसाधारण अनुवर्तनांतील

रूढिमुक्तता शोधक विचारांवर आश्रित असली पाहिजे

भ्रामक मूल्यें अतिपरिचयामुळे रुचिशून्य बनतात; व नंतर सत्य व शाश्वत मूल्यांचा शोध न करतां, मन असाधारण वर्तनांत, मूल्यभ्रमाची रचना करून, रुचि घेण्यास प्रवृत्त होतें. रूढिसंमत आचार टाकून, यंत्राप्रमाणे व अविचारपूर्वक, लोकविरुद्ध पण पूर्वीइतक्याच सारशून्य आचाराचा आश्रय केला, म्हणजे बाह्य नियमनिष्ठतेची अवस्था पार केली असें होत नाहीं; कारण तशा प्रकारचा बदल प्रतिक्रियात्मक असल्यामुळे, तो बंधनरहित व सत्यनिष्ठ जीवनाला पोषक होत नाही. साधक स्वत:ला रूढिमुक्त करण्यास अविचाराच्या प्रतिक्रियेमुळे प्रवृत्त होत नाही; तर त्याच्या मुळाशीं समीक्षणात्मक पूर्ण विवेक असतो. बाह्य नियमनिष्ठेची स्थिति पार करून, ज्यांना आंतरिक जीवनांतील सत्य व सारभूत अवस्थेत प्रवेश करावयाचा असेल, त्यांनी, रूढीची संमति किंवा असंमति यांचा विचार न करतां, स्वत:मधील सारासार विवेक वाढवावा.

सत्यासत्यविवेक

‘ शरीयत ’ किंवा कर्मठतेमधून ‘ तरीकत ’ किंवा मोक्षमार्गांत चढण्याचें रहस्यसर्वस्व केवळ बाह्य नियमनिष्ठतेच्या त्यागांत सांठविलेलें नाहीं. केवळ रूढिबंध तोडून व्यक्तिवैचित्र्य वाढविणें, किंवा साधारण पद्धति सोडून, असाधारण पद्धतीचा अवलंब करणें, हें ह्या परिवर्तनाचें स्वरूप नाहीं; तर ह्या परिवर्तनाचें रहस्य स्थायी परंपरेचें अंधानुसरण टाकून, सारासारविवेकनिष्ठ जीवनाचा स्वीकार करण्यांत सांठविलेलें आहे. कर्मठपणांतून मोक्षमार्गांत परिवर्तन झालें, म्हणजे तर्कशून्य अज्ञान जाऊन, तेथे समीक्षणात्मक विचार जागृत होतो. केवळ

बाह्यनियमबद्धतेच्या अवस्थेत, मनुष्याचें आध्यात्मिक अज्ञान इतकें गहन असतें, की आपण अज्ञानी, हेंहि त्याला ठाऊक नसतें. परंतु जेव्हा मनुष्य जागृत होत जाऊन, पथप्रविष्ट होतो, तेव्हा त्याला खऱ्या प्रकाशाची आवश्यकता भासते; व सुरवातीला **सदसत्, नित्यानित्य, सत्यासत्य व सारासार, यामध्यें बौद्धिक विवेचनात्मक निवड** करण्याच्या द्वारांच त्याचा प्रकाशाप्रत पोहोंचण्याचा प्रयत्न अभिव्यक्त होतो.

शुष्क अंधविश्वासाचें दिवाळें

त्याचबरोबर, साधकास केवळ सत्यासत्यामधील बौद्धिक निवड अपुरी पडते. **बुद्धियुक्त विवेक हीच पुढील सर्व तयारींची निःसंशय आधारशीला असली, तरी समजलेलीं नवीन मूल्यें आचरणांत उतरविल्या जातील तेव्हाच त्याचा पूर्ण लाभ होतो.** म्हणजे, **सिद्धांताला** महत्त्व नसून **आचरणाला** महत्त्व आहे. ज्या कल्पना, विश्वास, मतमतांतरें व सिद्धांत मनुष्य ' धारण ' करीत असतो, ते सर्व त्याच्या व्यक्तित्वाच्या अगदी बाहेरच्या स्तराला अधरपणे चिकटून राहतात. कित्येकवेळां मनुष्याचें मत एक असतें; व कृति त्याच्या अगदी उलट असते. **जो मनुष्य कोरड्या सिद्धान्तवादितेवर पुष्ट होतो, त्यानें अध्यात्मजीवनास अद्याप सुरवातहि केलेली नसते, तरीही त्याच्या मनावर असा भ्रम आरूढ होतो, की तो स्वतः आध्यात्मिकतेंत उन्नत झाला आहे; व त्यामुळे कोरड्या सिद्धान्तवादितेचें दिवाळेपण अधिक शोचनीय ठरतें.**

कधीकधी कडवेपणानें धारण केलेलें चुकीचें मत देखील अशा प्रकारचा अनुभव आमंत्रित करतें, की त्यामुळे पुढील अध्यात्म-

जीवनाचें द्वार उघडतें. ' शरीयत ' किंवा कर्मकांडाच्या अवस्थेंत देखील, कित्येक वेळां कर्मठतेमुळे अनेक स्वार्थरहित व उदात्त कार्यांची स्फूर्ति होते. कारण, त्या अवस्थेंत, विश्वास किंवा मतमतांतरें अंधपणे ग्रहण केल्या जात असलीं, तरी त्याबद्दलचा कटाक्ष व उत्साह, हे त्यांनी त्यावेळीं स्वीकारलेल्या विचारधारेला चोदना देतात. तुलनात्मक दृष्टीने पाहतां, कोरड्या सिद्धांतवादितेपेक्षा पंथगत कट्टर अंधविश्वासांचें गुणवैशिष्ट्य हें आहे, की त्याचा स्वीकार बुद्धीप्रमाणेच हृदयानेही केलेला असतो; केवळ सैध्दान्तिक ' मतांपेक्षा ', असले अंधविश्वास व्यक्तित्वाच्या अधिक भागावर पसरून त्यावर ताबा करतात.

अंधविश्वास व कट्टर पंथावलंबन यांची उत्तम बाजू

परंतु पंथगत अंधविश्वासांचे कांही फायदे असले, तरी त्यांचे तोटेहि तितकेच आहेत; कारण त्यांच्यामधील विवेचनात्मक विचारशीलता भ्रष्ट किंवा नष्ट झाल्यामुळे, व्यक्तिजीवनाची पथप्रदर्शक दृष्टीच तमाच्छादित होते. पंथविशिष्ट विश्वासांच्या कडव्या अंधानुसरणाने व्यक्तीचें व समाजाचें कांही हित झालें असलें, तरी त्याने त्यांची बहुधा अपरिमित हानीच झाली आहे. पंथ व विश्वास यांच्यामधील अंधनिष्ठेत, बुद्धि व हृदय या दोहोंना चालना मिळत असली, तरी त्यांत सारासारविचाराचा अस्त झालेला असल्यामुळे, बुद्धि व हृदय या दोहोंचाहि व्यापार बाधित होतो. म्हणून, अंधमतप्रधान पंथानुसरणाने केवळ अमिश्रित कल्याणच होतें असें नाही.

पंथगत कट्टर अंधविश्वासांच्या दुष्परिणामाचे कारण

समीक्षणात्मक विचार न करतां, आंधळेपणाने ग्रहण केलेली

कडवीं मतें टाकून, मनुष्य जेव्हां विचारानीं ग्राह्य वाटणाऱ्या सिद्धान्ताचा स्वीकार करतो, तेव्हां त्याच्या मनास स्वतःच्या मतांचें विवेचनात्मक परीक्षण करण्याची संवय लागते; व ही त्याची कांहीं प्रमाणांत उन्नतीच आहे. परंतु नवगृहीत मतांमध्ये अंधविश्वासांतील उत्कटता व उत्साह नसतो, असेंहि कित्येक वेळां दिसून येतें; व या नवगृहीत मनांत प्रेरक शक्ति नसेल, तर ते जीवनाच्या पृष्ठभागावरच तरंगत राहतात, किंवा व्यक्तित्वावर ओव्हरकोटाप्रमाणें अधर राहतात. मन भावांधतेपासून विमुक्त करण्यांत आलें असलें, तरी मनाचें हें विचारस्वातंत्र्य हृदयाचें सहकार्य गमावून मिळविलेलें असतें. गमावलेलें हृदयाचें सहकार्य पुनः मिळण्याकरता, विवेचनात्मक विचारांतून निर्माण झालेलें नवीन आदर्श भावनाक्षेत्रांत फिरून प्रविष्ट झाले पाहिजेत; व तेथें त्यांनी आपली प्रभावशाली सत्ता पुनः प्रस्थापित केली पाहिजे. दुसऱ्या शब्दांत सांगायचें, म्हणजे विचाराच्या परीक्षणांत ग्राह्य ठरलेल्या कल्पना जर क्रियाशील जीवनांत पुनः उतरतील, तरच त्यांचा पुरेपूर लाभ झाला असें समजावें. व्यावहारिक जीवनांमध्ये उतरत असतांना, ह्या कल्पनांमध्ये इष्ट तें परिवर्तन होऊन, त्या अधिक निर्दोष व स्पष्ट होतात; व ह्यांहूनहि अधिक महत्त्वाचा लाभ, म्हणजे त्या कल्पना आतां अलंकाराप्रमाणें केवळ भूषणरूप न राहतां, प्रत्यक्ष जीवनाच्या ताण्याबाण्यामध्ये गोंवल्या जातात.

तत्त्वांना आचरणांत उतरविण्याची आवश्यकता

‘ शरीयत ’ अथवा कर्मकांडांतील बाह्यनियमनिष्ठा सोडून, ‘ तरीकत ’ किंवा मोक्षमार्गांतील आंतरिक जीवनाच्या सत्य-

विस्तारांत प्रवेश करण्याच्या दोन पायऱ्या आहेत. (१) गुण-दोषविवेचनरहित अंधानुकरणांतील मानसिक जडतेचा त्याग करून, मनाला परीक्षणात्मक विचारांनी आंदोलित करणें, व (२) परीक्षणात्मक विवेकांत ग्राह्य झालेलीं तत्त्वें व्यावहारिक जीवनांत उतरविणें. आध्यात्मिक सफलतेकरता, विचार हा परीक्षणात्मक तर पाहिजेच, पण रचनात्मकहि असला पाहिजे. समीक्षणात्मक व निर्मितिक्षम विचारांमुळे साधकांत सद्‌गुणविशेषांचा परिपोष होतो; व अशा रीतीने पूर्वतयारी पूर्ण झाल्यावर, साधकाची बुद्धि व हृदय यांच्यांत समता येऊन, मुक्त व दिव्य जीवन परिस्फुटित होतें.

विवेचनात्मक व निर्मायक विचारांमुळे बुद्धि व अंतःकरण ह्यांच्यांत समता उत्पन्न होते.

---

# ७ : : : साधकाचीं लक्षणें

## भाग २ रा

## कांही दिव्य गुणविशेष

मनुष्याचें आंतरिक जीवन सुसंवादित व जागृत होण्याकरता, त्याच्यामध्ये कांही दिव्य गुणविशेषांचा विकास होऊन, ते त्याच्या दैनिक कर्तव्यांमध्ये अभिव्यक्त झाले पाहिजेत. कोणताहि एखादा विशिष्ट गुण, अलग करून पाहिल्यास फार महत्त्वाचा दिसला नाही, तरी इतर महत्त्वपूर्ण गुणविशेषांशीं असलेला त्याचा संबंध विचारांत न घेतां त्याचें मूल्यमापन करणें बरोबर नाही. अध्यात्मजीवनामध्ये, हे सर्व गुणविशेष परस्पराश्रित व एकमेकांना सहायक असतात; व त्यांचा परस्परसंबंध इतका दृढ व सारगर्भित असतो, की त्यापैकी एकाहि गुणाची अवहेलना केली तर बाकीच्या अनेक मौलिक गुणांची माती होते. तेव्हा, प्रत्येक

*अध्यात्मजीवनास आवश्यक असलेले गुणविशेष परस्परावर आश्रित असतात.*

सद्गुणाच्या यथार्थ उपयोगितेचा विचार केल्यास, त्याची पूर्ण जीवनास अनिवार्य आवश्यकता असल्याचें दिसून येतें.

धीरता व चिकाटी

प्रत्येक मनुष्य हक्कानें सत्याचा उत्तराधिकारी आहेच; परंतु सत्संपन्नता प्राप्त करण्याकरता, त्याची आध्यात्मिक तयारी असली पाहिजे; व ही तयारी होण्याकरता, अनेक जन्मांचा धीरतापूर्वक व चिकाटीचा अभ्यास पाहिजे. तेव्हा साधकाला आवश्यक असलेल्या अनेक गोष्टींमध्ये, कधीहि न मावळणारा उत्साह व कधीहि हार न घेणारी धीरता या दोहोंचा योग पाहिजे. सत्यानुभूति प्राप्त करण्याकरता, मनुष्यानें एकदा दृढ निश्चय केला, म्हणजे त्याच्या मार्गांत अनेक अडचणी उत्पन्न झाल्याचें त्याला आढळून येतें; व फारच थोडे लोक चिकाटीनें व धीरतेनें आपला प्रयत्न अखेरपर्यंत चालू ठेवतात. विघ्नांनी अभिभूत होऊन प्रयत्न सोडून देणें सोपें आहे. पुण्यातील एका गृहस्थाच्या गोष्टीमुळें हा मुद्दा स्पष्ट होईल. एक धार्मिक पुस्तक वाचून, या गृहस्थाच्या मनांत सर्वस्वाचा त्याग करण्याची ऊर्मी उत्पन्न झाली. पुणें सोडून तो जवळच्या जंगलांत गेला; व तेथें एका झाडाखालीं बसून व हातांत माळ घेऊन, तो देवाच्या नावाचा जप करूं लागला. प्रतिक्षणीं उत्साह कमी होत असतांनाहि व बराच त्रास सहन करून, त्यानें आपला जप चालू ठेवला. सूर्यास्तानंतर त्याला सर्व बाजूंनी भयभीत झालेल्या प्राण्यांच्या आरोळ्या ऐकूं आल्या; व रात्रीच्या वाढत्या अंधारांत ह्या आरोळ्याहि वाढत गेल्या, तरी सुध्दा त्यानें आपला निश्चय व चिकाटी सोडली नाही. परंतु जेव्हा त्याला अंधारांतून एक मोठें अस्वल

स्वतःकडे येतांना दिसलें, तेव्हा त्याने जीवितरक्षणाकरता यःपलायन सुरू केलें; व सात मैलपर्यंत वेगाने धांवत जाऊन, तो पुण्यांतील एका दुकानाजवळ पोहोंचला व तेथेंच बेशुध्द झाला. शुद्धीवर आल्यानंतर, त्याने भोंवताली जमलेल्या लोकांना आपली साहसकथा सांगून त्यांचें मनरंजन केलें; परंतु त्या क्षणापासून त्याची त्यागवृत्ति अस्तास गेली.

आध्यात्मिक प्रयत्नामध्ये, शारीरिक प्रयत्न व धैर्य तर पाहिजेच, पण त्याबरोबरच न डगणारी सहिष्णुता व अचल नैतिक धैर्यहि आवश्यक आहे. जग मायेंत फसलें असून, निस्सार वस्तूंवर आसक्त आहे. म्हणून जगाची रीत ही साधकाने स्वतःकरता निश्चित केलेल्या आदर्शांच्या विरुद्ध असते. जगांतून पळून जाऊन त्याचें काम भागत नाही. ज्या गुणविशेषाच्या द्वारां, तो जगाचा सामना करून, त्याचा स्वीकार करूं शकेल, त्याचा स्वतःमध्ये विकास करण्याकरता, त्याला जगांत पुनः परत यावें लागेलच. कित्येक वेळां त्याला जगरीति आवडली नाही, तरी जगसेवेच्या द्वारांच त्याला आपला मार्ग काढावा लागतो. आपणाला जाणण्यास असमर्थ असलेल्या व आपल्या बाबतींत अनुदार असलेल्या जगावर प्रेम करून, त्याची सेवा करावयाची असेल, तर साधकाने कधींहि संपुष्टांत न येणारी सहिष्णुता संपादन करावी.

जग जसें असेल, त्याच स्वरूपांत त्याचा स्वीकार करणें

मुमुक्षु ज्या मानाने साधनापथांत प्रगत होतो, त्या मानाने त्याला गुरूचा सहवास अधिक लाभतो; व त्याचें खऱ्या प्रेमाविषयींचें

सहिष्णुता

अनुभवजन्य ज्ञान उत्तरोत्तर वाढत जातें व त्यामुळे, संसारिक व्यवहारातील प्रीतिशून्यता, कठोर तिरस्कार, हृदयभेदी औदासीन्य व धुमसत राहणारा द्वेष पाहून, त्याचें अंतःकरण व्यथित होतें. हे सर्व आघात म्हणजे त्याच्या सहनशीलतेची परीक्षाच घेतात. जेव्हा जग कित्येक प्रसंगीं उदासीन किंवा विरुद्ध बनतें, तेव्हा संसारी मनुष्यहि दुःखित होतो. परंतु मानवी स्वभावापासून तो जास्त चांगुलपणाची अपेक्षा करत नाही; ह्या सर्व गोष्टींना कांही इलाज नाही, असेंच तो समजत असतो; व यामुळे त्याच्या हृदयांत जो हळुवारपणाचा अभाव होतो, त्याने त्याच्या दुःखाची तीव्रता कमी होते. उलटपक्षी, साधकाने गंभीरतर प्रेमाचा आस्वाद घेतला असतो; व त्याला प्रत्येक आत्म्यांतील प्रच्छन्न संभाव्यतेची जाणीव असते. त्याचप्रमाणे, स्वतःस ज्ञात व साध्य असलेल्या प्रेमाचें स्वारस्य जर जगाने अस्पष्टपणें का होईना पण ओळखलें असतें, तर जीवन ह्यहून कितीतरी सौंदर्यपूर्ण झालें असतें, याची जाणीव त्याला सतत विव्हल करते.

जगरीतीला आव्हान न देतां, साधकाने तिच्यासमोर मान तुकविली असती, तर सहिष्णुतेचा प्रश्न त्याला बिकट झाला नसता. परंतु, सर्व जगाने विरोध केला तरी स्वतःस दृग्गोचर झालेल्या

नैतिक धैर्य व आत्मविश्वास

उन्नतर जीवनाच्या आदर्शास निष्ठेने चिकटून राहणें, हें त्याचें सर्वश्रेष्ठ कर्तव्य होऊन बसतें. स्वानुभूत श्रेष्ठतर सत्याबद्दल निष्ठावंत होण्याकरता, कधीहि न डगमगणाऱ्या नैतिक धैर्याची व अजून सत्याभिमुख

न झालेल्या लोकांची निंदा, उपहास व द्वेष, यांना सामना देण्यास तत्पर असण्याची आवश्यकता असते; व ह्या बिकट संग्रामांत त्याला सद्‌गुरूंची व अन्य सहसाधकांची नेहमी मदत होतच असली, तरी त्याकरिता सदासर्वकाळ दुसऱ्याच्या साहाय्याची अपेक्षा न करतां, एकट्याने झुंजत राहण्याची शक्ति त्याने वाढविली पाहिजे. स्वतःमध्ये व सद्‌गुरूमध्ये दृढ विश्वास असल्यानेच असें परमश्रेष्ठ नीतिधैर्य अंगीं बाणतें. **जगावर प्रेम करून, सद्‌गुरूंच्या रीतीने त्याची सेवा करणें, हें दुर्बल हृदयाचें काम नाही.**

नीतिधैर्य व आत्मविश्वास यांना निश्चिन्त वृत्तीची जोड पाहिजे. चिंतेमुळे मानासिक शक्तीचा जो अपव्यय होतो, तितका दुसऱ्या फारच थोड्या गोष्टींनी होतो; व पूर्णपणें चिंतारहित बनणें, हें

निश्चिन्त वृत्ति

फारच कठीण कार्य आहे. जेव्हा मनाविरुद्ध गोष्टी घडतात, तेव्हा चिंतेचा अनुभव येतो. पण झालेल्या गोष्टीबद्दल, तें तसें झालें नसतें, तर बरें झालें असतें, असा विचार करणें वृथा आहे. **विगत गोष्टी झाल्या तशाच राहणार; कितीहि चिंता केली, तरी त्या निराळ्या होणार नाहीत.** परंतु सीमित अहंवृत्तिशील मन स्वतःच्या भूतकालाशीं तादात्म्य पावतें; त्याच्याशीं संबद्ध होतें; व भग्न आशांच्या यातना जागृत ठेवतें. या प्रकारें अस्वास्थ्य मनाला उद्विग्न करीत राहतें; व अहर्निश मनावर भूतकाळ कुरघोडी करतो. त्याचप्रमाणे भविष्यकाल अवांछनीय असण्याचा संभव असला, म्हणजे त्याच्याहि बद्दल चिंता वाटते. असें झालें, म्हणजे चिंता ही अपेक्षित आगामी परिस्थितीस सामना देणाऱ्या पूर्वप्रयत्नास आवश्यक सहचर व म्हणून समर्थनीय वाटते; पण कोणतीहि

परिस्थिति केवळ चिंता करून सुधरूं शकत नाही. परंतु बऱ्याचशा अपेक्षित गोष्टी घडूनच येत नाहीत; व घडून आल्याच तर त्या बहुधा अपेक्षेपेक्षा कितीतरी अधिक स्वीकरणीय ठरतात. चिंता ही वासनेच्या उत्तेजनाने ज्वराक्रान्त झालेल्या कल्पनेचा परिणाम आहे; व चिंतेत अनुभवास येणारीं सर्व दुःखें स्वयंनिर्मित असतात. चिंतेने कधीच कोणाचें कल्याण झालें नाही. चिंतेमुळे मानसिक शक्तींचा ऱ्हास तर होतोच, पण जीवनांतील परिपूर्णता व आनंदहि घटून जातात.

साधकास जे गुणविशेष अत्यंत आवश्यक आहेत, त्यांमध्ये प्रसन्नता, उत्साह व समता ह्यांच्याइतके महत्त्वाचे फार कमी आहेत; व चिंताविमुक्त झाल्याशिवाय हे गुण विकसित होऊं शकत नाहीत. मन जेव्हा उदास, विषण्ण किंवा उद्विग्न असतें, तेव्हा त्याचें व्यापार अव्यवस्थित व बंधनकारक होतात; व त्यामुळे, सर्व प्रकारच्या परिस्थितीमध्ये, प्रसन्नता, उत्साह व समता राखण्याची आत्यंतिक आवश्यकता उत्पन्न होते. जीवन चिंतारहित झाल्याशिवाय ह्यांतील एकहि गुण साध्य होत नाही. परंतु गतकालाबद्दल किंवा भविष्यकालाबद्दल आसक्ति असेल, तर त्यांतून चिंता ही अवश्यमेव निर्माण होणारच. जोंवर मन पूर्णपणें निरासक्त बनत नाही, तोंवर चिंता कोणत्यातरी रूपांत राहतेच.

प्रसन्नता, उत्साह व समता

मार्गांतील अडथळ्यांचें उल्लंघन करून जाण्याकरिता साधकास एकनिष्ठते ( One-pointedness ) ची जरूरी आहे. सांसारिक

व्यवहारामध्ये मानसिक शक्तींचा व्यय झाल्यास त्यांची उन्नति फारच हळू होते. परंतु एकनिष्ठता असणें, म्हणजे भासमान संसारांतील सर्व प्रलोभनांपासून विरक्ति असणें. त्याकरिता, मन सर्व मोहांपासून परावृत्त व्हावयास पाहिजे; व पूर्ण इंद्रियजय साधला पाहिजे.

संयम व विरक्ति एकनिष्ठेला आवश्यक आहेत

**खऱ्या प्रबोधनाच्या शोधांत एकाग्र होण्याकरिता संयम व वैराग्य साधलेले असावयास पाहिजे.**

गुरूच्या पथप्रदर्शनाचा लाभ झाला नसल्यास, साधनापथांतील उन्नति निश्चित किंवा सुस्थिर होऊंच शकत नाही. गुरूची मदत असणें ही उन्नतीची सर्वश्रेष्ठ अट आहे. साधकास तात्कालिक दृष्टीने अत्यावश्यक असणारें पथप्रदर्शन व मदतच सद्गुरूच्या द्वारां मिळतात. साधकाने स्वतःच्या उन्नतीकरिता प्रयत्नाची पराकाष्ठा करावी, इतकीच गुरूची अपेक्षा असते. चेतनेच्या आमूल परिवर्तनाची तो अपेक्षा करीत नाही. जेथे भूमिकेची पूर्वतयारी सिद्ध असते, तेथेच तो चेतनापरिवर्तनाची अपेक्षा करतो. भौतिक व्यवहाराप्रमाणेच आध्यात्मिक उन्नतीमध्येहि, काल हें एक महत्त्वाचें तत्त्व आहे. साधकाला अध्यात्मिकतेमध्ये पुढे ढकलल्यावर, गुरु स्वतः दिलेलें साहाय्य साधकाला पूर्णपणें आत्मसात होईपर्यंत वाट पाहतो. आध्यात्मिकतेची मात्रा प्रमाणाबाहेर दिली गेली, व विशेषतः ती अप्रासंगिक असेल, तर तिच्यामुळे अवश्यमेव अनिष्ट प्रतिक्रिया होतेच. म्हणून, स्वतःच्या मध्यस्थीने साधकाचें अतिशय हित साधण्याची जेव्हा खात्री असेल, अशाच

गुरूच्या मदतीचा लाभ घेणें

क्षणाची गुरु अत्यंत काळजीपूर्वक निवड करतो; व एकदा मध्ये पडून मदत केल्यावर, तो साधकाला त्याच्या सहाऱ्याची खरी आवश्यकता निर्माण होईपर्यंत, असीम धीरतेने वाट पाहात राहतो.

---

# ८ : : : साधकाचीं लक्षणें

## भाग ३ रा

### सेवातत्परता

मानवजातीची सेवा करण्यास साधकाने नेहमीं तत्पर राहिलें पाहिजे. स्वतःच्या कार्यक्षमतेस धरून नसलेल्या कार्यांत त्याने लक्ष घालण्याची आवश्यकता नाही. त्याने स्वतःच्या वैयक्तिक प्रवृत्तीस व कार्यक्षमतेला योग्य असलेल्या कार्यांची निवड करायची असते. परंतु जी सेवा त्याच्या कर्तबगारीच्या कक्षेंत असते, ती सेवा करण्यास तो अत्यंत बिकट परिस्थितींतहि तयार असतो.

वैयक्तिक प्रवृत्ति व कार्यक्षमता यांना अनुसरून सेवातत्परता

त्याला अनेक दिव्यांतून जावें लागेल, पण शक्य तेव्हा सेवा करायचीच हा त्याचा दृढ संकल्प असतो; व तो स्वतःच्या निश्चया-

पासून ढळत नाही. परंतु केवळ स्वतःच्याच द्वारां सर्वांत अधिक परिणाम घडून यावेत, या दृष्टीने तो सेवासक्त नसतो. सेवेची जरूरी असेल, तेव्हा त्या सेवेकरता त्याला कितीहि मोठा त्याग करावा लागला, तरी तो सेवातत्परच राहतो. परंतु मला एकट्यालाच या सर्व सेवेचें श्रेय मिळावें, अशा भ्रामक कल्पनेंत तो फसून जात नाही. ती सेवा करण्याचें भाग्य दुसऱ्या कोणाला लाभले तर तो मत्सरग्रस्त होत नाही. जर तो स्वतःकरताच सेवेची संधि शोधूं लागला, तर तो एक प्रकारचा त्याचा स्वार्थच होईल. ज्या सेवेंत यत्किंचित्हि स्वार्थपर भाव नाही, त्याच सेवेला अध्यात्मजीवनामध्ये महत्त्व आहे. स्वतःस कांही तरी मिळविल्याशिवाय गत्यंतर नाही, अशी आंतरिक गरज त्याला प्रतीत व्हावयास नको; व त्याचप्रमाणे, मी एकटाच दुसऱ्यांना कांहीतरी देण्यास समर्थ असावें, असेंहि त्याला वाटायला नको. सेवेमध्ये स्वार्थपरता कोणत्याहि रूपांत राहूं नये. जर सेवा आवश्यक असेल तरच, व जेव्हा ती आवश्यक असेल, तेव्हाच करावी; व तिचा उगम स्वतंत्र वातावरणांतच शक्य असलेल्या सहजतेंत असावा. त्याचप्रमाणे, सेवेंत सीमित 'मी'च्या हक्कावर जोर असूं नये, तर सहकार्य भाव पाहिजे.

सीमित 'मी' चें अनधिकृत अस्तित्व

सर्व कर्मांपासून व कर्मफलांपासून साधक अलिप्त झाला, म्हणजे तो लहान गोष्टी व मोठ्या गोष्टी या हानिकारक द्वंद्वांपासून मुक्त होतो. संसारी लोक स्वतःस साध्य किंवा प्राप्त झालेल्या गोष्टींच्या द्वारां स्वतःची पृथक् सत्ता अनुभवतात. म्हणून

स्वतःची कमाई, ते दृश्य परिमाणां ( Tangible Quantities ) च्या मापदंडानें मोजतात; व ते लहान गोष्टी सोडून मोठ्या गोष्टींच्या मागे लागतात.

लहानमोठ्या गोष्टींच्या द्वंद्वापासून मुक्ति

परंतु आध्यात्मिकतेच्या दृष्टीनें, लहान समजल्या जाणाऱ्या गोष्टी कित्येक वेळा मोठ्या समजल्या जाणाऱ्या गोष्टींइतक्याच महत्त्वाच्या असतात. लहान गोष्टी सोडून, मोठ्या गोष्टींच्या मागे लागण्यांत साधकाला कांहीच प्राप्तव्य नसतें; म्हणून तो मोठ्या गोष्टींइतकीच लहान गोष्टीमध्यें रुचि घेतो.

अध्यात्मजीवनांत महान् घटनांइतकीच लहान घटनांमध्येंहि सारपूर्णता असते. परंतु जगांतील परंपरागत विचारधारेंत ह्या सत्याची जाणीव नसते. कोणत्या गोष्टींना महत्त्व द्यायचें हें परंपरागत दृष्टीनेंच ठरविल्यामुळे, रूढ कल्पनांचें अनुसरण करीत असतांना, मनुष्याच्या सेवेचें संभाव्य क्षेत्र कृत्रिमपणे मर्यादित होतें. व जीवनास अत्यंत महत्त्वपूर्ण असलेल्या कित्येक गोष्टींची उपेक्षा होऊन जीवन अध्यात्मिकतेच्या दृष्टीने दैन्यता पावतें.

रूढ कल्पनांच्या प्रभावामुळे सेवेचें क्षेत्र सीमित होतें.

याप्रकारे, ज्या समाजामध्ये भौतिक विचारधारेचें प्रभुत्व आहे, त्या समाजांत अन्नवस्त्रादि जड सामुग्री इतरांना प्रदान करणें, हीच सेवा समजली जाते. ज्या समाजामध्ये बौद्धिक संस्कृतीच्या महत्त्वाची पारख आहे, त्या समाजांत विविध रूपांत विद्येचा फैलाव करणें, हीच सेवा समजली जाते. ज्या समाजांत

सेवेचीं क्षेत्रें स्वीकृत मूल्यांनी निश्चित होत असतात

सौंदर्याची अभिरुचि अधिक विकसित असते, त्या समाजांत कलाकृतींचें उत्पादन व विभाजन यांची संघटना करणें, हीच सेवा समजली जाते. ज्या समाजांत हृदयास संवेद्य असलेल्या अस्फुट मूल्यांची पारख आहे, त्या समाजांत भावना सुसंस्कृत करून त्या अभिव्यक्त करण्याचीं साधनें निर्माण करणें, हीच सेवा समजली जाते; व ज्या समाजामध्ये आत्मजीवनाची परम महत्ता ओळखली जाते, त्या समाजांत आध्यात्मिक प्रबोध प्रदान करणें हीच सेवा समजली जाते. ह्या सर्व सेवाप्रकारांमध्ये आध्यात्मिक प्रबोध देणें ही सेवा सर्वश्रेष्ठ आहे, कारण अध्यात्मज्ञानाच्या दृष्टिकोणांत सर्व मानवी प्रश्नांचा समावेश होत असून, अध्यात्मसंपन्न प्रबोधांमध्येच त्या सर्व प्रश्नांचें पूर्ण निरसन होतें.

परंतु आध्यात्मिक प्रबोध नसेल, तर सेवा करण्याची इच्छा मर्यादित विचारधारांनी आरूढ होते. सेवेचे दोन प्रकार आहेत. वस्तुतः सारभूत असलेल्या गोष्टी इतरांच्या जीवनांत आणणें ही एक प्रकारची सेवा; व इतरांच्या जीवनांतील सारभूत गोष्टींच्या प्राप्तीमधील अडथळे दूर करणें, ही दुसऱ्या प्रकारची सेवा. कोणत्या गोष्टी सारभूत आहेत, या संबंधीच्या कल्पना जर सीमित असतील, तर त्यांस अनुसरून, संभाव्य सेवाक्षेत्रहि मर्यादित होतेंच.

दोन प्रकारची सेवा

एखाद्या सार्वजनिक संस्थेला खूप मोठी देणगी देण्यासारखी महत्कृत्यें करणें, म्हणजेच कांहीं सेवासर्वस्व नाहीं. खचणाऱ्या हृदयास शब्दद्वारां धैर्य देणें, किंवा विपण्णतेमध्ये स्मितद्वारां आशा व

साध्या गोष्टींतील आशयसंपन्नता

प्रसन्नता निर्माण करणें, या सामान्य क्रिया देखील दुःसह आत्मबलिदान किंवा वीरतायुक्त स्वार्थत्याग, यांच्या द्वारां होणाऱ्या सेवेइतक्याच महत्त्वाच्या सेवा आहेत. एका दृष्टिक्षेपाने अंतःकरणांतील कटुता धुवून त्यांत नवप्रीति स्पंदमान करतां आली, तर तीहि सेवाच आहे. तेथे सेवाभाव नसतो, म्हणून ती सेवा नाही असें नव्हे. अलगअलग करून पाहिल्यास ह्या सर्व गोष्टी क्षुल्लक वाटण्याचा संभव आहे. परंतु जीवित अशा अनेक साध्या गोष्टींचेंच बनलेलें असतें; व अशा साध्या गोष्टींची उपेक्षा केल्यास जीवन हें सौंदर्यहीन तर बनेलच, पण त्यांतील अध्यात्मिकताहि लयास जाईल.

ज्याप्रमाणे संसारासक्त लोक कोणत्याहि लाभाची महत्ता त्याच्या मोठ्या परिमाणावरून ठरवितात, त्याचप्रमाणे अडथळे, अडचणी व विपत्ति यांचेंहि लहानथोरपण ठरवितांना ते तीच चूक करतात.

संसारी मनुष्याच्या मूल्य-मापनांतील चूक.

उदाहरणार्थ कोणतीहि आपत्ति विचारार्ह व्हावयाची असेल, तर बऱ्याचशा लोकांच्या दृष्टीने, तिला भव्य दृश्य-स्वरूप प्राप्त झालें पाहिजे. संसाराभिमुख लोकांचा हा विशेषच आहे, की ते आंतरिक जीवनांतील गाजावाजा न करणाऱ्या घटनांपेक्षा बाह्यजगतांत दृश्य आकार धारण करणाऱ्या घटनांनाच अधिक महत्त्व देतात. उदाहरणार्थ, केवळ अध्यात्म-दृष्टीने पाहतां, कडव्या द्वेषाने दीर्घकालपर्यंत परिपूर्ण भरलेलें जीवन हें विध्वंसक युद्धाहून वस्तुतः कमी वाईट नाही; तरी बहुधा विध्वंसक युद्ध हें द्वेषयुक्त जीवनापेक्षा मोठी आपत्ति मानण्यांत येतें.

युद्धामध्ये क्रूरतेची अनेक दृश्य उदाहरणें असल्यामुळे त्याला महत्त्व देण्यांत येतें; परंतु द्वेष बाह्यकृतीमध्ये मूर्तरूप झाला नाही, तरी तो कमी वाईट नाही. त्याचप्रमाणें, अदम्य तृष्णेने व्यथित असलेल्या हृदयांतील यातनांपेक्षा, रोगराईच्या सांथी, जखमा व मृत्युशय्येवरील वेदना यांच्याकडे संसारी माणसांचें लक्ष अधिक आकृष्ट होतें.

जो साधक श्रेय व प्रसिद्धि ह्या दोहोंबद्दल उदासीन बनून सेवातत्पर असतो, त्याच्याकरता, जगाच्या दृष्टीने लहानमोठ्या वाटणाऱ्या व पूर्ण जीवनास कुंठित किंवा वर्धमान करणाऱ्या सर्वच गोष्टी ह्या लक्ष्य पोहोचविण्यास योग्य असतात. ज्याप्रमाणे सार्वत्रिक जीवनप्रवाहामध्ये साम्राज्यांच्या उत्कर्षापकर्षांना महत्त्वाचें स्थान आहे, त्याचप्रमाणे उदासीनता किंवा माधुर्य यांनी भरलेल्या भंगुर क्षणांनाहि महत्त्वाचेंच स्थान आहे. एका प्रकारच्या घटनांचें महत्त्व दुसऱ्या प्रकारच्या घटनांच्या मापदंडाने करूं नये; व एकाच प्रकारच्या घटनांच्या महत्त्वास मान्यता देऊन, दुसऱ्या प्रकारच्या घटनांना तुच्छ लेखूं नये. साधक जीवनास अविभाज्य संपूर्णते ( Integral whole ) च्या दृष्टीने पाहतो; जीवनांतील कोणत्याहि एकाच अंगामध्ये तो दुसऱ्या अंगांची उपेक्षा करून, गढून जात नाही.

संपूर्ण जीवन हेंच सेवाक्षेत्र आहे

परंतु निःस्वार्थ सेवा करीत असतांनाहि साधक आपल्या मनावर सतत सावधानतेने पहारा करीत असतो. साधक हा नम्र, प्रामाणिक

व निष्कपट असला पाहिजे. तो जी सेवा करतो, ती केवळ दाखविण्याकरता नसते: तर तिचा उगम खऱ्या प्रेमांत असतो. साधक जर खऱ्या प्रेमाने प्रेरित झाला, तर त्या प्रेमामुळे, तो मत्सररहित होऊन, इतर सहसेवकांबरोबर पूर्ण सहकारिता करूं शकतो.

सेवा प्रेमांत उत्पन्न झाली असेल, तर त्यामुळे इतर सेवकांशीं सहकारिता साधते

सहसेवकांमध्ये पूर्ण सहयोगभाव व सुसंवादिता नसेल, तर त्यांची सेवा आध्यात्मिक आदर्शाच्या दृष्टीने अपुरी पडते. शिवाय साधकाची बाह्यसेवा प्रेमरहित असेल, तर जगांतील कित्येक संस्थांमधील वेतन घेऊन काम करणाऱ्या लोकांप्रमाणेच, तोहि ती सेवा केवळ कर्तव्यबुद्धीने करीत असतो. जगांतील संस्थामध्ये लोक वेतनाकरता काम करतात; फार तर रुक्ष कर्तव्यभावनेमुळे ते कार्यदक्ष बनतात. त्यांच्या कार्यामध्ये केवळ प्रेमांत सहजपणे उद्भूत झालेल्या कार्यांतील आंतरिक सौंदर्यपूर्णता असूं शकत नाही.

सद्गुरूचा सहवास असेल, तर साधकाला सेवाधर्माचें शिक्षण सुलभतेने आत्मसात् करतां येते. गुरु केवळ शब्दानेच नव्हे, तर स्वत:च्या उदाहरणाचा प्रत्यक्ष आदर्श ठेवून, शिकवीत असतो; व साधक जेव्हा गुरूला मानवतेची सेवा करतांना पाहतो, तेव्हा गुरुप्रेमामुळे, गुरूचा तो श्रेष्ठ भाव तो चटकन ग्रहण करतो. सर्व साधकांचें गुरूवर समानत: प्रेम असल्यामुळे, त्यांच्यामध्ये सहकारिताहि सहज निर्माण होते. गुरूची आज्ञा पालन करायची म्हणून ते सेवातत्पर असतात. ते स्वत:चें कार्य करीत नाहीत, तर गुरूचें कार्य करतात; व

गुरूच्या सहवासाचा महिमा

स्वतःच्या मनाने नव्हे, तर गुरूच्या प्रेरणेनेच, त्यांनी तें कार्य स्वीकारलेलें असतें. त्यामुळे, स्वतःच्या वैयक्तिक हक्कांच्या किंवा अधिकाराच्या किंवा राखीव सवलतींच्या कल्पनांपासून ते विमुक्त राहतात; व गुरुकार्य करण्यावरच त्यांचा कटाक्ष असतो; शक्त्यनुसार गुरुकार्याचा भार दक्षतेने स्वीकारण्यास जसे ते तत्पर असतात, त्याचप्रमाणे, गुरूची आज्ञा झाल्यास, व दुसरा सहसाधक तेंच काम अधिक उत्कृष्टपणे करूं शकत असला, तर त्या कार्याचें त्या दुसऱ्या साधकाकडे हस्तांतर करण्यासहि ते तयार असतात.

याप्रमाणे सहयोग करीत असतांना सर्व साधक, एका अर्थाने, गुरुप्रमाणेच एकमेकांचीही सेवाच करीत असतात, कारण ते सर्व गुरुकार्याला आत्मीयतेमुळे स्वतःचेंच कार्य समजत असतात.

अवडंबरशून्य सेवा.

परंतु, परस्परांच्या या सेवेंत एकमेकांवर हुकमत गाजविण्याचा प्रयत्न नसतो, कारण आपला सहसाधक स्वतःचें कार्य करीत नसून, त्याने अंगिकारलेलें गुरूचें कार्यच तो करीत आहे, याची त्याला पुरेपूर जाणीव असते. त्याचप्रमाणे साधक ह्या दृष्टीने सर्व समान आहेत, हेंहि तो जाणत असल्यामुळे त्याला अत्यंत विनम्र भावाने सेवा करणें सुलभ होतें. सेवेमुळे त्याचा अभिमान वाढण्यापेक्षा, त्याने सेवा केली नसती तर जास्त चांगलें झालें असतें. उच्चनीच भेद न ठेवतां, अवडंबर न करतां व हुकमत न गाजवतां सेवाक्षम बनणें हें अत्यंत कष्टसाध्य आहे. अध्यात्मक्षेत्रांत उपयोगिते-इतकेंच नम्रतेचेंहि महत्त्व आहे.

स्वतः कार्यासक्त असतो म्हणून नव्हे, तर शिष्यगणांसमोर सेवाव्रताचें मूर्तिमंत उदाहरण असावें म्हणूनच, सद्गुरु सेवाशील बनत असतो. इतरांची सेवा करीत असतांना तो त्यांच्यामध्ये स्वतःसच पाहातो व स्वतःचीच सेवा करीत असल्याचें अनुभवतो. क्षयरहित व आनंदमय ऐक्यभावामुळे, सद्गुरु स्वतःस सर्वांचा स्वामी व सर्वांचा सेवक, दोन्हीहि एकदमच असल्याचें जाणतो, व ज्या सेवेमध्ये सेवा करणाऱ्यास किंवा सेवा ग्रहण करणाऱ्यास दोघांनाहि बंधन होत नाही, अशा सेवेचा तो आदर्श बनतो. गुरूचें उदाहरण डोळ्यासमोर ठेवल्यास साधक लवकरच सेवेचा आदर्श स्वतःमध्ये उतरवितो. परंतु, साधकाची सेवाशीलता ही जेव्हा ओझें न वाटतां आनंद देणारी, बंधन न करतां स्वतंत्रता देणारी, हक्क-प्रतिहक्क निर्माण न करतां मुक्त आदानप्रदानाच्या सहजतेमध्ये स्फूर्त होणारी, स्वार्थपर वासनेच्या भारापासून विमुक्त असलेली व नित्य नवीन होणाऱ्या परिपूर्णतेच्या व तृप्ततेच्या भावाचा परिपोष करणारी असेल, तेव्हाच त्याला सेवाशीलतेची कला सिद्ध होते व त्याची आध्यात्मिक तयारी पूर्ण होते.

सेवेचा आदर्श

---

# ९ : : साधकाचीं लक्षणें

## भाग ४ था

### श्रद्धा

साधकास आवश्यक असणाऱ्या गुणविशेषांमध्ये श्रद्धा ही सर्वांत अधिक महत्त्वाची आहे. श्रद्धेचे तीन प्रकार आहेत. (१) आत्म-

श्रद्धेचे प्रकार व त्यांचें महत्त्व.

श्रद्धा किंवा स्वत:वरील श्रध्दा (आत्मविश्वास) (२) गुरुवरील श्रद्धा व (३) जीवनावरील श्रद्धा ( faith in life ). जीवनाकरता श्रद्धेची इतकी जरूरी आहे, की तिच्याशिवाय जिवन अशक्यच होईल. श्रद्धेमुळेच सहकारशील व सामाजिक जीवन शक्य होतें. परस्परावरील श्रद्धेमुळेच प्रेमाचें विमुक्त आदान-प्रदान व सहकार्ययुक्त श्रमविभाग शक्य होतात. परस्परांबद्दल अकारण भीति बाळगल्यास जीवन भारमय व सकुचित होतें.

बालकांची मोठ्या माणसावर स्वाभाविक श्रद्धा असते; मोठ्या

माणसापासून संरक्षणाची किंवा साहाय्याची अपेक्षा करण्याकरता त्यांना ओळखीचीं शिफारसपत्रें लागत नाहीत. इतरांनी स्वार्थ साधण्याकरता धोक्याने फसविण्याचा निष्ठुर धक्का न दिला, तर दुसऱ्यावर विश्वास टाकण्याची ही प्रवृत्ति पुढेहि कायम राहते. तेव्हा श्रद्धा ही मनुष्यास स्वभावसहज असली, तरी तिची वाढ व विकास प्रामाणिक व श्रद्धा ठेवण्यास योग्य असणाऱ्या मनुष्यांच्या समाजांतच होऊं शकते. द्रोहमय वातावरणांत श्रद्धा लोप पावते. श्रद्धा निर्माण करून दृढ करणाऱ्या प्रतिरूपी (Counterpart) गुणविशेषांचें साहचर्य असेल, तर परस्परामधील श्रद्धा पूर्णपणे स्थिर होते. दुसऱ्याने आपल्यावर टाकलेल्या विश्वासास पात्र होणें व दुसऱ्यावर विश्वास टाकणें, हे सद्गुण परस्परांना पूरक आहेत. व्यक्तिपर व सामुदायिक जीवनाचा अनिर्बंध व उत्कृष्ट प्रवाह चालू राहण्यास दोनीहि सद्गुणांची आवश्यकता आहे.

पारस्परिक श्रद्धा व तिला आवश्यक असलेलें सहचारी प्रतिरूप.

परस्परांमधील तर्कवितर्करहित व अचल श्रद्धा ही आदर्शमय जगांतील वस्तु आहे. वास्तविक व्यवहारामध्ये अशी श्रद्धा कांही वेंचक व खास ठिकाणीच आढळून येते. श्रद्धा ही कितीहि इष्ट असली, तरी असीम श्रद्धेस पात्र असलेले लोक जगांत असल्याशिवाय, ती पूर्णस्वरूपांत राहूं शकत नाही; व असें होण्याकरता समाजांत विश्वसनीयता, स्थैर्य व परोपकारशील प्रवृत्ति, यांचा पूर्ण विकास झाला पाहिजे. परंतु जोंवर मनुष्याची स्वतःमध्ये अविचल श्रद्धा

आत्मविश्वासाचे महत्त्व.

राहात नाही, तोंवर पारस्परिक श्रद्धेस पोषक असलेले हे गुणविशेष अविकसितच राहतात. माणसाला आत्मविश्वास नसेल, तर तो दुसऱ्यांचा विश्वास संपादन करून, जतन करण्यास आवश्यक असलेल्या सद्गुणांचा विकास करूं शकत नाही. कोणत्याहि बिकट दिव्यांतून जात असतांना, तुम्ही स्वतःस ग्राह्य झालेल्या ध्येयापासून कधीहि च्युत होणार नाही, ह्या अढळ आत्मविश्वासावरच अविचल शीलाची इमारत उभारतां येते.

आत्मश्रद्धेचा अढळ पाया

परंतु अचल आत्मविश्वास हा दुसऱ्यावरील पूर्ण श्रद्धेइतकाच विरळ आहे. निर्मितिक्षम व प्रभावी आत्मसंयमास आवश्यक असणारी निरतिशय आत्मश्रद्धा फारच थोड्या लोकांत विकसित असते. चांगल्या वाइटाचें ज्ञान असूनहि बरेच लोक सन्मार्गापासून वारंवार च्युत होतात; व असल्या दुर्दम दुर्बलतेचा, विफलतेचा व विकारवशतेचा सतत अनुभव घेत राहिल्यामुळे त्यांचा आत्मविश्वास खंडित होऊन ढासळतो. याप्रकारें जी आत्मश्रद्धा सतत पोखरली जाऊन नष्ट होण्याच्या बेतांत येते, तिला पुनः सुरक्षितपणे प्रस्थापित करावयाचें असल्यास, मनुष्याच्या समोर पूर्ण पुरुषाचें जिवंत उदाहरण असावयास पाहिजे व त्याच्यामध्ये श्रद्धा पाहिजे.

अनेक प्रकारचीं विघ्नें, संकटें, दुर्बलता, नालायकी व विफलता, यांचा वर्षाव होत असतांनाहि, गुरुनिष्ठेमुळे आत्मविश्वास व जीवनावरील श्रद्धा यांचा परिपोष होतो; व हेंच

गुरूवरील श्रद्धा

गुरूवरील श्रद्धेचें वैशिष्ट्यपूर्ण महत्त्व आहे. स्वत:मध्ये व बऱ्याचशा इतरांमध्ये जीवन दूषित, मर्यादित व विकृत स्थितीमध्ये असल्याचें मनुष्य पाहतो; पण गुरूमध्ये प्रतीत होणारें जीवन अविकृत, शुद्ध व अंतरहित असल्याचें तो जाणतो. आपला स्वतःचाच आदर्श सद्‍गुरूमध्ये मूर्तरूप झाला असल्याचें तो पाहतो. स्वतःमधील गूढतम आत्मदेव ज्या ध्येयाकरता तळमळत असतो, तें सर्व सद्‍गुरूमध्ये प्राप्त झालेलें असतें. सध्या स्वतःमध्ये सुप्त व असिद्ध अवस्थेंत असणारी, परंतु भविष्यकाळांत त्यास खास साध्य होणारी अशी श्रेष्ठतम अवस्था तो सद्‍गुरूमध्ये पाहतो; व यामुळे गुरुवरील श्रद्धा ही साधकाला स्वतःमधील प्रच्छन्न ईश्वरत्व जागृत व सिद्ध करण्याकरता सर्वश्रेष्ठ प्रेरक शक्ति बनते.

खरी श्रद्धा ही आत्म्यास येणाऱ्या गूढतर अनुभवावर व विशुद्ध अंत:प्रज्ञेच्या निर्दोष निर्णयावर अधिष्ठित असते. अशी श्रद्धा विवेचनात्मक विचाराला विरोधक नसते; तर उलट ती त्याचें अचूक मार्गदर्शन करते.

श्रद्धा व विवेचनात्मक विचार

विवेचनात्मक विचाराला ( Critical reason ) जेव्हा विशुद्ध अंत:प्रज्ञेवर ( Pure intuition ) आश्रित असलेल्या गंभीर व जिवंत श्रद्धेची जोड मिळते, तेव्हा तो विचार रुक्ष, निष्फळ किंवा अर्थहीन न राहतां, फलदायी निर्मितिक्षम व सारपूर्ण बनतो. उलटपक्षी, बऱ्याच प्रकारचे भोळे अंधविश्वास हे निर्भय, स्वतंत्र व विवेचनात्मक विचाराशिवाय भग्न होऊं शकत नाहीत. परंतु त्याबरोबरच हेंहि खरें आहे, की जो

विश्वास विशुद्ध अंत:प्रज्ञेवर आधारलेला नसतो, अशाच विश्वासावर विवेचनात्मक विचाराचें याप्रकारचें शुद्धीकरणाचें कार्य होतें. खरी श्रध्दा विशुध्द अंत:प्रज्ञेवर आश्रित असल्यामुळे, तिचा आदेश तर्कशील बुद्धीच्या निर्णयांच्या पलीकडचा असतो. अंत:प्रज्ञाप्रेरित श्रद्धा ही सीमित बुद्धीपासून उत्पन्न होत नाही; तर ती अधिक मौलिक असल्यामुळे केवळ बुद्धीची कसरत ही तिची मुस्कटदाबी करूं शकत नाही. परंतु श्रद्धा ही कोणत्याहि अवस्थेमध्ये आंधळी असावी किंवा तिचें विवेचनात्मक बुद्धीनें परीक्षण करूं नये, असा याचा अर्थ नाही. खरी श्रद्धा हा डोळसपणाचा एक प्रकार आहे, व तिला विवेचनात्मक बुद्धीच्या स्वतंत्र व्यापाराला भिण्याची आवश्यकता नाही.

भोळा भाविकपणा व शंका.

विवेचनात्मक बुद्धीच्या द्वारां गुरूची पारख करण्याचा अधिकार शिष्यांना प्रारंभीपासूनच असतो. परंतु, पारख करून गुरूच्या पूर्णतेची खात्री पटल्यावरहि जर शिष्याची श्रद्धा चंचल झाली, तर ह्याचें मूळ कारण म्हणजे त्या शिष्याच्या मनांत ध्येयविषयक प्रामाणिक निष्ठा व खरी आस्था नसते, हेंच होय. ज्याप्रमाणे, आध्यात्मिक ज्ञानाची दवंडी पिटणाऱ्या लोकांवर अंधश्रद्धा ठेवणाऱ्या माणसांचीं अनेक उदाहरणें आहेत, त्याचप्रमाणे स्वत:ला खात्रीलायक अनुभव मिळालेला असूनहि ज्यांची श्रद्धा अकारण डळमळत राहते, असेहि लोक आहेत. व ज्याप्रमाणे भोळ्या भाविकतेचा उगम अंतर्मनांत दडून बसलेल्या अनेक सुप्त वासनांमध्ये असतो, त्याचप्रमाणे विवेकशील श्रद्धेच्या आविर्भावास विरोधक

असलल्या अंतर्मनांतील सुप्त वासनाच कित्येक वेळा डोळस श्रद्धे-मध्ये असमर्थनीय चंचलता उत्पन्न करतात. पहिल्या बाबतींत वासनेमुळे अंधविश्वास निर्माण होतो; तर दुसऱ्या बाबतींत वासनेमुळेच असमर्थनीय शंका उद्भवते.

सुप्त वासनांच्या व्यापारा-मुळेच श्रद्धा चलित होते

तृष्णा ही विवेचनात्मक विचाराच्या क्रियेला विकृत करते. विशुद्ध अंतःप्रज्ञेवर आश्रित असलेली अचल श्रद्धा ही विविध वासनांच्या भारापासून विमुक्त असलेल्या मनालाच प्राप्त होऊं शकते. म्हणून, खऱ्या श्रद्धेचा विकास क्रमाक्रमानेच होत असतो. ज्या मानाने शिष्याची जाणीव वासना-रहित होत जाते, त्या मानाने त्याची श्रद्धा वाढत जाते.

बुद्धिनिष्ठ विश्वास व मतमतांतरें

केवळ बुद्धिगम्य विश्वास किंवा मतमतांतरें याहून श्रद्धा कशी अगदी निराळी आहे, हें सावधानपूर्वक लक्षांत आणलें पाहिजे. एखाद्या माणसाचा दुसऱ्याविषयीं उत्तम ग्रह असला म्हणजे त्याची त्याच्यावर एक प्रकारची श्रद्धा आहे, असें समजलें जातें. परंतु, जिवंत गुरुनिष्ठेमध्ये जी आध्यात्मिक क्षमता असते, ती अशा ग्रहामध्ये नसते. माणसाचे बुद्धिगम्य विश्वास व मतें हे त्याच्या मनःप्रदेशावरील अगदी बाहेरचे थर असतात. गंभीरतर मानसिक शक्तींशी त्यांचा आवश्यक संबंध नसतो. ते मनाच्या एका भागांत राहतात; परंतु अशीं मतें जीवनविषयक दृष्टिकोण निश्चित करणाऱ्या व्यक्तिमत्तेच्या आंतरिक गाभ्यामध्ये कोणताहि बदल घडवून आणत नाहीत. लोक कपडे घालतात,

त्याचप्रमाणे ते ' मतें ' हि धारण करतात. परंतु आणीबाणीच्या प्रसंगीं, तात्कालिक उद्देश साधण्याकरता, ते त्यांचीं मतें कपड्या-प्रमाणेच बदलतात. इतर उद्दिष्टांच्या ( purposes ) प्रसुप्त व अचेतन ( unconscious ) व्यापारांमुळेच अशा प्रकारचीं मतें बनलेलीं असतात. मतामुळे उद्दिष्टांची जाणीवपूर्वक निश्चिती झालेली नसते.

सजीव श्रद्धा ही विधायक व प्रेरणात्मक असते

उलटपक्षी, जिवंत श्रद्धेचा मनांतील सर्व गंभीरतर शक्तींशीं व उद्दिष्टांशीं जिव्हाळ्याचा व महत्त्वपूर्ण संबंध असतो. अशी श्रद्धा वरवर ' धारण ' केलेली नसते. ती चेतनेच्या केवळ बाह्य अंगावर बुद्धिनिष्ठ मतांप्रमाणे लटकलेली नसते. उलटपक्षी, सजीव श्रद्धा ही सर्व अंतःकरणाची पुनर्घटना करणारी प्रभावी शक्ति बनते; व तिची प्रेरणा निर्मितिक्षम असते. असा एकहि विचार उरत नाही, की ज्यांत अशी श्रद्धा नवजीवन ओतीत नाही; अशी एकहि भावना उरत नाही, की जी तिच्यामुळे प्रकाशित होत नाही; व असा एकहि हेतु उरत नाही, की जो तिच्या-मुळे बदलून जात नाही. गुरूवरील या प्रकारची सजीव श्रद्धा शिष्याच्या स्फूर्तीचें व अचल आत्मविश्वासाचें परमोच्च उगमस्थान बनतें; व गुरूवरची ही श्रद्धा केवळ त्याच्याबद्दलचा चांगला ग्रह किंवा मत या स्वरूपांत व्यक्त न होतां, सर्वस्वी गुरू-वरच अवलंबून राहण्याच्या क्रियाशीलतेच्या द्वारां व्यक्त होते. सजीव श्रद्धा म्हणजे कांही शिष्याने गुरूस दिलेलें शिफारस-पत्र नाही. तर, ती श्रद्धा गुरूवरच्या पूर्ण विश्वासाची

क्रियाशील ( active ) प्रवृत्ति असते. अशा श्रद्धेमध्ये, संदेहराहित्य व पूर्ण विश्वासाने गुरूकडून साहाय्य मिळण्याची अपेक्षा तर असतेच, पण त्याबरोबरच तिच्यामध्ये शिष्याची आत्मसमर्पणाची व शरणागतीची वृत्तीहि असते.

सजीव श्रद्धा अनुभवावर अधिष्ठित असते.

अशा प्रकारची परिणामकारक व जिवंत श्रद्धा, ही अधिकारी शिष्याला गुरूने दिलेल्या एखाद्या गूढ व गंभीर अनुभवावर अधिष्ठित असते. लोक जीं मतें अंधतेने ग्रहण करतात, किंवा अपूर्ण व वरपांगी विचाराने बनवतात, त्या मतांपेक्षा गुरुनिष्ठा मूलतःच भिन्न असते. बहुधा केवळ बुद्धिग्राहित मतांना फारच थोडें आध्यात्मिक महत्त्व असतें. त्यामुळे स्वतःमध्ये किंवा इतरांमध्ये शिष्य विश्वास ठेवतो की नाही, किंवा एखाद्या विशिष्ट क्षणीं त्याचा असा विश्वास आहे किंवा नाही, या गोष्टींची सद्‌गुरूला मुळीच पर्वा नसते. जिवंत श्रद्धेच्या द्वारां, साहाय्य घेण्यास शिष्य समर्थ आहे, असें जेव्हा गुरूला आढळून येतें, तेव्हाच तो ( केवळ मताहून भिन्न असणारी ) अशी श्रध्दा स्वतःच्या कल्याणप्रद प्रभावाने शिष्याच्या मनांत उत्पन्न करतो.

शिष्याची परीक्षा.

ज्याप्रमाणे मार्गदर्शनाच्या सामर्थ्याच्या बाबतींत शिष्य गुरूची परीक्षा करीत असतो, त्याचप्रमाणे सद्‌गुरूहि आपल्या बाजूने, ध्येयनिष्ठेच्या बाबतींत शिष्याची परीक्षा करीत असतो. शिष्याच्या मनांत स्वतःबद्दल श्रद्धा आहे की शंका आहे या, गोष्टीचें सद्‌गुरूला यत्किंचितृहि महत्त्व नसतें; तर तो केवळ शिष्याचा आध्या-

त्मिक शोध व प्रयत्न प्रामाणिक व अंत:करणपूर्वक आहे की नाही, याची परीक्षा घेत असतो. जेव्हा स्वत:च्या ईश्वरत्वाची प्रमाणखूण (proof) पूर्णपणे शरण आलेल्या शिष्याच्या आध्यात्मिक हिताच्या दृष्टीने, आवश्यक व अपरिहार्य असते, तेव्हाच सद्गुरु त्याला अशी खात्रीची प्रमाणखूण देतो; तत्पूर्वी नाही.

---

# १० : : : अवतार

प्रत्येक सजीव प्राणी कळत अथवा न कळत एकाच गोष्टीचा शोध करीत असतो. खालच्या दर्जाच्या सजीव प्राण्यांत आणि अप्रगल्भ मनुष्यांत हा शोध अजाणपणे( unconscious)होतो;प्रगल्भ मनुष्य हाच शोध जाणून करीत असतो. ह्या शोधाच्या विषयाची आनंद, शांति, स्वातंत्र्य, सत्य, प्रेम, पूर्णता,आत्मानुभव ईश्वरप्राप्ति व सायुज्यता ( union with God ) अशीं पुष्कळ नांवें आहेत. वस्तुतः हा शोध ह्या सर्वांसाठींच असतो,परंतु तो विशिष्ट मार्गानें चालला असतो. सुखाचे क्षण सत्याचे ओझरतें दर्शन व परमात्म्यैक्याचे धावते क्षणिक अनुभव प्रत्येकालाच मिळतात. पण हे अनुभव चिरकाल टिकावे अशी त्यांची इच्छा असते. सतत बदलत राहणाऱ्या परिस्थितींतहि अनंत सत्य प्रस्थापित करण्याची त्यांची इच्छा असते.

अवतार

ही मानवी इच्छा स्वाभाविक आहे; व ह्या इच्छेचा मुख्य आधार म्हणजे त्याची स्वतःच्या परमात्म्याशी असलेल्या मूलभूत ऐक्याची स्मृति हा होय. ही स्मृति व्यक्तीच्या कमीअधिक उत्क्रांतीच्या मानानें मंद अथवा तीव्र असते.

प्रत्येक प्राणी स्वत:च्या खऱ्या स्वरूपाच्या विषयीच्या अज्ञानाने बद्ध असलेला असा परमेश्वराचा अंशतः आविष्कारच असतो. वास्तविक

उत्क्रान्ति म्हणजे काय ?

सर्व उत्क्रान्ति ही अज्ञान स्थितींतील देवपणा-पासून ज्ञानयुक्त देवपणापर्यंतची मजल असून त्या उत्क्रान्तींत मूलतः शाश्वत व अनंत असलेला परमेश्वर अनेक रूपें धारण करतो, अनेक अनुभव अनुभवितो आणि स्वत:च घालून घेतलेल्या अनेक बंधनांच्या पलीकडे जातो. विधात्याच्या दृष्टीने उत्क्रान्ति हा खेळ आहे. ह्या खेळांत केवल तत्त्वास आपले निरु-पाधिक पूर्णज्ञान शक्ति आणि दैवी आनंद यांच्या असीमतेची कसोटी सर्व प्रकारच्या परिस्थितीमध्यें घेतां येते. परंतु, जोंपर्यंत ईश्वर पूर्ण मानवामध्यें परस्परविरुद्ध गोष्टींचा समतोलपणा व समभाव स्थिर करीत नाही, तोंपर्यंत उत्क्रांतीचा काल हा जीवाकरता शांति आणि कलह, सुख आणि दु:ख, प्रेम आणि तिरस्कार हे क्रमाने अनुभवण्याचा काल आहे. कारण जीवाचें ज्ञान, शक्ति व सुखक्षमता मर्यादित असतात. पूर्णावस्थेंत जीव आणि परमात्मा यांचें परस्परांचें ऐक्य ओळखलें जातें; व त्याच स्थितींत सातत्याचा व कालाच्या प्रवाहांतील अनंत-तेचा अनुभव येतो. परमेश्वर स्वत:ला परमेश्वर म्हणून व तत्त्वतः अपरिवर्तनशील म्हणून ओळखतो, व आविर्भावांतील अनंततेचा व आत्मप्रतीतीच्या शाश्वत आनंदाचा स्वतःच स्वत:च्या नव्या जाणिवेंत सतत अनुभव घेतो.

जीवनामध्येंच ही आत्मप्रतीति होऊं शकते व तशीच ती व्हावयास पाहिजे; कारण जीवनांतच मर्यादितपणाचा, त्या पलीकडे जाण्याचा आणि या बंधनापासून झालेल्या मुक्ततेचा आनंद अनुभवितां येतो.

या बंधनातीत मुक्‍तेचे तीन प्रकार आहेत. बहुतेक आत्मज्ञान झालेले आत्मे तावडतोब आणि नेहमीकरिता शरीरत्याग करितात आणि परमात्म्याच्या अनाविर्भूत स्वरूपामध्ये निमग्न राहतात. त्यांना फक्त एकरूपतेची जाणीव असते. नियमित जगताचें अस्तित्वहि ते मानीत नाहीत. जननमरणाचें चक्र पूर्ण होऊन त्यापासून ते मुक्त होतात. या स्थितीसच मुक्ति अगर मोक्ष असें म्हणतात.

मुक्तीचे तीन प्रकार

कांही आत्मबोध झालेले आत्मे कांही काल आपलीं शरीरें ठेवतात आणि त्यांची जाणिवहि परमात्म्याच्या अनाविर्भूत स्वरूपामध्ये निमग्न असते; व म्हणून आपल्या शरीराची अगर जगताची त्यांना जाणीव नसते. ते स्वानंद, सामर्थ्य आणि आत्मज्ञान यांचा अखंड अनुभव घेत असतात. परंतु या सर्वांचा ते ह्या बाह्य जगतांत दुसऱ्यांना मुक्ति मिळवून देण्यासाठी उपयोग करूं शकत नाहीत. तथापि, त्यांचें या जगतांतील केवळ अस्तित्व म्हणजेच स्वानंद, अनंत शक्ति आणि ज्ञान यांच्या प्रसरणाचा मध्यबिंदू बनते. आणि जे त्यांच्याजवळ जातात, ते त्यांची सेवा करतात व त्यांची पूजा करतात त्यांना ह्यांच्या सहवासाने आध्यात्मिक दृष्ट्या फायदा होतो. या विशिष्ट प्रकारच्या लोकांना 'मज्जुब' म्हणतात आणि त्यांच्या या स्थितीला 'विदेह मुक्ति' म्हणतात.

विदेह मुक्ति कोणती ?

कांही थोडे आत्मबोध झालेले लोक शरीरत्याग करीत नाहीत, आणि त्यांना परमात्म्याच्या अनाविर्भूत व आविर्भूत रूपांमध्ये आपण स्वतःच परमात्मा असल्याची जाणीव असते.

स्वतःला अपरिवर्तनशील म्हणून व त्याचप्रमाणे आत्मतत्त्वाचा नानाविध व अनंत आविष्कार म्हणून ओळखतात. त्यांना स्वतःला या जगतापासून निराळें असल्याचा, तसेंच या जगताचे ते निर्माणकर्ते व विनाशकर्ते असल्याचा व त्याचप्रमाणें जगताच्या बंधनांचा व त्यांच्या पलीकडे ते असल्याचाहि अनुभव येतो. स्वानंद, सामर्थ्य, असीम ज्ञान आणि पूर्ण शांति यांचा ते सतत अनुभव घेतात. या जगतांतील खेळांच्या आनंदाचाहि त्यांना पूर्ण अनुभव असतो. प्रत्येकांत वास्तव्य करणारें आत्मतत्त्व ते आपण स्वतःच असल्याची त्यांना जाणीव असते; आणि ह्यामुळे ते प्रत्येकास मुक्त 'मज्झुब' अगर सद्गुरु यांच्या अवस्थेंत परमात्मरूप होण्यास आध्यात्मिक मदत करतात.

अवतार हा सर्वश्रेष्ठ सद्गुरु

जगामध्ये नेहमी छप्पन सद्गुरु अगर पूर्ण व्यक्ति असतात. जाणीवेमध्ये ते एकच असतात; पण, त्यांचें कार्य मात्र निरनिराळें असतें. बहुधा ते समाजापासून अलिप्त राहून अज्ञात स्थितींतच राहतात व आपलें कार्य करीत असतात. परंतु, त्यापैकी पांच नेहमी समाजांत राहूनच कार्य करतात आणि एका अर्थानें ते सर्वांचे आदर्श बनून समाजांत प्रामुख्य आणि महत्त्व मिळवितात. अवतारकार्यामध्ये अवतार हा सर्वश्रेष्ठ सद्गुरु असल्यामुळे तो या आध्यात्मिक राजमंडळाच्या मुख्याची जागा घेतो.

अवतारकाल हें जगताच्या वसंत कालाप्रमाणें होत. ते जगतामध्ये नवीन शक्ति, जागृतीची नवीन जाणीव आणि आयुष्याचा

परमेश्वरी 'अवतारा'चा खरा अर्थ

नवीन अनुभव आणतात. हेंहि कांही थोड्यासाठीं नव्हे, तर सर्वांसाठी. आणि त्यामुळें ज्या जागृति आणि उत्साह या गुणांचा उपयोग व त्यापासून होणारा आनंद कांही उत्क्रान्त आत्म्यानांच मिळत होता, त्या जागृतीचा व उत्साहाचा अनुभव आता सर्व मानव जातीस मिळूं शकतो. अशा रीतीने एकंदरींत जीवन जाणिवेच्या वरच्या पायरीवर नेलें जातें व उत्साहाच्या नव्या दमाने तें चालविलें जातें. विकारांकडून विचारांकडे होणारी क्रांति ही एक पायरी असून विचारांकडून अंतःस्फूर्ति होणारी क्रान्ति ही दुसरी पायरी होय. दैवी व्यक्तिमत्वाच्या माध्यमांतून ही निर्मितिक्षम नवीन अंतःस्फूर्ति एका विशिष्ट अर्थाने मूर्तरूप होते. हाच परमेश्वरी अवतार होय.

अवतार हा उत्क्रान्तिद्वारां सद्गुरु होणारा पहिलाच आत्मा होय; आणि ज्याने आपला आविष्कार पूर्वी केला व पुढेहि करील असा एकच अवतार आहे. या अवतारामधूनच परमेश्वराने आपल्या जाणीव नसलेल्या देवपणापासून जाणीव असलेल्या देवपणापर्यंतचा प्रवास पूर्ण केला. जाणीवयुक्त परमात्मा होण्याकरिता त्याला प्रथम नेणिवेंत मनुष्य व्हावें लागलें होतें. मानवांच्या मुक्ततेसाठीं परमेश्वराने जाणीवपूर्वक धारण केलेला नरदेह म्हणजेच अवतार होय.

अवतार हा निरनिराळ्या रूपांत निरनिराळ्या नांवांनी निरनिराळ्या कालीं आणि जगताच्या निरनिराळ्या भागांत दृश्यमान

विनाश थांबविण्यासाठी अवतार

होत असतो. मानव जातीचा पारमार्थिक दृष्टीने नवीन जन्म होत असतांना तो मूर्तरूप धारण करीत असतो. अवताराच्या

६६६९ १०३

आविष्कारापूर्वीचा काल हा एक प्रकारचा आध्यात्मिक जन्मकाल असल्यामुळे या काळांत मानवांस जन्मापूर्वीचे निरतिशय दुःख भोगावें लागते. या कालांत मनुष्य वासनेचा नेहमीपेक्षा अधिक गुलाम बनलेला, लोभाकडे अधिक आकृष्ट झालेला, व त्याचप्रमाणे भीतिग्रस्त व अधिक क्रोधाविष्ट झालेला दिसतो. 'बळी तो कान पिळी' अशी स्थिति होऊन श्रीमंत गरिबावर जुलूम करतात; जे सत्ताधीश असतात अशा थोरांच्या फायद्यासाठी बहुजनसमाज लुटला जातो; आणि ज्या मनुष्यास शांति अगर विश्रांति मिळत नाही तो चैतन्याच्या कृत्रिम उद्दीपनामध्ये ( Excitement ) स्वतःस विसरण्याचा प्रयत्न करतो. त्यामुळे समाजाची सर्व बाजूने अधोगति होते, राष्ट्रीय व जातीय द्वेष उत्पन्न होऊन ते वाढतात, युद्धें उद्भवतात; मानव निराश होतो, आणि ही नाशाची लाट थांबविण्यासाठी शक्यता दिसेनाशी होते.

अशा काळीं अवतार येतो. अवतार हा मनुष्यरूपांत परमात्म्याचा पूर्ण आविष्कार असल्यामुळे तो मानवाचा निकष बनतो; व त्याच्याकडे पाहून मनुष्य आपण स्वतः काय आहों व काय होऊं शकूं याची कल्पना करूं शकतो.

अवताराचें सर्व गोष्टींत लक्ष असतें. परंतु तो मात्र सर्व वस्तुमात्रापासून अलिप्त असतो. थोडक्या दुःखाने त्याला करुणा येईल; परंतु अतिशय मोठ्या दुःखानेहि त्याची चलबिचल होणार नाही. तो सुख व दुःख, वासना व तृप्ति, शांति व कलह, जन्म व मृत्यु या द्वंद्वांच्या पलीकडे असतो. लोक ज्यांनी बांधले गेले आहेत, परंतु

बंधमुक्त व द्वंद्वातीत

ज्यांच्यापासून तो स्वतः मुक्त आहे व ज्यांच्यापासून लोकांना मुक्त करण्याकरिता तो आला आहे अशीं हीं द्वंद्वें म्हणजे त्याच्या दृष्टीने केवळ भ्रम होत. प्रत्येक क्षणाचा उपयोग तो दुसऱ्यांना मोक्षमार्गांत नेण्याकडे करीत असतो. मृत्यूनंतर देखील मनुष्याचें अस्तित्व नष्ट होत नाही, हें त्याला माहीत असतें म्हणून मृत्यूची त्याला काळजी वाटत नाही.

देवपण--निर्मिति शक्ति

जे त्याच्याजवळ राहतात त्यांच्या अंतःकरणांत तो प्रेम जागृत करतो व या प्रेमामुळे उत्पन्न होणाऱ्या सेवा करण्याच्या इच्छाज्योतिमध्ये सर्व स्वार्थी इच्छा नष्ट होतात. जे त्याला आपलें आयुष्य वाहून देतात, ते जाणिवेंत हळूहळू त्याच्याशीं एकरूप होऊन जातात. हळूहळू त्यांची मानवता त्यांच्या देवपणांत विरून जाते आणि ते मुक्त होतात.

प्रत्येक सद्गुरूस बारा शिष्य

जे त्याच्या अगदी निकटचे असतात ते त्याच्या अंतरंगांतील ( Circle ) म्हणून समजले जातात. प्रत्येक सद्गुरूस बारा शिष्यांचे एक अंतर्वर्तुळ असतें आणि ते शिष्य कार्य व अधिकार या बाबतींत सद्गुरूहून भिन्न असतात. तरी आत्मबोधाच्या बाबतींत ते सद्गुरूच्या बरोबरीचे केले जातात. अवतारकालामध्ये अवताराचें १२० शिष्यांचें वर्तुळ असतें. यापैकीं सर्वांना आत्मबोधाचा अनुभव येतो आणि ते दुसऱ्यांच्या मुक्तीसाठीं कार्य करीत राहतात.

अवतार त्याच्या पिढींतील लोकांना त्यांच्या खऱ्या आत्मरूपाची जागृति करून देतो. ज्यांची तयारी झाली असेल त्यांना

स्वर्गीय जीवनाचा प्रयोग

मुक्ति देतो, आणि एकंदरींत तत्कालीन आत्मपर जीवनांत नवीन जोम आणतो. त्याच्या दिव्य मानवी उदाहरणाची, दिव्य जीवनाच्या उदात्ततेची वासनारहित प्रेमाची, केवळ दुसऱ्यांच्यासाठींच उपयोगिलेल्या सामर्थ्याची, महत्त्वाकांक्षेने त्रस्त न झालेल्या शांतीची आणि भ्रमाने अंधुक न झालेल्या ज्ञानाची स्फूर्तिप्रद शक्ति पुढील पिढीसाठी राहते. पृथ्वीवर स्वर्गीय जीवनाचा आणि सर्व मानवतेसाठी दिव्य चरित्राचा प्रयोग त्याने करून दाखविलेला असतो. ज्यांच्या अंगीं जरूर तें धैर्य व प्रामाणिकपणा असतो, ते त्यांस स्वेच्छेने अनुसरूं शकतात.

ज्यांच्या अंगीं पारमार्थिक जागृति आहे, त्यांना हल्लींचा काल हा अवतारकालापूर्वी येत असलेल्या कालासारखा आहे हें

अंधकारांतून प्रकाशाकडे

माहीत आहे. जे स्त्रीपुरुष पूर्णपणें जागृत नाहीत त्यांना देखील हें आतां समजूं लागलें आहे; अंधकारांतून ते प्रकाशाकडे येण्याचा प्रयत्न करीत आहेत. आपल्या दुःखांतून ते सुखाकडे जाण्याची इच्छा करीत आहेत. स्वतः जीवनकलहामध्ये आपण बुडून गेलों आहोंत असें त्यांना आढळून येत आहे; व त्या जीवनकलहांतून आपल्याला शांति व मुक्ति मिळावी अशी ते प्रार्थना करीत आहेत.

पण, कांहीं काल त्यांना धीर धरलाच पाहिजे. विनाशाची लाट आणखी उंच वाढून ती अधिक दूरवर पसरली

शांतिसाम्राज्य केव्हा पसरेल ?

पाहिजे. परंतु, जेव्हा मनुष्य अगदी अंतःकरणापासून संपत्तीपेक्षा कांहीं अधिक टिकाऊ व ऐहिक सामर्थ्यापेक्षा अधिक शाश्वत अशा वस्तूंची

इच्छा करील, तेव्हाच ही विनाशाची लाट ओसरेल. तेव्हाच शांति येईल; आनंद आणि प्रकाशहि तेव्हाच येईल.

माझें मौन सोडणें—माझी सार्वजनिक रीत्या प्रगट होण्याची खूण आतां फार लांब नाही. मनुष्य ग्रहण करूं शकेल इतका परमोच्च अमोल ठेवा मी आणीत आहे. या अमोल ठेव्यांत इतर सर्व संपत्ती समाविष्ट आहेत. हा ठेवा अक्षय टिकणारा आहे व दुसऱ्यास देत जाण्याने हा वाढत जातो. ह्या अपार संपत्तीचें ग्रहण करण्यास तयार व्हा.

---

… … ग्रं. … ठाणे.
जि… … …लय
नं.……… ………

# ११ : : : सत्याची अनंतता

बऱ्याचशा लोकांची अशी समजूत असते की कोणत्याहि गोष्टीला आध्यात्मिक महत्त्व येण्याकरिता, ती जागतिक दृष्टीने फार मोठी असावयास पाहिजे. त्यांना असें वाटतें की एखादी कृति आध्यात्मिक स्वरूपाची गणली जाण्याकरता, त्या कृतीचे परिणाम फार दूरवर व जीवनाच्या विस्तीर्ण क्षेत्रावर टळकपणे व्हावयास पाहिजेत. ते नेहमी कोणत्याहि कृतीचे महत्त्व तिच्या परिणामांच्या बाह्य परिमाणावरून निश्चित करीत असतात. साधारणतः मनुष्य स्थूल जगाच्या विषयांमध्ये इतका गर्क झालेला असतो, की न जाणतां, त्याच्या आध्यात्मिक मूल्य निश्चितीमध्ये स्थूल जगांतील आकार व परिमाणमात्रांचा मापदंड शिरतो; व त्याचे मूल्यनिरूपण सदोष व चुकीचें करतो.

आध्यात्मिक मूल्यनिरूपणांतील चुकीचें कारण

ह्या सर्व गोंधळाचें मूळ कारण असें आहे, की आध्यात्मिक मूल्यमापन करतांनाही साधारण माणसाच्या मनावर गणित शास्त्रांतील

गणित शास्त्रांतील अनंतता

कल्पनांचें दडपण असतें. परंतु आध्यात्मिक महत्ता ही गणितशास्त्रांतील विशालतेहून अगदीच निराळी आहे. गणितशास्त्रांतील अनंतता ही सारख्याच परिमाणाचे व महत्त्वाचे असंख्य घटक एकत्रित करून रचली गेली असल्याची कल्पना असते. परंतु अशी गणनात्मक अनंतता कल्पनेमध्येहि असाध्य आहे; कारण कोणत्याहि संख्येची कल्पना करताक्षणींच त्याहूनहि अधिक मोठ्या संख्येची कल्पना आपल्याला करतां येते. तसेंच कोणत्याहि एका घटकाला स्वतंत्र अस्तित्व किंवा महत्त्व दिल्यास तो मिथ्या ठरतो. भ्रान्त कल्पनेच्या विलासामुळेंच गणनात्मक ( Mathematical ) अनन्तता उत्पन्न होते.

आध्यात्मिक अनन्तता ही कल्पनेमध्ये अनेक मिथ्या घटक एकत्रित करून रचली जात नाही. ती सत्य वस्तु असून, कल्पना

आध्यात्मिक अनन्तता

शांत झाल्यावरच तिचें दर्शन होतें. दुसरी एखादी वस्तू मिळविल्याने आध्यात्मिक अनन्तता वाढत नाही; व तिच्यांतून कोणतीही वस्तु काढून घेतल्याने ती घटत नाही. खरें पाहतां, तिच्यामध्यें कोणतीही वस्तू मिळवितां येत नाही; व तिच्यातून कोणतीही वस्तू काढून घेतां येत नाही; कारण तिच्यामध्यें सर्वच वस्तूंचा अंतर्भाव होत असल्यामुळे, तिच्या व्यतिरिक्त दुसऱ्या लहान किंवा मोठ्या कोणत्याहि वस्तूला जागाच रहात नाही. आध्यात्मिक अनंतता गणनातीत, खंडरहित व संपूर्ण आहे.

विश्वांतील कोणत्याहि घडामोडीचा आध्यात्मिक अनंततेवर परिणाम होत नाही. जगांतील सर्व घटना आभासरूप

(phenomenal) असून सत्याच्या दृष्टीने शून्यवत् आहेत. उदाहरणार्थ, धरणीकंप ही जीवित व वित्त यांची अपरिमित हानी करणारी म्हणून जगाच्या दृष्टीने अतिशय घातक व भयावह आपत्ति ठरली, तरी जगाच्या बुडाशी असणाऱ्या अनंत सत्यावर त्या आपत्तीचा मुळीच परिणाम होत नाही. किंबहुना अखिल विश्वाचा प्रलय झाला तरीहि आध्यात्मिक अनंतता सीमित होत नाही. म्हणून, जगाच्या दृष्टीने मोठ्या गणल्या गेलेल्या वस्तूंच्या मापदंडाने आध्यात्मिक अनंतता मोजण्याचा प्रयत्न करणें फोल आहे.

आध्यात्मिक अनन्तता हें भविष्यवर्ती साध्य नाही.

अनंत सत्य हा केव्हा तरी भविष्य काळांत साध्य करण्याचा दूरवर्ती विषय असून, सर्व जीवन त्याच्या प्राप्तीकरता केवळ साधनमात्र आहे, ही भ्रान्त धारणा झटकून टाकणें, मुमुक्षूंना अत्यंत काठिण असतें. परंतु सत्य हें केवळ भविष्यवर्ती असून भूतकालांत किंवा वर्तमानकालांत त्याचा अभाव झाला, तर तें अनंत राहणार नाही; व असें झाल्यास ती एक कालांत उत्पन्न होणारी घटना बनून सान्त होईल. जीवनास भावी काळांतील सुदूरवर्ती घटनेच्या सिद्धीचें केवळ एक साधनमात्र मानलें, तर तें जीवन व त्या जीवनांतील सर्वस्व यांचें स्वतःसिद्ध (intrinsic) मूल्य एकदम नष्ट होतें. हा दृष्टिकोणच अगदी चुकीचा आहे.

अनंततेचा सद्यःक्षण

कोणत्या तरी आगामी दिवशी जीवनाला आध्यात्मिक संपन्नता प्राप्त व्हावी, हा कांही जीवनाचा अर्थ नाही; उलटपक्षी मन भ्रमभारापासून मुक्त केलें, तर प्रत्येक क्षणामध्ये जीवन आध्यात्मिक संपन्नतेने पुरेपूर भरलेलेंच

आहे, हें प्रत्ययास येतें. जेव्हा मन प्रसन्न व प्रशांत असतें, तेव्हाच आध्यात्मिक अनन्ततेचें खरें स्वरूप समजून येतें. आध्यात्मिक अनन्तता ही केवळ आगामी घटना नसून, ती पूर्वीपासूनच अस्तित्वांत असलेली निरंतर स्वयंसंपूर्णता ( eternal self--fulfilment ) आहे; शिवाय ती हल्लीही आहेच व पुढेही तशीच राहणार आहे. जेव्हा प्रत्येक क्षण कालातीत महत्त्वाने संपन्न होतो, तेव्हा मृत भूतकालाबद्दल रेंगाळणारी आसक्ति राहात नाही, किंवा आगामी भविष्याबद्दल आशापूर्ण अपेक्षाहि राहात नाही, परंतु शाश्वत सद्यःक्षणा ( eternal now ) मध्येच अभंग जीवन राहतें. अशा प्रकारच्या रहाणीनेच आध्यात्मिक अनन्तता जीवनामध्ये प्रतीत होऊं शकते.

वर्तमान कालाला भावी घटनेचें साधन मानून महत्त्वशून्य करणें बरोबर नाही; कारण, असें केलें म्हणजे सर्व अर्थपूर्णतेचा संग्रह कल्पित भविष्यांत मानण्यांत येतो, व अस्तित्वांत असलेल्या प्रत्येक वस्तूच्या खऱ्या महत्त्वाचें यथार्थदर्शन किंवा सिद्धि होऊं शकत नाही.

**समृद्धिपूर्ण अस्तित्व**

अनन्ततेमध्ये भरतीओहटीला जागा नाही; तिच्यांतील दोन पिकांमध्ये (Harvests) महत्त्वशून्य अवकाश नसतो; तर तिच्या समृद्धिपूर्ण अस्तित्वांतील एकही क्षण अर्थवंचित किंवा महत्त्वशून्य राहूं शकत नाही. जेव्हा जीवन निष्क्रिय किंवा रितें व सुनें भासतें, तेव्हा सत्याची अनन्तता घटत नसते, तर व्यक्ति स्वतः त्या अनन्ततेमध्ये प्रवेश करून तिची पूर्ण प्राप्ति करून घेण्यास असमर्थ बनली असते.

ज्याप्रमाणे सर्व सारपूर्णतेचा संग्रह एखाद्या अपेक्षित भविष्यकाला-(future) मध्येच समजणें अनुचित आहे, त्याचप्रमाणे तिचा सर्वसंग्रह केवळ खूप अवडंबर असणाऱ्या घटनांमध्येच मानणें हेंही बरोबर नाही.

थोर व महान् घटना

आध्यात्मिक महत्ता (Spiritual significance) ही जीवनांतील केवळ थोर व महान् घटनांमध्येच सांठविलेली आहे, असे नाही. आध्यात्मिक गौरवास प्राप्त होण्याकरता, कोणतीहि गोष्ट असाधारण किंवा विशेष रूपानें आकर्षक असलीच पाहिजे, असें नाही. असाधारणत्व व आकर्षकत्वविशेष हे साधारण व नेहमींच्या वस्तूंशीं सापेक्षतेने संबद्ध आहेत; त्यांच्यांत केवळ अध्यात्मसौंदर्य खात्रीने असेलच असें नाही. तेव्हा, मनुष्याला आध्यात्मिक महत्ता प्राप्त होण्याकरता, त्याने एखाद्या कार्याला खूप मोठी पैशाची देणगी देण्याची आवश्यकता नाही; गरीब मनुष्य असें करूं शकला नाही, तरी तो जर त्याला शक्य असलेली देणगी देईल, तर त्याची आध्यात्मिकता कोणत्याहि दृष्टीने कनिष्ठ प्रकारची ठरणार नाही. देणगीच्या आंकड्याने देणगीला आध्यात्मिकता येत नसून, कोणत्या भावनेने ती देणगी दिली आहे, यावरून तिची आध्यात्मिकता निश्चित होत असते. खरें पाहतां, मोठ्या देणगीच्या मागे कधी कधी अभिमान किंवा स्वार्थपर उद्देश असूं शकतो; व असें असल्यास तिची आध्यात्मिक किंमत नष्ट होते. तसेंच एखादी लहानशी देणगी देखील पूर्णपणे निस्वार्थ प्रेमांत व नम्रभावांत दिली गेली, तर तिचें आध्यात्मिक महत्त्व कितीतरी अधिक असतें.

आध्यात्मिकता ही संख्यापरिमाणावर अवलंबून नसून, तो एक जीवनाचा गुणविशेष आहे. आध्यात्मिक अनन्ततेमध्ये जीवनाच्या सर्व अंगांचा समावेश होतो; तिच्यांत लहानमोठ्या सर्व क्रिया येतात. आध्यात्मिक अनन्तता ही सर्वांत अधिक मोठ्या वस्तूहून महान् आहे; व तशीच ती सर्वांत लहान वस्तूहून लहानहि आहे; बाह्यतः घटना लहान किंवा मोठ्या असल्या, तरी त्या दोहोंतून ती समानतेने अभिव्यक्त होऊं शकते. या प्रकारें, एखादा दृष्टिक्षेप किंवा एखादें सुस्मित हे सत्यप्रत्यया (Truth--Consciousness) मध्यें उद्भवलें असेल, तर त्याचें एखाद्या कार्याकरता आत्माहुति देण्याइतकेंच महत्त्व असतें. जेव्हा सर्व जीवन अनंततेच्या छायेंत व्यतीत होतें, तेव्हा त्यांत आध्यात्मिक महत्त्वाचे अंशभेद (gradations) किंवा श्रेणीभेद राहात नाहीत. जीवनामध्ये केवळ मोठ्याच गोष्टी आल्या व लहान गोष्टी आल्या नाहीत, तर तें जीवन असीम तर होणारच नाही, पण अतिशय रितें होईल. जेव्हा जीवनाकडे समग्रतेने (totality) पाहिलें जाते, व जेव्हा त्याचा स्वीकार समग्रतेने करण्यांत येतो, तेव्हाच प्रत्येक वस्तूमध्ये अंतर्हित असलेलें अनंत सत्य स्पष्टपणे अभिव्यक्त होऊं शकतें.

*आध्यात्मिक अनन्ततेमध्ये सर्वांत मोठ्या व सर्वांत लहान दोन्हीही गोष्टींचा अंतर्भाव होतो.*

अहंकेंद्रित वासना व अभिमानप्रेरित इच्छा या दोहोंमुळें बंधन निर्माण होतें. संग्रह करून ताबा मिळविण्याचा लोभ हा कोणत्याहि स्वरूपांत असला, तरी जीवनास सीमाबद्ध करतो. उदाहरणार्थ, जेव्हा एखादा मनुष्य दुसऱ्या व्यक्तीच्या प्रेमाकडे लुब्ध दृष्टीने पाहतो, व जेव्हा त्या व्यक्तीचें प्रेम त्याला न मिळतां

*अद्वैतांतील मुक्तावस्था व आनंद*

दुसऱ्या कोणाला मिळतें, तेव्हा त्याच्या आत्मजीवनाची गळचेपी होऊन, तें अत्यंत संकुचित होतें; व त्याला मर्यादितेची तीव्र जाणीव होते. याप्रमाणे जीव गुदमरून टाकणाऱ्या मत्सराच्या यातना सुरू होतात. परंतु ह्याच परिस्थितीकडे लोभरहित अंतःकरणाने पाहिलें, तर दुसऱ्याला मिळणाऱ्या प्रेमाचे नैसर्गिक सौंदर्य प्रत्ययास येईल. निर्लोभतेमध्ये मिळणाऱ्या स्वच्छ दृष्टीचा लाभ होऊन, त्याला अद्वयावस्थेंतील विमुक्त स्थिति तर मिळेलच, पण तो त्या अवस्थेंतील आनंदाचा रसास्वादहि घेतो. तो एकाच रूपाशीं संबद्ध होऊन, त्याच्या वर्तनें आग्रह न धरतां, जीवनांतील सर्व रूपांशीं तादात्म्य पावत असल्यामुळे, दुसऱ्या कोणाला तें प्रेम प्राप्त झालें, तरी तें त्याला स्वतःलाच मिळाल्यासारखें भासतें.

अद्वैतांत बंधनापासून मुक्ति आहे व सर्व वस्तुजाताचें यथार्थ दर्शन व रसास्वादन आहे. ज्या आध्यात्मिक अनंततेमध्ये

अद्वैताच्या द्वारां आध्यात्मिक अनंततेची सिद्धि

शाश्वत व क्षयरहित आनंदाचा निश्चित लाभ होतो, त्या अनंततेची अनुभूति केवळ अद्वैतास्थितींतच होऊं शकते. मत्सराप्रमाणेच क्रोध व रागद्वेष, हेही स्वयंनिर्मित बंधनें आहेत. सर्व प्रकारची ससीमता व मर्यादिता स्वयंनिर्मित व कल्पित असते; अहंचित्त व अहंप्रेरित कल्पना यांचा त्याग केल्यास, आहे त्याच्याच अनंत गौरवाची सम्यक् प्रतीति होते.

अद्वैतदृष्टीने सत्याची अनंतता प्रतीत झाली, म्हणजे सामाजिक

प्रश्न उत्कृष्ट रीतीने सोडविण्याकरिताही तिचा उपयोग होतो.

सामाजिक प्रश्नांच्या बाबतींत आध्यात्मिक अनंततेचा अर्थ

द्वैताला अनिवार्य सत्य मानल्यास सामाजिक प्रश्न कधींहि उत्तम रीतीने सुटूं शकत नाहीं. समाज व व्यक्ति यांमधील संस्थापना ( Adjustment ) किंवा विविध सामाजिक संस्थांमधील सुसंगति ही केवळ संख्येच्या कुशल योजनेने साध्य होऊं शकत नाहीं.

अल्पसंख्य ( Minority ) लोकांच्या हिताकडे पाहून सामाजिक हक्क निश्चित झाले, तर बहुसंख्य ( Majority ) लोकांच्या हितसंबंधांना अभिव्यक्ति न मिळून, बहुसंख्य लोक अल्पसंख्य लोकांचे विरोधक प्रतिस्पर्धी बनल्याशिवाय राहात नाहीत. उलटपक्षीं, लोकसत्तावादी राष्ट्रांमध्यें बहुसंख्य लोकांच्या हिताकडे दृष्टी ठेऊन सामाजिक हक्क निश्चित होतात; व अल्पसंख्य लोकांचें हित बाजूला राहतें. परंतु हा दृष्टिकोण देखील नानात्वप्रधान द्वैतमय क्षेत्रांतीलच आहे. त्यांत अल्पसंख्य लोकांचे प्रश्न तसेच कायम राहतात. ह्या दृष्टिकोणांत अल्पसंख्य लोकांचे हितसंबंध अभिव्यक्त होत नसल्यामुळें, हे अल्पसंख्य लोक बहुसंख्य लोकांचे विरोधक प्रतिस्पर्धी बनल्याशिवाय राहत नाहींत.

अल्पसंख्य व बहुसंख्य

जोंपर्यंत सामाजिक प्रश्नांमध्ये नानात्व व संख्या यांचें प्राधान्य असतें, तोंवर ते कायमचे व समाधानकारक रीतीने सुटूं शकत नाहींत. कोणतीहि सोडवणूक कायमची होण्याकरता, ती सर्वांचें मूलभूत ऐक्य व समष्टीची अविभाज्यता ( Indivisible Totality ), ह्या सत्याने प्रकाशित व्हावयास

अविभाज्य समष्टि

पाहिजे. सर्वांतर्यामी असलेल्या एकमेव तत्त्वास नानात्वाचें संवर्धन (Multiplication of the many) करून स्पर्श करतां येत नाही. संख्या कितीहि मोठी असली, तरी ती मर्यादितच असते. आध्यात्मिक अनंतता ही एक संख्या नसून, एकमेवाद्वितीय असें सत्य आहे.

नानात्वाचें जग

जेथे अनेक आहेत, तेथे त्यांच्यामध्ये तुलना होणारच; तेथे अल्प संख्या व बहुसंख्या राहणार; तेथे राखीव हक्क व अधिकार यांच्या बावतींत तरतमभाव उत्पन्न होऊन, विविध श्रेणीभेदामुळे मूल्यमापन दूषित होतें. आध्यात्मदृष्टीने पाहतां, हे सर्व भ्रान्त जाणिवेचेच प्रकार आहेत; कारण प्रत्येकांत स्पन्दमान होणारें सत्य एकच आहे. परंतु सत्य-प्रत्ययांत अनुभवास येणारी एकता ही समानते ( Equality ) च्या तत्त्वाहून भिन्न आहे.

प्रत्येकामधील व सर्वांमधील एकमेव तत्त्व

कोणतीहि एक व्यक्ति महत्त्व, हक्क व अधिकार या बाबतींत दुसऱ्या कोणत्याहि व्यक्तीच्या बरोबरीची आहे, हा समानते( Equality )चा अर्थ आहे. उलटपक्षी, सत्याच्या आध्यात्मिक अनन्ततेमध्ये एका व्यक्तीलाच समष्टि ( Totality ) मानण्याच्या विरोधाभासालाहि जागा राहते; व म्हणून एकाच व्यक्तीला दोन किंवा अधिक व्यक्तीइतकेंच नव्हे, तर सर्वांच्या बरोबरीचें महत्त्व देतां येतें. आध्यात्मिक अनन्ततेमध्यें मुळी तुलनेलाच वाव राहत नाही; तेथे लहानथोर नाहींत; तेथे हक्क व अधिकार यांच्या

रांनी बनलेल्या वर्तुळाच्या त्रिज्येएवढें अंतर काटते. जेव्हा एखादी वासना पुरेशी बळवती होते, तेव्हा ती परिपूर्ण होण्यासाठी कृतीमध्ये व्यक्त होते.

वासनांच्या क्षेत्राएवढेंच स्वार्थाचें क्षेत्र आहे. अनंत वासनांच्या अडथळ्यांपुढे आत्म्याला स्वतःच्या खऱ्या स्वरूपाचें अनिर्बंध व पूर्ण प्रादुर्भवन करणें कठीण होऊन बसतें; आणि आयुष्य स्वार्थकेंद्रित व संकुचित होतें. व्यक्तीच्या 'मी' पणाचें सारेंच जीवन हें सतत बदलणाऱ्या व नाश पावणाऱ्या गोष्टींच्या द्वारें वासनांची तृप्ति करून घेण्याच्या प्रयत्नांच्या पकडींत असतें. परंतु क्षणभंगुर गोष्टींच्या द्वारें खरी तृप्ति होणें कधीहि शक्य नाही. पळत्या गोष्टींपासून मिळविलेलें समाधान टिकाऊ नसतें; व त्यांत मनुष्याच्या वासना अतृप्तच राहतात. याप्रमाणें सार्वत्रिक असमाधान व अनेक प्रकारच्या चिंता उत्पन्न होतात.

अपेक्षेचा परिणाम-- असंतोष.

खंडित ( Frustrated ) अहंभाव मुख्यत्वाने काम, क्रोध आणि लोभ, यांमधून व्यक्तरूप होतो. कामवासना बऱ्याच बाबतींत लोभासारखीच असते. परंतु तिच्या तृप्तीच्या पद्धतीमध्ये फरक आहे, कारण तिचा या स्थूल जगताशीं संबंध आहे. स्थूल शरीराच्या माध्यमांतून कामवासना व्यक्तरूप होते; आणि तिचा स्थूल देहाशीं संबंध असतो. स्थूल जगताशीं बांधणाऱ्या शृंखलेचा हा एक प्रकार आहे. लोभ ही एक हृदयाची अस्वस्थ स्थिति आहे. सत्ता आणि संपत्ति यांची हाव हें त्याचें रूप होय. वासनांच्या तृप्तीसाठीच संपत्ति आणि सत्ता मिळविण्याचा

काम, क्रोध व लोभ

प्रयत्न केला जातो. वासनांची तृप्ति करण्याच्या प्रयत्नांत मनुष्याचें केवळ कांहीं अंशानेच समाधान होतें. आणि हें अर्धवट समाधान लोभाची आग विझवून टाकण्याऐवजी तिला वारा घालून अधिक प्रज्वलित करितें. अशा रीतीने लोभाच्या क्रीडाक्षेत्रास अमर्याद वाव मिळतो. तो मनुष्यास सदैव असंतुष्ट करून सोडतो. लोभाच्या मुख्य रूपांचा संबंध मनुष्याच्या विकारांशीं असतो. सूक्ष्म जगताशीं बांधणाऱ्या शृंखलेचा हा एक प्रकार आहे. क्रोध हा चिडलेल्या मनाची ज्वाला होय. इच्छा खुडल्या गेल्यामुळे अगर अपुऱ्या राहिल्यामुळे त्याचा उद्भव होतो. तो उपाधियुक्त अहंभावाचें पोषण करतो; व सत्ता आणि चढाई यांकरिता त्याचा उपयोग होतो. वासनांच्या पूर्तीमध्ये येणारे अडथळे दूर करणें, हें क्रोधाचें लक्ष्य असतें. क्रोधाची लहर ही अहंभाव व गर्व यांस पुष्ट करते. क्रोध हा उपाधियुक्त अहंभावाचा सर्वांत मोठा सहकारी होय. मन हें क्रोधाचें स्थान आहे; आणि मनाच्या चेष्टांमधूनच तो बहुधा व्यक्त होतो. मानासिक गुंतागुंतीचें क्रोध हें एक रूप आहे. काम, क्रोध आणि लोभ, यांचीं अनुक्रमें शरीर, मन व हृदय हीं व्यक्त होण्याचीं साधनें होत.

मनुष्याला काम, क्रोध व लोभ यांमुळे निराशेचा अनुभव येतो; तरी देखील तो खंडित अहंभाव काम, क्रोध आणि लोभ यांच्या द्वारांच अधिक समाधान मिळविण्याच्या मागें लागतो. अशा

दुष्ट वर्तुळ

तऱ्हेने जाणीव ही चिरकाल निराशेच्या दुष्ट वर्तुळामध्ये सापडते. काम, क्रोध अगर लोभ, हे व्यक्त होण्यामध्ये अडथळा आल्यास निराशा उत्पन्न होते. याप्रमाणें, निराशा ही स्थूल, सूक्ष्म व मानासिक गुंतागुंतीची सर्वसामान्य प्रतिक्रिया असते. काम, क्रोध व लोभ, हे स्वार्थाचें क्षेत्र व्यापून असतात. त्यांच्या अपूर्तीमुळे उद्भवलेली

खिन्नता म्हणजेच निराशा होय. या तिन्ही अंगीभूत दुर्गुणांचें मूळ जो स्वार्थ तोच शेवटी निराशा आणि काळजी यांचें कारण असतो. स्वार्थ हा आत्मघातकी आहे. तो वासनांच्या द्वारें तृप्ति करून घेण्याचा प्रयत्न करतो; परंतु शेवटी चिरस्थायी असमाधानच त्याच्या वाट्यास येतें.

वासना अमर्याद असल्याने स्वार्थ हा खास असमाधान आणि निराशा यांप्रत नेतो. म्हणून सुखाचा प्रश्न हा वासना सोडण्याचा प्रश्न होय. केवळ यांत्रिक दडपणामुळे वासनांवर ताबा मिळवितां येत नाही. केवळ ज्ञानानेच त्या नष्ट होऊं शकतात. विचारांच्या साम्राज्यांत तुम्ही खोल जाऊन पाहाल, आणि थोडा वेळच जर गंभीरपणाने विचार कराल, तर तुम्हाला वासनांचा फोलपणा समजून येईल. आतापर्यंत जें सुख उपभोगिलें व दुःख उपभोगिलें त्याचाहि विचार करा. आजपर्यंत आयुष्यांत ज्याचा उपभोग घेतला तें आज कांहीच नाही; व जें दुःख उपभोगिलें तेंहि आज समोर नाही. सारा कांही भ्रम होता. आनंदमय असणें हें तुमच्यावर आहे; तरीहि तुम्ही केवळ वस्तूंच्या हव्यासाने स्वतःवर दुःख ओढवून घेता. लोभ हाच सतत अस्वस्थतेचें मूळ आहे. तुम्हाला हवी ती वस्तू मिळाली नाही, म्हणजे तुम्ही निराश होता. व जर ती तुम्हास मिळाली, तर तुम्हांला ती अधिकाधिक हवी असते; आणि म्हणून तुम्ही दुःखी होता. 'मला कांहीहि नको' असें म्हणा, आणि सुखी व्हा. वासनांच्या फोलपणाची अविरत जाणीव तुम्हाला ज्ञानप्रद होईल. आणि हें तत्त्वज्ञान तुम्हाला गरजांपासून मुक्त करून, चिरंतन सुखाचा मार्ग दाखवील.

सुखाचा मार्ग.

वासना व गरजा यांमधील फरक काळजीपूर्वक समजून घेतला पाहिजे. अभिमान व क्रोध, काम आणि लोभ, हीं सर्व वासनांची

वासनात्याग.

रूपें आहेत. तुम्हाला वाटेल, 'जें मला हवेसें वाटतें, तें सर्व मला आवश्यक आहे' परंतु ती चूक आहे. एखाद्या वाळवंटांत प्रवास करतांना जर तुम्हाला तहान लागली असेल, तर तुम्हाला चांगल्या पाण्याची आवश्यकता आहे, परंतु लेमोनेडची नाही. जोंपर्यंत मनुष्यास देह आहे, तोंपर्यंत मनुष्यास कांही आवश्यक गोष्टी असणारच; आणि त्या भागाविणें हेंहि जरूर असतें. परंतु वासना ह्या विकृत कल्पनेपासून उत्पन्न होतात. जर कांही सुख मिळवावयाचें असेल, तर वासना टाकून दिल्या पाहिजेत. स्वार्थ हा वासनामय असल्याने वासनांचा त्याग म्हणजे मरणच होय. स्थूल देहापासून अलग होणें यास सर्वसाधारण अर्थाने मरण म्हणतात. परंतु खऱ्या अर्थाने, मरण म्हणजे नीच इंद्रियवासनांचा त्याग होय. स्वर्गनरकांची उदासवाणीं चित्रें रंगवून धर्मगुरु लोकांस खोट्या मरणासाठी तयार करीत असतात. परंतु जीवन-प्रवाहामध्यें अखंड सातत्य असल्याने, तें मरण हा केवळ भ्रम असतो. खरें मरण म्हणजे वासनात्याग हें होय; आणि तें पायऱ्या-पायऱ्यांनी हळूहळू येतें.

प्रेम व सेवा.

प्रीतीच्या उदयामुळे स्वार्थाचें मरण सोपें होतें.प्रीतीनेच मनुष्य खऱ्या अर्थाने मरत असतो. तुम्हीं जर परस्परांवर प्रेम करूं शकणार नाही, तर जो तुम्हाला दुःख देत असेल, त्यावर तुम्हीं प्रेम कसें करूं शकाल? स्वार्थाची बेडी अज्ञानामुळेच उत्पन्न होत असते. आपल्या कृतीचें व अभिरुचींचें क्षेत्र वाढविल्याने आपणांस अधिक उच्च प्रकारचें समाधान मिळेल, असें जेव्हा मनुष्याच्या लक्षांत येतें,तेव्हा तो सेवातत्पर जीवनाकडे वळतो. या स्थितीमध्ये त्याला पुष्कळ सद्वासना असतात. इतरांचें दुःखनिवारण करून, व मदत करून, त्यांना

सुख द्यावे,असें त्याला वाटतें.आणि अशा सद्वासनांमध्ये जरी अप्रत्यक्षपणें स्वार्थाशीं संबंध असतो, तरी चांगल्या कृत्यावर संकुचित स्वार्थाची पकड नसते. सद्वासनादेखील एका अर्थानें उच्च प्रकारच्या आणि विस्तृत स्वार्थाचींच रूपें असतात; कारण वाईट वासनांप्रमाणे, त्याहि द्वंद्वांच्या राज्यांतच वावरत असतात. परंतु सद्वासनांची पूर्ति करींत असतांना, स्वार्थ हा परिणामीं ज्यांत त्या सद्वासना देखील नष्ट होऊन जातील, अशा विशाल कल्पनेचा अंगीकार करीत असतो. स्वतःचीच चमक दाखविण्याऐवजीं अगर स्वतःकडेच लोकांना आकर्षून घेण्या-ऐवजी अगर संग्रहशील ( Possessive ) बनण्याऐवजी, मनुष्य दुस-ऱ्यांच्या उपयोगी पडण्यास शिकतो.

स्वार्थाची उत्पत्ति

अहंभावाच्या घटकांमध्ये ज्या वासना शिरतात, त्या चांगल्या किंवा वाईट असतात. साधारणपणे, वाईट वासनांना स्वार्थाचा प्रकार समजतात; आणि सद्वासनांना त्यागाचा प्रकार समजतात. परंतु स्वार्थ आणि त्याग यांना विभागणारी अशी एखादी सीमारेखा नाही. दोन्हीहि द्वंद्वाच्या राज्यांतच वावरतात. शुभाशुभद्वंद्वातीत दृष्टीने पाहातां, स्वार्थ आणि त्याग यांतील फरक मूलतः क्षेत्रविस्तारांत आहे. व्यक्तीच्या अहंभावयुक्त जीवनाची स्वार्थ आणि त्याग हीं एकमेकांशीं संबंध असलेलीं दोन अंगें आहेत. संकुचित व्यक्तित्वाभोवतीं जेव्हा सर्व वासना गोळा होतात, तेव्हा स्वार्थ उत्पन्न होतो. जेव्हा या अव्यवस्थित अवस्थेंतील वासनासमूहाची वाताहात होऊन जाते, तेव्हा त्यागाचा उगम होतो; आणि वासना विरल होऊन त्या अधिक क्षेत्र व्यापतात. स्वार्थ म्हणजे मर्यादित क्षेत्राभोवती इच्छा संकुचित करणें

होय; व त्याग म्हणजे इच्छेने विस्तृत क्षेत्रास व्यापणें होय. विरोधाभासाच्या द्वारें सांगावयाचें, म्हणजे त्यागाचें स्वार्थ हें संकुचित स्वरूप होय; आणि त्याग म्हणजे स्वार्थास कृतीच्या अधिक व्यापक क्षेत्रांत आणणें होय.

स्वार्थाचें निःस्वार्थांत रूपांतर

द्वंद्वांच्या क्षेत्रापलीकडे जाण्यापूर्वी, स्वार्थाचें निःस्वार्थांत रूपांतर झालें पाहिजे. सतत आणि चिकाटीने केलेलीं सत्कृत्यें हीं स्वार्थाला झिजवून टाकतात. चांगल्या कृत्यांतून व्यक्त झालेला आणि त्यांत विस्तृत झालेला स्वार्थ हा अंतीं स्वार्थाच्याच नाशास कारण होतो. पुण्य म्हणजे पुष्ट होत असलेल्या आणि नष्ट होत असलेल्या स्वार्थामधील सांधा आहे. प्रथमतः स्वार्थ हा वाईट प्रवृत्तींचा जनक होत असला, तरी अखेर तो सत्कृत्यांच्या द्वारां, स्वतःचाच पराजय करून घेणारा वीर ठरतो. जेव्हा असत् प्रवृत्तींची जागा सत् प्रवृत्ति घेतात, तेव्हा स्वार्थाचें त्यागांत रूपांतर होतें; म्हणजे जगाविषयींच्या कळकळींत स्वार्थ स्वतःस विसरून जातो. हें चांगलें आणि त्यागयुक्त जीवन जरी परस्पर विरोधी द्वंद्वांनीं बद्ध असलें, तरी पुण्य हें द्वंद्वापासून मुक्त होण्यास आवश्यक आहे. पुण्य हें स्वतःचें अज्ञान नष्ट करण्याचें साधन आहे.

समष्टिरूप आत्मीयता

पुण्यशील जीवनांतून आत्मा परमेश्वराकडे जातो. पापपुण्य, दुर्गुणसद्गुण आणि दुसरीं मायेचीं द्वंद्वें, यांच्या पलीकडे असलेल्या समष्टिरूप आत्मीयतेमध्यें त्यागाची देखील कल्पना

विराम पावते. स्वार्थरहित परमोच्च स्थिति म्हणजेच सर्वांशीं तादात्म्य पावण्याचा प्रारंभ होय. मुक्तीच्या स्थितीमध्ये, सर्वसाधारण स्वरूपाचा स्वार्थहि नसतो, अगर निःस्वार्थहि नसतो; तर या दोहोंची परिणति होऊन,ते दोन्हीही सर्वात्मभावनेमध्ये विरून जातात.सारें चैतन्य मूलतः एकच आहे, ही प्रतीति आली, म्हणजे शांति आणि आनंद यांचा लाभ होतो. एकत्वाच्या अनुभवामुळे अध्यात्मपर जीवनाचा प्रवाह बंद होत नाही, अगर व्यवहारांतील गोष्टींचें सापेक्ष महत्त्व नष्ट होत नाही. आत्मीयतेची भावना ही अखिल वस्तुमात्राशीं संवादिता उत्पन्न करते; पण त्यामुळे तुलनात्मक विवेक नष्ट होत नाही. तसेंच या सर्वात्मभावनेंत अचल शांति मिळते; परंतु सभोवतालच्या परिस्थितीविषयी बेफिकिरी उत्पन्न होत नाही. आणि ही एकत्वाची जाणीव कल्पनांच्या संचयावर आधारलेली नसून ज्यामध्ये सर्वांचा समावेश होतो, अशा अन्तिम सत्याशीं वस्तुतः झालेल्या ऐक्यावर अधिष्ठित असते.

सर्व वासनांचा निरास करून आणि अन्तिम सत्याशीं एकरूप होण्याची केवळ एकच इच्छा ठेऊन, तुमचें अन्तःकरण खुलें करा.

अंतिम सत्याशीं ऐक्य

सभोवतालच्या बदललेल्या परिस्थितीमध्ये तें अन्तिम सत्य शोधावयाचें नसतें, तर तें स्वतःमध्येच शोधावयाचें असतें. जेव्हा जेव्हा अंतरात्मा तुमच्या मानवी अन्तःकरणांत प्रवेश करण्याची इच्छा करतो, तेव्हा तेव्हा तें वासनांनी परिपूर्ण भरलेलें व सर्व द्वारें बंद असलेलें आढळून येते. तुमच्या अंतःकरणाचीं द्वारें बंद ठेवूं नका. सर्व भूतमात्रांत शाश्वत आनंदाचें उगमस्थान आहे, तरीही अज्ञानाने उत्पन्न

झालेल्या वासनामुळे, सर्व लोक दुःखीच असतात. उपाधियुक्त अहंभाव जेव्हा सर्व वासनांसहित मावळतो, तेव्हाच चिरंतन आनंदाचें ध्येय पूर्णपणें प्रकाशमान होतें.

वासनांचा त्याग ह्मणजे देहदंड किंवा जीवनविषयक निषेध-प्रधान वृत्ति नव्हे. अशा प्रकारच्या केवळ निषेधात्मक वृत्तीमुळे मानव अमानुष बनेल. देवपणा मानवतेस सोडून नाही. अध्यात्माने मानवतेचा उत्कर्ष झाला पाहिजे. मनुष्यांमध्ये जें चांगलें, विशाल आणि सुंदर असेल, तें प्रकट करण्याची प्रवृत्ति ह्मणजेच अध्यात्म होय. परिस्थितीमध्ये जें सुंदर आणि मधुर असेल, त्या सर्वांचा अध्यात्मामुळे परिपोष होतो. अध्यात्मपर जीवन ह्मणजे बेजबाबदारपणा नाही; व त्याकरिता व्यवहारांतील कर्तव्यांचा त्याग करण्याची आवश्यकता नाही. व्यक्तीचे समाजांतील विशिष्ट स्थान व त्याची परिस्थिति; यामुळे उत्पन्न होणारी जबाबदारी पार पाडतांना अगर व्यवहारांतील कर्तव्य करीत असतांना, अन्तरात्मा वासानासंभारापासून केवळ विमुक्त राहिला ह्मणजे पुरें. द्वंद्वांच्या गुंतागुंतीपासून आलिप्त असण्यांतच पूर्णता आहे. ही गुंतागुंत सुटल्याशिवाय, अबाधित व उद्धवकर आस्तित्वास प्रारंभ होऊं शकत नाही. परंतु गुंतागुंतीच्या भीतीने जीवनापासून दूर पळण्याने ही मुक्तता प्राप्त होत नसते. असलें पळणें म्हणजे जीवनाचा निषेध होय. निसर्गांतून व्यक्त होणाऱ्या द्वंद्वापासून दूर राहण्यांत पूर्णता नाही. या गुंतागुंतीपासून दूर पळण्याच्या प्रयत्नांत, जीवनाबद्दलची भीति दिसून येते. द्वंद्वाचा प्रभाव होऊं न देतां, जीवनास व्यवस्थित-

अध्यात्म हो जीवनविषयक निश्चयात्मक प्रवृत्ति होय.

पणे व पूर्णपणें तोंड देणें, यांतच परमार्थ आहे. परमार्थ म्हणजे मनाची निर्भ्रान्त स्थिति असून, त्याच्या प्रभावांत सर्व प्रकारचा मोह निर्बल होतो. जीवनाच्या निरनिराळ्या स्वरूपांशीं संबंध न टाळतां, सिद्ध पुरुष हा आत्यन्तिक कर्तव्यतत्परता राखूनहि पूर्णपणे अलिप्त राहूं शकतो.

---

## १३ : : : ईश्वर व व्यक्ति

ईश्वर अनंत आहे. तो चांगलें व वाईट, खरें व खोटें, सुख व दुःख, जन्म व मृत्यु —या सर्व द्वंद्वांहून श्रेष्ठ आहे. अद्वैत सत्य हेंच ईश्वराचें स्वरूप होय. ईश्वराला निराळें असें अस्तित्व नाही.

**ईश्वर हेंच एक सत्य होय**

ज्याप्रमाणें चांगलें हें वाईटाचें विरोधी असतें, त्याप्रमाणें ईश्वर देखील, ईश्वर नसलेल्या वस्तूचा विरोधी आहे, अशी शंका घेतल्यास, ईश्वराचें अनंतत्व हें मर्यादितेच्या विरुद्ध आहे, असा गैरसमज होतो. जेव्हा आपण अनंतत्व व मर्यादिता या दोघांविषयीं बोलतों, तेव्हा आपण त्यांना दोन निरनिराळे असें दाखवितों; आणि अनंतत्व हें मर्यादिता-विरोधी बनतें. परंतु अनंतत्व हें द्वंद्वातीत आहे. जेव्हा आपण अनंतत्व हें मर्यादितपणाच्या विरुद्ध आहे, अशा दृष्टीने पाहतों, तेव्हा, खरें पाहिलें असतां, तें अनंत राहत नाही, तर मर्यादितपणाचा एक विरुद्ध भाग म्हणून तें समजलें जातें; व म्हणून तें मर्यादित बनतें. आणि ज्याअर्थी अनंतत्व हें मर्यादितपणाची दुसरी बाजू होत नाही, त्याअर्थी मर्यादितपणाचें भासणें खोटें ठरतें, कारण खरें

अस्तित्व अनंत सत्यालाच आहे. ईश्वर केव्हाहि द्वैतांत बांधला जाऊं शकत नाही. वास्तविक पाहतां, सत्य हें एकच आहे; व तें सर्वान्तर्यामी आहे. मर्यादितपणाचें अस्तित्व केवळ काल्पनिक आहे.

तुम्ही अनंत आहां. तुम्ही खरोखरच सर्वांतरात्मा आहां. परंतु तुम्हा शरीरालाच 'मी' म्हणून समजता व म्हणून स्वतःला मर्यादित मानता. शरीर हेंच माझें खरें स्वरूप होय, असा जर तुम्ही विचार कराल, तर तुम्हीं आपलें खरें स्वरूप ओळखलें नाही, असेंच म्हणावें लागेल. तुम्ही स्वस्वरूपाचा शोध करून आत्मस्वरूपाचा खरा अनुभव घ्याल, तर तुम्हाला खात्रीने कळून येईल, कीं वस्तुतः तुम्ही अनंतच आहांत, व सर्व भासमान जगाच्या पलीकडे आहां. परंतु तुम्ही 'मी देह आहे' अशी चुकीची समजूत करून घेता. हीच चुकीची समजूत म्हणजे अज्ञान होय. अज्ञान हें मनाच्या द्वारें कार्यक्षम होतें. साधारण मनुष्य स्वतःला स्वतःचें शरीर समजतो; आध्यात्मिक उन्नति झालेला मनुष्य स्वतःला सूक्ष्म शरीर समजतो; साधु लोक स्वतःला कारण शरीर समजतात. परंतु यांपैकीं कोणालाहि आत्म्याचें खरें खरें स्वरूप कळलेलें नसतें. आत्मा हा अनंत आहे; व तो मन व शरीराहून भिन्न आहे. परंतु, अज्ञानामुळे आत्मा हा मनाच्या आधीन होतो; व स्वतःला कधीं शरीर तर केव्हा मन असें मानतो. जो मायेंतून मुक्त झाला नाही, तो मनुष्य जगांत निरनिराळ्या असंख्य व्यक्ति आहेत, असें समजूं लागतो. जितकीं मनें व शरीरें दिसतात, तितक्या

मर्यादितपणाचें दिखाऊ अस्तित्व

निरनिराळ्या व्यक्ति आहेत, असें त्याला वाटूं लागते. वस्तुतः आत्मा हा एक असून, तो सर्वान्तर्यामी आहे. परंतु प्रत्येक व्यक्ति स्वतःला इतरांपासून निराळी समजते. सर्व निरनिराळ्या भास-णाऱ्या व्यक्तींच्या मनामागे व शरीरामागे एकच शक्ति (आत्मा) वास करते, व त्यांमधूनच त्यांना अनेकत्वाचा अनुभव येतो. सर्वान्तर्यामीं एकच असणारा आत्मा अनेकसा भासूं लागतो, ह्याचें कारण मनाची भ्रामक कल्पना अथवा चुकीची विचारसरणी हें होय.

संचित संस्कारांमुळे चुकीच्या विचारांस चालना मिळते; व संस्कार-जन्य वासनांमुळे जाणीव आपलें खरें कार्य करूं शकत नाही. मागील

अशुद्ध विचारसरणीचे कारण.

अनेक जन्मांतील निरनिराळ्या अनुभवांच्या संस्कारांचा पगडा जाणिवेवर असतो; व ह्याच संस्कारांमुळे आत्म्याविषयींचें ज्ञान झाकलें जातें. विचारांत संस्कारांच्या आवरणाचा भंग करण्याची शक्ति नसेल, तर स्वतःच्या चुकीच्या विचारामुळे, जाणिवेंत भ्रम उत्पन्न होतो; व हा भ्रम जाणिवेची कमी उत्क्रांति झालेल्या प्राण्यांतच दिसून येतो, असें नसून, जाणिवेचा पूर्ण विकास झालेल्या मानवांतहि दिसून येतो.

दगडाच्या योनींतून क्रमाने उत्क्रांति पावणारी जाणीव, हळूहळू वाढत जाऊन, मानवयोनींत पूर्ण विकास पावते. उत्क्रांतीचा इति-

पूर्ण जाणिवेचें क्षेत्र.

हास म्हणजे जाणिवेच्या संथपणें झालेल्या उन्नतीचा इतिहास आहे. उत्क्रांतीचें फळ म्हणजे पूर्ण जाणीव होय: व ती मनुष्यांत आढळते. परंतु ही पूर्ण

जाणीव देखील धुळीने आच्छादिलेल्या आरशाप्रमाणे असते. पूर्व- संस्कारांच्या प्रतिबंधामुळे, ही मानवी पूर्ण जाणीव आत्म्याच्या स्वऱ्या स्वरूपाचें ज्ञान प्रकट करूं शकत नाही; म्हणूनच ती आपलें यथार्थ कार्य करण्याच्या कामीं असमर्थ असते.

जाणिवेंत अहंभावाचा जन्म.

मनुष्यांतील अनेक संस्कारांमुळे जाणिवेला एका ठराविक मर्यादेंतच वावरावें लागतें, व तिचें कार्य निरनिराळ्या वासनांनी अधिक निश्चित केलें जातें. परंतु वासना आपली पूर्ति करण्यास प्रवृत्त होत असल्यामुळे, पूर्ण जाणीव देखील व्यक्तिनिष्ठ व स्वार्थी बनते. जाणिवेची पृथकता ही एका प्रकारें निरनिराळ्या वासनांमुळे उत्पन्न झालेल्या नदींतील भोवऱ्याप्रमाणे होय. आत्मा हा वासनांत गुरफटला जातो; आणि त्याच्यामुळे निर्माण झालेल्या वर्तुळाच्या बाहेर तो पडूं शकत नाही. तो आपल्याच कल्पनेने ह्या मर्यादा निर्माण करतो; व त्यांतच स्वतः मोहवश होतो. नंतर तो स्वतःला मर्यादित व इतरांहून निराळा पाहतो. तो व्यक्तिगत अस्तित्वांतच गटंगळ्या खातो; व जितकीं मनें व शरीरें दृष्टीस पडतात, तितक्या त्याला निरनिराळ्या अनेक व्यक्ति भासतात.

निराळेपणा हा कल्पनेचा आभास होय.

एखाद्या बिलोरी कांचेंतून सूर्याचीं किरणें जाऊं दिलीं असतां तीं विस्कळित होतात; व कांचेमुळे त्यांना अनेकत्व प्राप्त होतें. जर या प्रत्येक किरणाला जाणीव असती, तर त्यांनी स्वतःला दुसऱ्याहून पृथक मानलें असतें; व त्यांना आपण एकाच सूर्यकिरणांतून उत्पन्न झालेले आहोंत, याविषयी विसर पडलेला दिसून आला असता. त्याच-

प्रमाणे, एकच सर्वश्रेष्ठ आत्मा हा मायेच्या जाळ्यांत अडकून स्वतःला अनेक समजूं लागतो. पण खरें पाहतां, असें मुळीच नसतें. व्यक्तीचें पृथकत्व हें खरें पाहिलें असतां अस्तित्वांतच नसतें. पण कल्पनेमुळे व्यक्तीला पृथक् अस्तित्वाचा भास होतो. सर्वान्तर्यामी एकच असणारा आत्मा स्वतःलाच पृथक् मानूं लागतो; आणि या पृथक् भावनेमुळे, 'मी' व 'माझे' आणि 'तूं' व 'तुझे' असा भेदभाव उत्पन्न होतो. खरें पाहिलें असतां, आत्म्याचे कोणतेच भाग पडूं शकत नाहीत. तो सर्वांत सारखाच असला, तरी स्वतःला पृथक् पृथक् व विभागला गेलेला असा निव्वळ कल्पनेमुळे मानतो. ही खोटी कल्पना आहे. कल्पना अत्यंत विशाल असली, तरी ती सत्यापासून दूरच असते. कल्पना ही सत्याव्यतिरिक्त इतर कांहीहि असूं शकेल. आत्म्याला निराळेपणांत जो कांही अनुभव येतो, तो सर्व काल्पनिक होय. आत्म्याच्या या पृथकतेच्या कल्पनेंतूनच अनेक व निरनिराळ्या भासणाऱ्या व्यक्ती उदयास येतात. यालाच अज्ञान किंवा माया म्हणतात.

मर्यादित व पृथक् अस्तित्वाबरोबरच स्थूल जगताच्या काल्पनिक अस्तित्वास सुरुवात होते. ज्याप्रमाणे मर्यादित व पृथक् अस्तित्वाला केवळ कल्पनासाम्राज्यांतच अस्तित्व असतें, त्याचप्रमाणें या स्थूल जगताला देखील खरें वास्तव्य नसून, कल्पनेमुळेच तें अस्तित्वांत आहे, असा भास मात्र होतो. जेव्हा आत्मा मायेच्या द्वैतांत उतरतो, तेव्हा त्याला मर्यादितपणा व विविधता प्राप्त होते. हा आत्म्याने स्वतः निर्माण केलेला मर्यादितपणा, म्हणजे जाणिवेच्या यज्ञवेदींत केलेला त्यागच होय. जरी तो पूर्वीप्रमाणेच अनंत व एक

दृश्य जगत्

असतो, तरी काळाने मर्यादित, अनेक प्रकार असलेल्या आणि उत्क्रांति होत असणाऱ्या या जगतांत आल्यामुळे, त्याला अपरिमित संकुचितपणा प्राप्त होतो. तरी देखील आत्म्याचें अधःपतन खरोखर होत नसून, मर्यादित व पृथक् अस्तित्व उत्पन्न होणाऱ्या जाणिवेंतच बदल होत असतो.

तिहेरी घोटाळा व द्वैत.

मर्यादित व्यक्तित्वाचा इतिहास म्हणजे मन, प्राण व शरीर यांच्यामुळे उत्पन्न होणारा तिहेरी घोटाळ्याचा इतिहास होय. या तिन्ही प्रकारांत द्वैतभाव असतो; आणि आत्मा मूलत: अद्वय असतांना देखील स्वतःला या घोटाळ्यांत गुरफटून घेतो. द्वैतभाव हा विरोध उत्पन्न करतो. चांगलें व वाईट, सद्गुण व दुर्गुण हीं असल्या विरोधाचींच उदाहरणें होत. द्वैतांत सांपडलेला अज्ञानी आत्मा हा चांगल्या व वाईट या दोहोंच्याही जाळ्यांत अडकून जातो. चांगलें व वाईट या द्वंद्वाला अज्ञानामुळे अस्तित्व प्राप्त झालेलें आहे; पण एकदा आत्मा यांत गुरफटला गेला, की त्याचेवर त्यांचा अंमल सुरू होतो. शरीर, मन व प्राण या तिघांची उत्क्रांति होत असतांना उत्पन्न होणाऱ्या घोटाळ्यामध्ये आत्मा वासनेच्या आधीन होतो. त्याला या स्थूल, सूक्ष्म व कारण जगांतील चांगलें व वाईट दोन्हीहि हवें असतें. आणि चांगलें व वाईट यांच्या विषमतेमुळे, वासनादेखील या विरोधाच्या ओढाताणीमुळे मर्यादित बनतात. यामुळे आयुष्यांत एका स्थितींतून दुसऱ्या स्थितींत नेणारे व कधी न संपणारे हेलकावे उत्पन्न होतात; व जीवनाला अनंतत्व कधीहि प्राप्त होत नाही. अमर्यादितपणा हा अखंड व कधी न बदलणाऱ्या तत्त्वमयत्वांतच अनुभवास

येतो. अनंत अशा परमेश्वराचा शोध हा द्वैताहून श्रेष्ठ असणाऱ्या भूमिकेंत करावयाचा असतो; आणि जेव्हा जाणीव संस्कारांनी निर्माण केलेल्या द्वैतांतून बंधमुक्त होते, तेव्हाच हें शक्य हात.

आपण आता पाहिलेंच आहे कीं, जाणिवेचें क्षेत्र संस्कारांनी मर्यादित झालेलें असतें. ही मर्यादिता मानवी अंतःप्रज्ञेचे दोन भाग पाडते. एक भाग जाणिवेच्या टप्प्यांत असतो; व दुसरा भाग जाणिवेच्या टप्प्याबाहेर असतो. ही नेणीव सृष्टीमागील आदिशक्तीशीं एकरूप असून, तिलाच लोक ईश्वर म्हणतात. नेणिवेंत असलेलें तत्त्व जाणिवेंत आणून, त्याला अंतिम सत्य म्हणून ओळखावयास पाहिजे. जाणिवेचा विस्तार म्हटला, म्हणजे जें पूर्वी खरोखर माहीत नव्हतें, त्याची जाणीव करणें हाच होय. सत्यप्रकाशित जाणिवेला कार्य करण्यांत कोणतेच अडथळे उद्भवत नाहीत. अशा प्रकारच्या उच्च स्थितींतील पूर्ण जाणिवेमध्ये आणि साधारण मनुष्याच्या जाणिवेमध्ये एकोणपन्नास महत्त्वाच्या पायऱ्या आहेत.

जाणीव व नेणीव यांतील फरक.

पूर्णतेस पावलेल्या सत्पुरुषांची (सद्‌गुरूंची) पूर्णप्रकाशित जाणीव आणि साधारण मानवांची आवरणयुक्त जाणीव ह्यांच्यामधील महदंतर हे अहंभाव उत्पन्न करणाऱ्या संस्कारांमुळे उत्पन्न होतें. हे संस्कार पवित्र शील, भक्ति व निःस्वार्थी सेवा यांमुळे नाहीसे होतात. परंतु ह्या बाबतींत उत्तम प्रगति सद्‌गुरूंच्या मदतीने होते. आध्यात्मिक उन्नति ही जाणिवेचा अधिक विकास करण्यांत नसून (कारण मानव

आध्यात्मिक उन्नति.

योनींत जाणिवेचा पूर्ण विकास झालेला असतो), तिला संस्कारांच्या बंधनांतून मुक्त करण्यांतच असते. जरी तत्त्वतः जाणीव ही निरनिराळ्या स्थितींत एकच असते, तरी जोंपर्यंत तिला आपल्या अनंतत्वाचें निःसंशय ज्ञान प्राप्त होत नाही व सर्व चराचराचें मूळ आपणच आहों हा प्रत्यक्ष अनुभव येत नाही, तोंपर्यंत ती पूर्ण जाणीव सत्यप्रकाशित समजली जाऊं शकत नाही.

गाढ निद्रा

झोपी जातांना, प्रत्येक वेळेस तुमचें अनंत आत्म्याशीं ऐक्य होतें; परंतु ह्या तादात्म्याचें तुम्हांस तेव्हा भान नसतें. ह्या तादात्म्यस्थितींत असतांना जाणिवेवर अज्ञानाचें आवरण असतें. ह्या स्थितींत, जाणीव व नेणीव ह्यांतील अंतर नाहींसें होतें. परंतु अनंतत्वाशीं झालेल्या ह्या ऐक्याचें झोपेंत भान नसल्यामुळे, तुम्हांस त्यापासून बुद्धिपुरःसर कांही फायदा करून घेतां येत नाही. ह्याच कारणामुळे, पुन्हा झोपेंतून जागे झाल्यावर, तुम्हांला पूर्वीच्याच सामान्य व्यक्तित्वाचें स्मरण होतें; व नंतरहि तुम्ही व्यक्तिगत जीवनच चालू करता. जर तुमचें आत्म्याशीं झालेलें ऐक्य तुम्हाला ओळखतां आलें असतें, तर निजून उठतांच तुम्हाला फार फरक झालेला आढळून आला असता; कारण त्यानंतरचें तुमचें जीवन अतिशय प्रभावशाली व पूर्ण झालें असतें.

सत्याशीं जाणीवपूर्वक झालेले ऐक्य

सद्गुरु हे सत्याशीं (ईश्वराशीं) जाणीवपूर्वक एक झालेले असतात. ते आपणच स्वयं परमात्मा असल्याचा अनुभव घेतात. त्यांच्या बाबतींत, जाणीव व नेणीव यांतील अंतर जाणीव स्वतः नेणिवेवर आक्रमण करून नाहींसे करते. ह्याचे उलट, निद्रित

मनुष्याची नेणीव त्याच्या जाणिवेवर आक्रमण करते. जाणिवेची वाढ किंवा क्षय हे फक्त मर्यादित मानवाचे बाबतींतच होत असतात. पूर्ण सद्गुरूचे बाबतींत, जाणिवेने नेणिवेवर कायमचा व अखंड विजय मिळविलेला असतो. त्यांची सत्चिदानंद स्थिति कधींही क्षय पावत नाही. यावरून आपणास कळेल, की सामान्य दृष्टीने सद्गुरू कधींही झोपी जात नाहीत. जेव्हा ते शरीराला विश्रांति देतात, तेव्हा त्यांना आपल्या जाणिवेंत अंतर किंवा खंड पडल्याचा कधीच अनुभव येत नाही.


पूर्णप्रज्ञ स्थिति.

पूर्णप्रज्ञ स्थितींत, जाणीव ही प्रकाशमान न होऊं देणाऱ्या सर्व अडचणींना दूर करून, स्वत: पूर्णपणे फलद्रूप झालेली असते. नेणिवेचा जाणिवेशीं होणारा लढा अगोदरच संपून गेलेला असतो; आणि मनुष्य आत्मज्ञानरूपी सूर्याच्या प्रकाशांत पूर्णपणें प्रकाशमान होतो. तो पूर्ण आत्मैक्य अनुभवितो; किंवा स्वतःच प्रकाशरूप बनतो. जोंपर्यंत मनुष्य द्वैतांत गुरफटलेला असतो व त्यांतील अनुभवालाच अंतिम सत्य मानतो, तोंपर्यंत तो अज्ञानामुळे निर्माण झालेल्या मर्यादेंतच वावरत राहतो. एकमेव अनंतत्व हेंच खरें सत्य होय. अनंतांत सर्वांचा समावेश होतो; त्याला दुसरा कोणताहि प्रतिस्पर्धी उरत नाही. ज्याला या अनंत आत्म्याचा अनुभव होतो, त्याची जाणीव उच्च व अंतिम स्थितीप्रत पोहोचलेली असते. ह्या स्थितींत, उत्क्रांतीमुळे प्राप्त झालेली पूर्ण जाणीव कायमच असते. परंतु तिच्यावरील संस्कारांचें व वासनांचें आवरण नाहींसें झालेलें असतें; व अज्ञानामुळे आलेल्या मर्यादित व्यक्तित्वाचें अनंत व अमर्याद अशा ईश्वरत्वांत रूपांतर होतें.

अनंत आत्म्याची अमर्याद जाणीव जरी प्रत्येकाला व्यक्तिगत (Personal) प्राप्त होते, तरी ती कोणत्याहि प्रकारचा भ्रम उत्पन्न करीत नाही. असा मनुष्य स्वार्थामुळे निर्माण झालेल्या वासनांतून मुक्त होतो; व आध्यात्मिक उन्नतीला चालना देण्यास एक ईश्वरी व अनंत शक्तीचें केंद्र बनतो. अज्ञानाच्या नाशामुळे व्यक्तित्व मर्यादारहित बनतें. अशी व्यक्ति, मायेच्या पृथक् भावनेमध्ये कधीच न फसणारी व अविनाशी असल्यामुळे, सतत मुक्त स्थितीचा आनंद अनुभवीत असते. या मुक्त स्थितींत, सर्व जग शून्यवत् स्वप्नमय भासतें; आणि अखंड आनंद व पावित्र्याचा लाभ होतो. साधारण मनुष्याला दुःखित व बेचैन करणारी माया अशा पुरुषापासून दूरच राहते. एका अर्थी, तो मृत असतो, कारण निरनिराळेपणाचा अनुभव आणणारा त्याच्यांतील व्यक्तिगत अहंभाव कायमचा नाहींसा होतो. परंतु दुसऱ्या अर्थी, तो नेहमीकरताच सत्‌चिदानंदस्थितीचा अनुभव घेऊन अमर बनतो. अशा पुरुषांत, अनंत शक्ति व ज्ञान वास करते; आणि सर्व जगांतील मानवांची आध्यात्मिक उन्नति करण्याकरता, हें विश्व त्याचें आध्यात्मिक क्षेत्र बनतें.


## विभाग २ रा

# श्रीमेहेरबाबांचे दिव्य संदेश



" केवळ शब्दमय शिकवणूक नव्हे, तर आत्मजागृति देण्याकरता मी आलों आहे. "

—श्रीमेहेरबाबा


पाषाण देह
धातु देह
वनस्पति देह
कीटक देह
मत्स्य देह
पक्षी देह
पशु देह
मानव देह
अवतरण
पक्षी
पशु
मानव
स्थूल जग
सूक्ष्म जग
कारण जग
पूर्ण जागृति
परमात्मस्थिति
परब्रह्म

म. ग्र. सं. ठाणे.
नं. .....................

१

# उत्क्रांति, जन्मपरंपरा व मोक्षमार्ग

## प्रास्ताविक

उत्क्रांति, जन्मपरंपरा व मोक्षमार्ग ह्यांमधून प्रवास केल्यावर आत्म्याला स्वानुभव येऊं शकतो. पूर्ण जाणीवशक्ति मिळविण्या-साठी, तो उत्क्रांतीच्या प्रक्रियेमध्ये आपल्या भोवती वाढत्या प्रमाणांत संस्कार गोळा करीत जातो. व अखेरीस मानवदेह मिळाला, म्हणजे त्याला पूर्ण जाणीव व सर्व प्रकारचे स्थूल संस्कार प्राप्त होतात.

यानंतर मानवदेहांतच आत्म्याची जन्मपरंपरा चालू होते. या अनेक जन्मांमध्ये, उत्क्रांतींत मिळालेली पूर्ण जाणीव कायम ठेऊनच तो नानाविध चांगल्या व वाईट संस्कारांचा आळीपाळीने अनुभव घेतो. मोक्षमार्गांत प्रवेश केल्यावर देखील आत्म्याची पूर्ण जाणीव कायमच राहते. परंतु आत्म्यावरील संस्कार उत्तरोत्तर फिके पडत जातात: व अखेरीस ते सर्व नष्ट होऊन, केवळ पूर्ण जाणीवच कायम राहते.

संस्कार फिके होत असतांना स्थूल संस्कार सूक्ष्म बनतात; नंतर हे सूक्ष्म संस्कार मनोरूप ( mental ) होतात; व अखेरीस सर्व संस्कार पूर्णपणें नाहीसे होतात.

मानवदेह प्राप्त होईपर्यंत, आत्म्यावरील संस्कारांचे गुंडाळे उत्क्रांतीच्या क्रमांत अधिकाधिक वाढतात व दृढ होतात; व मानवदेह प्राप्त झाल्यावरसुद्धा, जन्मपरंपरेचा अनुभव घेत असतांना, हे संस्कारांचे गुंडाळे कोणत्याहि प्रकारें कच्चे होत नाहीत. परंतु, मोक्षमार्गामध्ये प्रगति करीत असतांना, संस्कारांचे गुंडाळे हळूहळू उकलले जातात, व अखेरीस आत्मसाक्षात्काराच्या स्थितींत, आत्म्यावरील सर्व संस्कार पूर्णपणें नष्ट होतात.

सर्वान्तर्यामी असणारा परमात्माच सत्य वस्तु होय. परमेश्वराशिवाय दुसऱ्या कोणत्याहि वस्तूला खरें अस्तित्व नाही. निरनिराळे भासणारे सर्व जीवात्मे ह्या परमात्म्यामध्येच असून ह्याच्याहून मुळीच निराळे नाहीत. उत्क्रांति, जन्मपरंपरा व मोक्षमार्ग ह्यांची आवश्यकता आत्म्याला स्वतःच्या स्वरूपाची यथार्थ जाणीव होण्यासाठीच आहे. उत्क्रांति चालू असतां, संस्कारांचे गुंडाळे निर्माण होतात. या संस्कारांमुळे जाणिवेला जरी बंधन होत असले,तरी त्यांच्यावाचून जाणिवेचा उत्तरोत्तर विकास होऊं शकत नाही. मोक्षमार्गांत संस्कारांचे गुंडाळे पूर्णपणें उकलले जातात, तेव्हा जाणिवेचें सर्व प्रकारचें बंधन नष्ट होऊन, उत्क्रांतीनंतर तयार झालेली पूर्ण जाणीवच अखेर कायम राहते.

उत्क्रान्तिक्रमांत संस्कारांचे गुंडाळे उत्पन्न होत असतांना, आत्मा सात पायऱ्या ( भूमिका ) खाली उतरतो; आणि मोक्षमार्गांत

संस्कारांचे गुंडाळे उकलले जात असतांना, आत्मा सात पायऱ्या वर चढतो. परंतु उतरणें व चढणें हे दोन्हीही केवळ भास होत. सर्व-व्यापी आत्म्याची अखंड अनंतता सर्व स्थितींत कायमच असते; त्यांत चढणें, उतरणें किंवा इतर दुसरी कोणतीहि हालचाल होत नाही.

निरनिराळ्या राष्ट्रांचे, धर्मांचे व जातींचे जे स्त्रीपुरुष आहेत, त्या सर्वांचा आत्मा एकच आहे; व त्यांना परस्परांना मदत किंवा विरोध करण्याचा, त्याचप्रमाणे शांततेचा किंवा युद्धाचा, चांगला किंवा वाईट जो अनुभव येतो, तो देखील शून्यस्वरूप असलेल्या देहांच्या किंवा मनांच्या द्वारें मिळत असल्यामुळे, भ्रमाचाच भाग आहे.

द्वैतांतील रूपमय सृष्टि उत्पन्न होण्यापूर्वी, ज्ञान, शक्ति व आनंदाचा अखंड व अमर्याद महासागरच असलेला परमात्मा यांशिवाय दुसरी कोणतीहि वस्तु अस्तित्वांत नव्हती. परंतु ह्या महासागरास स्वतःचा जाणीवयुक्त अनुभव नव्हता. कल्पना करा की, हा महासागर अत्यंत शांत व स्थिर आहे, व स्वतःच्या शक्तीची, ज्ञानाची व आनंदाची जाणीवही त्याला नाही; एवढेंच नव्हे, तर आपण स्वतः महासागर आहोंत, हें देखील त्याला माहीत नाही; व ह्या महासागरांत जे असंख्य जलबिंदु आहेत त्यांना देखील आपण जलबिंदु असल्याची, महासागरांत असल्याची किंवा महासागराचाच भाग असल्याची जाणीव नाही. परमात्म्याची प्रारंभींची स्थिति अशी होती.

स्वतःचें स्वरूप कळण्याची जिज्ञासा जागृत झाल्यामुळे ह्या महासागरांत खळबळ उत्पन्न होते. ही जिज्ञासा ह्या महासागरांत पहिल्यापासूनच सुप्त स्थितीमध्ये होती. जेव्हा ही जिज्ञासा व्यक्त होऊं लागते, तेव्हा महासागरांतील प्रत्येक बिंदूला व्यक्तित्व प्राप्त होतें. ह्या जिज्ञासेमुळे महासागरांतील शांत जलामध्ये जेव्हा खळबळ उत्पन्न होते, तेव्हा त्यामधील जलबिंदूंच्या सभोवतीं अनेक बुडबुडे किंवा आकार उत्पन्न होतात; व ह्या बुडबुड्यांमुळेच जलबिंदूंना म्हणजे जीवात्म्याला व्यक्तित्व प्राप्त होतें. बुडबुड्यांमुळे अखंड महासागरांत खरोखरचे निरनिराळे भाग होत नाहीत. त्यांच्यामुळें जलबिंदु हे महासागरापासून वास्तविकपणें निराळे होऊं शकत नाहीत. बुडबुड्यांमुळे जलबिंदूंना निराळेपणाचा किंवा व्यक्तित्वाचा केवळ आभास मात्र होतो.

आता आपण एका जलबिंदूचें किंवा जीवात्म्याचें जीवन आरंभापासून शेवटपर्यंत पाहूं. सभोवती बुडबुडा किंवा आकार निर्माण झाल्यामुळे, जलबिंदूमध्ये किंचित् जाणीव उत्पन्न होऊन, व्यक्तित्वाचा म्हणजे निराळेपणाचा भास उत्पन्न होतो. जलबिंदूंत म्हणजे जीवात्म्यांत उत्पन्न झालेल्या ह्या जाणिवेला आत्म्याचें किंवा महासागराचें ज्ञान नसतें; तर ह्या जाणिवेला शून्यस्वरूप असलेल्या बुडबुड्यांचें म्हणजे देहरूप आकारांचेंच ज्ञान असतें. प्रारंभीचा पहिला अपूर्ण बुडबुडा म्हणजे दगड होय. कालांतराने हा बुडबुडा फुटून त्याच्या जागीं दुसरा उत्पन्न होतो, तेव्हा खालील दोन गोष्टी घडतात. ( १ ) जाणिवेचा अधिक विकास होतो; व ( २ ) पूर्वीच्या बुडबुड्यांत जे संस्कार उत्पन्न झालेले असतात, त्या

सर्वांना एक प्रकारची गाठ बसून, ते पक्के होतात. नवीन बुडबुडा उत्पन्न झाल्यावर जाणीव वाढते; परंतु जलबिंदूच्या म्हणजे जीवात्म्याच्या या वाढत्या जाणिवेंत, नवीन बुडबुड्याचें किंवा आकाराचेंच ज्ञान असतें; स्वतःचे म्हणजे आत्म्याचें ज्ञान नसतें. नंतर हा नवीन बुडबुडा फुटून, तेथे आणखी दुसरा नवीन बुडबुडा किंवा आकार उत्पन्न होतो; व असें होत असतांना, जमलेल्या सर्व संस्कारांना आणखी एक गाठ बसून, जाणीव अधिक वाढते. याप्रमाणे, मनुष्यदेह येईपर्यंत उत्क्रांतीमध्ये दगड, धातु, वनस्पति, कीटक, मासे, पक्षी व जनावरें अशा सात पायऱ्या आहेत. प्रत्येक वेळीं बुडबुडा किंवा आकार बदलत असतांना, जाणीव जास्त वाढून पूर्वीच्या संस्कारांना गाठ बसते; व अखेरीस मनुष्यदेहरूपी बुडबुडा किंवा आकार मिळाला, म्हणजे त्यांत जाणीव पूर्ण विकास पावते. परंतु, उत्क्रांतीमध्ये संस्कारांचीं वेष्टनें निर्माण होत असतांना, संस्कारांना ज्या गाठी बसतात, त्यांच्यामुळे बिंदुरूप जीवात्म्याची जाणीव बुडबुड्यावर म्हणजे आकारावरच जखडून राहते; व ह्याच कारणामुळे, मनुष्यदेहांतसुद्धा, जाणिवेची पूर्ण वाढ झालेली असूनही, आत्म्याला स्वतःचें ज्ञान होऊं शकत नाही.

मनुष्यदेह मिळाल्यावर, जीवात्म्याचा दुसऱ्या स्थितींत प्रवेश होतो. ही दुसरी स्थिति म्हणजे जन्मपरंपरा. मनुष्यदेह मिळाल्यावर संस्कारांचें अधिकाधिक गुंडाळे होण्याची क्रिया बंद होते. ह्या स्थितींत, जीवात्म्याला एकानंतर एक असे चौऱ्यांशी लक्ष देह घ्यावे लागतात. हे मनुष्यदेह कधी पुरुषांचे तर कधी स्त्रियांचे असतात; व त्याचप्रमाणे जीवात्मा अनेक मनुष्यदेह घेऊन, कधी भिकारीपणाचा

तर कधी राज्यपदाचा याप्रमाणे निरानराळ्या सुखदु:खरूप द्वंद्वांचा चांगल्या व वाईट संस्कारानुरूप अनुभव घेतो. मनुष्यदेहांतील या जन्मपरंपरेमध्ये, पूर्वीचे कांही संस्कार खर्च होऊन जातात; परंतु ह्या क्रियेंत संस्कारांचे गुंडाळे उकलले जात नाहीत. कारण, पूर्वीचे संस्कार खर्च होऊन त्यांचा अनुभव घेत असतांना, दुसरे नवीन संस्कार उत्पन्न होत असतात. ज्यावेळीं मनुष्य मोक्ष-मार्गांत प्रवेश करतो, तेव्हाच त्याच्या संस्कारांचे गुंडाळे उकलले जाण्यास सुरुवात होते. ह्या क्रियेंत दुसरे नवीन संस्कार उत्पन्न होत नाहीत; व अखेरीस आत्म्यावरील संस्कारांचीं सर्व वेष्टनें उकललीं जातात.

मनुष्यदेह मिळेपर्यंत, संस्कारांचीं वेष्टनें अधिकाधिक पक्कीं होत जातात. मनुष्यदेहांतील जन्मपरंपरेमध्ये, हीं वेष्टनें कायम राहून तीं जाणिवेला मर्यादित ठेवतात; परंतु प्रत्येक मनुष्यदेह बदलतांना, संस्कारांच्या गाठींना एक धक्का बसतो. अशा प्रकारें मोक्षमार्गांत प्रवेश करण्यापूर्वी, संस्कारांच्या गाठींना चौऱ्यांशी लक्ष धक्के बसल्यामुळे, त्या गाठी ढिल्या होतात.

त्यानंतर मोक्षमार्गांतील वर चढण्याच्या तिसऱ्या प्रक्रियेला सुरवात होते. ह्या प्रक्रियेमध्ये, महासागरांतील जलबिंदूवरील म्हणजे आत्म्यावरील संस्कारांचीं वेष्टनें हळूहळू उकललीं जाण्यास सुरुवात होते. असें होत असतांना, संस्कार उत्तरोत्तर अधिक फिके होत जातात; व आत्म्याची जाणीव हळूहळू स्वत:कडे वळते. आत्मा सूक्ष्म व कारण जगांतील भूमिका उल्लंघन करीत जातो; व त्याचे

सर्व संस्कार नाहीसे झाल्यावर, त्याला आपण स्वतःच परमात्मरूप महासागर आहों, असा जाणीवपूर्वक अनुभव येतो.

परमात्मरूपी अनंत महासागरांत तुम्ही एक जीवरूपी जलबिंदु आहां. तुमचा आत्मा साधारण स्थितीमध्ये आहे. तुम्ही आपल्या जाणिवेने बुडबुड्याचा किंवा आकाराचा अनुभव घेतां. ह्या बुडबुड्याच्या स्थूल (देहरूपी) आवरणामधून, पृथ्वीरूपी जो एक मोठा स्थूल बुडबुडा आहे त्याचा तुम्ही अनुभव घेतां. वास्तविक पाहतां तुम्ही पूर्वीपासूनच परमात्म्याशीं एकरूप आहांत; परंतु तुम्हांला परमात्म्याचा अनुभव येत नाही. तुमची जेव्हा आध्यात्मिक प्रगति होते, तेव्हा तिसऱ्या भूमिकेपर्यंत, तुम्ही आपल्या जाणिवेने सूक्ष्म-जगत्‌रूपी जो एक मोठा सूक्ष्म बुडबुडा आहे, त्याचा अनुभव घेतां; व हा अनुभव तुम्हांला सूक्ष्मदेहरूपी सूक्ष्म बुडबुड्यामधून येतो. परंतु परमात्म्याकडे तुमची जाणीव वळलेली नसते, म्हणून तुम्हाला स्वतः परमात्म्यांतच असूनहि परमात्म्याचा अनुभव येत नाही. तुमची जेव्हा तिसऱ्या भूमिकेपासून सहाव्या भूमिकेपर्यंत प्रगति होते, तेव्हा तुम्ही आपल्या जाणिवेने, कारण-जगद्रूपी जो एक मोठा मनोमय बुडबुडा आहे, त्याचा अनुभव घेतां; व हा अनुभव तुम्हाला कारणशरीररूपी बुडबुड्याच्या द्वारें येतो. ह्या स्थितींत देखील, तुम्हाला परमात्म्याचा अनुभव येत नाही. परंतु, ईश्वरी स्थितीमध्ये, तुम्ही आपल्या जाणिवेने परमात्म्याचाच अनुभव घेतां; व ह्या स्थितींत, सर्व आकार केवळ बुडबुडेच आहेत, असा अनुभव येतो.

आता अशी कल्पना करा, की तुम्ही परमात्मरूपी महासागरांतील बिंदुरूप आत्मा असून, ह्या आत्म्याला स्थूल शरीराशिवाय

आणखी पांच आवरणें आहेत. सध्या तुमचा बिंदुरूप आत्मा स्थूल शरीराकडे व त्याच्याद्वारें स्थूल जगताकडे पाहतो. तसेंच तुम्ही जेव्हा आंतील दुसऱ्या आवरणाकडे व दुसऱ्या आवरणाच्या द्वारें पाहाल, तेव्हा तुमचें स्थूल शरीररूपी पहिलें आवरण हे केवळ आवरणच आहे, असा अनुभव येईल. याप्रमाणे क्रमशः आंतील सर्व आवरणांच्या मागे जाणीवरूपी दृष्टि पोचविली, म्हणजे हीं सर्व आवरणें स्वतःचींच केवळ छायारूप आच्छ दें आहेत, असा अनुभव येतो; व अखेरीस, तुम्ही परमात्म्याकडे जाणीव वळवून त्याच्याशीं एकरूप झालां, म्हणजे प्रारंभापासून, स्वतः तुम्हीच केवळ सत्य होतां, आणि आतापर्यंत तुमच्या अनुभवास आलें, तें तुमच्याच स्वतःच्या छायेवाचून दुसरें कांहीहि नव्हतें, हें निश्चित ज्ञान तुम्हांला मिळतें.

---

# रेखाकृतींचें स्पष्टीकरण

## आकृति नं. १

रेखाकृति नं. १ (पान १३६) मधील मोठें अर्धवर्तुळ सर्वव्यापक परमात्मा (Oversoul) दर्शवितें. परमात्म्यामध्ये जगांतील सर्व वस्तूंचा समावेश होतो. उत्क्रान्ति (Evolution), जन्मपरंपरा (Reincarnation) व मोक्षमार्ग (Process of Realisation), असे जीवात्म्याच्या जीवनामधील तीन मुख्य विभाग दर्शविले आहेत. छोटें वर्तुळ म्हणजे जीवात्मा. नरदेह प्राप्त होण्यापूर्वी जीवात्मा

ज्या दशांमधून जातो त्या अशाः—दगड, धातु, वनस्पति, कृमि, मत्स्य, पक्षी व प्राणी. ह्या प्रत्येक दशेचे सात विभाग होतात. सातवा टप्पा पूर्ण झाला की दशा बदलते; व दशांतराच्या स्थानीं रेखाचित्रांत जी गाठ दिसते, तिचा अर्थ असा आहे, की दशा बदलतांना, पूर्वी मिळविलेले सर्व संस्कार एकत्रित होऊन घन होतात. जीवात्म्याभोवती जें वर्तुळ आहे, तें उत्क्रान्तींत उत्पन्न झालेले संस्कार दाखवितें; व जीवात्म्याखाली जें भरीव लोलक आहे तें संस्कारांबरोबरच्च वाढत असलेली जाणीव दाखवितें. 'अ' जीवात्मा, उत्क्रान्ति, जन्मपरंपरा व मोक्षमार्गाचा अनुभव घेतल्या· वर 'ज्ञ' जीवात्मा होतो. फक्त परमात्मस्थितींतच जाणिवेवर संस्कारांचें आवरण रहात नाही.

उजव्या बाजूला जीं तीन मोठीं वर्तुळें आहेत, तीं क्रमशः खालील तीन भूमि दाखवितातः— (१) अन्नभूमि (gross world (२) प्राणभूमि (subtle world) व (३) मनोभूमि (mental world). नरदेह मिळविण्यापूर्वी स्थूल जगताची जाणीव पूर्णपणें विकसित झालेली नसते, म्हणून दगड, धातु, वनस्पति, कृमि, मत्स्य, पक्षी व प्राणि—यांचे देह असलेल्या जीवा· त्म्यांची जाणीव ही रेषारूपाने स्थूल जगताच्या वर्तुळाला अंशतःच स्पर्श करतांना दाखविली आहे. या रेषा, अनुक्रमें दगड, धातु, वनस्पति कृमि, मत्स्य, पक्षी व प्राणी, या देहां (forms) च्या द्वारें, मनुष्यपूर्व स्थितींतील जीवात्म्यांचा व स्थूल जगताचा जाणीवरूप संबंध दाखवितात. नरदेहांतील जाणीव पूर्ण विकसित असल्यामुळे, त्यांतून जाणाऱ्या रेषा स्थूल जगताच्या संपूर्ण वर्तुळांतून जातांना दाखविल्या आहेत.

मनुष्यदेहांतील जन्मपरंपरेंतून जात असतांना, जीवात्म्याला स्त्रीदेह व पुरुषदेह या दोहोंचा अनुभव घ्यावा लागतो. त्याचप्रमाणे, जीवात्मा कोणत्याहि देशांत, पंथांत किंवा धर्मांत जन्म घेतो. मनुष्यदेह मिळण्यापर्यंतची घटना वर चढण्यासारखी दिसत असली. तरी आत्मज्ञानाच्या दृष्टीने, जीवात्मा ह्या घटनेंत वास्तविक अधिकाधिक खाली उतरत असतो; व मोक्षमार्गांत तो खाली उतरत असल्यासारखें दिसत असलें, तरी तो या घटनेंत आत्मज्ञानाच्या दृष्टीने वास्तविक अधिकाधिक वर चढत असतो. रेखाकृतिमध्ये पहिली ( वास्तविक उतरण्याची ) घटना दाखविण्यासाठी, दगडापासून स्थूलजगतापर्यंत वर गाठी बनवीत जाणारी रेषा काढली आहे; व दुसरी ( वास्तविक चढण्याची ) घटना दाखावण्यासाठीं, स्थूल जगतापासून परमात्मास्थितिपर्यंत खाली गाठी सोडवीत येणारी दुसरी रेषा काढली आहे. गाठी बनण्याची क्रिया संपल्यावर, मनुष्यदेहांतील जन्मपरंपरा सुरू होते; व गाठी सुटण्यास प्रारंभ होईपर्यंत, ती अव्याहत चालू राहते.

मोक्षमार्गांतील पहिल्या भूमिकेपासून तिसऱ्या भूमिकेपर्यंतचे उन्नत जीआत्मे हे स्वतःच्या सूक्ष्म शरीरांशीं तादात्म्य पावून, सूक्ष्म जगताचाच अनुभव घेतात. स्थूल जगताची जाणीव असणाऱ्या साधारण जीवात्म्यांचें त्यांना भान असतें; व ते त्यांच्यावर सूक्ष्म जगतांत कार्यही करतात. परंतु हें सर्व ते स्वतःच्या सूक्ष्म शरीरांमधून सूक्ष्म जगतांत; करतात; व त्यांचा स्थूल शरीरांच्या द्वारां स्थूल जगताशीं कांहीहि संबंध नसतो. त्याचप्रमाणे, चवथ्या भूमिकेपासून सहाव्या भूमिकेपासून उन्नत जीवात्म्यांना स्थूल व सूक्ष्म जगताची


जाणीव असणाऱ्या जीवात्म्यांचें भान असतें. परंतु त्यांच्यावरील आपलें कार्य ते कारणशरीरांतून कारणजगतांत करतात; व स्थूल देहांतून स्थूल जगताशीं, किंवा सूक्ष्म देहांतून सूक्ष्म जगताशीं त्यांचा कांहीही संबंध नसतो. म्हणून, रेखाचित्रामध्ये सूक्ष्मभानाच्या जीवात्म्यांचा संबंध केवल सूक्ष्म जगताच्या वर्तुळाशींच व कारणभानाच्या जीवात्म्यांचा संबंध केवल कारणजगताच्या वर्तुळाशींच रेषारूपाने दाखविला आहे.

परमात्मस्थितीमध्ये, जाणिवेची सर्व संस्कारांपासून मुक्तता होऊन, ती ईश्वराकडे वळते; व ह्या 'मज्झुबांच्या' (विदेही सिद्धांच्या) अवस्थेंत, आत्म्याचा स्थूल, सूक्ष्म अथवा कारण यां पैकी कोणत्याही जगताशीं संबंध रहात नाही. परंतु परमात्मस्थितींतील कांही फारच थोडे आत्मे खाली उतरून सृष्टीची जाणीव पुन्हा मिळवितात; व हेच पूर्ण सद्गुरु होत. सद्गुरूचा आत्मा हा ह्या रेखाचित्रांत एकांत एक बसविलेल्या सात वर्तुळांनी स्वतंत्रपणें दाखविला आहे. (ह्या वर्तुळांचा अर्थ रेखाचित्र नं. २ मध्ये स्पष्ट केला आहे.) संबंध दाखविणाऱ्या रेषांच्या, द्वारें रेखाचित्रांत खालील मुद्दे स्पष्ट केले आहेत, ते लक्षांत घ्यावेत.

(१) सद्गुरुपद मिळालेल्या आत्म्याचा विज्ञानभूमीशीं म्हणजे परमात्म्याच्या सर्वातीत भागांशीं संबंध असतो. ही विज्ञानभूमि सर्व सद्गुरूंचें विश्रांतिस्थान असते. (२) तसेंच त्याचा परमात्मस्थितीशीं संबंध असतो व त्याचप्रमाणे (३) त्याचा तिन्ही जगतांशीं व सर्व जीवात्म्यांशीं (मग ते कारणभानाचे, सूक्ष्मभानाचे किंवा जन्मपरंपरेंतील स्थूल भानाचे साधारण जीवात्मे असोत, किंवा मनुष्यदेहापूर्वीचे उत्क्रान्तिस्थितींमधील जीवात्मे असोत) संबंध असतो.

आकृति नं. २




पाषाण . धातु
वनस्पती
कृमी व कीटक
मासे
पक्षी
पशु
मानव
आत्मज्ञ मानव
स्थूल देह
अत्यल्प जाणीव
बुडबुडा
अत्यल्प नै. प्रवृत्ति
अल्प जाणीव
अविकसित सू. देह
अल्प नै. प्रवृत्ति
वाढती जाणीव
अल्प विकसित सू. देह
अविक. नि. नै. प्र.
वाढती जाणीव
अर्धवि. सू. देह
पूर्ण. नै. प्र. (अल्प बुद्धि)
अपूर्ण जाणीव
स्थूल देह (वासनांचा पूर्ण आविष्कार)
पूर्ण वि. सू. देह (वासनांचा अंश आविष्कार)
मनोदेह (बीजरूप वासना)
बुद्धि
संस्कार (मूल वासना)
व्यष्टी भावाचे स्थान
अहंकार
पूर्ण जाणीव
स्फूर्ति
अंतःप्रज्ञा
स्थूल देह
सूक्ष्म देह
कारण देह
महाकारण देह
समष्टी मन
अनंत आत्मा
अनंत प्रज्ञा

## आकृति नं. २

रेखाचित्र नं. २ (पान १४८)मध्ये उत्क्रान्तिविषयक व मोक्षमार्गविषयक अधिक विस्तृत व सूक्ष्म माहिती दिली आहे. सर्व वर्तुळांचे आंतील सर्वांत लहान छोटें वर्तुळ म्हणजे जीवात्मा. मनुष्यदेह मिळेपर्यंत जीवात्म्याभोंवतींचीं वर्तुळें संख्येने वाढतांना दाखविलीं आहेत; व पुढे हीं सर्व वर्तुळें कायम राहतात. जीवात्म्याच्या वर्तुळाला लागूनच जें दुसरें वर्तुळ आहे, तें त्याची जाणीव (consciousness) दाखवितें. ही जाणीव मनुष्यदेहापर्यंत वाढत जाते; परंतु पुढे ती तशीच कायम राहते. उत्क्रान्तीमध्ये वनस्पतींना फारच थोड्या प्रमाणांत नैसर्गिक अंतःप्रेरणा (instinct) असते; पण त्यांना सूक्ष्म शरीर नसतें. सूक्ष्म शरीर हें अविकसित स्थितींत प्रथम कृमींमध्ये व सरपटणाऱ्या प्राण्यांत आढळून येतें. ह्या सूक्ष्म शरीराचा विकास होत जाऊन, तो मनुष्यदेहांत पूर्ण होतो. सूक्ष्म शरीराच्या विकासाबरोबरच अंतःप्रेरणाहि वाढते. बुद्धि ही अत्यल्प प्रमाणांत प्रथमतः प्राण्यामध्ये निर्माण होते; परंतु कारणदेह हा उत्क्रान्तीच्या शेवटीं मनुष्यदेहांतच उत्पन्न होतो.

मनुष्यस्थितींतील वर्तुळांमध्ये सर्वांत आंतील वर्तुळ म्हणजे जीवात्मा, दुसरें वर्तुळ म्हणजे पूर्ण जाणिव दाखवितात. व त्यावरील इतर सहा वर्तुळे, अनुक्रमें खालील गोष्टी दाखवितातः (१) व्यष्टिभावाचें स्थान, (२) अनाविष्कृत सुप्त वासना अथवा संस्कार, (३) बुद्धि, (४)कारण देहांतील अनुभवांत येणाऱ्या वासना, (५)ज्यांत वासना अंशतः व्यक्त होतात तें सूक्ष्म शरीर, व (६) ज्यांत सर्व वासना पूर्णपणें व्यक्त होतात, तें स्थूल शरीर.

जाणिवेचें वर्तुळ सोडून, जीवात्म्याच्या वर्तुळाभोंवतींचीं इतर सर्व वर्तुळें जाणिवेवरील आवरणांचे थर दाखवितात. ह्या थरांपैकीं सर्वांत बाहेरचें वर्तुळ म्हणजे स्थूल शरीर, व त्याच्या जवळचें आंतील वर्तुळ म्हणजे सूक्ष्म शरीर होत; व बाकीचीं आवरणरूपीं चार वर्तुळें ही कारणदेहाचें ( म्हणजेच मनोदेहाचें ) चार व्यापार दाखवितात. कारणदेहांतील या चार व्यापारांपैकीं इच्छा व विचार ह्या दोहोंचा समावेश बहुधा मनामध्ये करतात; व बीजरूप वासना अथवा अनुदित संस्कार व व्यष्टिभाव, या दोन व्यापाराचा समावेश अहंभावामध्ये करतात. ह्याप्रमाणे, मानवी स्थितींत, जीवात्म्याला तीनच शरीरें असलीं, तरी ( स्थूल देहरूपी आवरण धरून ) सहा आवरणें असतात.

जन्मपरंपरेचा अनुभव घेऊन, मनुष्यदेहधारी आत्मा जेव्हा मोक्षमार्गांत प्रवेश करतो, तेव्हा बुद्धी ( Intellect ) च्या जागीं अंतःस्फूर्ति ( Inspiration ) उत्पन्न होते; व ही अंतःस्फूर्ति पहिल्या भूमिकेपासून तिसऱ्या भूमिकेपर्यंत कार्य करते. पुढे चवथ्या भूमिकेपासून सहाव्या भूमिकेपर्यंत, ह्या अंतःस्फूर्तीच्या जागीं ज्ञप्ति ( Illumination ) चा उदय होतो.

आत्मज्ञ मानवाच्या आत्म्याभोंवतालचीं वलयें किंवा वर्तुळें ईश्वरप्राप्त जीवात्म्यांचें माध्यम (Vehicle) दाखवितात. ह्या रेखाकृतीचे बाबतींत खालील गोष्टी काळजीपूर्वक लक्षांत घ्याव्या:—

(१) सर्वांत वरील तीन वर्तुळें अनुक्रमें स्थूल, सूक्ष्म व कारण शरीरें होत. हीं तीनाहि शरीरें साधारण मनुष्यलाहि असतात.

(२) ईश्वरप्राप्त पुरुषाचे बाबतींत एक नवीन सर्वव्यापक समष्टिशरीर ( Universal body ) असतें. हेंच महाकारण शरीर

असून, हें समष्टिमना ( Uuiversal mind ) चें आश्रयस्थान असतें. ज्याप्रमाणें एखाद्या पेल्यामध्ये पाणी राहावें, त्याप्रमाणें या समष्टिशरीरां (Universal body) त समष्टीमन Universal Mind) राहातें. म्हणून, समष्टिशरीर व समष्टिमन हें जरी दोन निरानिराळ्या वर्तुळांनी दाखविले असले, तरी ते दोन्ही परस्पराहून अलग राहूं शकत नाहीत. सद्गुरूचें समष्टिमन हें आपल्या सर्वव्यापक समष्टिशरीराच्या द्वारां, सृष्टींतील सर्व जीवात्म्यांच्यां कारणदेहांशीं संलग्न असतें; व तें या कारण-देहांच्या द्वारां स्थूल, सूक्ष्म किंवा कारणजगतांत वाटेल तो बदल घडवून आणूं शकतें. त्याचप्रमाणे हेंहि लक्षांत असूं द्यावें, की सद्गुरूला इतरांप्रमाणे जरी कारणदेह ( मनोदेह ) असला, तरी त्याचें सर्व कार्य सतत समष्टिमनांतूनच होत असतें.

( ३ ) सद्गुरूमध्ये मानवी स्थितींतील मर्यादित अहंभाव नसतो. त्याचें परिवर्तन मर्यादारहित परमात्मभावामध्ये झालेलें असतें; व म्हणून, पृथक्त्वाची किंवा संकुचित व्यक्तित्वाची कल्पना जाऊन, त्या ठिकाणीं, अविभाज्य व सर्वव्यापक अशा अनंत अस्तित्वाची प्रतीति येते.

( ४ ) सद्गुरुपदास पोचलेल्या आत्म्याचें ज्ञान अनंत असतें. मानवी स्थितींत, संस्कारांचे आवरण असल्यामुळे, जाणिवेचा पूर्ण विकास झालेला असूनहि, मनुष्याला आत्म्याची अनंतता अनुभवास येत नाही. परंतु ईश्वरप्राप्त मनुष्यामध्ये पूर्ण विकसित जाणिवे-वर अशा प्रकारच्या संस्कारांचें आवरण राहत नसल्यामुळे, त्याच्या जाणिवेंत आत्म्याचें अनंतत्व व्यक्त होतें.

मेहेराबाद, अहमदनगर
१७ मे, १९४३.

# २

# हिंदुस्थानांत रचनात्मक नेतृत्वाची आवश्यकता.*

मानवतेचा आध्यात्मिक इतिहास बनविण्यांत, हिंदुस्थानाने अत्यंत पुरातन कालापासून सर्वांत महत्त्वाचा भाग घेतलेला आहे. हिंदुस्थान, हें अनेक अवतार, सद्‌गुरु, द्रष्टे आणि ऋषि, यांचे माहेरघर आहे; आणि त्या सर्वांनी मानवतेच्या आध्यात्मिक विकासामध्ये अतुलनीय भाग घेतला आहे. भौतिक प्रश्न सोडविण्यातहि, हिंदुस्थानने उल्लेखनीय भाग घेतला आहे; कारण तेथे पहिल्या प्रतीचे अनेक शास्त्रज्ञ, कवि, तत्त्वज्ञ, सम्राट, पुढारी आणि मुत्सद्दी निर्माण झालेले आहेत. पूर्वीच्या काळीं, हिंदुस्थानने जीवनाच्या आध्यात्मिक व भौतिक बाबतींतहि प्राविण्य व महत्त्वाचें स्थान मिळविलें होतें; आणि नवीन भावि जगांतहि हिंदुस्थानचें स्थान अद्वितीयच राहाणार आहे.

*हिंदुस्थानचा गौरवपूर्ण पूर्वकाल.*

---

* इ. स. १९४२

हिंदुस्थानपुढे आज ज्या समस्या उपस्थित आहेत, त्या कांहीं दृष्टींनीं, इतर कोणत्याही देशास सोडवाव्या लागणाऱ्या समस्यांपेक्षा, अधिक गुंतागुंतीच्या आहेत. भिन्न भिन्न जाति, मतें, पंथ आणि धर्म असलेले लोक हिंदुस्थानांत येऊन राहिलेले आहेत; आणि या सर्वांमध्यें घटनात्मक एकरूपता (uniformity of composition) नसल्यामुळे, ऐक्यभाव प्रस्थापित करण्यामध्ये व सहकारशील कार्य करण्यामध्ये, हिंदुस्थानच्या राष्ट्रीय जीवनांत, कांहीं अडचणी उत्पन्न झाल्या असल्या, तरी हा घटनात्मक एकरूपतेचा अभाव हा एक केवळ कायमचा अडथळाच आहे, असें मानण्याचें कारण नाहीं. हिंदुस्थानच्या राष्ट्रीय जीवनांत, जे निरनिराळ्या संस्कृतींचे प्रवाह आलेले आहेत, त्यांमुळे त्याच्या राष्ट्रीय व्यक्तिमत्त्वे ( national personality ) च्या संपत्तींत भरच पडली आहे; आणि त्यांच्यामुळे, सर्व संस्कृतींचा नवीन समन्वय ( a new cultural synthesis ) करण्याची योग्य संधी निर्माण झाली आहे एवढेंच नव्हे, तर अशा समन्वयाची आवश्यकताहि उत्पन्न झाली आहे. ह्याच भारतीय जीवनांतील, परस्पर विरोधी व संघर्षशील गोष्टी रचनात्मक नेतृत्वाच्याद्वारा हाताळल्या गेल्या, तर त्यांच्या द्वारा, केवळ हिंदी जीवनाला सुसंवादी बनवून पुनरुज्जीवित करणारीच नव्हे, तर सर्व जगताला एक नवीन गति देणारी व सुसंपन्न जागतिक संस्कृति निर्माण होऊं शकेल.

हिंदुस्थानांतील राष्ट्रीय प्रश्नांची गुंतागुंत

ज्या प्रक्रियेने आपण या नवीन विश्वसंस्कृतीप्रत पोहोचूं, ती केवळ यांत्रिक असूं शकणार नाहीं. केवळ आजच्या भिन्नभिन्न

नवीन विश्व-संस्कृतीचा उद्गम पूर्ण व एकजिनसी दृष्टीनेच होईल.

संस्कृतींतून अलग काढलेले व निवडलेले त्यांचे कांही भाग एकत्रित केल्याने आपणांस कोणत्याहि सामर्थ्यशाली विश्वसंस्कृतीची प्राप्ती कदापि होणार नाही. त्या रीतीने फार तर एक ठिगळे जोडून केलेली गोधडी तयार होईल. **संकलित विचारांची खिचडी ही ध्येयाच्या प्रत्यक्ष नवदर्शनाचें स्थान कधींहि घेऊं शकणार नाही.** परिश्रमपूर्वक निवड करून व परंपरागत व सुरक्षित मूल्यांचा नुसता ढीग रचून, नवीन विश्व–संस्कृतीचा उद्गम होणार नाही. तर प्रचलित रूढींवर कोणत्याहि दृष्टीने अवलंबून न राहणाऱ्या, अशा पूर्ण व एकजिनसी ( integral ) सत्यदर्शनांतूनच, नवीन संस्कृतीचा उदय होईल.

पूर्ण व एकजिनसी दर्शनापासून जी नवीन विश्व-संस्कृति उद्भवेल, तिच्यामुळे आपोआपच **संस्कृतींचा समन्वय** ( cultural synthesis ) साधेल. ज्या दृष्टीमुळे नवीन विश्व-संस्कृतीची स्फूर्ति होईल, ती सर्वगामी ( comprehensive ) असेल. आणि ती विविध परंपरांमध्ये सांठलेल्या मूल्यांचा निषेध करणार नाही, किंवा त्यांच्याविषयीं केवळ संरक्षणात्मक सहिष्णुताहि ठेवणार नाहीं; तर उलट निरनिराळे धर्म आणि संस्कृति यांच्या सक्रिय सार-ग्रहणतेच्या द्वारांच, ती विश्वसंस्कृती अभिव्यक्त होईल. **सत्याचें विशाल दर्शन हे एखादे मत, अंधविश्वास किंवा संप्रदाय, यांच्या योगाने मर्यादित होऊं शकत नाही. परंतु या मर्यादांचें उल्लंघन करावयाचें असल्यास, तें प्रचलित मत, अंधविश्वास व संप्रदाय, यांचें मूल्य अंधतेने व पूर्णपणे नाकारून साधणार नाही;** तर त्या

सर्वांच्यामध्यें सत्याचे जे अंश किंवा पैलू अनस्यूत असतील, ते शोधून, त्यांच्या महत्त्वावर भर देऊन, आणि त्यांचे प्रकाशन व संवर्धन करूनच या मर्यादा ओलांडून जाणें शक्य होईल.

ज्यांतून अंतिम सत्याचा आविष्कार होईल, अशा समन्वयकारी व उत्कृष्ट संस्कृतीचा उद्गम आणि विकास करणें, हें हिंदुस्थानच्या समोरील एक महत्त्वाचें कार्य आहे.

आंतरराष्ट्रीय क्षेत्रांतील हिंदुस्थानची भावी भूमिका

दुसरें एक महत्त्वाचें कार्य करण्यास लागणारी विशेष योग्यता हिंदुस्थानच्या ठायींच आहे; आणि तें दुसरें कार्य म्हणजे इतर राष्ट्रांत परस्परांविषयीं सद्भाव आणि एकता उत्पन्न करणें, हे होय. दुसऱ्या राष्ट्रांची भवितव्यता ठरविण्याच्या बाबतींत, जें कार्य हिंदुस्थानला करावयाचें आहे, त्याविषयींचें स्पष्ट ज्ञान असणाऱ्या विधायक नेतृत्वाची आज जरुर आहे. परराष्ट्रीय धोरणांत, हिंदुस्थानने वर्णयुद्धांत अगर वर्णद्वेषांत सहभागी होतां कामा नये. काळा, पिवळा आणि पांढरा, हे सारे बाह्य त्वचेचे फरक आहेत; प्रत्यक्ष आत्म्यांमध्ये कांही हे भेद नाहीत. पूर्वीच्या इतिहासांत, हिंदुस्थान हा पूर्व आणि पश्चिम, यांना जोडणारा दुवा बनला होता; आणि हिंदुस्थानमुळेच पूर्व आणि पश्चिम परस्परांच्या अधिक निकट आलेल्या आहेत.

हिंदुस्थानांतील विधायक नेतृत्वापुढे असलेलें तिसरें महत्त्वाचें कार्य, म्हणजे हा देश अत्यंत कठीण परिस्थितींत असतांनाहि, राजकीय समतोलता ठेवणें हें होय. राजकीय पारतंत्र्यांतून मुक्त झाल्याखेरीज, आणि

परकीय आक्रमण आणि गुलामगिरी यांची भीति नष्ट झाल्याखेरीज, हिंदुस्थान जगताला आपलें संपूर्ण देणें (Contribution) देऊं शकणार नाही. जर त्याला आपलें कार्य इतर राष्ट्राच्या बरोबरीनें व बंधुत्वाच्या नात्याने करावयाचें असेल, तर त्याला स्वतःचें राष्ट्रीय जीवन व त्याचप्रमाणे परराष्ट्रीय धोरण निश्चित करण्याचें स्वातंत्र्य असलें पाहिजे. परंतु, या प्राथमिक गरजेवर भर देतांना, हिंदुस्थानने आपली राजकीय समतोलता ढळूं देतां उपयोगी नाही. राष्ट्रीय स्वातंत्र्य आणि आत्म-निर्णय यांसाठी प्रयत्न करणें जरी न्याय्य ठरत असले, तरी तसें करतांना स्वतःला प्रतिक्रियात्मक पृथकतेला (Reactionary Isolationism) बळी पडूं देणें, हें कधींहि योग्य होणार नाहीं. त्याचप्रमाणे परकीय आक्रमणाला तोंड देतांना, भारतवर्षाने द्वेष, दुष्टपणा अगर सूड, या भावनांपासून आलिप्त राहिलें पाहिजे.

गंभीर सत्य

सर्व प्रकारच्या संकुचितपणाने प्रेम मर्यादित होतें. हिंदुस्थानमध्ये व त्याचप्रमाणे जगाच्या इतर भागांतहि, मानवता ही उथळ आणि अंतीं असत्य ठरणाऱ्या जाति, पंथ, राष्ट्रीयता, धर्म, संस्कृति इत्यादि भेदांमुळे, छोट्या छोट्या समूहांमध्ये विभागली जात आहे; आणि या सीमित समूहां ( Groups ) ना भेदजनक अविश्वास व भीति यांचीच चिरकालची संवय असल्याने, त्यांच्यामध्ये परस्परांत संदेह, शत्रुता अगर औदासिन्यच वसत असतें. हा सर्व प्रकार अज्ञान, पूर्वग्रह आणि स्वार्थ यांमुळे होतो. जो कृत्रिम निराळेपणाचे बंध फोडून बाहेर येऊं शकेल, व जो जीवनाच्या अविच्छेद्य ऐक्याच्या जाणिवेमुळे प्रभावपूर्ण होईल, अशा परस्पर प्रीतिभावाचें पोषण केलें, तरच अज्ञान,

पूर्वग्रह आणि स्वार्थ, यांमुळे घडणाऱ्या उपरिनिर्दिष्ट अनिष्ट प्रकारास आळा बसू शकेल. पार्थिव जगतावरील महान् दैवी योजनेमधील समान भागीदार या नात्यानेच नव्हे, तर समानतः एकाच जीवनाची निरनिराळी रूपें असल्यामुळेहि, सर्व मानवांचें परस्पर ऐक्य आधींच सांधलें गेलेलें आहे, हें गंभीर-सत्य ( हिंदुस्थानांत मुबलक कार्यक्षेत्र असणाऱ्या ) रचनात्मक नेतृत्वामध्ये ध्यानांत ठेवावे लागेल; व त्याच्यावर विशेष भरहि द्यावा लागेल. या गंभीर सत्यास विसंवादी असणारें कोणतेंहि धोरण लाभदायक किंवा फलदायी होणार नाही. जे द्रष्टे आहेत, त्यांच्याच हातांमध्ये मानवतेचें भवितव्य आहे.

३

# नवयुगनिर्मितीच्या पूर्ववेदना ×

जागतिक रणकंदनाचें ऽ वादळ चढत्या प्रमाणांत उग्र होऊन, आता परासीमेस पोहोचलें आहे. ह्या वादळाच्या तीव्रतेचा कळस झाला असल्यामुळे, तो सार्वत्रिक ऱ्हासास कारणीभूत होईल. भौतिक सुखाच्या शोधांत, सर्व प्रकारचा असंतोष भलत्याच प्रमाणांत वाढला आहे. निरनिराळ्या लोकांच्या हितसंबंधांतील फरक वाढत जाऊन, त्यांतून संहारक कलह निर्माण झाला आहे. व्यक्तिपर व सामाजिक-विषयक प्रश्नांची सोडवणूक करण्याच्या बाबतींतला मानवाचा प्रयत्न विफल झाला आहे; व ही विफलता स्पष्टपणे दृग्गोचर होत आहे. आपल्या प्रश्नांची विधायक व निर्मितिक्षम रीतीने सोडवणूक करण्यांत, मानवजातीची असमर्थता दिसून येत आहे; व मानवाचें

× नव्हेंबर, १९४१

ऽ महायुद्ध नं. २ (१९३९–४५) चालू असतांना हा संदेश दिला आहे.

मूलस्वरूप व त्याच्या जीवनाचें ध्येय याविषयींचें करुणास्पद अज्ञान हेंच या असमर्थतेच्या मुळाशीं आहे.

प्रकाश व अंधार यांच्या शक्तीमध्ये आज जगांत लढा होऊन राहिला आहे. एका बाजूला बेगुमान लोभ, अनियंत्रित द्वेष व सामर्थ्याची हाव, यांच्या द्वारां स्वार्थी लोक स्वतःकरिता सुख मिळविण्याच्या प्रयत्नांत आहेत. जीवनाचें खरें ध्येय ते जाणत नाहीत; व त्यामुळे ते संस्कृतीच्या सर्वांत खालील पायरीपर्यंत घसरले आहेत. त्यांनी आपल्या शिवात्म्यास निर्जीव भूतकालांतून आलेल्या व प्रति क्षणीं विदीर्ण होत असलेल्या विधींच्या ढिगांत पुरून टाकलें आहे. भौतिक सुख व मर्यादित कल्पना, यांच्या पगड्यामुळे त्यांना आपल्या ईश्वरीय ध्येयाचें विस्मरण झालें आहे. ते वाट चुकले आहेत; व त्यांच्या अंतःकरणांत द्वेष व दुष्टपणा यांचें थैमान चालू आहे. दुसऱ्या बाजूने कांही लोक नुकसान व दुःख सहन करून, त्यागयुक्त व धैर्यशाली कृतीच्या द्वारां, आपल्या शिवात्म्यास अनावृत करीत आहेत. हल्लीचें युद्ध मानवास धैर्य, सहनशीलता व त्याग, यांचे धडे शिकवीत आहे.

मानवजातींतील स्वार्थाचा रोग नाहीसा होण्याकरितां अत्यंत जालीम व सर्वांना लागू पडणाऱ्या उपायाची आवश्यकता आहे. ह्या स्वार्थरूपी वृक्षाचीं मुळें इतकीं खोल गेलीं आहेत, कीं तो मुळासकट उपटावयाचा असेल, तर त्यावर सर्व बाजूंनी प्रहार करावे लागतील. एकदा स्वार्थ नष्ट झाला, म्हणजे खरी शांति व सुख यांचा स्वाभाविक उदय होईल. आत्मदानपर प्रेमांत उत्पन्न होणारी शांति व सुख चिरकाल टिकणारीं असतात. आपल्या अंतःकरणांत महत्त्वाचें

पूर्ण परिवर्तन घडवून आणण्यास लागणारें धैर्य व कळकळ यांची जोड मिळाली, तर अत्यंत पापी मनुष्य देखील मोठा सत्पुरुष बनूं शकतो.

सध्याची संहारक अंदाधुंदी सर्व जगभर पसरेल; परंतु त्यानंतर बराच कालपर्यंत युद्ध होणार नाही. पुढे येणाऱ्या सुखाच्या विशाल कालखंडांकरिता आजच्या येऊनजाणाऱ्या हालअपेष्टा सहन करणें उचित आहे. हल्लीच्या अंदाधुंदीमधून काय निघेल ? तिचा शेवट कसा होईल ? ह्या अंदाधुंदीचा शेवट एकाच रीतीने होऊं शकतो. मानवजातीस या सर्व प्रकारांची किळस येईल. वासना, कलह व द्वेष यांची मानवास घृणा येईल. लोभ व द्वेष इतक्या कोटीस पोहोंचतील, की मानवास त्यांचा कंटाळा येईल. आजच्या समस्यापूर्ण परिस्थितींतून सुटण्याचा मार्ग निःस्वार्थपणा हाच होय. सर्व प्रश्नांच्या सोडवणुकीचा एकच मार्ग खुला आहे; व तो म्हणजे **द्वेष टाकून प्रेम करणें, वासना टाकून दान करणें व आक्रमण टाकून सेवा करणें.**

तीव्र दुःखांतून विशाल शक्ति निर्माण होईल.तीव्र दुःखाचा अनुभव हा जेव्हा संत्रस्त मानवास जागृत करून, खऱ्या ज्ञानाच्या उपासनेस प्रेरणा देतो, तेव्हाच त्या अनुभवांतील हेतु पूर्ण होऊन, त्यांतील सार फलद्रूप होतें. अभूतपूर्व यातनांमधून, अभूतपूर्व आध्यात्मिक सार निघेल; सत्याच्या अधिष्ठानावर जीवनाची रचना करण्याकरिता, या यातनांची मदत होते. सार्वत्रिक दुःख मानवजातीस आपल्या आध्यात्मिक इतिहासांतील परिवर्तनबिंदूकडे धांव घेण्यास प्रेरणा देईल; व तो काल अगदीं जवळ आला आहे. हल्लींच्या यात-

त्यांमुळे मानवांच्या परस्परसंबंधाविषयीचें, खरें ज्ञान जागृत होण्याचा काळ जवळ आला आहे. मानवजातीवर कोसळलेल्या संकटांच्या खऱ्या कारणांची प्रांजळपणे व निर्भयपणे मीमांसा करण्याची व सद्‌वस्तूच्या नवीन अनुभवाचा शोध करण्याची हीच वेळ आहे. आत्मा शाश्वत व सत्य आहे, हें जाणणें म्हणजे कधींहि फिक्या न पडणाऱ्या आनंदाचें वारसदार होणें होय. स्वतःच्या शिवात्म्याशीं ऐक्य पावून, हें ज्ञान मिळविण्यास आता मुळींच विलंब व्हावयास नको.

शिवात्म्याशीं ऐक्य पावल्यावर, मनुष्याला सर्वत्रांमध्ये अनंत आत्माच दिसतो; व तो अहंबुद्धिनिष्ठ जीवनाची मर्यादिता तोडून मुक्त होतो. व्यक्तिगत जीवात्म्याने आपल्या सर्वव्यापक परमात्म्याशीं असलेल्या ऐक्याचा अनुभव संपूर्ण जाणिवेने घेतला पाहिजे. ह्या पुराण सत्याने प्रकाशित होऊन, मानवांच्या जीवनास नवीन दिशा लागेल; व आपल्या दैनिक व्यवहारांमधील त्यांच्या शेजाऱ्याबद्दलच्या दृष्टिकोणामध्ये पुनर्घटना घडून येईल. खरें ऐक्य व सहकार्य निर्माण करण्याकरितां, एकत्वाचें आध्यात्मिक महत्त्व पटलें पाहिजे; कारण, असल्या ज्ञानांतून बंधुता सहजच उत्पन्न होते. आध्यात्मिक ज्ञानाने प्रकाशित झालेलें नवीन जीवन, म्हणजे सत्याचाच पुरस्कार होय. असलें नवजीवन कल्पनेच्या साम्राज्यांतलें नसून, पूर्णपणे व्यवहार्य आहे. रक्तलांछित युद्धाच्या वणव्यांत आज मानव लोटले गेले असल्यामुळे, त्यांना तीव्र यातनांच्या द्वारां, जडवादावर अधिष्ठित असलेल्या जीवनाची क्षणभंगुरता व फोलपणा अनुभवास येत आहे. खऱ्या सुखाची तळमळ असलेले लोक ज्यावेळीं सुखाच्या खऱ्या उगमस्थानाचा शोध करतील, तो क्षण जवळ आला आहे.

त्याचप्रमाणे, मूर्तरूप सत्यच अशा देवमाणसा (God-man)चा सहवास मिळविण्याचा मानव उत्सुकतेने प्रयत्न करतील; कारण, देवमाणसाच्या द्वारां, त्यांना स्फूर्ति व आध्यात्मिक ज्ञान मिळेल. ते ईश्वरीय अधिकार-वाणीचें मार्गदर्शन ग्रहण करतील. दैवी प्रेमाच्या आविष्काराने आत्म-जागृति होईल. हल्लीच्या दुखःमय कठिण प्रसंगामध्ये, ते स्वतःच्या शिवात्म्यास सन्मुख होऊन, परमात्म्यांच्या इच्छेचा स्वीकार करण्यास तत्पर होत आहेत. दैवी प्रेमाने मानवाच्या अंतःकरणांत ईश्वर आणण्याचा व त्यांना शाश्वत व खऱ्या आनंदाची प्राप्ति करून देण्याचा मोठा चमत्कार घडून येईल; व त्यामुळे मानवजातीची निकडीची गरज भागेल. दैवी प्रेम मानवांना परस्परांचे बाबतींत निःस्वार्थ व परोपकारी बनवील, व त्यामुळे सर्व प्रश्न पूर्णपणे सुटतील. पृथ्वीवरील नवीन बंधुता वास्तवसृष्टींत उतरेल; व सर्व राष्ट्रांत प्रेम व सत्य यामुळे उत्पन्न होणारा एकोपा राहील.

माझें अस्तित्व प्रेमाकरिताच व सत्याकरिताच आहे; व दुःखित मानवास माझें सांगणें आहे तें असें: —

" निराश होऊं नका ! तुह्मांला ईश्वरी कार्याकरिता आत्म-समर्पण करण्याची व प्रेम व सत्य यांनी विभूषित असलेल्या ईश्वरी कृपेचा स्वीकार करण्याची शक्ति देण्याकरिता मी आलों आहे. सर्व विजयांत श्रेष्ठ असलेला जो आत्मविजय तो मिळ-विण्याच्या बाबतींत साहाय्य करण्याकरिताच माझें येणें आहे. "

# ४

# प्रार्थनेचें रहस्य.

निरनिराळ्या विश्वधर्मांमध्ये निरनिराळ्या प्रार्थना प्रचारांत आढळून येतात; व प्रत्येक धर्मांतील बहुसंख्य लोक त्या धर्मांत प्रचलित असलेल्या विशिष्ट प्रार्थनांनाच विशेष महत्त्व देतात. बहुधा प्रार्थना करण्याची भाषा, पद्धत, वेळ व ज्या शब्दांत प्रार्थना करावयाची ते शब्द देखील ठरलेलेच असतात; व ह्या पद्धतिविशेषांत एखादा लहानसहान देखील फरक झाल्यास प्रार्थनेचें आध्यात्मिक महत्त्व कमी होतें, अशीच बहुसंख्य लोकांची समजूत असते. सारांश, साधारणतः बहुजन समाजाच्या प्रार्थनेमध्ये अंतरंगापेक्षा बहिरंगावर व भावार्थापेक्षा बाह्यविधीवर जास्त जोर असतो. परंतु ह्या प्रवृत्तीमुळे, अनेकवेळा, प्रार्थना म्हणजे यांत्रिक पोपटपंचीच बनत जाते; व प्रार्थनातत्त्वाचा गूढार्थ बाजूलाच राहतो.

वास्तविक पाहतां, प्रार्थनातत्त्वाचें खरें रहस्य तद्द्वारां होणाऱ्या विचार व भावना यांच्या समन्वयांत आहे. शुद्ध

विचार व उदात्त भावना ह्या परस्परांशीं समरस व एकरूप होण्याकरितां, प्रार्थनेइतकें सुलभ व प्रभावशाली दुसरें साधनच नाही. केवळ अध्यात्मचिंतनाने बुद्धि प्रखर होईल; केवळ कर्मकांडांतील विधियुक्त पूजेमुळे शरीराला व मनाला शिस्तीचें वळण लागेल व थोडाबहुत हृदयाचाहि विकास होईल; परंतु, अंतःकरणांत स्वयंस्फूर्तीने उत्पन्न होणाऱ्या प्रार्थनेमुळे, बुद्धि व भावना ह्या दोन्हीहि शुद्ध व प्रकर्षावस्थेंत जाऊन, एकमेकांत सहज विलीन होतात.

जोंपर्यंत मनुष्याच्या अंतरंगांत अशा प्रकारची सुसंवादिता निर्माण होत नाही, तोंपर्यंत त्याला आत्मज्ञान अथवा सत्यप्रतीति कधीहि होणें शक्य नाही. व म्हणूनच निरनिराळ्या विश्वधर्मांत जें प्रार्थनेला महत्त्व दिलें आहे, तें योग्य आहे. प्रार्थनेमुळे मनांत शांति व ज्ञान यांचा उदय होतो; परंतु हें ध्येय साध्य होण्याकरिता प्रार्थनाविषयक खालील गोष्टी ध्यानांत ठेवल्या पाहिजेत.: —

(१) मनुष्याने ईश्वराची, ईश्वरी अवताराची, किंवा ईश्वरस्वरूप सद्गुरूची प्रार्थना अंतःकरणपूर्वक करावी.

(२) प्रार्थना करण्यामध्ये ऐहिक किंवा पारलौकिक स्वार्थ साधण्याचा हेतु नसावा.

(३) आपल्याला परमात्म्याचें खरें स्वरूप समजावें व आपण त्याच्याशीं एकरूप व्हावें, हेंच प्रार्थनेचें उद्दिष्ट असावें.

(४) मनावर दडपण आणून कशीतरी केलेली प्रार्थना कंटाळवाणी व अर्थहीन असते. उलटपक्षी, स्वयंस्फूर्त व प्रेमपरिप्लुत प्रार्थना नितांत सुंदर व शांतिप्रद असते.

(५) केवळ बुद्धिनिष्ठ प्रार्थना रुक्ष व पंगु असते. प्रार्थनेंत उत्कट प्रेमाचा ओलावा असणें अवश्यक आहे. बुद्धि व भावना ह्या दोहींना प्रार्थनेमध्ये पूर्ण अभिव्यक्ति मिळाली पाहिजे; व ह्या दोन घटकांमध्ये समतोलपणा पाहिजे. सारांश, प्रार्थना एकांगी नको.

---

५

# नाममाहात्म्य संदेश *

सर्व जग हल्ली दुःख व गोंधळ यांचा अनुभव घेत आहे. या दुःखांतून व अंदाधुंदींतून आध्यात्मिक सुव्यवस्था निर्माण करण्याकारितां, अखिल विश्वाच्या मुळाशीं असणाऱ्या दैवी शक्तीची प्रार्थना करण्याशिवाय दुसरा मार्ग नाही. परमेश्वराची अंतःकरणपूर्वक प्रार्थना केल्यास व त्याचें नांव कोणत्यातरी धर्मपद्धतीने घेतल्यास, मानवाचें अंतःकरण शुद्ध होऊन, ईश्वरी व निर्मितिक्षम प्रकाशपर शक्तीचा आविष्कार होतो. परमात्माच एकमेव सत्य वस्तु आहे; आणि जे कोणी त्याला भक्तिपूर्वक शरण जाऊन, त्याचें प्रेमाने स्मरण करतात, ते स्वतःच्याच शिवात्म्याशीं व अखिल विश्वांतील चैतन्याशीं एकरूप होतात. ज्या दैवी प्रेमाने मानवाचे सर्व प्रश्न सुटूं शकतात, तें जागृत करण्याचें सामर्थ्य केवळ आत्मज्ञानी लोकांमध्येच असतें.

---

* जॅनेवारी १९४२.

६

# ईश्वर आणि धर्म *

धर्मांचीं जीं संघटित स्वरूपें आज दिसतात, त्यांत त्या त्या धर्माच्या आद्य प्रवर्तकांची खरी व स्फूर्तिदायी दृष्टि व्यक्त होत नाही. अंधविश्वास, ठराविक मतें, आचाराविचार हें आध्यात्मिक जीवनाचें सार असूं शकत नाही. वरील गोष्टी वरपांगी व फोल तर असतातच; पण पुष्कळ वेळा, त्यामुळे नुकसान व दिशाभूल होते. त्यांनी धर्ममार्तंडांच्या दंभाचा परिपोष होतो; व ते भोळया जनतेला फसविण्यास मात्र कारणीभूत होतात. बाह्य विधि व समारंभ यांत गुरफटलेला धर्म ह्मणजे आत्म्यास अडकविणारा सांपळाच होय. धर्मांतर केल्यानेही या संकटांतून सुटका होत नाही; कारण त्यांत मनुष्य एक सांपळा सोडून, दुसऱ्या सांपळ्याचा आश्रय घेतो. धर्माने जर माणसाचा आत्मा मुक्त होऊन त्यास ईश्वर प्रतीती होत नसेल, तर त्या धर्माचें कांहीच प्रयोजन नाही. असें झालें, ह्मणजे धर्म जाऊन तेथे ईश्वर आलेला बरा.

---

* गोरक्षण कम्पाउंड, नागपुर. ११ नव्हेंबर १९४४.

याकरिताच मला एखादा नवा धर्म निर्माण करावयाचा नाही. जगांत आधीच असंख्य धर्ममतें आहेत. मानवाला आणखी एक नवा पिंजरा बहाल करण्याकरिता मी आलों नसून, मला जगाला अनंत सत्याची ओळख करून द्यावयाची आहे. जगाला शब्दांची गरज नाही; प्रत्ययाची गरज आहे. ईश्वरी जीवनांतील पूर्णता व स्वातंत्र्य त्यांस हवें आहे; यंत्रसम व भपकेबाज विधींचा उथळपणा नको. त्याला प्रेमाची गरज आहे; पाशवी शक्तीचा देखावा नको. माझ्यापुढे जें कार्य आहे, तें निर्णायक आहे. आपण सर्व एक आहोंत. आत्मदृष्टीने पाहतां, मी तुमच्यापैकी कोणापेक्षाहि श्रेष्ठ नाही. मी तुम्हाला ईश्वरत्व बाहेरून देणार, असें नव्हे. आपणा सर्वांत तें ईश्वरत्व एकाच प्रमाणांत अधिष्ठित आहे. आपण सर्व एक आहोंत, या मूलभूत सत्याचा अनुभव मात्र मला तुम्हाला द्यावयाचा आहे.

आजच्या आमच्या यातनांमधून भावी ज्ञानपूर्ण मानवता निर्माण होणार आहे. मनुष्य अहंकारयुक्त व मोहमय जीवनाचा त्याग करण्यास प्रवृत्त होईल; व मग त्याला स्वस्वरूपाची ओळख पटून, तो स्वतः ईश्वरच असल्याबद्दल त्याची खात्री होईल. असें झालें म्हणजे त्याच्या हृदयांतून अलोट अशा ईश्वरी प्रेमाचा प्रवाह सुरू होईल. दैवी प्रेम अमर, भयरहित व शुद्ध असतें. अखिल जीवन एक आहे, या दिव्य जाणिवेंतून त्याचा उगम होतो. ज्यांना खऱ्या व सारभूत मूल्याबद्दल आस्था आहे, त्यांनी ही माझी हांक ऐकावी. सत्य व प्रेम यांचें नवें युग निर्माण करण्याच्या कार्यात, त्यांना बराच भाग घ्यावा लागेल. माझा सर्वांना आशीर्वाद आहे.

× × ×

# ७

# ईश्वर आणि प्रेम *

एखाद्या कठिण पर्वतशिखरावर चढतांना कांटे, खांचा, खळगे इत्यादि ओलांडून जावें लागतें, त्याचप्रमाणें अध्यात्ममार्गहि कठीण आहे. पण कितीहि कठिण वाटला, तरी एकदा पत्करलेल्या अध्यात्ममार्गावर, टाकलेलें पाऊल परत घेतां येत नाही. प्रत्येकाने जागृत ईश्वरत्वा ( Conscious divinity )चें अध्यात्मशिखर गांठलेंचे पाहिजे. टाळाटाळ अगर पळवाट किंवा आराम यांनी फक्त आत्मप्रत्ययाचा दिवस दुरावेल. या मार्गावर कितीहि आस्था ठेवली, तरी ती थोडीच आहे. मिथ्या जगाच्या जंजाळांत गुंतणें, म्हणजे टाळतां येण्यासारख्या अनेक आपत्ति निष्कारण ओढवून घेणें होय. आत्मज्ञानरूपी ध्येयावर लक्ष्य ठेवल्यास त्या सहज टळतात.

हें आध्यात्मिक शिखर गांठण्याकरिता, प्रेम अत्यंत आवश्यक आहे. ईश्वरप्राप्तीस या व्यातीरिक्त जे गुण आवश्यक आहेत, ते सर्व प्रेममार्गाचा प्रामाणिकपणें अवलंब केल्यास आपोआप प्राप्त

* नॅशनल कॉलेज हॉल, नागपूर. १२, नव्हेंबर १९४४

होतील. कारण, प्रेमामुळे समोरचा मार्ग प्रकाशित होत जातो. प्रेमाचा दिवा नसेल, तर तुम्ही अंधारांत वाट चुकाल. प्रेमशून्य हृदय हे अंधार व यातना यांत सांपडते. पण ईश्वरी प्रेमामुळे जो बेचैन झाला असेल, तो मात्र निःसंशय अवीट गोडीच्या ईश्वर-प्राप्तीच्या अचूक मार्गावर आहे.

मानवी प्रेम सदोष असेल, पण तेवढ्याने तें त्याज्य ठरत नाही. तें प्रेम क्रमाने साधकांतील अंतर्गत दोष काढून, त्याला सत्याच्या मार्गावर नेऊन सोडतें; व शेवटी त्यास ईश्वरस्वरूपांत विलीन करतें. विशुद्ध प्रेमामध्ये जे स्वतःच्या अलगपणाच्या व्यक्तित्वाचा होम करण्यास तयार नाहीत, अशांना स्वानुभवांतील आत्मप्राप्ती-रूपी अत्युच्च सुखाचें द्वार कायमचेंच बंद असतें. ईश्वराचा शोध करीत असणाऱ्या सर्वांना माझा आशीर्वाद आहे. हेच लोक पुढे येणाऱ्या सत्यनिष्ठ व प्रेमपूर्ण युगाचे आधारस्तंभ राहतील.

# ८

# ईश्वरासाठींच जगा व ईश्वरासाठींच मरा*

हें महायुद्ध× ही एक आपत्ति असली, तरी ती आवश्यक आहे. मानवामध्ये उदात्त तत्त्वांची जागृति करण्याच्या ईश्वरी योजनेचा हा एक भाग आहे. मानव या युद्धाने शिकविलेले धडे घेण्यास चुकेल, तर त्याने सोसलेलें सर्व दुःख व्यर्थच ठरेल. रस्त्यांतला एक साधा मनुष्य देखील एखाद्या निःस्वार्थ ध्येयासाठीं स्वार्थत्यागाची कमाल गाठूं शकतो. हें महायुद्धांत प्रत्यही सिद्ध झालेलें आहे. त्याचप्रमाणे जगांतील सर्व भौतिक वस्तू संपत्ति, मालमत्ता, सत्ता, कीर्ति कुटुंब, इतकेंच काय, पण माणसाचें पृथ्वीवरील जीवनसुद्धा क्षणभंगुर आहे, व यापैकीं कशाचेंच महत्त्व शाश्वत नाहीं, हें देखील या युद्धांतच प्रत्ययास येतें. या युद्धांतील घटना हे धडे देऊन मानवास सत्यस्वरूप परमात्म्याच्या कार्याकरितां

---

* अहमदनगर. २७ डिसेंबर १९४२

× हा संदेश महायुद्ध नं. २ ( १९३९-४५ ) चालू असतां दिला.

प्रवृत्त करतील, आणि त्याला खऱ्या शाश्वत तत्त्वांनी प्रेरित होणाऱ्या नव्या जीवनांत नेऊन सोडतील. स्वतःच्या देशासाठीं किंवा राजकीय ध्येयासाठीं लोक निःसीम स्वार्थत्याग व अश्रुतपूर्व अशीं दुःखें भोगीत आहेत. तेव्हा ईश्वरासाठीं किंवा सत्यासाठीं देखील ते तेवढाच त्याग किंवा दुःखें खास साहूं शकतील. सत्यनिष्ठ जीवनासाठींच मनुष्याचा जन्म आहे, हें सर्व धर्मांनी उद्‌घोषित केलें आहे. म्हणून धर्माच्या नांवाखालीं कलह माजविणें हा शुद्ध मूर्खपणा आहे.

सर्वांच्यामध्ये स्फुरणारें चैतन्य एकच आहे. तसेंच ईश्वराहून अलग दुसरी कोणतीहि वस्तू नाहीं व ईश्वराशिवाय दुसऱ्या कशालाही महत्त्व नाही. मानवाला पुनर्दर्शन होण्याचा काळ जवळ आला आहे. ईश्वरासाठींच जगावें व ईश्वरासाठींच मरावें, इतका तो महान् आहे. बाकी सर्व म्हणजे आभासमय ध्येयासाठीं केलेली निरर्थक व वायफळ धडपड.

---

१

# परमात्माच सत्य वस्तु आहे*

जाणिवेंतील संस्कारजन्य अज्ञानामुळे, आत्मा आणि शरीर हीं एकच आहेत, असा भ्रम निर्माण होतो. अशा प्रकारें शरीराच्या अभिमानांत गुरफटलेल्या आत्म्याचें ज्ञान हें अर्थातच इंद्रियद्वारां अनुभवास येणाऱ्या संवेदना व त्यांवरून निघणारे निष्कर्ष एवढ्या त्रिज्येंतच आकुंचित राहतें. पण सत्य ओळखायचें असेल, तर हें ज्ञान अपुरें पडतें, इतकेंच नव्हे तर बहुधा दिशाभूलहि करतें. शरीर म्हणजेच आत्मा अशी भावना असलेल्यांना इंद्रियजन्य अनुभव सत्य वाटला तरी इंद्रियांना भासणारें व द्वद्वांनी भरलेलें हें जग सर्वस्वी मिथ्याच आहे. वास्तविक पाहतां, प्रेम, कल्याण आणि सहृदयता यांचा जणु सागरच असणारा आणि अमर व अविभाज्य असा ईश्वर हाच काय तो सत्यस्वरूप आहे.

---

* रामकृष्ण आश्रम, नागपूर १२, नोव्हेंबर १९४४

या ईश्वराचें स्वरूप ओळखण्याची व ईश्वराशीं एकरूप होण्याची पहिली अट म्हणजे अहंपणा व "मी" यांचा पूर्ण नाश होऊन, शरीराचा अभिमान पूर्णपणे नाहीसा झाला पाहिजे. द्वैतभाव हा भ्रममूल आहे. लोभ, मत्सर व वासना यांनीं परिपूर्ण अशा शरीर–सुख–प्रधान जीवनांतील संस्कारांमुळे हा द्वैतभाव बळावतो. पण सेवेचें व्रत पत्करून, आत्मसाक्षात्कारी सद्‌गुरूंच्या सहाय्याने या अडचणींतून पार पडता येऊन, आत्मप्रत्यय मिळविणें शक्य असतें. तसें झाल्यास, ईश्वराशीं आपलें कसें तादात्म्य आहे, याचा प्रत्यय येतो. ईश्वरप्राप्ति हें जीवनाचें खरें ध्येय आहे. या एकाच उद्देशाने विश्व निर्माण झालें आहे.

ईश्वरप्राप्ति हें विशिष्ट व्यक्तींचें त्यांच्या त्यांच्या पुरतेंच एक स्वार्थपर कार्य आहे, असा एक गैरसमज रूढ आहे. परंतु, ईश्वरस्वरूपांत स्वार्थीपणा अगर इतर कोणत्याहि प्रकारच्या मर्यादेचें बंधन राहू शकत नाही. द्वैतभावपूर्ण अशा आकुंचित जीवनाचा शेवट म्हणजेच ईश्वरस्वरूपाची प्राप्ती. यामुळे प्रत्येक व्यक्ति विश्वात्म्याशीं तादात्म्य पावते; व सत्य वस्तूची ओळख पटून प्रेम, शांतता व सुसंवादिता यांनी व्यक्तिजीवन परिपूर्ण होतें. ईश्वरप्राप्त सद्‌गुरु हा सबंध मानवजातीला उपकारक होतो.

---

१०

# प्रेमाची प्रेरक शक्ति*

सुखलोलुपता अगर परिणामी ग्लानि आणणारा भावनाक्षोभ म्हणजे खरें प्रेम नव्हे. संवेदनांची आसक्ति असलेल्यांना व स्वार्थी सुखाचा हव्यास असलेल्यांना खऱ्या प्रेमाचा आस्वाद मिळणें शक्य नाही. कारण, त्यांचें अंतःकरण रुक्ष व दुर्बल बनलेलें असतें. पण ज्यांचीं हृदयें साधीं व पवित्र आहेत, त्यांना सद्‌गुरुप्रसादानें शुद्ध प्रेमाचा अनुभव येतो. शुद्ध प्रेम सामर्थ्यवान् व प्रेरक असतें. माणसांतील दुजा भावाचा पडदा या प्रेमामुळे नष्ट होतो. शुद्ध प्रेमामुळे माणूस स्वार्थत्यागास व सर्वांना कल्याणकारक असणारीं कार्यें करण्यास उत्सुक बनतो. प्रेम हें जातपात, देशविदेश, गणगोत, धर्मभेद, लिंगभेद इत्यादि कांहीहि ओळखत नाही. प्रेम हें संस्कारजन्य गुलामगिरींतून मुक्तता करतें, व आत्मप्रत्ययाच्या स्वतंत्र वातावरणांत नेऊन

---

* धंतोली, नागपूर. १३, नोव्हेंबर १९४४

सोडतें. या प्रेमामुळे मनुष्य अनंत व चिरंतन जीवनाच्या स्फूर्तिमय शक्तींत विलीन होतो.

व्यक्ति व तिचें आत्मस्वरूप यांत मुख्यत्वें भेदप्रवण अहंभावाचाच पडदा असतो. हा अहंभाव पूर्णपणे समर्पण करूनच हृदयाचीं बंद कपाटें उघडणें शक्य होतें; व अशा अहंभावशून्य हृदयांतच ईश्वराचा प्रवेश होऊं शकतो. आत्मज्ञानी व सत्यस्वरूप विभूतिद्वारांच ईश्वरस्वरूपाचा प्रत्यय येऊं शकतो. असा पुरुष हृदयांत शुद्ध प्रेम उत्पन्न करतो. हृदयावर चढलेली बुरशी त्याच्या कृपेने जळून भस्म होते. अशा पूर्ण पुरुषास जे धैर्यशाली व भाग्यशाली लोक शरण जातात, त्याच्यावर त्याची कृपा होते. जे लायक असतात, तेच सद्गुरूच्या प्रसादाचे अधिकारी होतात. हा प्रसाद मिळाला, म्हणजे हृदयांत खऱ्या प्रेमाचा उदय होऊन, साधक ईश्वरस्वरूपांत विलीन होतो; व ईश्वराशीं ऐक्य पावल्यावर, तो त्या दिशेने प्रयत्न करणाऱ्या इतर अनेक साधकांचा मार्गदर्शक बनतो. दुसरी कोणतीहि शक्ति शुद्ध प्रेमाहून अधिक मोठी नाही.

## ११

# अखिल जीवनाची एकता.*

### अविचारी धडपडीचें दुःखमय पर्यवसान

आज माणूस माणसाचा शत्रू बनला आहे. आविचारी, व अर्थहीन व अपरिहार्य घटनाचक्रांत तो असहाय्यपणे सांपडला आहे. आत्मविचाराच्या अभावामुळे कालप्रवाहांत या हेतुशून्य घटनाचक्रांचा उदय झालेला आहे.

### बंधुतेच अस्तित्व

अविभाज्य जीवनसमुद्रांतील एकत्वामध्ये निव्वळ अज्ञानामुळे, जात, देश, धर्म, पंथ इत्यादि भेद निर्माण झालेले आहेत. या कृत्रिम भेदामुळे हृदय विषारी बनतें; व आपसांतील

---

* कान्व्होकेशन हॉल, नागपूर युनिव्हर्सिटी. १४, नव्हेंबर १९४४

परस्परसंबंध दूषित होतात. वस्तुतः आपण सर्व एकाच जीवनाचे अंश आहोंत, म्हणून बंधुता ही प्रयत्नपूर्वक निर्माण करावयाची एखादी आगंतुक गोष्ट नसून, स्वयंसिद्ध वस्तुस्थिति आहे. सत्याचा अंगिकार करावयाचें ठरवितांक्षणींच या बंधुतेला मान्यता देऊन तदनुसार वागणें, हें प्रत्येकाचें कर्तव्य ठरतें. ईश्वरस्वरुपाशीं एकरूप असलेल्या महापुरुषांच्या चरणीं लीन होऊन, हें सत्य हळूहळू आत्मसात् करून घ्यावयास हवें. हळूहळू मानवाने आपल्या पूर्वग्रहांचा त्याग करून, वरपांगी दिसणाऱ्या मिथ्या भेदांच्या जाळ्यांतून सुटका करून घेतली पाहिजे. हळूहळू मानवाने अद्वैतपूर्ण व अभेदपर अशा ईश्वरस्वरूपाकडे धांव घेतलीच पाहिजे.

## विभागूं न शकणारी विविधता

एकरूप ईश्वराचा हृदयांत उदय झाला, म्हणजे द्वैताचा खेळ संपला असें नव्हे. तुम्हाला जगांतील कार्य जगाच्या द्वैतांतच करावयाचें असतें; पण द्वैतांत गुंतून न जातां एकत्वाची स्थापना करणें, म्हणजे जगांतील विविधता समूळ नाहीशी करणें नव्हे. साकार जगांत वैचित्र्यपूर्ण आविष्काराला पुष्कळ अवकाश राहतो. पण चिरंतन सत्याच्या अनुभूतीवर अधिष्ठित असलेल्या निर्मितिक्षम सुसंवादितेमध्यें असल्या विविधतेमुळें बदसूर निर्माण होत नाहीं. उलट सत्यपूर्ण जीवनाच्या अमर्याद एकरूपतेंत ती भिन्नता विलीन होईल. आत्मसाक्षात्कारांतून सहिष्णुता, जीवनांतील गोडी आणि विशुद्ध प्रेम यांचा उदय होऊन औदासीन्य, वैविध्याचा अनिच्छापूर्वक अंगिकार व आसक्ति यांचा लोप होईल. वैविध्यपूर्ण जगांतच एकत्वाचा आस्वाद घेतां आला पाहिजे.

# मानवाचें अंगीभूत ईश्वरत्व

दैवी प्रेमाचें महत्त्व स्वयंसिद्ध आहे. प्रेमाचा इन्कार करणें म्हणजे स्वत:च्याच शुद्ध व सत्य स्वरूपाचा इन्कार करणें आहे. प्रेमशून्यतेमुळे फक्त आत्मवंचना व आत्मनाश हींच संभवतात. कधी तरी, अंतर्मुख दृष्टी करून, आत्म्याला जखडणाऱ्या शृंखलांचा त्याग केला पाहिजे. भिन्नभावाची बेडी ही कधी तरी मोडून फेकलीच पाहिजे. अशानेच मानवास परमात्मस्थितींतील अनंत जीवनाचा लाभ होईल. मग यांत उशीर कशाला? काल्पनिक भिन्नत्वाचें पटल या क्षणींच कां दूर कराना! विशुद्ध प्रेमाला जीवन अर्पण करा; आणि निर्भय बना. अखिल जीवन अविभाज्य व एकरूप आहे. भिन्नत्व काल्पनिक आहे. मी सादर केलेल्या या अमर सत्याचा स्वीकार करा!

१२

# सात उदात्त तत्त्वें

(१) खरें अस्तित्व परमात्म्यालाच आहे. सर्वभूतान्तरात्मा जो एकच एक परमेश्वर त्याच्यावाचून कोणतीहि वस्तु सत्य नाही.

(२) खरें प्रेम, म्हणजे अनंत आत्मतत्त्वावर असणारें प्रेम. या प्रेमामुळे परमात्मरूपी सद्वस्तु पाहण्याची व तिचें ज्ञान करून घेऊन तिच्याशीं एकरूप होण्याची तीव्र आकांक्षा जागृत होते.

(३) खरा आत्मयज्ञ, म्हणजे या प्रेमाकरिता देह, मत, अधिकार, स्वार्थ व प्राणहि अर्पण करण्यास तयार असणें.

(४) खरा त्याग, म्हणजे व्यवहारांतील अनेकविध कर्तव्य करीत असतांना, सर्व स्वार्थपर विचारांना व वासनांना टाकून देणें.

(५) खरें ज्ञान, म्हणजे सज्जन लोकांचा व वाईट समजल्या जाणाऱ्या लोकांचा, तसेंच सत्पुरुषांचा व पापी समजल्या जाणाऱ्या

लोकांमधील अन्तर्यामी परमात्माच आहे, हें जाणणें. हें ज्ञान प्राप्त झाल्यावर, मनुष्य मोबदल्याची अपेक्षा न ठेवतां, सर्वांना परिस्थिती-नुरूप मदत करण्यास तत्पर असतो. त्याच्यावर भांडणांत भाग घेण्याचा प्रसंग अनिच्छेने आलाच, तर तो आपलें कर्तव्य करीत असतांना निर्वैर व द्वेषरहित राहतो. इतरांच्या विषयी बंधुभाव व भगिनीभाव ठेऊन, त्यांना सर्वांना तो आनंद देतो; व तो कोणा-चेहि—ज्यांनी त्यांचें नुकसान केलें असेल त्यांचें देखील—देहाने, वाणीने किंवा मनानेहि वाईट करीत नाही.

(६) खरा संयम, म्हणजे नीच वासनांपासून निवृत्त होऊन जितेंद्रिय होणें. असल्या संयमाशिवाय शील पूर्णपणे निर्लेष राहूं शकत नाही.

(७) खरी शरणागति, म्हणजे प्रतिकूल परिस्थितीमुळे मनाची साम्यावस्था ढळूं न देणें व सर्व प्रकारच्या संकटांत ईश्वरी इच्छेचा शान्तपणे स्वीकार करणें.

## १३

# मानवतेस आध्यात्मिक स्वातंत्र्य मिळविण्यास मदत करा

जगांत सगळीकडे प्रत्येक मनुष्याचा आत्मा स्वातंत्र्यासाठीं तळमळत आहे. स्वातंत्र्यप्रेम आणि स्वातंत्र्यासाठी शोध हे मानवतेचे गुणविशेष आहेत. सर्व देशांत, सर्व प्रकारच्या परिस्थितींत, सर्व जातींत आणि सर्व काळीं " स्वातंत्र्य " हाच मानवतेचा मानबिंदु झालेला आहे. परंतु निर्भेळ आणि खऱ्या स्वातंत्र्याचा अर्थ ज्यांना कळलेला आहे असे फारच थोडे लोक आहेत. बऱ्याचशा लोकांना स्वातंत्र्यास वास्तविक आवश्यक असणाऱ्या गोष्टीबद्दल फारच कमी माहिती असते; व त्यामुळे त्यांची धडपड केवळ सापेक्ष स्वातंत्र्य प्राप्त करून देणाऱ्या जीवनाकरिताच असते. सारांश, निरनिराळे लोक निरनिराळ्या प्रकारच्या सापेक्ष स्वातंत्र्यासाठी झटत असतात.

आयुष्याच्या सर्व क्षेत्रांत मनुष्याला स्वातंत्र्य हवें असतें; आणि म्हणून मनुष्य ज्या प्रकारचें आयुष्य चालवूं इच्छितो त्या प्रकारच्या आयुष्यास लागणाऱ्या सर्व गोष्टी त्याला हव्या असतात. अशा प्रकारें आपल्या देशाशीं जे तादात्म्य पावतात त्यांना "राजकीय स्वातंत्र्य" हवें असतें; ज्यांना आर्थिक गोष्टींचें महत्त्व वाटत असतें, त्यांना आर्थिक स्वातंत्र्य हवें असतें; ज्यांना धार्मिक बाबींनी स्फूर्ति मिळते त्यांना धार्मिक स्वातंत्र्य हवें असतें. सामाजिक अगर सांस्कृतिक ध्येयाविषयी ज्यांना आत्यंतिक तळमळ असते ते त्यांना ज्या प्रकारचीं ध्येयें आवडत असतात, आणि त्यांना ज्या ध्येयाचा प्रसार करावासा वाटतो, त्या ध्येयाचीं वाचेने व कृतीने उपासना करण्याचें स्वातंत्र्य मिळविण्याचा प्रयत्न करतात. परंतु या साऱ्या स्वातंत्र्यांना ज्यामुळें खरें महत्त्व येतें, असें मूळ स्वातंत्र्य म्हणजे आध्यात्मिक स्वातंत्र्य आहे, याची जाणीव फारच थोड्या लोकांना आहे. वास्तविक: मनुष्याला जरी संपूर्ण स्वातंत्र्य मिळालें, तरी जोंपर्यंत त्याला आध्यात्मिक स्वातंत्र्य मिळत नाही, तोंपर्यंत त्याचा आत्मा दुःखात्मक बंधनांतच तळमळत राहील. कोणतीहि व्यक्ति, समाज अगर देश ज्या व्यावहारिक स्वातंत्र्यासाठी प्रयत्न करतात, तें स्वातंत्र्य स्वभावतःच मर्यादित असतें. कारण तें दुसऱ्या कोणत्याहि व्यक्ति, समाज अगर देश यांना हव्या असणाऱ्या तसल्याच प्रकारच्या स्वातंत्र्याशीं अविरोधी असलें पाहिजे.

राजकीय, आर्थिक, धार्मिक व सांस्कृतिक स्वातंत्र्य द्वंद्वांतच आणि द्वंद्वामुळेच अभिव्यक्त होतें. तें द्वंद्वावरच जगतें; आणि द्वंद्वावरच पुष्ट होतें. म्हणूनच तें सापेक्ष आणि मर्यादित असतें.

तें अनंत असूं शकत नाहीं. त्याचें प्रमाण कमी जास्त होऊं शकतें; आणि जरी सतत प्रयत्नानें तें मिळविलें, तरी तीं चिरकाल टिकणारी ठेव होऊं शकत नाहीं. कारण त्यासाठीं ज्या बाह्य गोष्टी मिळविलेल्या असतात, अगर जी बाह्य स्थिति परिपक्व केलेली असते, त्या गोष्टी व ती परिस्थिति कायमची टिकेलच अशी खात्री नसते.

केवळ आध्यात्मिक स्वातंत्र्यच पूर्ण आणि अनंत असतें; आणि सतत प्रयत्नांनी तें साध्य झालें तर तें चिरकाल टिकतें, कारण जरी द्वंद्वांमध्येच आध्यात्मिक स्वातंत्र्य व्यक्त होत असलें, तरी त्याचें अधिष्ठान जीवनाच्या एकतेच्या अनुभवांत असून, त्यावरच तें पोसलें जातें.

आध्यात्मिक स्वातंत्र्य मिळण्याची मुख्य अट म्हणजे सर्व प्रकारच्या गरजांपासून मुक्ति ही होय. वासना हीच मनुष्याला त्या वासनेस पोषक असलेल्या परिस्थितींत बांधून ठेवते. जर कोणतीहि वासना नसेल, तर कसलीहि मर्यादा राहणार नाही; आणि कशावर अवलंबूनहि राहावयाला नको. वासनेमुळेच आत्मा बंधनांत पडतो. हीं वासनेचीं बंधनें जेव्हा तो तोडून टाकतो, तेव्हा तो शरीर, मन आणि अहंकार यांच्या बंधनापासूनहि स्वतःला मुक्त करतो; आणि हेंच जीवनाच्या एकतेची प्रतीति आणून देणारें आणि सर्व प्रकारचे संशय आणि चिंता नाहीसे करणारें असें आध्यात्मिक स्वातंत्र्य होय.

आध्यात्मिक स्वातंत्र्यांतच चिरंतन सुख आणि निर्मळ आत्मज्ञान असूं शकतें. सत्यप्रीतीचा अबाधित अनुभव केवळ

आध्यात्मिक स्वातंत्र्यांतच उगम पावूं शकतो. आध्यात्मिक स्वातंत्र्यांतच मर्यादितपणा आणि दुःख यांचा कायमचा अंत होऊं शकतो. आणि आध्यात्मिक स्वातंत्र्यांतच मनुष्य सर्वांकरिता जगूं शकतो; व कार्य करीत असतांनाहि तो अलिप्त राहूं शकतो. दुसऱ्या प्रकारचें कोणतेंहि स्वातंत्र्य हें वाळूवर बांधलेल्या घराप्रमाणें असतें; आणि दुसऱ्या कोणत्याहि प्रकारच्या ध्येयसिद्धीला नष्ट होण्याची भीति असते. म्हणून आध्यात्मिक स्वातंत्र्यासारखी दुसरी देणगी नाही; आणि दुसऱ्यांना ती मिळविण्यास मदत करण्यासारखें श्रेष्ठतम कर्तव्य नाही. ज्यांना या आध्यात्मिक स्वातंत्र्याचें आत्यंतिक महत्त्व पटलें असेल, त्यांनी तें स्वतःसाठीं मिळविण्याचा प्रयत्न करावयाचा येवढेंच नव्हे, तर दुसऱ्यांना तें मिळविण्यासहि मदत करणें, हें त्यांचें ईश्वरप्रणीत कर्तव्य आहे.

ज्यांना दुसऱ्याची निःस्वार्थ सेवा करावीशी वाटते, ते त्यांना कपडे, औषधें, अन्न व राहावयास आश्रय देतात; व ते कर्तव्यबुद्धीने प्रेरित होऊन प्रबलांकडून झालेल्या जुलुमापासून दुर्बलांचें रक्षण करण्यास तत्पर असतात. एवढेच नव्हे तर दुसऱ्यासाठीहि आपले प्राण खर्ची घालण्यास ते तयार असतात. अशा सर्व प्रकारची सेवा चांगली आहे. परंतु मानवतेसाठीं आध्यात्मिक स्वातंत्र्य मिळविण्यास लागणारी मदत या सर्वांहूनहि अधिक महत्त्वाची असून अत्यंत श्रेष्ठ होय.

आध्यात्मिक स्वातंत्र्य मिळविण्यास मदत करण्याचा मार्ग इतर कोणत्याहि मदत करण्याच्या मार्गापेक्षा अगदीच निराळा आहे. भुकेल्या माणसाला तुम्ही अन्न द्याल, आणि त्याला मग तें नुसतें

खावें लागेल; तहानेल्याला तुम्ही पाणी द्याल; आणि त्याला मग तें नुसतें प्यावें लागेल; वस्त्रहीन मनुष्यास तुम्ही कपडे द्याल; आणि त्याला ते नुसते घालावे लागतील; आश्रयहीन मनुष्यास तुम्हीं घरें पुरवाल; आणि त्यांस त्यांत नुसतें राहावें लागेल. परंतु आध्यात्मिक बंधनाच्या यातनांचें दुःख तात्काळ शमन करणारी दुसऱ्यांना देण्यासारखी अशी कोणतीहि तयार वस्तु नसते. आध्यात्मिक स्वातंत्र्य हें स्वतःसाठी स्वतःलाच आपल्या नीच मनोवृत्तींशीं झगडून आणि सतत जागता पहारा करून मिळवावें लागतें. सत्यप्रसाराचें कार्य स्वीकारलेल्या प्रत्येक शिपायाने इतरांना आत्मविजय मिळविण्याच्या प्रयत्नांस उद्युक्त करावयाचें असतें; इतकेंच नव्हे, तर, त्या बाबतींत प्रत्येक पाऊल टाकतांना त्यांना मदत करावयाची असते. त्यांचें ओझें हलकें करण्याचा दुसरा मार्ग नाही.

प्रियतम वाचकांनो! तुम्ही माझ्या या कार्याचे सहभागी व्हाल असा माझा पूर्ण विश्वास आहे. तुमच्यापैकी पुष्कळांनी आजपर्यंत पुष्कळ वर्षेपर्यंत माझ्यावरील प्रेम व श्रद्धा यामुळे माझ्या आज्ञांचें पालन केलें आहे. आणि माझ्या आध्यात्मिक कार्यासाठी नानाप्रकारच्या संकटांत तुम्ही मला चिकटून राहिलां आहां. आता मानवतेला ईश्वरप्रतीति होण्यास मदत करण्याच्या माझ्या कार्यासाठीं सर्वस्व अर्पण करण्याची वेळ आलेली आहे. केवळ परमेश्वरच सत्य आहे हें अक्षय चिरंतन सत्य स्पष्टपणें समजून घेऊन त्याविषयीं निःशंक झालें पाहिजे; व तें नीट पटवून घेऊन वाचेने व आचरणाने सिद्ध केलें पाहिजे; सत्याचें पूर्ण ज्ञान होण्यांतच मनुष्याला आध्यात्मिक स्वातंत्र्य मिळणार आहे. सर्वांच्यामध्ये एकच

परमतत्व भरलें आहे. या प्रतीतिमुळे परस्परांबद्दल अनिर्बंध प्रेम निर्माण होतें. व तें अनिर्भेद्य जागतिक बंधुतेस पोषक होतें. चिरंतन शांति निर्माण करील, असें सत्य समजण्यासाठी आणि मनुष्याला आध्यात्मिक बंधनांतून मुक्त करण्यासाठी कितीहि मोठा त्याग करावा लागला, तरी तो थोडाच आहे.

"मानवतेला आध्यात्मिक स्वातंत्र्य देण्याच्या या ईश्वरप्रणीत कार्यांत मला मदत करीत असतांना, जरूर पडल्यास तुह्मी प्राण देण्यासहि तत्पर असलें पाहिजे. परमेश्वरशोधाच्या कार्यांत दुसऱ्यांना मदत करण्याच्या तुमच्या कर्तव्यांत तुह्मांला सर्व प्रकारच्या दुःखांचे व त्यागांचे स्वागत करावें लागेल. आपल्या वैयक्तिक परिस्थितीला उत्तम झेपेल, अशा कार्याची रूपरेषा ठरविण्यासाठी, जर कोणाला विशिष्ट सूचनांची गरज असेल, तर माझ्याकडून त्या देण्यांत येतील."

# १४

# नवीन कालचक्र*

"मी एखादा पंथ, संस्था, संघ किंवा नवीन धर्म स्थापन करण्याकरिता आलों नाही. मी जो धर्म शिकवीन, त्यामुळे अनंत-रूपांत अनस्यूत असलेल्या एका तत्त्वाचें ज्ञान होईल. लोकांना मी अंतःकरणरूपी पुस्तक वाचण्याचें शिकवीन; कारण त्यांतच जीवनां-तील रहस्याची किल्ली आहे. विधींच्या बाह्य आविर्भावापेक्षा, त्यांच्या मागे असणारा भावच आपल्या विवेकशक्तीने आचर-णांत आणला पाहिजे. बुद्धि व भावना, यांचा मी सुंदर मिलाफ घडवून आणीन. संस्था व संघ स्थापून सत्य कधीच जवळ येत नाही. तत्त्वप्रत्यय करून घेणें हें व्यक्तीचेंच कार्य आहे.

"प्रत्येक प्राणिमात्रास स्वतःमध्येच असलेल्या प्रेम, आनंद, ज्ञान व श्रेय, यांच्या सागराकडे जातां येतें. पुढे धर्माचें जें स्वरूप होतें,

*ब्रेमेन बोटीवरून: १९, मे १९३२

त्या स्वरूपांत कोणताहि आध्यात्मिक प्रणेता नवीन धर्म देत नाही. मूळ धर्मसंस्थापकाचें केवळ अस्तित्वच कल्याणप्रद व अध्यात्मप्रवृत्तीस पोषक असतें. तो आपल्या सान्निध्यानें दुसऱ्यास आत्माभिमुख करतो. थोर महात्म्याशीं झालेला आपला सहवास चिरस्मरणीय व्हावा, व त्यानें स्वतःच्या प्रभावानें उत्पन्न केलेलें वातावरण कायम राहावें, या उद्देशानें लोक सामुदायिक धर्म अस्तित्वांत आणतात. आंतील भाव नष्ट झाला, म्हणजे धर्मांचें व संतांचें माहात्म्य हळू हळू क्षीण होतें. नंतर प्रचलित कल्पनांविषयीं मन साशंक व चिकित्साप्रवण होतें, व अध्यात्मजीवनास पोषक असून, अधिक अर्थपूर्ण व व्यवहार्य असणारें दुसरें नवीन तत्त्व शोधण्याची इच्छा उत्पन्न होतें. हल्लीं जगांत सार्वजनिक असमाधान आहे. आणि जगांतील गोंधळ व दुःख नष्ट करणारा उपाय आपणास सापडावा, अशी लोकांची इच्छा आहे. ती मी तृप्त करीन; व त्यांना खऱ्या आनंदाचा व शांतीचा मार्ग दाखवीन. पण याकरता, त्यांची दृष्टि अधिक विशाल व गंभीर झाली पाहिजे.

"साधारणतः, सद्गुरु हे मुमुक्षूंना त्यांच्या अधिकाराप्रमाणे योग्य तें साहाय्य व्यक्तिशः देतात. परंतु, पूर्वीचें कालचक्र संपून हल्लीं नवीन कालचक्रास प्रारंभ होत असल्यामुळे, हा अवतारकाल आहे; व म्हणून, मानवजातीस माझी मदत व्यक्तिशः व सार्वत्रिकहि होईल. जुन्या व नवीन कालचक्रांचा संधि आला, म्हणजे अध्यात्म विचारांचें पुनरुज्जीवन करून रूढ जीवनपद्धतींत नवचैतन्य निर्माण करणारा पुरुष जन्मास येतो. कांहीं थोड्या व्यक्तींना तो अत्युच्च प्रबुद्धावस्था देतो व सर्व जगाच्या आध्यात्मिक प्रगतीस चालना देतो.

"पाश्चिमात्य जग हें जीवनाकडे केवळ बुद्धीच्या व तर्काच्या दृष्टीने पाहतें; व बुद्धीस अगम्य असणाऱ्या तत्त्वाविषयीं तें साशंक आहे. बौद्धिक माहिती म्हणजे सर्वांत निकृष्ट दर्जाचें ज्ञान असलें, तरी वाचन, श्रवण व तर्क इत्यादिकांमुळे ती माहिती वाढते; व त्यामुळे खऱ्या ज्ञानाचा आभास उत्पन्न होतो.

" परंतु सर्वांत श्रेष्ठ ज्ञान म्हणजे सर्व वस्तूंचें यथार्थ दर्शन घडविणारा व चिरकाल टिकणारा प्रबोधच होय. ह्या सर्वार्थ-प्रकाशक प्रबुद्ध स्थितींत, मनुष्य सर्व वस्तूंशीं व व्यक्तींशीं समरस होऊन, जीवनांतील सर्व कलांमध्ये ईश्वरत्वाचा अनुभव घेतो; व इतरांस आनंदमय करण्याचें त्याच्यांत सामर्थ्य येतें. जगांतील कर्तव्य व व्यवहार तो लक्षपूर्वक करीत असला, तरी तो जगाविषयीं मनानें नि:संगच्च राहतो. हाच खरा संन्यास. या शेवटल्या व अतिश्रेष्ठ प्रबुद्धावस्थेंत, आत्मा हा शक्ति, ज्ञान व आनंद यांनी भरलेल्या अमर्याद महासागरांत लय पावतो. ज्याला ही मुक्ति मिळते, तो हजारों मनुष्यांस आपल्याप्रमाणेंच पूर्ण करूं शकतो.

" आध्यात्मिक स्वरूपाची पुनर्घटना लवकरच घडवून आणण्याचा माझा संकेत आहे. अशा प्रकारचा दैवी शक्तीचा आविष्कार कालचक्रांच्या संधिकालांत होत असतो; व ख्राईस्टच्या अवस्थेंत राहणारा पूर्ण पुरुषच या प्रकारें सार्वत्रिक स्फूर्ति देऊं शकतो. माझ्या कार्यामध्ये, सर्व वस्तूंचा व जीवनकलांचा अंतर्भाव होईल. पूर्णावस्थेंत, त्याज्य व ग्राह्य असा भेद राहत नाही. माझ्यापासून मिळणाऱ्या आध्यात्मिक गतीमुळे, जगांतील राजकीय, आर्थिक व वैषयिक प्रश्न ( त्यांचा मुख्य सिद्धांताशीं प्रत्यक्ष संबंध नसूनहि ) आपोआप सुटूं

लागतील; व सध्या अगम्य वाटत असलेल्या बाबतींत नवीनच सार व अर्थ आढळून येईल.

" ही अध्यात्मिक घडामोड होत असतांना, जो विविध देशांस फायदा होईल, तो त्या देशांत असणाऱ्या शक्तीवर अवलंबून राहील. ज्या मानाने सामर्थ्य अधिक असेल, त्या मानाने कार्यहि अधिक विस्तृत स्वरूपाचें होईल. सद्गुरु हा फक्त शक्तिप्रवाहास योग्य दिशा देतो. व्यवहारपरायण पाश्चिमात्य संस्कृति व ध्येयनिष्ठ पौर्वात्य संस्कृति, यांचा सुंदर मिलाफ घडवून आणणें, हेंच माझें अशक्यप्राय वाटणारें कार्य आहे. बौद्धिक व भौतिक प्रगतीच्या उच्च शिखरावर आरूढ झालेली पाश्चिमात्य संस्कृति व पूर्ण सद्गुरूच्या रूपाने अध्यात्मिक उन्नतीची पराकाष्ठा व्यक्त करणारी पौर्वात्य संस्कृति, ह्या परस्परांस कमी न लेखतां, एकमेकांत मिळून जातील. आध्यात्मिक व आधिभौतिक प्रगति बरोबरच झाली पाहिजे. बुद्धि व अंतःकरण यांच्यांत समता ठेवली पाहिजे. विवेका-करता बुद्धि पाहिजे; व भावनांकरता अंतःकरण पाहिजे. त्यांच्या सम्यक्मीलनामुळे कला, शास्त्र व निसर्ग, या सर्वांचा अंतर्भाव असणाऱ्या पराप्रज्ञेची प्राप्ति होते.

" ज्या अनंत तत्त्वापासून सर्व वस्तू उत्पन्न होतात, त्या तत्त्वाशीं मी ऐक्य पावलों आहे. हीच खाइस्टअवस्था. मला लोकांनी जगाचा उद्धार करणारा ईश्वरप्रेषित महात्मा म्हटलें, तरी त्याचा माझ्यावर कांहीं परिणाम होत नाही. कारण ज्या खाइस्ट अवस्थेचा मी सतत अनुभव घेतों, व ज्या अवस्थेप्रत मी इतरांना नेईन, ती अवस्था शब्दातीत आहे.....

"ख्राइस्टपदास पोचलेला कोणीही पुरुष चमत्कार करूं शकतो. परंतु चमत्कार करणें हे अध्यात्मिक उन्नतीचें लक्षण असतेंच असें नाही. लोकांनीं माझ्याकडे शारीरिक व्यथेकरता किंवा ऐहिक वस्तूंच्या प्राप्तीकरतां येऊं नये. देश, काल व परिस्थिति यांना अनुरूप असे चमत्कार माझ्या हातून घडले, तरी कोणाचीही पोकळ जिज्ञासा पूर्ण करण्याकरता मी चमत्कार करणार नाही. आध्यात्मिक सुधारणा करणें, म्हणजेच अतिश्रेष्ठ रोगनिवारण आहे; व तें मी घडवून आणीन. परमपद प्रत्येकांत छादित स्थितींत आहे; परंतु ते स्पष्टप्रत्ययांत आणलें पाहिजे."

१५

# न्यूयॉर्कला संदेश*

"कांहीं वृत्तपत्रकारांना माझ्या कार्याचें यथार्थ स्वरूप समजलें नाहीं, किंवा ते केवळ खळबळ उत्पन्न करण्याच्या इच्छेस बळी पडले, तर त्यांत फारसें आश्चर्य नाही.

"मला कोणताहि धर्म, संस्था, पंथ, किंवा संघ स्थापन करावयाचा नाही. अशा प्रकारचे संघ हल्ली पुष्कळ आहेत. आपलें ध्येय नित्य आचरणांत आणण्याकरता लोकांना मी मदत करीन. तत्त्व व आचरण, ध्येय व त्याची अभिव्यक्ति, या दोहोंत जें आधुनिक कालांत महदंतर आहे, त्यामुळेंच सार्वत्रिक असमाधान उत्पन्न होतें. हल्ली जीवनाच्या आध्यात्मिक व आधिभौतिक बाजूंचें एकीकरण करण्याऐवजीं, त्या एकमेकांपासून विभक्त करण्यांत आल्या

---

*न्यूयॉर्क. २२ मे, १९३२

आहेत. परंतु जीवन व त्याची रूपमय अभिव्यक्ति, चैतन्य व भौतिक सृष्टि या दोहोंत मूलतः विरोध नाही. त्यांच्यांत विरोध असल्याचा भास अज्ञानामुळे उत्पन्न होतो. तेव्हा योग्य विचार करणें, व बुद्धि व भावना यांच्यांत समता उत्पन्न करून, प्रबोध मिळविणें, हाच एक त्यावर उपाय आहे. अशा प्रकारचा प्रबोध तुम्हाला माझ्याकडून मिळेल.

"ज्यांनी गूढ संशोधनाची पराकाष्ठा केली आहे, अशा सर्वांना परमात्मा ही एकच सद्वस्तु असून, तोच सर्व झाला आहे, असा प्रत्यक्ष अनुभव आला आहे. म्हणजे, तुम्हाला जरी ठाऊक नसलें, तरी पर वस्तु ही तुमच्यांपैकी प्रत्येकामध्ये छादित स्थितींत आहे. परंतु त्या पर वस्तूचा अनुभव घ्यावयाचा असल्यास, ती जाणिवेंत आली पाहिजे. सद्वस्तूविषयीं केवळ बुद्धिनिष्ठ निश्चय होऊन भागत नाही. प्रबोध होऊन अखेर त्या सद्वस्तूशीं ऐक्य पावण्यानेच खरें ज्ञान होतें. हीच ख्राइस्ट–अवस्था असून, तिचा मी सतत अनुभव घेतों.

"पौर्वात्य संस्कृतींत 'संस्कार' या नांवाने निर्देशिलेल्या मनःप्रवृत्ती व वासना ह्या प्रबोध होण्यास प्रतिबंध करतात. इतर लोकांशीं संघर्ष करीत असलेल्या विभक्त अहंचा भ्रम हा ह्या प्रवृत्ती व वासनांमुळेच होतो. चैतन्य जेव्हा भूतसृष्टींत अवतीर्ण होऊन उत्क्रांत पावतें, तेव्हा अशा प्रकारचा विभक्त अहं निर्माण होण्याची आवश्यकता असते; व तसा तो निर्माण झाला नसता, तर स्थूल शरीरांत परमात्म्याचा अनुभव येऊंच शकला नसता.

"उत्क्रांतीपूर्वी, आपण सर्व वस्तूंचें उगमस्थान असणाऱ्या तत्त्वाशीं एकरूप होतों. परंतु, सागरांतून कधीच बाहेर न

निघालेला मासा हा ज्याप्रमाणें समुद्राचा विशिष्ट अनुभव स्पष्टपणे घेत नाही, त्याप्रमाणे आपणाला तेव्हां त्या तत्त्वाची जाणीव नव्हती. उत्क्रांतीनंतर, आधी त्या तत्त्वापासून आपण विभक्त होतो; व नंतर जन्ममरणपरंपरेंतून त्याच्याशीं ऐक्य पावण्याची जाणीवयुक्त आकांक्षा आपल्या मनांत उत्पन्न होते. मूलतत्त्वाशीं ऐक्य होणें हे स्थूल देहांतच शक्य आहे. कारण, जडभूतांतच चैतन्यास साम्यावस्था येऊं शकते.

" अमेरिकेंत नाना वर्णांचे लोक एकत्र झालेले असल्यामुळे, लवकरच सुरू होणाऱ्या अध्यात्मिक घडामोडींचा पाया येथे उत्तम रीतीने बांधतां येईल. अमेरिकेंत प्रचंड शक्ति आहे. हल्ली जरी ती योग्य मार्गांत व्यक्त होत नसली, तरी मी तिला आध्यात्मिक व निर्मितिक्षम मार्गांना वळवीन...

" माझें कार्य व्यवहार्यच आहे. ध्येय आचरणांत न आणतां तें केवळ डोळ्यासमोर ठेवणें, किंवा आध्यात्मिक बाबींपेक्षा आधिभौतिक बाबींस अधिक महत्त्व देणें, यांत खरी व्यवहारदक्षता दिसून येत नाही. परंतु आपणास उत्कृष्ट व्यवहार पाहिजे असेल, तर ध्येय नित्य आचरणांत उतरलें पाहिजे; जीवनामध्ये चैतन्यास सुन्दर मूर्त स्वरूप दिलें पाहिजे; व विश्वबंधुत्व कल्पनासाम्राज्यांतून उतरून वस्तुसृष्टींत आलें पाहिजे.

" माझ्या कार्यामुळे अतुल उत्साह उत्पन्न होईल; व कांही प्रमाणांत त्याला विरोधहि होईल. पण हें अपरिहार्य आहे. अशा विरोधामुळे, माझ्या अध्यात्मिक कार्यास पुष्टीच मिळेल. धनुष्याची दोरी आपल्याकडे आपण जितकी अधिक ताणून ओढतों, त्या मानानेच बाण अधिक वेगानें आपल्या इष्ट स्थळीं पोंचतो. "

# १६

# कॅलिफोर्निआस संदेश*

" परमेश्वरप्राप्ति आणि सर्वांत श्रेष्ठ अवस्था, याविषयीं इतकें वाङ्मय झालें आहे, की ती मिळविण्याच्या शक्यतेविषयीं व मार्गाविषयीं लोक गोंधळून जातात. तत्त्वज्ञानाची आवड असलेले लोक ह्या वाङ्मयाचा अभ्यास करून फक्त बुद्धिपहेलवान बनतात. ती श्रेष्ठ अवस्था प्रत्येकामध्ये सुप्त स्थितींत आहेच. 'ईश्वराचा पुत्र' (The son of God) प्रत्येक मनुष्यात आहे, परंतु तो प्रकट झाला पाहिजे, व ही श्रेष्ठ अवस्था प्रचलित मानसिक व भौतिक परिस्थितींत मिळेल, अशा प्रकारचा व्यावहारिक मार्ग आपणास पाहिजे.

" चर्चमधील पुजारी वर्गाने सुरू केलेले निरनिराळे विधि व समारंभ हे ईश्वरप्राप्तीचा मार्ग रुक्ष करतात; व साधारणतः धार्मिक बाबींत जगांत जी हल्ली अनास्था दिसते, तिच्या मुळाशीं हेंच कारण।

---

* हॉलिवुड (कॅलिफोर्निआ) २९, मे १९३२

आहे. हिंदुस्थानांत एका बाजूस अध्यात्मिक विकास पूर्णतेस गेला असला, तरी निरनिराळ्या पंथांनीं लादलेल्या विधींमुळे जातीभेदाचें जंजाळ उत्पन्न झालें आहे. शिवाय, ह्या विधींमुळे बाह्य थाट कायम राहिला, तरी आंतील भाव नष्ट होतो; व अहंकार कच्चा होण्याऐवजी अधिक पक्का होतो; व ज्या मानाने अहंता अधिक घन होईल, त्या मानांने आत्मप्रतिष्ठा पण वाढते. विभक्त-पणाचें हें अहंज्ञान कायम ठेवण्याची भेदवासना ही मनुष्याच्या मनात 'मीच बरोबर आहें,' 'मीच कृपाछत्राखाली आहें,' 'मलाच जगण्याचा हक्क आहें' इत्यादि विचार उत्पन्न करते; व त्यामुळे मनुष्य संहारतत्पर होतो. 'कोणी तुझ्या एका गालावर मारलें, तर तूं आपला दुसरा गाल पुढे कर' ही जीझसची आज्ञा फेटाळून, ख्रिश्चन जगांतील सर्व देश शस्त्रसमृद्धीकरताच अहमहमिका करतात. यावरून अहंज्ञान म्हणजे काय तें स्पष्ट होईल.

"खनिज पदार्थ, वनस्पती व प्राणी—यांमधून उत्क्रान्ति तत्त्वा-प्रमाणें क्रमशः आरोहण करणारें चैतन्य, हें मनुष्यदेहांत अधिक विस्तार पावून, पूर्ण जाणिवेच्या रूपाने विकसित होतें. ही पूर्ण जाणीव निर्माण करण्याकरतांच, अनंत, आनंदमय, सद्रूप व केवल अशा परमेश्वरामधून, ह्या सृष्टीचा आविर्भाव झाला. परंतु मानवी स्थितींत, जाणिवेच्या पूर्ण विकासाबरोबरच, पूर्वीच्या परिस्थितीमुळे अहंभाव किंवा मीपणा उत्पन्न होतो; व ही अडचण नाहीशी करण्याकरतांच, महात्मे व सद्गुरु हे भूतलावर अवतार घेतात.

तृप्त व अतृप्त वासनाच या अहंभावाच्या घटक आहेत. अहंभावामुळें, मनुष्यास स्वतः मर्यादित, दुर्बल व दुःखित

असल्याचा भ्रम होतो. मानवी स्थितींतील पूर्ण जाणीव कायम ठेऊन अहंभाव टाकणें, व त्याचें हळूहळू ब्रम्हात्मभावांत रूपांतर करणें, हीच यापुढील आत्मोन्नति आहे. मनुष्यास ही ब्राह्मी स्थिती प्राप्त झाली, म्हणजे तो स्वतःस सर्वांमध्ये पाहतो; व सर्व वस्तुजात सत्तामय स्वात्म्याचीं मूर्तरूपें असल्याचें जाणतो. अहंभाव घालवून ब्राम्ही अवस्था प्राप्त करण्याचा सर्वांत उत्तम व सोपा मार्ग, म्हणजे प्रेम वाढवून, कोणत्याही परिस्थितींत मानवजातीची निष्काम सेवा करणें, हाच होय. धार्मिक व नैतिक व्यवहार हे ह्या मार्गास पोषक आहेत. ज्या मानाने आपण स्वार्थ विसरून इतरांच्यांकरता जीवित खर्च करूं, त्या मानाने आपल्या मलिन वासना क्षीण होतात; व त्यामुळे, अहंभाव घटत जाऊन त्याचें स्वरूप बदलतें. मीपणा अखेरपर्यंत कायम राहतो. ख्राइस्ट–अवस्था प्राप्त होण्यापूर्वींच्या मोक्षमार्गांतील सहा भूमिका ओलांडल्यानंतरच तो पूर्णपणे मावळतो; व त्याचें दैवी आत्मभावामध्यें रूपांतर होतें. ‘ मी व माझा पिता अभिन्न आहोंत ’ असें जेव्हा जीझस म्हणाला, तेव्हा तो ह्याच ब्राह्मी अवस्थेंत होता. ह्या स्थितींत, मनुष्य अनंत पदाचा व सत्य वस्तूचा एकाच वेळीं अनुभव घेतो.

“साधारणतः, उपरोक्त क्रम हा सद्गुरु न भेटल्यामुळे स्वतःच प्रयत्न करणाऱ्या साधकास लागू आहे. परंतु पूर्ण सद्गुरूचें साहाय्य असेल, तर सर्वच काम फार सोपें होतें. पूर्ण पुरुषास सर्वभावाने शरण जाऊन, त्याची आज्ञा तत्परतेने पाळली, तर हजारो वर्षें नीति-नियमांचें पालन करण्यापेक्षा अधिक फायदा होतो. समष्टि-मनाशीं ऐक्य पावल्यामुळे, पूर्ण सद्गुरु हा प्रत्येक मनुष्याच्या अंतःकर-

णांत असतोच; व त्यामुळे, साधकांत सुप्त असलेलें श्रेष्ठ ज्ञान जागृत करण्याकरिता, ज्या विशिष्ट स्वरूपाची मदत आवश्यक असते, तीच मदत तो त्याला देऊं शकतो. पूर्ण सद्गुरूच्या अलौकिक कर्तृत्वाचें कारण हेंच आहे. पूर्णतेस सहृदयता व विनोदी स्वभाव यांची जोड असेल, तर भौतिक भूमीमध्ये जास्त प्रभावशाली परिणाम होतो.

" मी सतत खाइस्ट–अवस्थेंत असतों....सर्व जगास आध्यात्मिक गति देऊन, शिवाय जे कोणी माझ्याकडे येतील, त्यांना मी स्वयंज्योति सत्पदाचा मार्ग दाखवीन. हेंच माझें अवतारकार्य आहे. "

---

## १७

# हॉलीवुडला संदेश*

"अमेरिकेंत आल्यापासून लोक मला विचारतात की, 'बेकारी, व्यसनाधीनता, समाजस्वास्थ्यास विघातक गुन्हे करण्याची प्रवृत्ति, इत्यादि सामाजिक स्वरूपाचे बिकट प्रश्न सोडविण्याविषयीं मला काय सांगावयाचें आहे ?'

"व्यक्तिगत व सामाजिक सर्व अनर्थांचें मूळ स्वार्थवृत्तींतच आहे. मुत्सद्दी लोक हे लुचपत घेऊन, आपणास निवडून देणाऱ्या लोकांच्या हिताविषयीं स्वार्थामुळेच उदासीन होतात; स्वार्थाकरताच, दरवडेखोर लोक कायदे झुगारून स्वहित साधतात; व स्वार्थाकरताच, गरीब जनतेची छळणूक होते. तेव्हा, स्वार्थवृत्ति गेली, तरच हे सर्व अनर्थ नष्ट होतील. परंतु स्वार्थवृत्ति टाकून देण्याचें काम सोपें नाही. निःस्वार्थ होण्याची मनुष्यास तळमळ लागली असली, तरीहि स्वेच्छेने

*हॉलीवुड निकरबाकर हॉटेल मधील स्वागतप्रसंगीं. ३१, मे १९३२

तत्त्वप्रत्यय देण्यास समर्थ असलेल्या सद्‌गुरूची मदत असल्याशिवाय, तें कधीच पूर्णपणें साध्य होत नाहीं. आत्मविषयक भ्रामक कल्पनांमुळेच स्वार्थवृत्ति उत्पन्न होते; व सत्यरूपाचें ज्ञान होऊन ह्या भ्रमाचा बोध झाला, म्हणजे स्वार्थवृत्ति नष्ट होते.

" सर्व भूतांत अंतर्भूत असलेल्या एकमेव परमात्म्याचें ज्ञान मी तुम्हांस करून देईन. त्यामुळे, विभक्त अहंची भ्रान्तिमूलक कल्पना जाऊन, स्वार्थवृत्ति नष्ट होईल. व चढाओढीच्या ऐवजीं सहकार्य उत्पन्न होईल; भीतीच्या ठिकाणीं श्रद्धा निर्माण होईल; लोभाची वृत्ति जाऊन, तेथेच औदार्य दिसूं लागेल; व परपीडन नामशेष होईल.

" मी सात वर्षांपासून मौन धारण करून केवळ वर्णफलकाच्या द्वारा विचार व्यक्त कां करितों, व माझ्या बोलण्याचा मानवी अवस्थेच्या परिवर्तनाशीं कोणता संबंध राहील, असेंही मला विचारण्यांत आलें आहे.

" मानव सध्या विचारांच्या अभिव्यक्तीकरिता तीन देहांचा उपयोग करतात; व त्यांना तीन अवस्थांचा अनुभव येतो. हे तीन देह खालीलप्रमाणें आहेत.

" कारण शरीर हें पूर्वसंस्कारामुळे उद्‌भवणाऱ्या विचारांचें उगमस्थान आहे. विचार हे बीजरूपानें कारणशरीरांत सुप्तस्थितींत राहतात, पण ते व्यक्त होत असले, तर प्रथम त्याचें इच्छेंत रूपांतर होऊन, ते दुसऱ्या म्हणजे वासनात्मक सूक्ष्म शरीरांत उतरतात. या शरीरास मनोमय पंचज्ञानेंद्रियें आहेत. विचार हे या शरीरांतच स्वप्नाच्या किंवा अतृप्त वासनेच्या रूपानें राहतात; अथवा त्यांची क्रियारूप अभिव्यक्ति

तिसऱ्या म्हणजे स्थूल शरीराच्या द्वारां होते. ह्या शरीरास स्थूल पंच-ज्ञानेंद्रियें आहेत. ह्या तीन देहांस अनुसरून, (१) स्वप्नरहित गाढ निद्रेची नेणीव (२) स्वप्नांतील किंवा अस्पष्ट व अव्याकृत वासनांची अर्धजागृति व (३) क्रियाक्षम पूर्ण जागृति — अशा तीन अवस्था आहेत.

सूक्ष्म व स्थूल शरीरांतून विचारांचें संक्रमण झाल्याने मनुष्याची इच्छाशक्ति मूर्तरूप धारण करते. विचार परिणामकारक रीतीने व्यक्त होण्याकरता, हे सर्व देह निर्मल असून, त्यांचा परस्परांत संवादि व्यापार असावयास पाहिजे; बुद्धि व भावना सम होऊन एकमेकांत मिळाल्या पाहिजेत; व भौतिक आविर्भावाचें मूळ आध्यात्मिक प्रतीतींतच असलें पाहिजे.

" ईश्वरस्वरूप पुरुषामध्ये विचार किंवा वासना नसतात. त्याच्या द्वारां, आत्मरूपांतून ईश्वरी संकेत पूर्णपणें व्यक्त होतो. तो नेहमी तुर्यस्थच असतो; व त्याच्यामधून अनंत प्रेम, ज्ञान, आनंद, शांति व शक्ति प्रसृत होतात. आलोकन किंवा स्पर्श याहूनहि अधिक परिणामकारक असा सत्याचा आविष्कार त्याच्या वाणींतून होतो. यामुळेच बहुधा अवतार हे कित्येक वर्षें मौन धारण करतात; व जेव्हा त्यांना सर्व जगाला अंतिम सत्य प्रगट करावयाचें असतें, तेव्हाच ते मौन सोडून भाषण करतात. मी जेव्हा भाषण करीन, तेव्हा ईश्वरी संकेताच्या अभिव्यक्तिमुळे, सर्व जगांतील चैतन्याचें आध्यात्मिक परिवर्तन होईल."

## १८

# भारतभूमीस संदेश.*

" हिंदुस्थान हा अध्यात्मप्रधान देश आहे. प्राचीन कालापासून महात्मे व अध्यात्मगुरु ह्या देशांत अवतीर्ण होत असल्यामुळे, त्यास सर्व जगांत भाग्यशाली व श्रेष्ठ स्थान आहे. म्हणून, बंधनांत राहून आधिभौतिक दुःख भोगावें लागलें, तरीहि हिंदुस्थानांतील आध्यात्मिक वातावरण कायम ठेवलेंच पाहिजे. जोपर्यंत हें वातावरण कायम आहे, तोंपर्यंत हिंदुस्थानला कितीही दुःख भोगावें लागलें, तरी हरकत नाही. सध्याच्या दुःखाचा अखेर परिणाम स्वातंत्र्य व आनंद यांतच होईल. बंधनाचा व दुःखाचा अनुभव घेतल्यावरच स्वातंत्र्याची व आनंदाची खरी किंमत कळून येते.

" परंतु या दुःखाचा लवकर अंत करावयाचा असेल, तर मित्रावर व शत्रूवर प्रेम, सदिच्छा व तितीक्षा, ह्यांची आवश्यकता आहे.

---

* २१, नव्हेम्बर १९३२ ला 'कान्टेविर्दे' बोटीने यूरोपांत जाण्यापूर्वी दिलेला संदेश.

तसेंच दुसऱ्याचे दोष काढण्याऐवजी, हिंदुस्थानने स्वतःमधील दोष नाहीसे करावेत. धर्मभेदांमुळे उत्पन्न होणारे द्वेषयुक्त दंगे ताबडतोब बंद झाले पाहिजेत. मग हिंदुस्थानला स्वातंत्र्य व आनंद, यांचा लाभ होईल, यांत मुळीच शंका नाही.

" पंथभेद, धर्मभेद, अंधविश्वास, धार्मिक विधी व व्याख्यानें किंवा शारीरिक सुखाच्या व अधिभौतिक हिताच्या मागे लागणें, यामुळे खऱ्या आनंदाची प्राप्ति कधीच होत नसून, त्याकरता निस्वार्थ प्रेम व विश्वबंधुत्व पाहिजे, याची जाणीव लवकरच सर्व जगांत उत्पन्न होईल."

१९

# कोठून व कुठे ?*

" पृथ्वीवरील प्राणिमात्रांपैकी प्रत्येकाला जन्म हा लागू आहेच. परंतु इतर प्राणिमात्रांच्या जन्ममरणापेक्षा, किंवा अनैच्छिक व क्षुल्लक जीवितापेक्षा, मानवजन्माचा विशेष म्हणजे हा, की तो आपल्या उत्क्रान्तिरूप प्रगतिपथाच्या महत्त्वाच्या टप्प्यावर असतो. क्वचित् ही पायरी अखेरचीहि असते. नरदेह मिळाल्यावर, तो परतंत्र नसतो; व आपलें भवितव्य स्वेच्छेने निर्माण करूं शकतो. तेव्हा, उत्क्रान्तीच्या खालील स्थितीच्या वेदनांतून वर चढलेल्या मानवाने त्या वेदनांचे पारितोषिक, जें अध्यात्मिक पुनर्जीवन, तें ह्याच जन्मांत साध्य करण्याची कोशिस करावी; व मरणोत्तर जीवनाबद्दलच्या आशेंत समाधान मानून घेऊं नये.

" आत्माभिमुख होऊन, ' मी कोठून आलों व कुठे चाललों ! ' ह्या प्रश्नाने स्वतःचें परीक्षण करणाऱ्या मानवाच्या बाबतींत, आध्या-

* श्रीमेहेरबाबांच्या त्रेचाळीसाव्या जन्मदिवशीं, त्यांनी ता. १८ फेब्रुआरी १९३७ ला जमलेल्या भक्तगणास दिलेला संदेश.

त्मिक पुनर्जीवनास प्रारंभ झाला, असें समजावें. एकदा मन समाहित झालें, म्हणजे न कळत व आपोआपच, भौतिक परिस्थितीहि अशी जुळून येते, की तो मनुष्य अखिल जगताविषयीं निर्वैर व अविरोधी होतो; त्याच्यामधील पुराणमताभिमान, असहिष्णुता, अहंकार व स्वार्थ समूळ गळून पडतात; व त्याला प्रत्येक बाबतींत नवीन आशय व सार दृग्गोचर होतें. मग पापी व पुण्यशील पुरुष, हे दोघेहि निरनिराळ्या आकारांच्या व काल व कार्यकारणभाव यांनी नियमित असलेल्या अशा विश्वरूपी सागरांतील शक्तीमुळे नैसर्गिक रीत्या उत्पन्न होणाऱ्या लाटाच भासतात. सत्पुरुषास आपल्या स्थानविशेषाचा गर्व असण्याचें कारण नाहीं; व पापी पुरुषासहि चिरकाल लांछन असण्याचें कारण नाही. कोणीहि स्वतःस कःपदार्थ समजून हताश होऊं नये.

" 'कोठून?' व 'कुठे?' या प्रश्नांचें उत्तर मिळविण्याचा प्रयत्न करणें; हाच एक सर्व व्याधिविनाशक उपाय मी जगास दाखवितों. सर्वांचें उगमस्थान व ध्येय एकच असून, पृथ्वीवरील जीवन एक आवश्यक खंड आहे, ह्या ज्ञानामुळे मानवजातींत बंधुभाव उत्पन्न होईल; व त्यामुळे युद्धास व आर्थिक आक्रमणास कारणीभूत होणारा जो संकुचित धर्मवेडेपणा किंवा कडवा देशाभिमान, यांच्या मुळावरच आघात होईल.

" जीवनाचें अंतिम ध्येय प्राप्त होण्याकरता, माझा तुम्हां सर्वांना आशीर्वाद आहे."

## २०

# चालू महायुद्धाचें आध्यात्मिक रहस्य*

### (जागतिक युद्ध नं. २, इ.स. १९३९–१९४५ ला उद्देशून)

हल्लींच्या महायुद्धांतून नवीन जग निर्माण होईल.

चालू महायुद्धांत दोन प्रकारच्या शक्ती कार्य करीत आहेतः— (१) ज्यांच्यामुळे प्रेम, न्याय, अखिल मानवतेचें हित व सुसंवादिता (Harmony) उत्पन्न होतील, अशा शक्ती, व (२) ज्या शक्ती वंशविषयक किंवा राष्ट्रविषयक सीमित प्रेमा (Loyalty) शी संबद्ध झाल्यामुळे, स्वार्थपर होऊन इतरांवर जुलुम करण्यास प्रवृत्त होतात, अशा शक्ती. या लढाईमुळे, कोट्यवधी लोकांचें अपरिमित नुकसान होऊन, त्यांचा नाश होत आहे. परंतु हे सर्व व्यर्थ जाणार नाही. ह्या घोंटाळ्यांतून स्वातंत्र्य, ज्ञान व आनंद–यांनी समृद्ध असलेलें नवीन जग निर्माण होईल.

---

* इ. स. १९४१.

सर्वांत समर्थनीय लढाई घेतली, तरी ती केवळ साधनमात्र असूं शकते; लढाई हें स्वतःसिद्ध असें साध्य कदापि असूं शकत नाही.

लढाई ही अपरिहार्य आपत्ति आहे

तेव्हा, युद्धांतील नेत्यांनी आपलीं अंतःकरणें शोधावींत; व ज्या साध्याकरता ते लढून राहिले आहेत, तें साध्य ईश्वरी योजनेस धरून ठरवावें. **अखिल मानवतेमध्ये अध्यात्मनिष्ठ बंधुता (Spiritual Brotherhood) निर्माण करावी व या बंधुतेमध्यें कोणत्याहि प्रकारचा वर्गभेद, वर्णभेद, राष्ट्रभेद, वंशभेद, धर्मभेद किंवा पंथभेद न राहता, ती सर्व मानवांच्या एकतेच्या अभेद्य जाणिवेवर आधारलेली असावी, अशी ईश्वरी योजना (Divine Plan) आहे.** युद्धाच्या खटाटोपांतून काय निष्पन्न होतें, यामुळे तो समर्थनीय किंवा असमर्थनीय ठरणार नसून, त्या खटाटोपाच्या मुळाशीं प्रेरणा देणारीं जीं साध्यें आहेत, त्यांच्यामुळे हा सर्व खटाटोप समर्थनीय किंवा असमर्थनीय ठरेल. जगाला या युद्धास तोंड द्यावे लागेल. कधीहि भरपाई न होऊं शकणारें असें नुकसान व निरतिशय दुःख, यांचा स्वीकार करावा लागला, तरी जगाला ह्या अग्निदिव्यांतून जावें लागणारच आहे. हें युद्ध ही एक अपरिहार्य आपत्ति आहे.

लढाईकडे केवळ तिचें स्वतःचें स्वरूप समजून घेण्याच्या दृष्टीने पाहिल्यास, ती केवळ अनिष्टच आहे, असें म्हणतां येत नाही.

युद्धांत वाढणारे कांही आध्यात्मिक गुण.

कारण, अचानक धोक्याची परिस्थिति निर्माण करून, लढाई ही सीमित स्वार्थपरतेहून निराळ्या अशा क्रियाशीलतेची आवश्यकता उत्पन्न करते, इतकेंच नव्हे, तर अशा क्रियाशीलतेस प्रेरणा देऊन तिचें विमोचन करते. या नवीन क्रियाशीलतेमध्ये, आपल्या इतर बांधवांच्या

सुरक्षितपणाकरता व उत्कर्षाकरता, त्याग व दुःख यांचा स्वीकार करण्याची स्वार्थरहित वृत्ति असते. अशी निःस्वार्थ क्रियाशीलता धोक्याच्या परिस्थितीच्या आघातामुळे उत्स्फूर्त झाली असली, तरी कधीच अभिव्यक्त न होण्यापेक्षा, निःस्वार्थ क्रियाशीलतेची ही अशी अभिव्यक्ति अधिक इष्ट आहे. केवळ स्वतःची सुरक्षितता मिळविण्यामध्ये, किंवा बेमुर्वतपणें स्वतःचेंच स्वतंत्र अस्तित्व व हित स्थायी करण्याच्या अश्लाध्य धडपडीमध्ये, पूर्णपणें व्यग्र होण्यापेक्षा, ( सामुदायिक धोक्याच्या परिस्थितींतील दडपणामुळे का होईना ) जर लोक स्वत्व व स्वार्थ विसरले, तर ते इष्टच आहे. युद्धप्रयत्नामुळे, आध्यात्मिक महत्त्व असणारे अनेक सद्गुण उत्पन्न होऊन विकसित होतात. तेव्हा, केवळ युद्ध-प्रयत्नाचाच विचार केला, तरी त्यांत आध्यात्मिक सार मुळीच नाही, असें म्हणतां येत नाही. ज्यावेळीं असा युद्धप्रयत्न कांही श्रेष्ठ मूल्यांकरता व सार्वत्रिक कल्याणाकरता होतो, तेव्हा तो आध्यात्मिक दृष्टीने केवळ समर्थनीय ठरतो, इतकेंच नव्हे, तर अपरिहार्य असतो.

लोकांनी लढाईतील आपत्तींना धैर्याने व शांतपणें तोंड द्यावें. कर्तव्याची हांक जेव्हा जोराची व सुस्पष्ट असेल, तेव्हा दुःख स्वीकारून केलेला कोणताहि त्याग वाजवीपेक्षा मोठा नाही. लोकां-वर प्रत्यक्ष व आक्रमक हल्ला झाला, तर त्याचा प्रतिकार करणें, हें त्यांचें कर्तव्यच होऊन बसतें; व त्याकरता दुसरा इलाज नसल्यास, लढाईतहि प्रत्यक्षपणें भाग घ्यावा लागतो. परंतु, असा प्रतिकार करीत अस-तांना, स्वतःच्या अंतःकरणामध्ये, केवळ स्वतःच्या कर्तव्याची

*स्वतःवर प्रत्यक्षपणें हल्ला झाल्यास त्यामधील कर्तव्य.*

जागृतीच आहे व त्यांत आध्यात्मिक अज्ञानांत फसलेल्या आक्रमकाबद्दल विद्वेष किंवा कटुभाव, यांचा लवलेशहि नाही, याची त्यांनी स्वतःची पूर्ण खात्री करून घ्यावी. तसेंच वैमानिक हल्ल्यामुळे, समुद्रावर किंवा जमिनीवर, जीं शारीरीक व मानसिक दुःखें उद्भवतात, त्यांच्याबद्दल त्यांनी बेपर्वा असूं नये. तर उलट, त्यांनी **युद्धांत जखमी किंवा निराश्रित झालेल्या लोकांची, यथाशक्ति व यथामति, सर्व प्रकारें, सेवा करावी.**

साधारणतः, मुमुक्षूंना केवळ ऐहिक हिताबद्दल अनास्थाच असते व बऱ्याचशा युद्धांत केवळ ऐहिक हेतूच असतात; म्हणून युद्ध व युद्धप्रयत्न, यांत ते मुळीच लक्ष न घालण्याचा संभव असतो. परंतु, अध्यात्माची ऐहिकतेपासून पूर्ण फारकत करणें, ही भूल होय. ऐहिक गोष्टींनाहि आध्यात्मिक बाजू किंवा महत्त्व असतें. आंतरिक जीवनाच्या अतींद्रिय सत्यांत मग्न असणाऱ्या मुमुक्षूंनी देखील, लढाईबद्दल ( व विशेषतः ते स्वतः त्या लढाईंत गुंतले गेले असल्यास— ) उदासीन राहून चालणार नाही. **मुमुक्षूंचा दृष्टिकोण हा सीमारहित परमात्म्याच्या अस्तित्वावर व अनंतत्वावर आधारलेला असतो; तेव्हा, आत्मदृष्टींतून निर्माण होणाऱ्या कर्तव्याकरता, सर्वस्वाचा त्याग करण्याची तत्परता ठेवणें, हें त्यांना मुळीच कठिण वाटावयास नको.**

मुमुक्षूंचें कर्तव्य.

खरें पाहिलें असतां, सर्व प्रकारचे कलह व युद्धें, म्हणजे ईश्वरी लीलेचाच भाग आहेत; ते सर्व व्यक्तसृष्टीमध्ये आविष्कृत होणाऱ्या ईश्वरी इच्छेचाच परिणाम आहेत. भ्रमपूर्ण द्वैतसृष्टीला निर्माण करून तिची धारणा करणाऱ्या मायेच्या द्वारां, हें सर्व घडतें. या ईश्वरी लीलेमध्ये, मायेचा खेळ दुहेरी स्वरूपाचा असतो. ( १ ) माया ही आत्म्याला भ्रमांत

मायेचा दुहेरी व्यापार.

फसविण्यास साधनीभूत होते; व त्याचप्रमाणे, अध्यात्मविषयक अज्ञान व बंधन, यांच्यापासून आत्म्याला विमुक्त करण्यास देखील, मायाच कारणीभूत होते. मायेविषयी बेपर्वा राहून चालणार नाही; परंतु, तिचा उपयोग करतांना, वैराग्य व ज्ञान या दोहोंची आवश्यकता आहे. मायेमुळेच लढाया होतात. मायेच्या सृष्टीविषयीं आसक्ति किंवा अनासक्ति असेल, त्याप्रमाणे लढाई ही अध्यात्मदृष्टीने अहितकारक किंवा हितकारक होईल.

सर्व जीवांची अभेद्य एकता

अंतिम व एकमेव सत्याच्या अध्यात्मदृष्टीने पाहतां, सर्व जीव हे मूलतः व वास्तवदृष्टीने एकच आहेत. एकमेकांत लढाई करीत असणाऱ्या लोकांमध्ये, लढाईमुळे वास्तवदृष्टीने खरा असा भेद निर्माण होत नाही. युद्धमान राष्ट्रांतील लोक हे, त्यांचीं शरीरें व मनें निराळीं असल्यामुळे, स्वतःच निराळे असल्यासारखे वाटतात; परंतु आत्मदृष्टीने पाहतां, हे सर्व फरक गौण आहेत, इतकेंच नव्हे, तर मिथ्या आहेत. कितीहि लढाया झाल्या, तरी सर्व जीवांची एकता अभेद्यच राहते. पारमार्थिक सत्तेच्या दृष्टीने, कोणताहि जीवात्मा दुसऱ्या जीवात्म्याशीं वास्तविकपणें लढाई करीत नसतो. निरनिराळ्या तत्त्वप्रणालीं ( Ideologies ) मध्ये संघर्ष होतो; व ध्येयप्रणालींचा हा संघर्ष मनांत उतरतो, इतकेंच नव्हे, तर शरीरांवरहि प्रभाव करतो. परंतु अविभक्त व अविभाज्य आत्मा हा स्वतः, संपूर्ण व अभेद्य एकतेमुळे, क रसच राहतो.

आध्यात्मिक उन्नति झालेल्या लोकांना सर्व जीवांच्या एकतेच्या

सत्याची जाणीव असते; व ईश्वरी लीलेंतील त्यांचा भाग हा त्यांच्या आध्यात्मिक ज्ञानाने निश्चित होत असतो. ईश्वरी इच्छेस अनुसरूनच ते आपलें कर्तव्य करतात. अनंत सत्याशीं एकरूप असल्यामुळे, स्वतःचें कार्य करतांना, ते स्वार्थपर विचारांपासून विमुक्त असतात; व प्रतिक्रियात्मक द्वेष, दुष्टपणा किंवा सूड, या भावना त्यांच्यांत मुळीच नसतात.

आध्यात्मिक उन्नति झालेल्या लोकांनी काय करावें

इहलोकींच्या गोष्टी व वस्तू, यांच्या संहाराचा व नाशाचा आत्म्यावर किंचित्‌हि परिणाम होत नाही. तसेंच मरण हें पुढील जीवनाचें द्वारच आहे. ज्यांना ईश्वरी इच्छेमध्ये भाग घ्यायचा आहे, त्यांनी वियोग व वस्तूंचा नाश, यामुळे चलित होऊं नये; व ईश्वरी इच्छेचा आनंदाने स्वीकार करण्याची वृत्ति, त्यांनी इतरांमध्ये निर्माण करावी. लढाईतील दुःखाचें रहस्य न समजल्यामुळे, कित्येकांच्या अंतःकरणांत कटुता येईल. जीवनांतील अचल श्रद्धा व अवीट गोडी पुनः प्रस्थापित करण्याकरता, त्यांना सहाय्याची आवश्यकता आहे. दुःखितांची अनावश्यक विषण्णता व उद्विग्नता नाहीशी करण्याची जबाबदारी, ज्यांनी आंतरिक जीवनांतील कालातीत मूल्यें आत्मसात केलीं आहेत, अशा लोकांवरच राहील.

समतोलपणाची आवश्यकता

कसोटीच्या वेळी, प्रत्येकाने सीमित स्वत्वाचा विचार न करतां, इतरांचा विचार करावयास पाहिजे—म्हणजे अहंजीवन जाऊन, तेथें सर्वांच्यामध्ये समत्वाने असणारें परमात्म्याचें जीवन अधिकाररूपाने प्रस्थापित झालें पाहिजे. भ्रमरूप विश्वांतील एक भाग, म्हणून मानवी दुःखाची उपेक्षा करणें, हें चूक आहे. मानवी

प्रेमाच्या द्वारां मानवाच्या दुःखाचें निवारण करणें

दुःखाची उपेक्षा करून नव्हे, तर त्याचें प्रेमाने निराकरण करू- नच, अनंत जीवनाचें द्वार खुलें होतें. भ्रमरूप विश्वाच्या अंत- र्यामीं असलेलें सत्य सांपडण्याकरता, हृदयशून्य उपेक्षा जाऊन, तिच्या ठायीं निःस्वार्थ व क्रियाशील सेवावृत्ति आली पाहिजे.

लढाईचें महत्त्व हें तात्पुरतेंच असतें.

ज्यांना बुद्धि व प्रेम यांची बाजू घ्यावयाची आहे, त्यांनी युद्ध व युद्धप्रयत्न, हे दोन्हीहि वस्तुतः शांतीचें व परस्परविषयक समजुतदार- पणा (Understanding) चें ध्येय साध्य करण्याकरिता केवळ साधनेंच आहेत, हें लक्षांत ठेवावें; हें त्यांचें कर्तव्य अखेरीस सांगितल्या गेलें असलें, तरी तें गौण स्वरूपाचें नाही. लढाईच्या द्वारा साध्य होणारें ध्येय सोडून दिलें, तर लढाईचें समर्थन करतां येणार नाही. लढा- ईत कांही आध्यात्मिक गुणांचा विकास होतो, हेंच एक कारण घेतलें, तर तितक्याने लढाईचें समर्थन होत नाही. शांतीच्या काळांत देखील ह्या गुणांचा विकास होऊं शकतो. धोक्याच्या परिस्थितीचें दडपण नसतांना देखील, स्वयंस्फूर्त प्रेम व सेवावृत्ति यांच्या द्वाराच, निःस्वार्थ व लोकहितपर क्रियाशीलता निर्माण व्हावी, अशी वेळ आज आली आहे.

सत्य व प्रेम यांचें नवीन युग येण्याकरिता लागणारी पूर्वतयारी.

कितीहि कठिण वाटत असलें, तरी मानवतेला ह्या भयंकर युद्धां- तून, आपला आध्यात्मिक बाणा पूर्णपणें कायम राखूनच बाहेर पडाव लागेल. द्वेष व सूड या भावनांच्या विषाने अंतःकरण कलुषित न होऊं देतां, व आत्म्यास दुःखाने होरपळून न जाऊं देतां, मिळालेले व तसेच दिलेले प्रहार मनांतून काढून टाकले, म्हणजे ईश्वरी इच्छेस बिनशर्त शरणागति

होईल. युद्धोत्तर मानवतेची प्रेरक शक्ति ईश्वरी इच्छेंत राहील. हें युद्ध अनेक अनिष्ट आपत्तींनी युक्त असलें, तरी ईश्वरी योजना पृथ्वीवर आणण्याकरता व सत्य व प्रेम, शांती व जागतिक बंधुता, अध्यात्मज्ञान व अनिर्बंध निर्मायकता ( Creativity ), यांनी विभूषित होणाऱ्या नवयुगाच्या निर्मितीकरता मानवतेस दिग्दर्शन देण्याच्या माझ्या कार्यांत, ह्या युद्धाची एक प्रकारें मदतच होईल.

# २१

## नवमानव*

पूर्वीप्रमाणेच आजही मानवजातीच्या इतिहासांत फार आणी-बाणीचा व कठिण प्रसंग आल्यामुळे, अखिल मानवजात सध्या आध्यात्मिक पुनरुज्जीवनाच्या दुस्सह वेदना अनुभवीत आहे. संहारक शक्तींचे मोठे प्रवाह सध्या सुरू आहेत; व प्रथमदर्शनीं, त्यांचाच विजय होतो आहे, असें भासत असलें, तरी विधायक व निर्मितिक्षम शक्तींमुळे, मानवाचें भवितव्य उज्ज्वलच होईल. विधायक व निर्मिति-क्षम शक्तींचें कार्य हें मुख्यत: नि:शब्द राहिलें, तरी त्यामुळे अनेक बदल घडून येऊन, मानवजातीची आध्यात्मिक प्रगति अप्रतिहत चालू राहील, यांत शंका नाही. क्षुधित व संत्रस्त जगतास 'एकमेवाद्वितीयं' व अनंत सत्याचा पुन्हा बोध देण्याचा जो ईश्वरी संकेत आहे, त्याला पोषक अशीच ही सर्व योजना आहे.

* नोव्हेंबर १९४२

जीवनाच्या निरनिराळ्या क्षेत्रांतून स्पष्ट अथवा सूक्ष्म स्वरूपांत चालू असलेला कलह व मत्सरयुक्त चढाओढ ही कोणत्या रीतीने नष्ट करतां येईल, याचा विचार होण्याची आज आवश्यकता आहे; व हाच मानवजातीसमोरचा अत्यंत निकडीचा प्रश्न आहे. लष्करी युद्धामुळे, जगांत संहार होऊन अंदाधुंदी माजते, हें निर्विवाद आहे. परंतु, मानवाचा मध्यवर्ति प्रश्न युद्धविषयक नसून, ज्या गंभीर कारणांचें युद्ध हें द्योतक आहे, त्या मूलभूत कारणांबद्दलचाच आहे. केवळ युद्धविरोधी प्रचारामुळे, युद्ध किंवा त्यामुळे उत्पन्न होणारें दुःख पूर्णपणें टाळतां येणार नाही. मानवी इतिहासांतून युद्ध नाहींसें करावयाचें असेल, तर युद्धाचीं मूलभूत कारणें नष्ट केलीं पाहिजेत. लष्करी युद्ध ज्यावेळी चालू नसतें, तेव्हा देखील, लोकांचें व्यक्तिशः किंवा सामुदायिक रीतीने, एकमेकांशीं आर्थिक अथवा इतर कोणत्यातरी सूक्ष्म प्रकारचें युद्ध चालूच असतें. आणि ज्या वेळेला ह्या मूलभूत कारणांचा अतिरेक होतो, तेव्हाच लष्करी स्वरूपाचें अमानुष युद्ध उत्पन्न होतें.

युद्धस्वरूपांत जी अंदाधुंदी उत्पन्न होते, तिचें मूळ कारण म्हणजे बरेचसे लोक अहंमन्य व स्वार्थी असतात, हेंच होय. त्यांचा अहंभाव व स्वार्थ ते, व्यक्तिशः व सामुदायिक रीतीने, व्यक्त करतात. जवळजवळ सर्व लोकांचें जीवन या भ्रामक कल्पनांवर अधिष्ठित असतें. सर्वांमध्ये व्यापलेलें चैतन्य एकच आहे, याची जाणीव ठेवणें, म्हणजेच भ्रमरहित होऊन केवळ सत्याचें ग्रहण करणें होय. या जाणिवेमध्ये, भेदभाव नष्ट होऊन, बंधनकारक स्वत्वाची विस्मृति होते.

हें ज्ञान मनुष्यास प्राप्त झाल्यावर, युद्धाचा प्रश्न आपोआप सुटेल. युद्ध हें अनावश्यक व असंमजसपणाचें आहे, हें आपणांस स्पष्टपणाने समजलें पाहिजे; म्हणजे युद्ध थांबविणें, हा प्रश्न निकडीचा न राहतां, ज्या वृत्तीमुळे अशी अमानुष व दुःखप्रद परिस्थिति उत्पन्न होऊं शकते, ती वृत्तीच नाहीशी करण्याकडे सर्वांचें लक्ष वेधेल. अखिल प्राणिमात्रांचें ऐक्य प्रतीतीस आलें, म्हणजे सहकार्ययुक्त व सुसंगत जीवन अपरिहार्य व सहजसिद्ध होतें. म्हणून, ज्यांना मानवजातीची पुनर्घटना करावयाची आहे, त्यांनी आत्म–जागृतीचें महत्त्वाचें कार्यच हातीं घ्यावयास पाहिजे.

युद्धें ही केवळ भौतिक क्षेत्रांतील जुळवाजुळव करण्याकरता उत्पन्न होत नाहीत. ‘ माझें ’ म्हणून समजल्या जाणाऱ्या क्षेत्रांतील मर्यादित इच्छा व आकांक्षा, यांच्याविषयी अविचारपूर्वक ममत्व धारण केलें, म्हणजे युद्धें निर्माण होतात. भौतिक जुळणी ( Material adjustment ) ही तिच्याहून अधिक व्यापक असणाऱ्या आध्यात्मिक जुळणी ( Spiritual adjustment ) चा केवळ एक भाग आहे. जीवनाच्या केवळ भौतिक क्षेत्रांतून स्वार्थ नाहीसा केल्याने आध्यात्मिक जुळणी घडून येणार नाही; बौद्धिक, भावनाविषयक व सांस्कृतिक क्षेत्रांतून देखील, जेव्हा स्वार्थ मूलतः नष्ट होईल, तेंव्हाच आध्यात्मिक जुळणी पूर्णपणें साधेल.

मानवाच्या बाबतींत, केवळ पोटोबालाच प्राधान्य देणें, म्हणजे मानवाला पशुतुल्य समजणें होय. परंतु, केवळ भौतिक जुळणी घडवून आणावयाची असली, तरी त्यांत यश येण्याकरता, आत्मविकास

हा झालाच पाहिजे. जोंपर्यंत, स्वार्थ नष्ट होऊन त्या जागीं त्यागनिष्ठ प्रेमाचा उदय होत नाही, तोंपर्यंत आर्थिक क्षेत्रांत देखील, सुव्यवस्थितपणा व सहकार्य उत्पन्न होणार नाही. ही जाणीव जेव्हा सार्वत्रिक होईल, तेव्हाच मानवजातीचे आर्थिक प्रश्न सुटतील. परंतु, ही जाणीव नसल्यास, भौतिक साहित्यसामुग्री व साधनें यांत कितीहि प्रगति झालेली असली, तरी परस्परांशी कलह व तज्जन्य भौतिक क्षेत्रांतील उणीव, ही टाळतां येणें अशक्य आहे.

आजच्या यातनामय लढ्यांतून व दुःसह दुःखांतून जो नवमानव निर्माण होईल, तो भौतिक शास्त्रें किंवा त्यांच्यावर अवलंबून असलेल्या व्यवहारोपयोगी साधनांना कमी लेखणार नाही. भौतिक शास्त्रांना अध्यात्मविरोधी मानणें, ही चूक आहे. आध्यात्मिक जीवनास पोषक किंवा घातक असणें, हें त्या भौतिक शास्त्रांचा जो उपयोग करून घेण्यांत येतो, त्यावर अवलंबून आहे. ज्याप्रमाणे, कलेच्या योग्य आविष्कारांतून अध्यात्मजीवन व्यक्त होऊं शकतें, त्याचप्रमाणे, भौतिक शास्त्रांचा योग्य उपयोगहि अध्यात्मजीवनाच्या अभिव्यक्तीस व परिपूर्णतेस कारणीभूत होतो. देहविषयक ज्ञान व भौतिक सृष्टींतील जीवन, यांची आत्मानुभवास मदत होऊ शकत. परंतु याकरता, सारभूत शाश्वत तत्त्वांच्या अधिक विशाल अध्यात्मज्ञानांत, त्या दोहोंचाहि समावेश झाला पाहिजे. अशा प्रकारचें अध्यात्मज्ञान नसेल, तर भौतिक ज्ञानाचा व साधनांचा उपयोग हा संहारप्रवर्तक व आत्म्यास बंधनकारक होतो. भौतिक शास्त्रें व धर्मभावना, ह्यांची वाढ एकमेकांच्या बरोबर झाली, तरच मानवजातीची सर्वांगीण प्रगति होईल.

आध्यात्मिक स्वरूपाचा गंभीर अनुभव हा नवमानवाच्या भावी संस्कृतीचा आत्मा राहील; त्या संस्कृतींत, केवळ बुद्धिग्राह्य व रुक्ष कल्पनांना प्राधान्य राहणार नाही. जें सत्य बुद्धिगम्य नाही, तें आध्यात्मिक अनुभवांत येऊं शकतें; केवळ तर्कानें त्याचें आकलन करतां येत नाही. बुद्धीच्या द्वारां, आध्यात्मिक सत्य हे कांही प्रमाणांत इतरांच्याकरता व्यक्त करतां येईल; परंतु, त्या सत्याचा अनुभवच घ्यावयाचा किंवा द्यावयाचा असेल, तर बुद्धि केवळ पंगु ठरते. दोन माणसांना डोकेंदुखीचा अनुभव असेल, तर ते दोघे सहकार्य करून त्या अनुभवाचें निरीक्षण करतील; व त्याचा अर्थ बुद्धीच्या द्वारां, परस्परांस विशद करूं शकतील. परंतु, एकाद्या माणसाला डोकें-दुखीचा अनुभवच नसेल, तर केवळ बुद्धीच्या द्वारा, डोकेंदुखी काय असतें, हे त्याला कधींहि समजणार नाही. डोकेंदुखीचें यथार्थ स्वरूप समजण्याकरता, माणसाचें स्वतःचेंच डोकें दुखलें पाहिजे. हें कार्य एखाद्या वेळेस त्याच्या डोक्यावर टोला देऊन साधतां येईल; परंतु वर्णनानें होणार नाही. त्याचप्रमाणे, आध्यात्मिक अनुभवाची जागा केवळ बुद्धीच्या स्पष्टीकरणानें भरून येणार नाही. बुद्धीच्या द्वारा, फार तर तो अनुभव मिळण्यास लागणारी पूर्वतयारी करतां येईल.

आध्यात्मिक अनुभव हा केवळ बुद्धीला अगोचर असल्यामुळे त्याला गूढ मानलें आहे. परंतु गूढ सत्य हे बुद्धिविरोधी, दुर्गम, दुष्प्राप्य, अव्यवहार्य किंवा अनुभवाशीं असंबद्ध नाही. गूढ आध्यात्मिक अनुभवांत सत्याचें यथार्थ आकलन होतें; तो एक स्पष्ट प्रत्यक्षज्ञानाचा प्रकार आहे. त्यांत प्रतीतीस येणारें सत्य इतकें व्यवहार्य आहे, की तें प्रतिक्षणीं नित्याच्या व्यव-

हारांत व्यक्त होऊं शकतें; व त्याचा अनुभवाशीं इतका निकट संबंध आहे, की एका अर्थानें सत्याला अनुभवाचेंच अंतिम ज्ञान म्हणतां येईल. आध्यात्मिक अनुभवास गूढ मानलें आहे; परंतु तो अनैसर्गिक किंवा मानवी जाणिवेला अप्राप्य नाही. अनंत तत्त्वाचा प्रत्यक्ष अनुभव घेऊन, जोंपर्यंत मानवी बुद्धि स्वतःच्या स्वाभाविक उपाधी टाकून देत नाही, तोंपर्यंत आध्यात्मिक अनुभव बुद्धीला अप्राप्य आहे; व त्याला गूढ म्हणण्याचा भावार्थ याहून दुसरा कांहीहि नाही. "सर्व कांही सोडून माझ्याकडे या", असें जेव्हा ख्राइस्ट म्हणाला, तेव्हा तो हा गूढ अनुभव मिळविण्याचा मार्ग दाखवीत होता. माणसाने आपल्या सर्व प्रकारच्या मर्यादितेचा त्याग करून, ईश्वराच्या अनंत जीवनांत स्थित झालें पाहिजे, असा ख्राइस्टच्या म्हणण्याचा गर्भितार्थ आहे. आध्यात्मिक अनुभव मिळविण्याकरता, उच्च भूमिकांतून आत्मप्रत्यय मिळविण्याची आवश्यकता आहे, त्याचप्रमाणे जगांतील कर्तव्यें व दैनिक व्यवहारहि दक्षतेने करण्याचीहि आवश्यकता आहे. जीवनाच्या निरनिराळ्या क्षेत्रांशीं जर अनुभवाचा संबंध तुटला, तर तो आध्यात्मिक स्वरूपाचा तर राहतच नाही, परंतु त्याला विकृत प्रतिक्रियेचें स्वरूप येतें.

वास्तव जीवनाच्या कठीण व कठोर गरजांना जो प्रातिक्रियात्मक अनुभव टाळतो, तो नवमानवास उत्साह देऊं शकणार नाही. नित्यप्रवाही जीवनाशीं ज्यांना समरस होतां येत नाही, त्यांच्यामध्ये, वास्तवसृष्टीपासून दूर पळून जाण्याची व कल्पनानिर्मित भ्रमात्मक परिस्थितींत सुरक्षितता मिळविण्याची प्रवृत्ति उत्पन्न होते. वास्तवजीवनाशीं पूर्णपणें समरस व्हावयाचें असेल, तर

त्यांत स्वत्व व निराळेपणाची कल्पना टाकून द्यावी लागते. ही कल्पना टाकून देणें जड झाल्यामुळे, व स्वत्व व निराळेपणा शक्यतोंवर टिकविण्याकरता म्हणून, वरीलप्रमाणें विकृत प्रतिक्रिया उत्पन्न होते. पण त्यांत जीवनविषयक प्रश्न वास्तविक सुटत नाहीत; व स्वयंपूर्णतेचा व सुरक्षिततेचा खोटा आभास मात्र उत्पन्न होतो. असल्या विकृत प्रतिक्रियेंत, जीवनविषयक प्रश्नांची अंतिम सोडवणूक तर होतच नाही, परंतु अशा सोडवणुकीचा जो खरा मार्ग आहे, त्यापासूनहि मनुष्य अधिक दुरावतो. जीवनरूपी समुद्रांत ज्या नित्य नवीन व दुर्धर लाटा उत्पन्न होतात, त्यांच्यामुळे मानव हा कल्पनानिर्मित व भ्रमात्मक सुरक्षिततेमधून वारंवार बाहेर खेचला जाईल; व जोंपर्यंत तो पळवाट शोधून आपलें स्वत्व व निराळेपणा सुरक्षित व कायम ठेवण्याचा प्रयत्न करील, तोंपर्यंत तो स्वतःवर नानाप्रकारचीं नवीं दुःखें ओढवून घेईल.

स्वतःचा निराळेपणा टिकविण्यासाठी, मनुष्य पळवाट शोधीत असतो. त्याचप्रमाणें, स्वतःचा निराळेपणा टिकविण्यासाठी, तो नानाप्रकारचे बाह्य विधि व समारंभ किंवा चालीरीती व रूढि, यांच्याशीं तादात्म्य पावतो. बाह्य विधि व समारंभ किंवा चालीरीती व रूढि, यांच्यामुळे बहुधा जीवनास मर्यादिता उत्पन्न होते. निःसंकोच जीवनाच्या अभिव्यक्तीस जर त्यांचा क्वचित माध्यम म्हणून उपयोग केला, तर पृथ्वीवर ईश्वरी जीवनाची सिद्धि करण्यांत, त्यांचा अडथळा न होतां, उलट मदत होईल. परंतु, बहुधा विधि व समारंभ किंवा चालीरीती व रूढि, यांच्याभोवती, कालांतराने भावनिरपेक्ष असें स्वतःचेंच फालतू महत्त्व व स्तोम उत्पन्न होत असतें; व असें झालें,

म्हणजे बाह्यविधींवरील आसक्ति ही जीवनाच्या संकोचास व मर्यादितेस कारणीभूत होते. नवमानवाच्या जीवनांत, बाह्य विधींवरील आसक्ती उडेल व आत्म्याचे दृष्टीने, त्यांना साधन म्हणून दुय्यम दर्जाचें गौण स्थान मिळेल. व त्यामुळे जीवनाची मर्यादिता नष्ट होऊन, निर्मितिक्षम आत्मजीवनाचा निःसंकोच विकास होईल. भ्रमात्मक, निःसार व संकुचित जीवन जाईल, तेथे सत्याश्रित सारभूत व अनंत जीवनाचा उदय होईल; व ज्या मर्यादितेमुळे स्वतःचा निराळेपणा टिकून राहतो, ती ज्ञानामुळे नष्ट होईल.

याप्रमाणे, पळवाट शोधून, भ्रममूलक कल्पनांच्या द्वारां, किंवा बाह्यविधींशीं तादात्म्य पावून, मनुष्य स्वतःचा निराळेपणा टिकविण्याचा प्रयत्न करतो. स्वतःचा निराळेपणा टिकविण्याच्या आणखी एका मार्गाचा तो अवलंब करतो. तो म्हणजे वर्गभेद, मतभेद, जातिभेद, पंथभेद, राष्ट्रभेद किंवा लिंगभेद इत्यादींमुळे उत्पन्न होणाऱ्या एखाद्या संकुचित वर्गाशीं तादात्म्य पावणें. ह्यांत मनुष्याचा निराळेपणा नाहीसा झाल्यासारखा दिसला, तरी वास्तविक पाहतां, तो असल्या भेदानिर्मित वर्गाशीं तादात्म्य पावून, स्वतःचा निराळेपणा व्यक्त करीत असतो. दुसऱ्या वर्गाहून आपण भिन्न आहोंत, या कल्पनेंत तो आनंद मानीत असतो.

दोन द्वंद्वांपैकी एकाशीं तादात्म्य पावून, दुसऱ्यापासून स्वतःला भिन्न मानल्यामुळे, मनुष्याचा निराळेपणा उत्पन्न होतो व फोफावतो. एखाद्या पंथाशीं तादात्म्य पावून, किंवा त्याच्या दृष्टीने जें वाईट ठरलें असेल, त्याहून भिन्न असा जो चांगुलपणा त्याच्याशीं तादात्म्य पावून, मनुष्य स्वतःच्या निराळेपणाचें रक्षण

करीत असतो. परंतु, एखाद्या मर्यादित पंथाशीं किंवा मर्यादित ध्येयाशीं तादात्म्य पावण्यांत, मनुष्याचा निराळेपणा नष्ट झाल्याचा केवळ भास मात्र होत असतो. तो निराळेपणा वास्तविक नष्ट होत नाही. विश्वव्यापी जीवनाच्या सागरांत मर्यादित स्वत्व विराम पावण्याकरता, सर्व प्रकारचा निराळे-पणा समूळ नष्ट व्हावयास पाहिजे.

परंतु बरेचसे लोक निराळेपणाची दृढ भावना व तज्जन्य आक्रमक वृत्ति यांच्या मगरमिठींत सांपडलेले असतात; व मानवाच्या या शृंख-लांच्या दृश्याने जे खचून जातात त्यांच्या दृष्टीने मानवाचें भवितव्य केवळ निराशाजनकच ठरतें. परंतु मानवाच्या या विपद्ग्रस्त स्थितीचें जर आपल्याला योग्य मापन करावयाचें असेल, तर मानवाच्या वास्तविक परिस्थितीचा अधिक खोल विचार व्हावयास पाहिजे. कांही लोक जाग-तिक परिस्थितीच्या केवळ पृष्ठभागाचेंच समालोचन करतात; त्यांना ज्या सुप्त शक्तींत पुढे येणाऱ्या नवमानवाचें भवितव्य साठवलें आहे, त्या दिसू शकत नाहींत. परंतु या सर्व सुप्त शक्तींचा व्यापार सुरू होऊन, त्यांचें कार्य दृग्गोचर होण्याकरिता, आध्यात्मिक ज्ञानाच्या ठिणगीची आवश्यकता आहे. काम, क्रोध व लोभ यांच्या व्यापाराने जगांत अतोनात अंदाधुंदी व दुःख उत्पन्न होईल. परंतु मानवी स्वभावाचा एकच आशापर विशेष आहे; व तो म्हणजे, या संहारक शक्तींच्या व्यापारांत देखील एक प्रकारचें प्रेम खास असतेंच.

युद्धांत देखील सहकार्यपर क्रिया आवश्यक असतेच; परंतु तेव्हां एखाद्या संकुचित वर्गाशीं किंवा ध्येयाशीं तादात्म्य पावल्यामुळे, या सह-कार्याचें क्षेत्र कृत्रिम रीतीने मर्यादित होतें. युद्ध करण्याच्या मागे देखील,

एक प्रकारचें प्रेमच असतें; परंतु या प्रेमास ज्ञानाची जोड नसते. प्रेमास पूर्णता येण्याकरता, त्यांतील सर्व प्रकारची मर्यादिता नष्ट होऊन, तें अनंत झालें पाहिजे. मानवी जीवनाच्या प्रत्येक स्थितींत प्रेम हें असतेंच. परंतु तें प्रेम सुप्त किंवा मर्यादित असतें; व त्या प्रेमांत स्वार्थपर महत्त्वाकांक्षा, वंशाभिमान, क्षुद्र प्रकारचा अभिनिवेश, मत्सर, किंवा राष्ट्र, जाति, पंथ अगर धर्म यांसंबंधी आसक्ति इत्यादि विकारांचें विष कालविलें गेलें असतें. मानवजातीचा जर उद्धार होणार असेल, तर मानवाच्या अंतःकरणरूपी दालनाचा दरवाजा उघडून, त्यांत नवीन प्रेमाचा उदय झाला पाहिजे; व तें प्रेम व्यक्तिपर अथवा सामुदायिक तृष्णेने कलुषित व्हावयास नको.

विशाल व अनंत प्रेमाचा ज्यावेळीं निःसंकोच आविष्कार होईल, तेव्हाच त्यांतून नवमानव उत्पन्न होईल. असल्या प्रेमाचा आविष्कार होण्याकरता, सद्गुरूंच्या कर्तृत्वांत, आत्मजागृति निर्माण झाली पाहिजे. **केवळ निश्चयांतून प्रेम उत्पन्न होणार नाहीं; निश्चयांत फार तर कर्तव्यपालन होईल.** निश्चयात्मक प्रेमामुळे, आपल्या दृष्टीने योग्य ठरलेलें कर्तव्य हे केवळ बाह्यतः आचरणांत आणतां येईल. परंतु असली क्रिया आध्यात्मिक दृष्टीने फोल आहे. कारण त्या क्रियेच्या अंतरंगांत, सहजस्फूर्त प्रेमाचें सौंदर्य नाही. प्रेम हें सहजस्फूर्त असावयास पाहिजे; त्यांत आंतील किंवा बाहेरील शक्तीची जबरदस्ती काम देत नाही. जबरदस्तीमुळे प्रेम कधींहि उत्पन्न होणार नाही; परंतु प्रेमांतच प्रेम उत्पन्न होऊं शकतें. **प्रेम हें स्वभावतः प्रसरणशील आहे. प्रेमपूर्ण हृदयांतून तें निष्प्रेम**

हृदयांत प्रवेश करतें. जे लोक प्रेमाचे ग्राहक बनतात, त्यांच्या हृदयांत देखील, त्या प्रेमास प्रत्युतर ह्मणून प्रेमच निर्माण होतें. खरें प्रेम अजिंक्य व दुर्दम असतें. असल्या प्रेमाची शक्ति सदोदित वृद्धिंगत होते; व त्याच्या सारख्या वाढत असलेल्या क्षेत्रांत सापडणाऱ्या प्रत्येक व्यक्तीवर, त्याचा टिकाऊ परिणाम होतो. हृदयांतून हृदयांत जेव्हा विशुद्ध प्रेमाचे अनिर्बंध संक्रमण होईल, तेव्हाच मानवास नवजीवन मिळेल.

अखिल प्राणीमात्रांचा अंतर्भाव असलेल्या व्यापक ईश्वरी जीवनाहून अधिक श्रेष्ठ असे दुसरें कांहींहि नाही, हें जेव्हा मानवास पूर्णपणें पटेल, तेव्हाच प्रेमाचे द्वारा सामाजिक, राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय क्षेत्रांत, शांति, सुव्यवस्था व आनंद यांचें साम्राज्य पसरेल. शिवाय तें प्रेम स्वतःसिद्ध विशुद्धतेने व सौंदर्याने शोभित होईल. दैवी प्रेमावर द्वैतमूलक आघातांचा परिणाम होत नाही; व त्यांतून ईश्वरीयत्वच व्यक्त होत असतें. दैवी प्रेमामुळेच नवमानव ईश्वरी योजनेस अनुकूल होईल. दैवी प्रेमामुळे, व्यक्तिपर जीवनांत अक्षय माधुर्य व अखंड आनंद उत्पन्न होईल; इतकेंच नव्हे, तर नवमानवाच्या नवीन युगास प्रारंभ होईल. दैवी प्रेम हे नवमानवाचे जीवनांत सहकारिता व सुसंवादिता उत्पन्न करील. दैवी प्रेमामुळेच, निर्जीव बाह्यविधींच्या भगरभिटींतून जीवन विमुक्त होईल व निर्मितिक्षम व ज्ञानप्रकाशित होईल. दैवी प्रेमानेच, नवमानव भ्रमरहित होऊन सत्यज्ञानांत स्थित होईल; व सृष्टीच्या अनंत जीवनांत प्रविष्ट होऊन, तो शाश्वत शांति व अखंड आनंद यांचा अनुभव घेईल.

---

## २२

# आध्यात्मिक कार्यकर्त्यांचें कर्तव्य *

**मानवास ज्ञानदीप दाखवा**

माझ्या आज्ञेस अनुसरून, माझा संदेश ऐकण्याकरता तुम्ही जमला आहांत, याबद्दल मला फार आनंद झाला आहे. ज्याला अध्यात्म–मार्गांत शिष्यत्व मिळवावयाचें असेल, त्याने मानवास परमेश्वरप्राप्तीच्या अधिकाधिक जवळ नेण्याच्या ईश्वरी कार्याकरता, सेवातत्पर असावयास पाहिजे. मला विषेश आनंद याचा झाला आहे, की तुम्ही मजविषयीं श्रद्धा व प्रीति ठेवून, माझ्या जगाच्या आध्यात्मिक उद्धार करण्याच्या कार्यांत भागीदार होण्यास अंतःकरणपूर्वक तयार झाला आहांत. मी दर्शविलेल्या सत्याचें स्वतः आकलन करून, अज्ञानाने आवेष्टित असलेल्या मानवतेस तुम्ही उत्साहपूर्वक व धैर्याने ज्ञानदीप दाखवाल, असा मला पूर्ण विश्वास आहे.

---

* ता. १४ फेब्रुआरी १९४३ रोजी, श्रीमेहेरबाबांचा हा संदेश नियुक्त शिष्यांनी हिंदुस्थानात अनेक ठिकाणीं वाचला.

आध्यात्मिक कार्याची रूपरेषा

मानवतेच्या खऱ्या व अन्तिम कल्याणाच्या दृष्टीने, आध्यात्मिक कार्य हे अत्यंत महत्त्वाचें असल्यामुळे, ज्यांचें मानवतेवर प्रेम आहे, त्या सर्वांचें तें न टाळतां येणारें असे कर्तव्यच होऊन बसतें. तेव्हा, आध्यात्मिक कार्याची रूपरेषा ही अगदी स्पष्ट असण्याची फार आवश्यकता आहे. सर्व जग द्वैताच्या मिथ्या कल्पनेंत पक्कें फसलें आहे. भेदभ्रमांत सांपडल्यामुळे, जगाला भेदनिर्मित गुंतागुंत सुटत नाही. कल्पित भेदांच्या यातनेंतून जगाला मुक्त करणें, व त्याला अखिल जीवनाच्या एकतेच्या सत्याची प्रतीति करून देणें, हेंच आध्यात्मिक कार्यकर्त्यांचें कार्य होय.

नानात्वा ( Manyness ) चा उगम.

आत्मा हा अज्ञानवश होऊन, स्वतःच्या शरीराशी व अहंभावयुक्त मनाशीं तादात्म्य पावतो; व यांतच नानात्वाच्या भ्रमाचा उगम आहे. जड व सूक्ष्म शरीरें व अहंभावास अधिष्ठानभुत असलेलीं कारण शरीरें, ही द्वैतमय जगताच्या निरनिराळ्या स्थितींचा अनुभव घेण्याचीं साधनें होत. परंतु ह्या शरीरांच्या द्वारां, सर्वदेहातीत असलेल्या आत्म्याच्या यथार्थ स्वरूपाचें ज्ञान होऊं शकत नाही. अहंप्रेरित मनाशीं व शरीरांशीं तादात्म्य पावल्यामुळे, आत्म्याला नानात्वाचा भ्रम होतो. सर्व शरीरांमध्ये व व्यष्टिमनांच्या ( Ego-minds ) मध्ये वसणारा आत्मा एकच असून, त्याचें वास्तव रूप अखंड आहे. परंतु तो या माध्यमरूप देहांमध्ये व अहंप्रेरित मनांमध्ये गुंतलेला असल्यामुळे, स्वतःस मर्यादित मानून, स्वतःस सृष्टींतील अनेकांमधील

एक समजतो; व स्वत: एकच एक व अद्वितीय सत्य असल्याचा अनुभव त्याला येत नाही.

**जाणिवेच्या अवस्था**

अनंत कालापासून, प्रत्येक जीवाचें समष्टिरूप परमात्म्याशीं अभेद्य ऐक्य आहे; व या परमात्म्यालाच खरें अस्तित्व आहे. परंतु मीच देह किंवा व्यष्टिमन आहे, या मिथ्या कल्पनेमुळे, कोणत्याहि प्रकारच्या भेदास ज्यांत थारा नाही, अशा सद्वस्तूंत विविधरूप अनेकत्वाचा भ्रम उत्पन्न होतो. देह आणि व्यष्टिमनें जाणिवेची केवळ वाहक ( Mediums ) आहेत. या त्रिविध साधनांतून किंवा वाहकांतून, जगांतील जो अन्तस्थ भूमिकांचा अनुभव आत्म्याला मिळत जातो, त्याला अनुसरून, त्याच्या जाणिवेच्या स्थितीहि बदलत जातात.

**परमेश्वरप्राप्ति किंवा आत्मसाक्षात्कार.**

अखिल प्राणिमात्रांचें ऐक्य व अस्तित्व ज्यांत समाविष्ट आहे, असा परमात्मा आपण स्वतःच आहोंत, हे ज्ञान बहुतेक लोकांना नसतें. त्यांच्यामध्ये, आत्मज्ञान सुप्त स्थितींत राहते व तें जाणिवेंत स्पष्ट होत नाही. परंतु द्वैतरूपी पडदा ज्यांनी बाजूला सारला आहे, त्यांचा आत्मानुभव हा साधनांवर किंवा वाहकांवर अवलंबून नसतो; व त्या अनुभवामध्ये, सर्व जीवांमध्ये सत्तामात्रेंकरून वसणारा एकमेव परमात्माच आपण स्वत: असल्याचें ज्ञान आत्म्याला होतें. सर्वांच्या एकतेच्या सत्याने प्रकाशित झालेलें असें जीवन मर्यादारहित व दुःखरहित होतें. अशा जीवनांत, अनंताचें अनंतत्व प्रकट होतें. ह्या आध्यात्मिक पूर्णतेच्या मुक्त अवस्थेमध्यें,

सत्यनिष्ठ ईश्वरी जीवनाचा अनुभव व आविष्कार व्हावा, म्हणून अहंप्रेरित जीवनाचा अन्तिम व निःशेष त्याग केला जातो; व जीवनाचें खरें महत्त्व केवळ व सत्तारूप ईश्वराशिवाय दुसऱ्या कशांतहि नाही, याची निश्चित प्रतीति देते.

कालाचें महत्त्व.

आत्मसाक्षात्कार म्हणजे अनंततेंतील जीवन होय. तो कालातीत अनुभव आहे. परंतु कोणतेंही आध्यात्मिक कार्य हें नानारूप सृष्टीमध्यें गुंतलेल्या जीवांच्याबद्दलच असतें; व म्हणून, त्या कार्याला कालाची मर्यादा लागू आहे. आध्यात्मिक कार्यकर्ते सृष्टींतील कालाविषयीं उदासीन राहूं शकणार नाहीत. वेळेचें भान न ठेवणें, म्हणजे आध्यात्मिक कार्याबद्दलच अनास्था ठेवणें होईल. तेव्हा ज्यांना कार्य करावयाचें आहे, त्यांनी काल-प्रवाहाचें विवेकयुक्त भान ठेवण्याची आत्यंतिक आवश्यकता आहे. व विशेषतः, अगदी जवळ असलेल्या भविष्यत् कालांतील क्षणाचें पूर्ण महत्त्व जाणणें फार जरूर आहे. कारण त्यावेळीं, आत्मज्ञानांत प्रतीत होणाऱ्या सत्याचा सार्वत्रिक आविष्कार होईल.

धोक्याची सूचना.

दुःखित मानवतेस सत्य दाखविण्याच्या या सार्वत्रिक कार्यांत, मला मदत करणें, हें प्रत्येक आध्यात्मिक कार्यकर्त्याचें कर्तव्य आहे. हें सत्यग्रहण करण्यास व त्यांत सुप्रतिष्ठित होण्यास जी लोकांची पूर्वतयारी लागेल, ती तुम्हाला करून घ्यावयाची आहे. परंतु त्याबरोबरच एक महत्त्वाचा मुद्दा तुम्ही लक्षांत ठेविला पाहिजे. अखंड व एकरस जीवनांमध्ये, लोक केवळ कल्पनेने भेद निर्माण करीत राहतात; व आध्यात्मिक कार्य-

कर्त्यांना थोडी देखील विश्रांति घेऊं देत नाहीत. परंतु, द्वैताच्या कल्पनेंतून त्यांची सुटका करून, आध्यात्मिक स्वातंत्र्य मिळविण्याच्या कार्यांत तुम्हांला त्यांना मदत करावयाची असेल, तर त्यांच्यासाठी प्रयत्न करीत असतांना, तुम्ही स्वतःमध्ये एकत्वाची जाणीव सतत जागृत ठेवण्याची आवश्यकता आहे.

आध्यात्मिक कार्यांतील अडथळे.

मी विशद करीत असलेल्या अमृतत्वाचा आस्वाद घ्यावयाचा असेल, तर लोकांच्या मनांतून स्वार्थ व कोतेपणा पूर्णपणें नाहीसे झाले पाहिजेत. स्वार्थ व कोतेपणा सोडून देण्यास लोकांचें मन वळविणें, ही सोपी गोष्ट नाही. श्रीमंत व गरीब, सुखवस्तु व वंचित, राज्यकर्ते व प्रजाजन, नेते व बहुजनसमाज, आक्रमक व दलित, उच्च व नीच, प्रतिष्ठित व ज्यांची कुचंबणा होते असे लोक, याप्रमाणें जे भेद लोकांत निर्माण होतात, ते उगीच नाहीत. हे भेद लोक आपल्या अज्ञानामुळे निर्माण करून टिकवितात. या भेदांना चिकटल्यामुळे, दूषित विचार व भावना यांमध्ये ते इतके स्थिर होतात, की ते विचार व त्या भावना दूषित असल्याची जाणीवहि त्यांना राहत नाही. ते जीवनाचे निरनिराळे भिन्नभिन्न विभाग करतात; व आपली भेदवासना टाकून देण्याची त्यांची तयारी नसते. जेव्हा तुम्ही आपल्या आध्यात्मिक कार्यास सुरवात कराल, तेव्हा भेदांनी भरलेल्या क्षेत्रांत तुम्हाला प्रवेश करावा लागेल; व तुम्हाला आढळून येईल, की लोकांना या भेदांविषयीं इतकी आसक्ति आहे की, ते हे भेद वाढवून पक्के करण्याकरतां व

कायमचे टिकवण्याकरता, न जाणतां किंवा बुद्धिपुरस्सर प्रयत्न करीत असतात.

केवळ टीका केल्याने हे भेद तुम्ही नष्ट करूं शकणार नाहीं. भेदप्रवण विचार व भावनांमुळें या भेदांचा परिपोष होतो; व

त्यांना सत्याकडे वळवा.

प्रेम व ज्ञान याशिवाय भेदप्रवण भावना व विचार नष्ट करण्याचा दुसरा मार्ग नाही. सत्यनिष्ठ जीवनाकरता तुम्ही लोकांचें मन वळविलें पाहिजे. तुम्ही त्यांच्यावर जबरदस्तीने आध्यात्मिकता लादूं शकत नाहीं. केवळ तुमच्या अन्तःकरणांमध्ये अकृत्रिम मैत्री व निष्कलंक सदिच्छा असून भागणार नाही. तुम्हाला तुमच्या कार्यांत यश येणार असेल, तर तुम्ही त्यांना त्यांचें इकाचें उच्चतम ध्येय गांठण्यास व स्वतःची बंधनातून व दुःखांतून मुक्तता करून घेण्यास मदत करीत आहांत, अशी श्रद्धा व खात्री तुम्हाला त्यांच्यामध्ये निर्माण करता आली पाहिजे. तुम्ही त्यांना आध्यात्मिक स्वातंत्र्य किंवा बोध मिळविण्याच्या बाबतींत दुसऱ्या कोणत्याहि प्रकारची मदत देऊं शकत नाही.

आध्यात्मिक स्वरूपाची मदत देत असतांना, तुम्ही खालील चार मुद्दे लक्षांत ठेवले पाहिजेत—

(१) खालील भूमिकेवर उतरण्याची दार्शनिक ( Apparent ) क्रियाः—कित्येकदा ज्यांना तुम्ही मदत करूं इच्छिता, त्यांच्या भूमिके-इतक्या खालील भूमिकेवर उतरल्याचा देखावा तुम्हाला करावा

आध्यात्मिक कार्यकर्त्यांना सूचना

लागेल. इतरांना जाणिवेच्या उच्च भूमिकेवर नेण्याचा जरी तुमचा उद्देश असला, तरी त्यांना समजणारी भाषा तुम्ही वापरल्याशिवाय तुमच्या

मदतीचा फायदा ते घेऊं शकणार नाहीत. तुमच्या विचारांच्या व भावनांच्या द्वारां तुम्हाला जें द्यावयाचें आहे, तें त्यांना समजणार नाही. तेव्हा तुमच्या विचारांचा व भावनांचा त्यांच्यावर परिणाम करावयाचा असेल, तर त्यांची मांडणी, त्यांच्या अनुभवाशीं व सामर्थ्याशीं जुळती असली पाहिजे. परंतु त्याबरोबरच तुम्ही हेंहि लक्षांत ठेवलें पाहिजे कीं, असें करीत असतां, तुम्हीं आपल्या स्वतःच्या ज्ञानाच्या उच्च भूमिकेवरून खरोखर घसरूं नये. ज्याप्रमाणांत त्यांचें ज्ञान वाढेल, त्यामानानें तुम्ही आपली रीत हळूहळू बदलावयास हवी; व यासाठी तुमचे खालील भूमिकेवर दार्शनिक उतरणें थोड्या कालासाठीच असावयास हवें.

(२) आध्यात्मिक ज्ञानानें सर्वांगीण उन्नत्ति होते:—तुम्ही जीवनाचे निरनिराळे विभाग करून मग प्रत्येक विभागाचा निराळा व स्वतंत्र विचार करणें बरोबर नाही. कित्येक वेळां, विभागशः विचार करण्यामुळे, अखंड प्रज्ञेमध्ये अडथळा उत्पन्न होतो. याप्रमाणें राजकारण, शिक्षण, नीति, भौतिक प्रगति, शास्त्रें, कला, धर्म, गूढवाद, संस्कृति वगैरे जीवनाचे निरनिराळे भाग करून, त्यांपैकीं एकाच भागाचा तुम्ही स्वतंत्र विचार केल्यास, तुम्हाला जीवनांतील अनेकविध प्रश्न पूर्णपणें व समाधानकारक रीतीनें सोडवितां येणार नाहींत. परंतु, जर तुम्हीं इतरांच्या मनांत आध्यात्मिक स्फूर्ती व ज्ञान उत्पन्न करूं शकलां, तर जीवनांतील या सर्व विभागांत, आपोआपच उन्नति होणार, हें निश्चित. तेव्हां आध्यात्मिक कार्यकर्ते या दृष्टीने, तुम्ही जीवनांतील सर्व व्यक्तिगत व सामाजिक प्रश्न पूर्णपणें व खरोखर सुटतील, असा प्रयत्न केला पाहिजे.

(३) आध्यात्मिक उन्नतीमध्ये, ज्ञानाचा उदय आंतून व स्वाभाविकपणें होतो. जें आध्यात्मिक ज्ञान तुम्ही इतरांना देऊं इच्छिता, तें त्यांच्यामध्येच सुप्तस्थितींत आहे. तें अनावृत करण्याकरता तुम्ही केवळ निमित्तमात्र आहांत, याची जाणीव, आध्यात्मिक कार्यकर्ते या दृष्टीनें तुम्हाला सतत जागृत ठेवावी लागेल. आध्यात्मिक प्रगति ही 'बाहेरील वस्तूंच्या संचयांत नसून, आंतून होणाऱ्या आत्म्याच्या अनावरणामध्ये आहे. सद्गुरूशिवाय आत्मज्ञान कधींहि होऊं शकत नाही. परंतु, सद्गुरू हा इतरांच्यामध्यें सुप्त स्थितींत असलेल्या शक्ती जागृत करण्याच्या कार्यांत, त्यांना मदत देतो, हेंच सद्गुरूच्या सहाय्याचें वैशिष्ट्य आहे.

(४) कांही प्रश्न उत्तराहूनहि महत्त्वाचे असतात:—सद्गुरु तुमच्या द्वारां जें कार्य करून घेऊं इच्छितात, त्याचें यथार्थ स्वरूप आध्यात्मिक कार्यकर्ते या दृष्टीने तुम्ही आपल्या दृष्टीसमोर सतत ठेवलें पाहिजे. आत्मज्ञान प्रत्येकामध्ये सुप्त स्थितींत आहेच, हें जेव्हा तुम्हाला स्पष्टपणें समजेल, त्यानंतर तुम्हांस इतरांना आयती तयार केलेलीं उत्तरें किंवा उपाय सांगण्याची उत्सुकता राहणार आहे. लोकांच्या समोर एखादा नवीन प्रश्न मांडण्यांत, किंवा त्यांच्यासमोर असलेला प्रश्नच अधिक स्पष्टपणें मांडण्यांत, तुम्ही संतुष्ट रहाल. एखाद्या क्रियोन्मुख ( Practical ) परिस्थितींत, त्यांनी स्वतःला विचारला नसतां, असा एखादा प्रश्न तुम्ही त्याला विचारला, किंवा प्रश्न विचारून शोध करण्याच्या वृत्तींत तुम्ही त्यांना आणलें, व त्यामुळे ते त्यांच्या परिस्थितीबद्दल नवीन, उपयुक्त

व निर्मितिश्रम क्रियेस प्रवृत्त झाले, तरी देखील तुम्ही आपलें कर्तव्य केल्यासारखें होईल. तुमच्या बुद्धीचा निर्णय त्यांच्यावर लादण्यापेक्षा, तुम्ही जर त्यांना एखादा अधिक खोल दृष्टीकोन द्याल, किंवा एखादी फलोन्मुख विचारांची किंवा क्रियेची दिशा दाखवाल, तर त्याला अधिक महत्त्व आहे. परंतु जे प्रश्न स्वतःसमोर मांडण्यांत तुम्ही त्यांना मदत कराल, ते केवळ तार्किक किंवा गुंतागुंतीचे नसावेत. जर हे प्रश्न सरळ, साधे व मूलभूत असतील, तर लोक स्वतःच त्यांची उत्तरें देऊं शकतील. परंतु ज्याअर्थी तुमच्या कुशल मध्यस्थीशिवाय ते आपले नानाविध प्रश्न आध्यात्मिक दृष्टीने सोडवूं शकले नसते, त्याअर्थी तुम्हीं त्यांची अत्यंत आवश्यक व बहुमोल सेवाच केल्यासारखें होईल.

आध्यात्मिक कार्यकर्त्यांच्या मार्गांत, नानाप्रकारचे अडथळे येणारच, हें आपण पूर्वींच पाहिलें आहे. परंतु सर्व अडथळे हे त्यांतून पार पडण्याकरितांच असतात. कांही अडथळे अनुल्लंघनीय वाटले, तरी फलाविषयीं किंवा परिणामाविषयीं चिंता न करतां, तुम्ही त्यांना मदत करण्याची शिकस्त कराल. अडथळे व त्यांचें उल्लंघन, यश व अपयश, हे सर्व एकरस अनंतांतील भास होत; व तुम्ही आपलें कर्तव्य मनःपूर्वक करण्यांतच त्याची परिपूर्ति आहे. खरे अस्तित्त्व व अंतिम महत्त्व ईश्वरालाच आहे, ही जागृति मानवतेंत निर्माण करण्याच्या माझ्या कार्यात, चिकाटीने व एकानिष्ठेने मदत करण्यास तुम्ही तयार झाला आहां; व या आध्यात्मिक कार्याकरितां, तुम्हाला पुष्कळ प्रसंग मिळतील. या क्षेत्रांत, कार्याला पुष्कळ वाव

अडथळ्यांचें उल्लंघन

आहे. तुम्ही या कार्यांत बिनशर्त पडाल, असा मला दृढविश्वास आहे. तुम्हांला स्वतंत्रपणाने देण्यांत येणाऱ्या आज्ञा बिनतक्रार पाळण्यानेच, मला या कार्यांत तुमची मदत होणार आहे.

यशापयशाविषयीं निश्चिंत राहून, तुम्हांला आपलें कार्य करावयाचें आहे. परंतु या जाणिवेने व या वृत्तींत केलेल्या कार्याची फलनिश्चिति आधीच ठरलेली आहे. आध्यात्मिक कार्यकर्त्यांच्या अविरत परिश्रमामुळे, मानवतेस नवीन शाश्वत शांति, व गतिमान सुसंवादिता (Dynamic Harmony), अचल संदेहरहितत्व व न मावळणारा आनंद, अक्षय माधुर्य व निष्कलंक पावित्र्य, निर्मितिक्षम प्रेम व अनंत ज्ञान, यांचा अनुभव येईल.

आध्यात्मिक कार्याचें फळ

# २३

# आध्यात्मिक आकांक्षेची ज्वाला *

सीमित व्यक्तीच्या अहंजीवनामध्ये, भ्रमात्मक ‘ मी ’ व ‘ तूं ’ ह्या द्वंद्वांचा परिपोष होत असतो. याप्रमाणे जीवनाच्या एकतेचे ‘ माझे ’ व ‘ तुझे ’ असे कृत्रिम खंड पडून, त्यांत द्वैताचें दूषित तत्त्व शिरतें. निराळ्या अस्तित्वाच्या मिथ्या कल्पनेमध्ये व तिच्याच द्वारां अहंभाव जगतो व त्याचें आश्रयस्थान बनणाऱ्या ह्या अज्ञानामधूनच नानाविध व सतत वर्धमान असणाऱ्या वासनांचें जीवन सुरू होतें. सुख व दुःख, तृप्ति व अतृप्ति, चांगलें व वाईट, ह्या द्वंद्वांमध्ये सतत अपरिहार्यपणें हेलकावे खात बसणें, हा वासनामय जीवनाचा धर्म आहे. पृथग्भावा ( separative consciousness ) च्या अज्ञानांत उद्भूत होणाऱ्या सर्व वासना दुःखदायी व बंधनकारक बनतात. ज्या भ्रमाक्रान्त जीवनांत कधींहि फलद्रूप न होणाऱ्या आश्वासनांची अनिवार्य जुलूमशाही आहे, अशा जीवनाच्या वासना ह्या घटक होत.

---

* मेहेर अध्यात्म मंडळ, सावनेर. १५–११–१९४४

परंतु अहंजीवनांतील सुखदुःखांच्या घनघोर वादळांत देखील, सद्गुरूच्या कृपाप्रसादाने व अनुभवाच्या परिपक्व स्थितीमध्यें, मिथ्या व क्षणिक आकारांच्या द्वारां तृप्तता शोधित असणाऱ्या वासनांची असीम विफलता ( utter futility ) स्पष्टपणे प्रतीत होते. सद्गुरूच्या प्रीतिजीवनामध्ये वासनांचा किंवा द्वैताचा क्षोभ नसतो. अशा जीवनामध्ये, खऱ्या मूल्यांचें दर्शन आत्म्याला एकदा झालें, की तो निराळेपणा उत्पन्न करणाऱ्या अहंजीवनाच्या पिंजऱ्याला व वासनांच्या शृंखलांना तोडून टाकण्यास प्रवृत्त होतो. हीच आध्यात्मिक आकांक्षेच्या जीवनाची सुरवात होय. खरें व खोटें, वास्तविक महत्त्वाचें व वास्तविक बिनमहत्त्वाचें, यामधील खंडरहित सारासारविचार हा ह्या नवीन जीवनाला सतत साथ देतो. ह्याप्रमाणे आध्यात्मिक आकांक्षा एकदा जागृत झाली, म्हणजे तिला पुढे केव्हाहि पूर्णपणे दाबून ठेवतां येत नाही, किंवा टाळतां येत नाही. ही आकांक्षा म्हणजे एक अंतरहित भडकणारी ज्वाला बनते; व बंधनकारक वासनांची मुळेंच भस्म करून टाकते. ही आध्यात्मिक आकांक्षा किंचितहि मंद न होतां, व बेगुमान ( uncompromising ) पणे पुढे चालू राहते; व ती मुमुक्षूला सद्गुरूच्या एकरस व अविभाज्य अशा सत्यजीवना ( life in the truth ) मध्ये स्वतःच्या स्वतंत्र अस्तित्वाचें विसर्जन करावयास भाग पाडते, इतकेंच नव्हे, तर ती त्याला त्या सत्यजीवनांत मिळवून त्याच्याशीं एकरूप करते. याप्रमाणे यात्रेकरू हा तीव्र आध्यात्मिक आकांक्षेच्या द्वारा, स्वतःच्या शांतिधामाप्रत अवश्यमेव पोहोचणार, हें ठरलेलेंच आहे ज्यांच्यामध्ये ही आकांक्षा आहे, त्या सर्वांना माझा आशीर्वाद आहे.

# २४

# मानवाचा आध्यात्मिक वारसा *

सर्व ऋतूंत व सर्व ठिकाणीं, मानव हा सुखासाठीं सतत तडफडत आहे. परंतु तें सुख फारच थोड्या लोकांच्या वाट्यास येतें; कारण फारच थोड्या लोकांना सुखाचें रहस्य हस्तगत झालेलें असतें. मनुष्याला सदा सर्वकाळ खंडित व सीमित असल्याची जाणीव असते. तो नेहमी व निरंतर, यातना व दुःख यांनी ग्रस्त असतो. स्वतःचें खरें स्वरूप न जाणल्यामुळे, मनुष्य स्वतःच्या देहाशीं, वासनांशीं किंवा सीमित व्यष्टिमनाशीं तादात्म्य पावतो; आणि त्यामुळे त्यांचीं बंधनें व त्यांचीं दुःखें तो स्वतःवर ओढवून घेतो. परंतु, तो जेव्हा स्वतःला ह्या सर्वांहून निराळा व ह्या सर्वांच्या पलीकडे असल्याचें जाणतो, तेव्हाच त्याला त्याचा अखंड आनंदाचा ईश्वरी वारसा पूर्णपणे प्राप्त होतो.

---

* इ. स. १९४७

जो मनुष्य, सांस्कारिक आसक्तीमुळे, स्वतःस देह, वासना किंवा व्यष्ठिमन मानतो, तो स्वतःच्याच अज्ञानरूपी पिंजऱ्यामध्ये पकडला जातो. ज्याप्रमाणे, हताश झालेला पिंजऱ्यांतील पोपट स्वतःचे पंख पिंजऱ्याच्या गजांवर फडाफड आपटतो, पण बंधमुक्त होण्याऐवजी स्वतःच्या पंखांस केवळ इजाच करून घेण्यामध्ये यश संपादन करतो, त्याचप्रमाणे, माणसाचेहि स्वतःच्या शृंखला तोडण्याचें सर्व प्रयत्न अखेरीस त्याला त्याच शृंखलांनी अधिक दृढपणें जखडून टाकण्यास कारणीभूत होतात. खोल चिखलांत रुतलेला मनुष्य जों जों त्यांतून बाहेर निघण्याचा प्रयत्न करतो, तों तों त्या प्रयत्नामुळेच तो त्या चिखलांत अधिक फसतो.

व्यक्तीने कोणाच्याहि साहाय्याशिवाय केलेले प्रयत्न कित्येक वेळा अयशस्वी होतात. कारण अशा प्रयत्नांचा उगम अज्ञानजन्य अहंभावामध्येच असतो. ह्याकरिताच, आध्यात्मिक मुक्तेतकरता, सद्गुरु हा अगदी आवश्यक आहे. सद्गुरु हा सत्यस्वरूप असून, त्याची क्रियाशीलता सीमित अहंप्रेरित जाणिवेंतून न होतां, सत्यां- ( Truth )तच उत्स्फूर्त होत असते; व कोणाचीहि मदत न घेतां मुमुक्षूने केलेल्या स्वतःच्या प्रयत्नांपेक्षा, सद्गुरूने दिलेलें साह्य हें अधिक प्रभावी असतें. ह्याचा अर्थ असा नव्हे, की मुमुक्षूने आध्यात्मिक मुक्ततेकरता किंवा परिपूर्णतेकरता, स्वतः प्रयत्नच करूं नये. अनुभूती ( Realisation ) करता, त्याने त्याची स्वतःची पराकाष्ठा तर केलीच पाहिजे. परंतु त्याबरोबरच, त्याने सद्गुरूपासून त्याचेकडे

येणाऱ्या अपरिहार्य व विपुल साहाय्यास सन्मुख राहून, त्याचा स्वीकार केला पाहिजे. मुमुक्षूमध्ये सुप्त स्थितींत आधीपासूनच नाही, असें कांही तरी अगदी नवीन त्याला देणें, हें कांही सद्गुरूचें कार्य नाही. मुमुक्षूचाच जो खरा आत्मा आहे, त्याला सद्गुरु हा केवळ अनावृत करतो. मुमुक्षूचा ज्या ईश्वरी वारसावर हक्क आहे, त्याचीच प्राप्ति करून घेण्याचें सामर्थ्य सद्गुरु त्याला देत असतो.

---

# २५

## प्रच्छन्न संपत्ति *

वळणावळणानें पण अखेरीस समुद्रास मिळत नाही, अशी एकहि नदी नाही; व अखेरीस परमोच्च ध्येय गांठीत नाही, असा एकहि प्राणी नाही. परंतु, सर्वांतर्यामी असूनहि स्वतःमध्ये वसणारा जो परमोच्च व सत्यस्वरूप आत्मा आहे, त्याची पूर्णता व त्याचें ऐश्वर्य व्यक्त करण्यास समर्थ असणारी पूर्ण विकसित जाणीव ही केवळ मानवदेहांतच असते. स्वतःच जमवलेल्या सांस्कारिक अज्ञानामुळेच मनुष्य ह्या परिपूर्णता व तृप्ततारूपी अनिर्वचनीय प्रच्छन्न संपत्तीचा उपभोग घेऊं शकत नाही. उत्क्रान्तींतील विकासक्रमाच्या द्वारां मानवदेहांत व मानवी जाणिवेंत उतरण्याच्या आत्म्याच्या प्रक्रियेमध्ये, संस्काररूपी गाळ सांचत जातो. संस्कार हे

* बुद्ध सोसायटी, नागपूर १६-११-१९४४

मार्गस्थ यात्रेकरूंच्या अंगावर सांचणाऱ्या धुळीप्रमाणे होत. सर्वश्रेष्ठ अशा मनुष्यदेहांतदेखील ईश्वरी जीवन हें संचित संस्कारांच्या गाळांत फसलेलें असतें. या संस्कारांच्या नानामुख व विक्षेपक (Dis-tracting) गतिमत्तेमुळे, जाणीव ही मिथ्या व भ्रममय गोष्टींच्या क्षेत्रांत सीमित होते; व त्या जाणिवेची अभिव्यक्तीहि संकुचित व विकृत होते.


मिथ्या गोष्टींबद्दलच्या बहुरंगी वासना ह्या एकामागून एक सोडून द्याव्या लागतात. भेदप्रवण अहंतारूपी फसव्या अग्नीस पोसणाऱ्या संस्काररूपी सर्व काष्टांची सत्याच्या अजेय ज्वालेमध्ये एकामागून एक आहुती द्यावीच लागते. कारण, सत्या (Truth) चा जाणिवेवरील हक्क हा नाकबूल करता येण्यासारखा नाही. केवळ ह्याच मार्गाने, मनुष्य अमृतजीवना (Life Eternal) ची अंत-रहित सुरुवात (Endless beginning) असणारें परमोच्च असें ईश्वरी ध्येय गांठतो. त्याचा दुसरा मार्ग नाही. अनंततेंतील जीवनामध्यें बंधन, ऱ्हास किंवा दुःख नसून, त्यांत जाणीवयुक्त व अबाध्य ईश्वरत्वाचें शाश्वत व प्रतिक्षणी नवीन होणारें असें आत्मप्रतिष्ठापन (Self-affirmation) असतें. जाणीवरूपी नभोमंडलांत, सर्वात्मा असणाऱ्या ईश्वराचा प्रकाश सतत तळपत राहण्यासाठी, संस्काररूपी मेघ हे पूर्णपणे नष्ट झाले पाहिजेत. आत्म्यांतील ही प्रच्छन्न संपत्ति प्राप्त करण्यामध्ये तुम्हाला मदत करणें, हेंच माझें अवतारकार्य आहे. जे कोणी ह्या संपत्तीच्या शोधांत आहेत, त्या सर्वांना माझा आशीर्वाद आहे.

---

## परिशिष्ट नं. १

### १

# फळीवरील कांहीं प्रवचनें *




“ जीवन्मुक्त पुरुष ह्या जगाच्या व्यवहारांत क्वचितच लक्ष घालतो; व जेव्हां त्याला दुसऱ्याचें निरातिशय हित करावयाचें असेल, तेव्हांच तो आपलें मन व्यवहाराकडे लावतो. मुम्बई शहराच्या पूर्वभागांत

---

* जुलै १९२५ पासून श्रीमेहेरबाबांनी मौन धरलेलें असल्यामुळे, त्यांचीं सर्व प्रवचनें वर्णमाला छापलेल्या फळीवरून देण्यांत आलीं आहेत. —अनुवादक.

राहणारे लोक जॉर्ज बादशहाचे प्रजाजन आहेत. पण ते कोठे राहतात, काय करतात, याची त्याला कांही माहिती असते काय? मुळींच नसते. परंतु त्यांच्याविषयीं माहिती मिळविण्याची बादशहाची इच्छा असल्यास, त्याला ती माहिती ताबडतोब देण्यांत येईल. त्याचप्रमाणें, जीवन्मुक्तास वाटेल, तर तो कोणतीहि गोष्ट मुळापासून जाणूं शकतो; व बादशहाप्रमाणें त्याला इतरांस त्रासहि द्यावा लागत नाही. परंतु साधारणतः, तो याप्रमाणें व्यवहारांत लक्ष घालीत नाही. जगांतील प्राप्त व्यवहार करत असलेला असा तो दिसला, तरी तो त्यांत तल्लीन होत नाही.''

## २

"चवथ्या भूमिकेंत रूढ झालेला योगी देखील जन्ममरणचक्रांतून मुक्त होत नाही. कारण त्याचे कर्मजन्य संस्कार अद्याप नष्ट झालेले नसतात. चांगल्या कर्मांचे चांगले संस्कार होतात; व वाईट कर्मांचे वाईट संस्कार होतात. कर्मांप्रमाणेंच विचारांमुळेंहि संस्कार उत्पन्न होतात. इतकेंच काय, पण बोलणें, ऐकणें, पाहणें, खाणें, पिणें, झोप घेणें व अति सूक्ष्म चंचलता, यांचेसुद्धा संस्कार होतात. सद्गुरूने ह्या संस्कारांचें परिमार्जन केलें नाही, तर ते यंत्राप्रमाणे बिनचूक फलद्रूप होतात. तुमचें सध्याचें जीवित, सुख व दुःख, त्याचप्रमाणें सद्गुण व दुर्गुण हे सर्व तुमच्या पूर्वीच्या संस्कारांनी निश्चित झाले आहेत. यालाच सुफी पंथाचे मुसलमान 'आमाल' म्हणतात. दुसऱ्या शब्दांत सांगावयाचें, म्हणजे तुमचा हा जन्म तुमच्या सूक्ष्म संस्कारांचा स्थूल परिणाम आहे. चांगलेवाईट सर्व संस्कार नष्ट झाल्याशिवाय, मुक्ति मिळूं शकत नाही. पुण्यकर्मांची साखळी सोन्याची; व पापकर्मांची

साखळी लोखंडाची समजावी. परंतु धातु कोणतीहि असली, तरी त्यांचें बंधन नाहीसें होईपर्यंत मोक्ष नाही.

साधारण योगांतील प्रक्रियांनी चांगले संस्कार उत्पन्न होतात; पण मुक्ति मिळत नाही. तेव्हा, मोक्षाची इच्छा असल्यास, पापपुण्य-रूप संस्कारांच्या जमाखर्चाचा पूर्ण परिहार झाला पाहिजे — म्हणजे 'पाटी' कोरी असावी. परंतु, पूर्ण सद्गुरूच्या अनुग्रहाशिवाय, 'पाटी' अगदी कोरी करणें शक्य नसतें. सद्गुरू कोणाचेंहि संस्कार पुसून टाकूं शकतो. प्राकृत मनुष्याच्या अनंत संस्कारांस केसांच्या ढिगाची उपमा देतां येईल. तो त्या संस्कारांना काढून टाकूं शकत नाही. परंतु सद्गुरु त्यांचा एका क्षणांत नाश करूं शकतो."

## ३

"भौतिक जगाचें ज्ञान व परमेश्वराशीं ऐक्य पावल्यावर मिळणारें दिव्य ज्ञान—असे ज्ञानाचे दोन प्रकार आहेत. आध्यात्मिक पूर्णतस प्राप्त झालेला पुरुष जेव्हा या स्थूल जगताच्या बाबतींत बोलतो, तेव्हा त्याने या दोन्ही प्रकारच्या ज्ञानांचा जरी प्रत्यक्ष उपयोग केला नाही, तरी त्याच्या शब्दांत त्याच्या भौतिक ज्ञाना-प्रमाणेंच त्याच्यांत असणारें ईश्वरत्वहि व्यक्त होतें. अशा पुरुषाच्या कृतीमध्ये व वाणींत, एक प्रकारचा सुन्दर व रहस्यमय अर्थ असतो. पण बहिर्मुख मनुष्याला तो बहुधा दिसत नाही. मूर्खाला रत्न दिलें, तरी त्याची त्याला किंमत नसते; परंतु त्याचें खरें महत्त्व त्यांतील तज्ज्ञांसच समजतें.······"

# ४

" तत्त्वदर्शनानंतरहि मनुष्याच्या प्रकृतिधर्मांत फरक होत नाही.

" परमेश्वर प्राप्त होण्यापूर्वी त्याच्यांत अहंकार असतो; व त्यामुळेच क्रोध, शाप व कठोरवाणी, हे त्याचें अहित करतात. अहंकार आहे, तेथे ईश्वर नाही; व ईश्वर आहे, तेथे अहंकार नाही, हें तुम्ही पक्कें ध्यानांत ठेवा. पूर्ण पुरुषाच्या ब्राम्ही स्थितींतील क्रियांत किंवा शब्दांत अहंता नसते. तरी, तत्त्वसाक्षात्कार झाला असूनहि, त्याचा मूळ स्वभाव बदलत नाही. परंतु, जेव्हा तो इतरांच्यावर रागावतो, तेव्हा त्यांचें परम कल्याणच होतें, हें विसरतां कामा नये.

" ' माझेंमन नाना प्रकारच्या विषयांचा अभिलाष करीत होतें; पण तुला पाहिल्यापासून तुझ्या दर्शनावाचून मला कोणतीच इच्छा राहिली नाही. ' या अर्थाची हाफीजची कविता आहे.

"यांवरून स्पष्ट दिसतें की, विविध पदार्थ पाहाणें, हा कवीचा स्वभाव आहे. आता प्रियतम पाहिल्यापासून इतर कांही पाहण्याची त्याची इच्छा नसली, तरी दृश्यांची प्रीति शिल्लक आहेच. पूर्वी त्यास अनेक पदार्थ पाहावेसें वाटत होतें. आता फक्त परमेश्वरच पाहावासा वाटतो. अहंता नष्ट झाल्यामुळे हें वासनापरिवर्तन झालें. अहंभाव जाऊन, तेथे ईश्वरभाव आला. मनुष्याचा रागावण्याचा स्वभाव गेला नाही, तरी आध्यात्मिक पूर्णता प्राप्त झाल्यावर, त्या रागाचा परिणाम अगदीच निराळा होतो. कारण त्याच्या मागे ईश्वरत्व असतें; व ज्या मनुष्यास त्या रागाचा लाभ झाला असेल, त्याचें हितच होतें. "

# ५

" मनरूपी पडद्यामुळे, मनुष्याचें अंतरंग व बहिरंग असे दोन निरनिराळे भाग होतात. अंतरंग निर्मल करणें इतकें कठीण आहे, की साधारण मनुष्यास तें अशक्यच आहे. अगदी पवित्र अंतःकरण असणें, सद्‌गुरूंच्या कृपेशिवाय शक्य नाही. परंतु बहिरंग म्हणजे शरीर शुद्ध ठेवण्याचा प्रत्येकाने कसून प्रयत्न केला पाहिजे. धार्मिक विधी—('शरीयत') देहशुद्धीकरिता आहेत. त्याचें पालन केल्याने, 'सालिक' किंवा सद्‌गुरूची भेट होते. भाग्यवशात् सद्‌गुरूंच्या शिष्यत्वाचा लाभ होईपर्यंत, प्रत्येकाने आपलें स्वधर्मविहित आचरण केलेंच पाहिजे. देहशुद्धीमुळे अंतरंगहि थोड्या प्रमाणांत विमल होतें. प्रार्थना व विधी यांमुळे तर हटकून फायदा होतोच.

"स्वतःचा धर्म व सद्‌गुरु या दोहोंपैकी एकाचाच अंगिकार करावा; व योगप्रक्रियेचा तृतीय पंथ भयावह आहे.

" गुरुकृपेने एकदा अंतरंग विमल झालें, म्हणजे बाह्यशुद्धीची आस्था ठेवली नाही तरी चालतें. पुष्कळ संत घाणेरड्या ठिकाणीं राहतात, व देहाच्या स्वच्छतेविषयीं त्यांना मुळीच पर्वा नसते, हें तुम्हाला ठाऊक असेलच."

# ६

" इष्ट वस्तु मिळाल्यावर मनाला संतोष होतो; पण त्यानंतर लवकरच त्याची पूर्वीची स्थिति त्यास प्राप्त होते. त्याचप्रमाणे, एखादें कडू औषध इच्छेविरुद्ध दिलें, तर मनस्ताप होतो; परंतु लवकरच

तो शांत होऊन, मनाची पूर्वीची स्थिति कायम होते. जगांतील सर्व सुख व दुःख याप्रमाणे क्षणिक आहे. कांही मिनिटांपूर्वी, तुम्ही चॉकोलेट्स मिटक्या मारून खाल्लींत. परंतु तो आनंद आता माव-ळला असून, त्याचा अवशेषहि वर्तमानकालांत राहिला नाही. त्याच-प्रमाणे, सर्व सुख व दुःख अनित्य आहे. भोगलोलुप मनाला विषय-सुख अत्यंत प्रिय असतें. परंतु संयोग असेपर्यंतच तें सुख राहतें. वियोग झाल्यानंतर तें नाहीसें होतें. तुम्ही जर जगांतील या नाशवंत सुखाची चिरकाल टिकणाऱ्या अध्यात्मप्रचुर आनंदाशीं तुलना केली, तर तुम्हाला त्या दोहोंतील फरक कळून येईल."

७

"प्रत्येक कार्याला कारण असतेंच. या जगांतील सर्व दुःख काल्पनिक व स्वतः निर्माण केलेलें असतें. त्याला फारसें मोठें कारण नसतें. कारणच कल्पित असल्यामुळे, त्या दुःखाचा आपल्या मनावर परिणाम होऊं देण्याची आवश्यकता नाही. त्याचप्रमाणें, जगांतील सुखाची अभिलाषा ठेवणें, म्हणजे बालिशताच आहे. तुमच्याविषयींच्या किंवा इतर जगांतील सर्व बाबतींत, तुम्ही केवळ तटस्थ साक्षी होऊन रहा. 'हे हाफीज! ऐहिक सुख व दुःख दोन्ही चंचल आहेत. सत्य ह्या दोहोंच्या पलीकडे असल्यामुळे, तूं आनंदांत रहा.' या अर्थाची हाफीजची कविता आहे."

८

"एखाद्या एम्. ए. पास झालेल्या शिक्षकास लहान मुलांना वर्णमाला शिकवावयाची असेल, तर त्याने मुलांच्या मनोभूमिकेपर्यंत

खाली उतरलें पाहिजे. तरच तो त्यांना शिक्षण देऊन, पायरी पायरीने, आपल्या इतकी योग्यता त्यांना आणून देऊं शकेल. तो आपलें पांडित्य विसरला नाही, तर त्याचे शिकविण्याचे सर्व प्रयत्न व्यर्थ होतील. त्याप्रमाणेच सद्‌गुरूस देखील, शिष्यांस ज्ञान देण्याकरतां, त्यांच्याच भूमिकेंत यावें लागतें. कांहीहि करण्यापूर्वी त्याला भोवतालच्या परिस्थितीचा विचार केला पाहिजे. ह्या बाबतींत अरेबियाच्या पैगंबराचें उदाहरण पाहा. जेव्हा त्याच्या शत्रूंनी त्याचा छळ करून त्याला ठार मारण्याची धमकी दिली, तेव्हा तो मक्केहून मदिनेस पळून गेला; व अशा बिकट परिस्थितींत, त्याने साधारण मनुष्या-प्रमाणेंच वर्तन केलें. परंतु 'सालिक' किंवा सद्‌गुरुप्रमाणे, 'मज्झूब' यथाप्राप्त अनुवर्तन करूं शकत नाहीत. कारण ते ईश्वरीय आनंदसागरांत इतके निमग्न असतात, की त्यांना देहाचें मुळीच भान नसतें. ते इतरांना ज्ञान किंवा सत्यप्रत्यय देऊं शकत नाहीत."

## ९

"आपले दोन डोळे सोडून, आपणास एक आणखी अंतश्चक्षु आहे. हा अंतश्चक्षु दोन भिवयांच्या मध्ये असून, तोच बाहेरील दोन डोळ्यांतून सर्व पाहत असतो. परंतु संत अंतश्चक्षूने ईश्वर पाहतात; व बाह्य नेत्रांनी जग पाहतात."

## १०

"स्वरूपावस्थिति ही सर्वांच्याकरिता सारखीच असते. प्रेषित महात्मा व सद्‌गुरु यांच्या सामर्थ्यांत फरक नसतो. फक्त त्या

सामर्थ्याचा उपयोग करण्याचा अधिकार मात्र दोघांनाहि सारखा नसतो. वास्तविक पाहतां, सद्गुरु कोणासहि कांही देत नाही. तो फक्त शिष्याच्याच अंतःकरणांत असलेली आध्यात्मिक संपत्ति अनावृत करतो. देहपतनानंतर आपल्या सामर्थ्याचा उपयोग करण्याचा अधिकार सद्गुरूस नसतो. त्याला सामर्थ्य असतें; पण त्याचा उपयोग तो करूं शकत नाही. जेथे सद्गुरूची समाधी असते, तेथे त्याची शक्ति वास करतेच. परंतु त्या समाधीची पूजा करून जर कोणाचा फायदा झाला, तर त्याचें कर्तृत्व त्या सद्गुरूकडे मुळीच नसतें, हें ध्यानांत ठेवा ! भक्त त्या शक्तीचा उपयोग करून घेतो; व स्वतःचें कल्याण करतो. स्थूल शरीराने जिवंत असेपर्यंतच सद्गुरु दुसऱ्याचें हित करूं शकतो. देहत्याग केल्यावर तो कोणाचे संस्कार नष्ट करूं शकत नाही, किंवा कोणाला एकहि भूमिका उत्तीर्ण करून देत नाही. परंतु जे भक्त त्याच्या अनंत सद्रूपाची आराधना करतात, त्यांना त्याच्या अनंततेमुळे भक्तीस अनुरूप असलेलें फल मिळतें."

## ११

" 'जगण्यापेक्षा मरणें बरें; मरण्यापेक्षा भिणें बरें; व भिण्यापेक्षा कृति बरी.' अशी एक उर्दू म्हण आहे.— जगणें म्हणजे जगांतील बहिर्मुख जीवन; मरणें म्हणजे ईश्वराशीं तादात्म्य पावणें; भिणें म्हणजे परत देहभानावर येणें; मरणें म्हणजे दुसऱ्यांच्या अंतःकरणांत दैवी प्रेम उत्पन्न करणें; व कृति म्हणजे दुसऱ्यांना पूर्णावस्था देणें. तेव्हा ह्या उर्दू म्हणीचा अर्थ असा आहे, की जगांत बहिर्मुख जीवन कंठण्यापेक्षा ईश्वराशीं तादात्म्य पावलेलें बरें; एकत्त्यानेच

ब्रह्मानंदांत निमग्न होऊन राहण्यापेक्षा, ईश्वरप्राप्तीनंतर परत देहभानावर येणें बरें; मानवजातीविषयीं उदासीन राहण्यापेक्षा त्यांच्या अंत:-करणांत दैवी प्रेम निर्माण करणें चांगलें; व त्यांच्या अंत:करणांत दैवी प्रेम निर्माण करण्याहूनहि त्यांना परमात्म्याशीं एकरूप करणें, हें चांगलें आहे. ”

## १२

“ दुसरा आपणास कितीहि वाईट तऱ्हेने वागवो, आपण शान्तच राहिलें पाहिजे. कोणी परछिद्रान्वेषी दृष्टीने तुमच्याकडे पाहो, तुम्हांस दोष देवो किंवा कसेहि कठोर शब्द बोलो, ते सर्व धीराने सहन करा. यांतच खरें धैर्य आहे. मनुष्य सर्व सैन्य आपल्यापुढे नमवील, परंतु तो आपला क्रोध जिंकूं शकत नाही. ”

## १३

“ काममूलक विचार व क्रिया किंवा क्रोधाचा आवेग याविषयीं सावध रहा. माझ्या म्हणण्याप्रमाणे वागा; त्यांत तुमचेंच कल्याण आहे. सत्समागम, जनतेची सेवा व ईश्वराचें नांव घेणें, ह्या तीन साधनांत सर्वश्रेष्ठ योगांचा व धर्माचरणाचा अंतर्भाव होतो. इतकें केलें म्हणजे सर्व धर्म पूर्णपणे पाळले जातात. ”

## १४

“ जगांतील कोणत्याहि गोष्टीला महत्त्व नाही. आत्मज्ञानी पुरुषाला हें जग स्वप्नाहून तुच्छ वाटतें. शेक्स्पीअरसारख्या महाकवीला सुद्धा खऱ्या आनंदाचा व सदेकरस तत्त्वाचा अल्पहि

अनुभव नव्हता. ईश्वराची स्थिति सुषुप्तीप्रमाणे आहे. ईश्वरप्राप्त मानवास पूर्ण जाणीव कायम ठेऊन सुषुप्तीचा अनुभव घेतां येतो. ही स्थिति अनिर्वाच्य आहे. 'शून्यांत शून्य मिळविलें, म्हणजे हें जग निर्माण होतें', असें हाफीज म्हणतो."

## १५

"परमेश्वरापासून मनुष्यास दूर ठेवणाऱ्या तीन गोष्टी आहेत. काम, क्रोध आणि कांचन (लोभ). काम आणि लोभ जिंकला जाईल; परंतु क्रोध ताब्यांत आणणें फार कठीण. जर या तीन शत्रूंस जिंकाल, तर काम, क्रोध आणि लोभ–यांचा संयम करणारा 'वली'च तुम्ही व्हाल."

## १६

"ज्याप्रमाणे वाळवंटांतून चालणाऱ्या मनुष्यास मोत्यें आणि हिरे यांपेक्षा केवळ पाण्याचीच किंमत जास्त वाटते, त्याप्रमाणेच खऱ्या प्रेमिकास केवळ ईश्वरच हवा असतो, आणि इतर सर्व वस्तू त्यास तुच्छ वाटतात. त्याला नांव, कीर्ति अगर संपत्ति यांपैकी कांहीहि नको असतें. फक्त त्याच्या प्रियतमाचाच तो भुकेला असतो. ज्याच्या अंतःकरणांत असें प्रेम नसतें, तो स्वार्थांतच मग्न असतो."

## १७

"आत्मज्ञानाचा स्वल्प अंश देखील मिळाला, तरी तुम्हाला अनिर्वचनीय आनंदाची प्राप्ति होईल. ह्या ज्ञानांत प्रत्येक वस्तु

आपली हकीकत तुम्हांला सांगेल; व प्रत्येक बाह्य पदार्थ तुम्हांला आनंदच देईल. दुःखमय भासणारें हें सर्व विश्व स्वर्गा-प्रमाणे शोभायमान होईल. आत्मवान सद्गुरूला स्वतःसारखा एकच अधिकृत पुरुष ( Charge-man ) असतो. त्याला तो सर्व देतो. तो अधिकृत पुरुष त्याचा पूर्णपणें वारस होतो; व त्याच्या अंतरंगांत ( Circle ) समाविष्ट असलेल्या बारा जणांना ती सद्गुरूपासून मिळालेली अध्यात्मसंपत्ति वाटून देतो. तो ही अध्यात्मसंपत्ति म्हणजे निजबोध ( जो सर्वांच्याकरिता सारखाच असतो ) व सामर्थ्य ( जें अंतरंगांतील स्थान व तत्त्वप्रत्ययापूर्वी केलेले परिश्रम यांवर अवलं-बून असतें ) त्या बारा जणांना प्रत्येकाच्या योग्यतेप्रमाणे नेम-लेल्या वेळी देतो; व मग त्या अधिकृत पुरुषाचा गुरु निधन पावतो. कधी कधी, त्या सद्गुरूचा बाह्य देह कायम असला, तरी तो आंतून अंतर्धान पावतो; व कांही बाबतींत, अंतर्धान पावण्याच्या आधी त्याचा देहपात होतो. संपत्ति वाटण्याचा अर्थ असा की तो अधि-कृत पुरुष आपलें आंतील कार्य अंतरंगांतील घटकांच्या स्वाधीन करतो; व तो स्वतः त्या कार्यापासून मुक्त होतो. ”

## १८

“ मरण सर्वांनाच आहे. जीवनांतील ती एक आवश्यक स्थिति आहे. आत्मा फक्त आपलें घर बदलतो. कोट बदलण्यापेक्षा मरणाचें महत्त्व जास्त नाही. किंवा मरणाला झोपेची उपमा देतां येईल. झोपेंतून मनुष्य पूर्वीच्या देहांतच जागृत होतो, व मरणा-नंतर मनुष्य नवीन देहांत जागृत होतो, हाच त्यांच्यांत फरक आहे. मनुष्य रात्रीं झोप घेतो, तेव्हा तो जागा झालेला पुन्हा दिसण्याची

आशा असते, म्हणून जगांतील लोक झोपेविषयीं अकांडतांडव करीत नाहीत. नवीन देहांत मृत मनुष्य हाही पुन्हा खात्रीने जागृत होतोच. तेव्हा या मृत्यूरूपी निद्रेविषयीं आपण तसेंच उदासीन कां राहूं नये? लोक शोक करतात, तो मरणामुळे नव्हे. आपला प्रिय मनुष्य पुन्हा आपल्या दृष्टीस पडून आपल्या मनाचें समाधान होणार नाही, म्हणून ते शोक करतात; व हा केवळ स्वार्थच आहे.

" माणूस मेला, म्हणजे सर्व बाजूंनी आक्रोश ऐकूं येतो. ' माझा प्रिय बाप मेला, ' ' माझ्या जीवनांतील हिरा गेला, ' ' माझा आश्रयदाता नाहीसा झाला, ' ' माझा प्रियकर कोठे आहे ? ' इत्यादि शोकमय उद्गार त्या घरीं ऐकूं येतात. परंतु इतकें दुःख व शोक दाखवीत असतांना सुद्धा, मृत मनुष्याच्या हितापेक्षाहि माझे-पणाची कल्पना प्रमुख असते.

मनुष्यजीवनाच्या प्रारंभापासून मृत्यूची तलवार सारखी चालूच आहे. रोज माझ्या शेंकडों व हजारों बंधूंना मरतांना मी प्रत्यक्ष पाहतों, पण त्याबद्दल मला कांहीच दुःख वाटत नाही; व जमशेटजींचा मृत्यूहि त्याला अपवाद नाही. मृत्यु अपरिहार्य आहे हें सर्व लोक कबूल करतात. परंतु ही गोष्ट सर्वांना कबूल असली, तरी जेव्हा एखाद्याचा मृत्यू होतो, तेव्हा लोक आक्रोश करतात, हा मनाचा दुर्बलपणा किंवा वेडेपणा आहे.

## १९

" नाम घेण्यांतच मन एकाग्र करावें; व तसें करतांना श्वासोच्छ्वास नियमित असावा. श्वास आंत घेण्याची व बाहेर सोडण्याची

क्रिया हळूच झाली पाहिजे; व श्वास सोडतांना ईश्वराचें नाम घेत राहावें. इतर विचार येतीलच. पण ते आले तरी त्यांना बाजूला सारून मन शांत व स्थिर ठेवावें. एकदा ह्या क्रियेची आवड उत्पन्न झाली, म्हणजे तुम्ही ती कधीहि सोडणार नाही; व या कृतींत तुम्हाला एक प्रकारचा आनंद वाटूं लागेल. ”

## २०

फारच क्वचित् प्रसंगीं, चतुर्थ भूमिकेंत आरूढ झालेले योगी आपल्या सामर्थ्याचा दुरुपयोग करतात; व त्यांना खनिज पदार्थांत जाऊन मनुष्यदेह मिळेपर्यंत पुन्हां उत्क्रान्ति करावी लागते. परंतु साधारणतः मनुष्याची अपक्रान्ति होत नाही. सर्व शरीरांत नरदेह श्रेष्ठ आहे, कारण त्यांतच परमेश्वरप्राप्ति होऊं शकते; व ईश्वरप्राप्ति होईपर्यंत आत्म्याचें जन्ममरण चुकत नाही.

## २१

“व्यष्टिबिंदू हा जेव्हा सत्तारूप सागराच्या विधाता नामक भागांतून आत्मज्ञान होण्याकरता विभक्त झाला, तेव्हापासून संस्कार उत्पन्न होण्यास सुरुवात झाली. पुढच्या सर्व योनी व जन्म जाणिव व आत्मज्ञान होण्याकरताच होतात. संस्कार सारखे उत्पन्न होऊन इतके घन होतात, की ते मनुष्यास जिवंतपणीं व मेल्यावरहि सोडीत नाहीत; पण ईश्वर साध्य होण्यापूर्वी संस्कार मनुष्यापासून वियुक्त झाले पाहिजेत. कारण संस्कार असेपर्यंत, व्यष्टिबिंदूला आदिसंकेताची विस्मृति राहून, संस्कारांमुळे उत्पन्न होणारी गतीच भासमान होत असते. सर्व संस्कारांचें परिमार्जन होईपर्यंत,

मनुष्याला ईश्वर मिळत नाही. पण त्यांचें परिमार्जन करणें फार कठीण आहे. ”

# २२

“ सूक्ष्म जगताला पुढे गति देणें, हें एक आत्मज्ञान असून जगाची जाणीव कायम ठेवणाऱ्या ‘ सालिकांचें ’ ( सद्गुरूंचें ) कर्तव्य आहे. परंतु त्यांतील प्रमुख पुरुषास अंतरंग (circle) निर्माण करून त्या अंतरंगांतील व्यक्तींना आत्मज्ञान घ्यावें लागतें; व शिवाय स्थूल जगतालाहि गति घ्यावी लागते. याप्रमाणे गति देण्याचें कार्य करण्याकरिता, डोक्यांतील अत्युच्च भागांत अनुभवास येणारी निर्विकल्प स्थिति सोडून, सद्गुरूंना ब्रह्मांड नांवाच्या दुसऱ्या टप्प्यांत उतरावें लागतें. हा दुसरा टप्पा म्हणजे वरील आनंदमय स्थिति व निम्नतर मानुष देह (lower human form) या दोहोंतील संधिबिंदूच आहे व त्या टप्प्यांतून या देहाचे खालील सर्व भाग दिसूं शकतात. ह्या पाहाण्यांत ईश्वरप्राप्तीपर्यंतची सर्व जन्ममरणपरंपरा दिसते.

“ अध्यात्मिक संबंधामुळे व पूर्वतयारीमुळे आत्मज्ञानाचा अधिकार प्राप्त झालेल्या व्यक्तींना वर आणून ईश्वरसाक्षात्कार देण्याची जबाबदारी, ज्या आत्मज्ञ पुरुषांवर पडते, त्यांना या संधिबिंदूवर यावें लागतें. परंतु आत्मज्ञानाचा अधिकार मिळणें फार दुर्लभ आहे. अनेक युगांतून केलेला स्वार्थत्याग व आत्मज्ञ पुरुषाशीं जडलेला दृढ संबंध व भोगलेलें दुःख, यांवर आत्मज्ञानाचा अधिकार अवलंबून असतो. अनेक युगांत दुःख भोगल्यानंतरच आत्मज्ञानाकरतां उत्पन्न होणाऱ्या अंतरंगांत ( Circle ) प्रवेश करण्याची पात्रता मनुष्यास येते. सर्व संस्कार नष्ट करून व मनांतील सर्व

विचारांचा अस्त करून उन्मनी स्थितींत राहिल्यास ईश्वराचा अनुभव येतो. पण हें फार कठीण आहे. कारण, मनांतील विचार बंद करण्याचा प्रयत्न केला तर गाढ झोप येऊं लागते. म्हणजे नेणीव प्राप्त होते. मोठमोठे योगी देखील मनाला सर्वकाळ पूर्णपणे स्तब्ध करूं शकत नाहीत. ध्यानांत किंवा समाधींत त्यांचें मन निष्क्रिय होतें; परंतु यामुळे देखील नवीन संस्कार उत्पन्न होतात. व समाधींतून उतरल्याबरोबर, मन आपले व्यापार करण्यास सज्ज होतें; व त्यांत उरलेल्या संस्कारांची भर पडते. हाफीजने शरीरास भांड्याची, आत्म्यास अग्नींतून निघणाऱ्या धुराची व संस्कारांना मोठ्या दगडाची उपमा दिली आहे. तो म्हणतो की, कितीहि प्रयत्न केला तरी धुराने दगड फेकला जात नाहीं; व म्हणूनच कोणी महात्म्याने येऊन तो दगड उचलला पाहिजे. तसेंच एखाद्या पक्ष्याने आंतून पिंजरा उघडण्याचा प्रयत्न केल्यास तो उघडणार नाहीं, तर त्याचें दार उघडण्याकरता बाहेरूनच मदत आली पाहिजे. सारांश, ज्यांना अध्यात्मिक उन्नति हवी असेल, त्यांनी अनेक आपत्तींना तोंड देण्याची तयारी केली पाहिजे; व सहनशीलता वाढविली पाहिजे."

## २३

"निंदा किंवा स्तुति यामुळे तुम्ही कर्तव्यपराङ्मुख होऊं नये. आपण आपलें कर्तव्य उत्कृष्ट रीतीने बजावलें, असें तुम्हास तुमची सदसद्विवेकबुद्धि सांगत असेल, तर बस आहे. इतर सर्व विचार सोडून द्या. तुमची अंतःप्रज्ञाच उत्तम निवाडा देईल."

## २४

" मुमुक्षूंनी प्रातःकाळीं लवकर उठावें. तुम्ही उशीरा उठाल, तर तुमच्यांत व जगांतील इतर लोकांत विशेष फरक नाही. सकाळचे तीन वाजेपासून सहापर्यंतचा काल हा ध्यानास फार उत्तम आहे. पांच-सहा तासांची झोंप तुम्हाला पुरे. "

## २५

" पुष्कळ लोक अहंकार घालविण्याविषयीं बोलतात व लिहितात; पण बऱ्याच लोकांना अहंभावाचें स्वरूप न समजल्यामुळे, त्यांच्या उपायांनी अहंभावाचा क्षय न होतां, तो कायम राहून अधिक वाढतो. **अहंभावांत स्वार्थ व गर्व यांचाच केवळ समावेश होतो, असें नाही; तर तुमच्या शरीराची, मनाची, किंवा व्यष्टिजीवनाची जाणीव असणें, हा सुद्धा अहंभावच आहे.** तुम्ही काल झोपलांत ना ? पण त्याविषयीं आज विचार करणें, हा अहंभावाचाच प्रकार आहे. तुम्हांला कोणी शिव्या दिल्यामुळे तुम्हांला अपमान वाटला, तर तोहि अहंभावच आहे. अहंभावाला अनंत शिरें आहेत. पण त्यांतील क्रोध, काममूलक तृप्ति, लोभ व निंदा हीं चार प्रमुख आहेत. अहंभाव नष्ट करण्याकरिता, दैवी प्रेम व सद्गुरूच्या ठिकाणीं पूर्ण शरणागतवृत्ति—हे दोन उपाय आहेत. "

## परिशिष्ट–ब

# प्रश्नोत्तरें

## १

प्रश्नः—ध्यानांत मनाचें नियमन करावें लागतें; व त्याकरता शक्तीचा उपयोग करावा लागतो. परंतु मनाचा व्यापार अनिर्बंध असल्याशिवाय त्यास सत्य शाधून काढतां येणार नाही. मग ध्यानाचें समर्थन कसें करतां येईल ?

बाबाः—मी ध्यानापेक्षा प्रेमाला व कर्तृत्वाला अधिक महत्त्व देतों. एखाद्या व्यक्तीवर आपलें प्रेम असलें, तर आपण त्या व्यक्ति-विषयीं सहजच स्वाभाविकपणें विचार करतों; व या व्यापारांत, मनाचा निरोध करण्याचा प्रश्नच उद्‌भवत नाही.

प्रश्नः—या प्रकारचें भावतें व स्वयंस्फूर्त चिंतन निःसंशय सुन्दर असतें; व त्यास समर्थनाची आवश्यकता नाही. परंतु एकाच विशिष्ट रूपावर चित्तैकाग्र्य साधण्याची आवश्यकता आहे, असें कांहीं तत्त्ववादी सांगतात तें कां ?

बाबा:—कोणत्याहि वस्तूवर चित्त पूर्णपणें एकाग्र केल्यास सर्व संस्कारसमूह खिळखिळा होतो; व त्यामुळे संस्कारशृंखलांचें बंधन शिथिल होतें.

प्रश्न:—विश्वप्रेम व गुरुभक्ति या दोहोंचा समन्वय कसा करतां येईल ?

बाबा:—कोणी कोणावरहि प्रेम केलें तरी तें मलाच मिळतें; कारण मी तेथे आत्मरूपाने आहेच.

## २

प्रश्न:—" माझा तुमच्यावर विश्वास आहे व माझी श्रद्धा अधिक दृढ व्हावी अशी माझी इच्छा आहे. "

बाबा:—" पण कां ? तुला जें पाहिजे तें तुझ्यांतच आहे; व तुला तें तेथेच मिळेल. कोणी माझा अनुयायी असो वा नसो, तें साध्य होण्याकरता मी तुम्हाला मदत करतों. "

## ३

प्रश्न:—" मला आपणांस भेटून फार आनंद झाला. हल्ली माझें आयुष्य नीरस झालें असून त्यांत सुधारणा घडवून आणण्याचा मार्ग मला दिसत नाही. "

बाबा:—" प्रत्येक मनुष्य सुखाच्या शोधांत आहे; व त्याला तें मिळविण्याचा उपाय सांपडत नाही. तेव्हा एका अर्थी प्रत्येकालाच आपलें आयुष्य कंटाळवाणें वाटतें. पण वस्तुतः जीवन सौंदर्य-रसाने भरलेलें आहे व आनंद मिळण्याकरतांच तें आहे. मी

तुम्हाला मदत करीन व तेव्हा सर्व परिस्थिति नवीनच दिसूं लागेल. मी म्हणतों तें तुमच्या अनुभवास येईल. परिस्थितीला महत्त्व नसून आपल्या दृष्टिकोणाला महत्त्व आहे. आज तुह्मी खिन्न आहांत; व आयुष्यांतील सर्व गोष्टी तुह्माला रुक्ष वाटतात. पण उद्या तुमची दृष्टि बदलली, ह्मणजे तुमचा विषाद जाऊन तुमची वृत्ति उल्हसित होईल. सर्वांत सोपा मार्ग ह्मणजे कोणतीहि गोष्ट मनाला लावून घेऊं नये. व त्यांना तात्पुरतेंच महत्त्व द्यावें. 'माझा जन्म स्वतः आनंदी राहून इतरांना आनंद देण्याकरतांच आहे' असें तुह्मी स्वतःस सुचवीत जा. ह्मणजे हळूहळू तुमच्या आनंदाची वाढ होऊन तुह्मी दुसऱ्यांनाहि आनंद द्याल. 'माझें जीवन रुक्ष आहे' अशी सूचना स्वतःला कधीहि देऊं नका. त्यामुळे वाईट परिणाम होतो. सर्व कांही उत्तम आहे व मी आनंदांतच राहणार, असें नेहमी ह्मणत जा. मी तुह्माला मदत करूं शकतों; व ती मिळत असल्याचें तुमच्या दृष्टोत्पत्तीस येईल."

## ४

आपण पतित असून अत्यंत गोंधळलेल्या स्थितींत असल्याचें एका मनुष्यानें लेखी पत्र हातीं दिल्यावर बाबा त्याला ह्मणाले—

"मला हें सर्व माहीत आहे. तुह्मी जास्त सांगण्याची आवश्यकता नाही. मी तुह्माला सर्व समजाऊन सांगतों. तुह्मी चिंता करूं नका. जेव्हा एखाद्याची अध्यात्मिक उन्नति होणार असेल, तेव्हा त्याच्यांत कामवासना किंवा प्रेम अतिशय असतें. ह्या कामवासनेचें प्रेमांत परिवर्तन केलें पाहिजे. कामवासना स्थूल इंद्रियांची तहान आहे;

व प्रेम ही आत्म्याची तहान आहे. मला तुमच्याविषयीं सर्व माहीत आहे व मी तुह्माला अध्यात्मिक साहाय्य करीन. फिरून उठण्याचा प्रयत्न न करूं शकण्याइतके तुह्मी पतित आहांत, असें स्वतःला कधीहि वाटूं देऊं नका."

५

एक ख्रिश्चन धर्मोपदेशक आपल्या डाक्टर मित्राबरोबर बाबांच्या भेटीस आला असतां झालेलीं प्रश्नोत्तरें:—

प्रश्नः—ख्रिश्चन लोकांच्या दृष्टीने ख्राइस्ट हा एकच महापुरुष आहे. कारण त्याच्यांत वैशिष्ट्य आहे. तुमचाहि तसाच विश्वास आहे काय?"

बाबाः—"त्याचें वैशिष्ट्य त्याच्या जाणीवेच्या व अवस्थेच्या दृष्टीने आहे. मुसलमान फक्त महंमदालाच मानतात व पार्शी लोक झरथुष्ट्राला, हिंदु कृष्णाला व बुद्धधर्मानुयायी बुद्धालाच ईश्वरतुल्य समजतात. प्रत्येक म्हणतो की माझ्या आदर्शांतच वैशिष्ट्य आहे. पण ह्याविषयीं इतकें स्तोम का? नांवांत काय आहे? खरें महत्त्व जीझसच्या चारित्राला आहे. ख्राईस्टचा उपदेश समजून त्याचें खरें महत्त्व जाणण्याकरता त्याप्रमाणें वागलें पाहिजे. केवळ समारंभ, भाषणें, चर्चा व टीका यांमुळे ख्राइस्टचें खरें महात्म्य प्रत्ययास येत नाही. प्रेम करा असा एकाच साध्या गोष्टीचा ख्राइस्टने उपदेश केला. पण त्याच्या फारच थोड्या अनुयायांमध्ये प्रेमाची वाढ झालेली दिसते."

प्रश्नः—"ख्रिश्चन धर्मांत प्रेमाचें स्थान कोणतें आहे?"

बाबा:—“ प्रेमांत निःस्वार्थ सेवेचा व वासनात्यागाचा समावेश होतो. शुद्ध प्रेमांत सर्व गोष्टी अंतर्भूत आहेत. प्रेमांत इतर सर्व गुणांचा विलय होतो. परंतु हल्ली लोक काममूलक प्रेमालाच खरें प्रेम समजतात, तें बरोबर नाही. प्रेम शुद्ध असावयास पाहिजे. ”

प्रश्न:—“ पण असें शुद्ध प्रेम सद्गुरूच्या साहाय्याशिवाय शक्य नसतें. ”

बाबा:—“ ईश्वर बाहेर आहे व आंतहि आहे. त्याचा शोध स्वतःमध्येंच कां करूं नये? आपण ईश्वराच्या कृपेची याचना करीत असतांनाहि ईश्वर कृपा करीत नसला, तर अशा प्रकारच्या ईश्वरा-विषयीं तुम्ही काय म्हणाले? लोक नुसतें तोंडाने बोलतात; पण ईश्वराची कृपा मिळविण्याची त्यांना खरी तळमळ नसते. सर्वांमध्ये ईश्वर हा साररूपाने असून, तो अनंत आहे; व व्यक्ती त्या अमर्याद महासागरांतील बिंदू होत. हें सर्व आपल्या दृष्टीवर अवलंबून आहे. तुम्हाला हें फूल फूलच वाटतें; पण मला त्यांत ईश्वर दिसतो. ”

## ६

एक कलेचा प्रेमी बाबांना भेटण्यास आला असतां ‘कलेंत स्वतःचा आत्मा ओतला जातो म्हणून मला कलेचे प्रेमी आवडतात’ असें बाबा म्हणाले; व मग खालील संभाषण झालें.

प्रश्न:—“ आतापर्यंत मी कल्पनेच्या साहाय्यानेच कल्पनांच्या उगमस्थानाचा शोध करीत आहे. परतु ईश्वरी तत्त्व सापडण्याचा दुसरा कांही उपाय आहे काय? मी एका चर्चेकरता चित्रें काढलीं आहेत; पण मला अधिक गंभीर दृष्टि यावयाला पाहिजे. ”

बाबाः—" ज्ञान हा प्रत्येकाचा हक्क आहे. कलेंतील स्फूर्तीचा उगम प्रेमांत असेल, तर ती कला मनुष्याला श्रेष्ठ भूमिका प्राप्त करून देते. कलेवरची प्रीति कायम ठेवा. कलेमुळे तुमच्या अंतर्जीवनांतील नवीन दालन उघडेल. जेव्हा तुम्ही चित्र रंगविता, तेव्हा तुमच्या डोळ्यासमोरील विषय सोडून बाकी सर्व गोष्टी तुम्ही विसरून जाता. जेव्हा तुमचें सर्व लक्ष कलेंत असतें, तेव्हा तुम्हाला स्वतःचेंहि मुळींच भान नसतें; व जेव्हा तुम्हाला स्वतःचें भान नसतें, तेव्हा तुमचा अहंभाव कमी होतो व अनंत प्रेमाचा उदय होतो. आणि प्रेम उत्पन्न झालें म्हणजे ईश्वर प्राप्त होतो. कलेमुळे अनंत ईश्वराची कशी प्राप्ती होते, हें आता तुम्हाला समजेल···."

## ७

एक बाई आपल्या नट मुलाला घेऊन बाबांना भेटण्यास आली त्या वेळीं झालेला संवाद.

प्रश्नः– " मनुष्याला आपलें ध्येय कसें साध्य करून घेतां येईल ? ( मुलाकडे बोट दाखवून ) हा नट आहे."

बाबा ( मुलास उद्देशून ):—" आत्म्याच्या अभिव्यक्तीचें कला हें उत्कृष्ट साधन असून ती इतरांना स्फूर्तिदायक होते. परंतु तुझी अभिव्यक्ति अनिर्बंध होत नाही, असें तुला वाटत असेल तर तूं एक गोष्ट कर. रंगभूमीवर काम करण्यापूर्वी ' मी स्वतःचा भाव पूर्णपणें व्यक्त करूं शकतों व करीन ' असें स्वतःचें मन तयार कर. म्हणजे प्रत्येक वेळीं केलेल्या अभिनयाने तुझा आत्मविश्वास अधिक दृढ बनेल. बहुधा मनच बंद असतें. स्वतःस कमी समजून किंवा

भितीमुळे किंवा कामांत आवड नसल्यामुळे बऱ्याचशा नटांना आपलें काम उत्कृष्ट रीतीनें करतां येत नाही. कारण, ह्या न्यूनतेच्या भावनेमुळे अभिव्यक्तीस प्रतिबंध होतो. अभिनय करतांना 'मी जगांतलि सर्वोत्तम नट आहे' अशी कल्पना करून स्वतःचा भाव पूर्णपणें व्यक्त करावा. मी तुला अध्यात्मिक स्वरूपाचें साहाय्य करीन. पण तूं स्वतःस सर्वोत्कृष्ट नट समजत जा. जर ही समजूत अभिमानामुळे उत्पन्न झाली नसून स्वतःतील कर्तृत्वशक्तीच्या विमोचनाकरता ठेवली, तर ती योग्यच आहे......."

## ८

एक चित्रकार आपल्या दोन मुलांस घेऊन बाबांना भेटण्यास आला असतां 'मी मनुष्यांत अध्यात्मरंग भरवीत असल्यामुळे मीहि चित्रकारच आहे', असें त्यास बाबा म्हणाले व नंतर खालील संवाद झाला.

प्रश्नः—"मला आध्यात्मदृष्टि पाहिजे."

बाबाः—"ती दृष्टि तुम्हांला येईल... सध्या तुम्हाला योग्य वाटेल, तें तुम्ही करा. नंतर याहूनहि श्रेष्ठ भाव व्यक्त करावासा वाटेल, तेव्हा तो आपोआपच तुमच्या चित्रांत उतरेल."

प्रश्नः—"मलाहि असेंच वाटतें."

बाबाः—"हिंदुस्थानांत एक चित्रकार आहे. आम्ही दोघेहि तरुण होतों, तेव्हा तो मला आपलीं चित्रें दाखवीत असे. तीं चित्रें कांहीतरीच असत. पण तीं चित्रें चांगलीं नाहीत, हें माहीत असूनहि मी त्याला तीं चांगलीं आहेत, असें म्हणून प्रयत्न चालू ठेवण्यास

सांगितलें. पुढे जवळ जवळ एक वर्षाने माझ्याकडे पुन्हा येऊन त्याने मला आणखी दुसरीं चित्रें दाखविलीं. तीं फारच उत्तम होतीं. परंतु तरीहि तीं फार चांगलीं आहेत असें मी त्याला सांगितलें नाही. मी फक्त त्यास तो उद्योग चालू ठेवण्यास सांगितलें; व आज तो तिकडील प्रख्यात चित्रकार आहे. तेव्हा तुम्हाला जशी प्रेरणा होईल, तसेंच करीत असा व कालांतराने त्याची आपोआप वाढ होईल. (बाहेरची रमणीय निसर्गश्री हाताने दाखवून )–हें माझें चित्र तुम्हाला कसें आवडतें ? हें सर्व माझें चित्र आहे."

## ९

एक तत्त्वज्ञानाचा विद्यार्थी.

प्रश्नः—"दुर्गुणांचा अनुभव घेतल्याशिवाय मनुष्यांत सद्गुण उतरूं शकतील काय ?"

बाबाः—"दुर्गुण व सद्गुण या दोहोंचा अनुभव घेतल्यावरच ह्या द्वंद्वाच्या पलीकडे असलेल्या अनंताचा प्रत्यय येतो."

प्रश्नः—"चर्चनिष्ठ धर्मांत व ख्राइस्टमध्ये काय फरक आहे ?"

बाबाः—"त्यांच्यांत जमीनअस्मानाचा फरक आहे. ख्राईस्ट समारंभांत सापडणार नाही. तो जीवनांतच उतरला पाहिजे...."

## १०

कलेचा इतिहास लिहिणारा एक मनुष्य.

प्रश्नः—"जगांतील दुःखाला कोणता उपाय आहे ? आत्मदानाने तें नष्ट होईल काय ?"

बाबा:——" होय. बऱ्याच लोकांनी केलेल्या आत्मदानाने. परंतु हा सार्वत्रिक प्रयत्नाचा प्रश्न आहे. तुमच्या स्वत:विषयीं काय ! "

प्रश्न:——" मला स्वतःविषयीं इतकी फिकीर वाटत नाही. "

बाबा:——" इतरांची निःस्वार्थ सेवा करण्याची तुमची इच्छा असली, तरी तुम्हांला स्वत:चा प्रश्न टाळतां येणार नाही. कारण दुसऱ्यांच्या हिताकरता तुम्ही स्वतः जो प्रयत्न करता, त्याचा सामाजिक परिणाम होतो. एखादा रक्तपितीचा रोगी निरोगी लोकांच्या गर्दीत मिसळला, तर त्या स्पर्शजन्य रोगाने सर्व वातावरण दूषित होईल. त्याचप्रमाणें ज्या मनुष्यामुळे वातावरण सुगंधयुक्त होतें, तो इतरांस आनंदच देईल. तेव्हा व्यक्तिविषयक प्रश्न म्हणजेच सामाजिक प्रश्न; व सामाजिक प्रश्न म्हणजेच व्यक्तिविषयक प्रश्न. इतरांना मदत करण्याकरता, तुम्ही स्वतः शक्ति व ज्ञान यांनी संपन्न असलें पाहिजे. "

प्रश्न–" बरें. स्वत:चा प्रश्न थोडासा बाजूला सोडूं. आपण दुसऱ्याला मदत करण्याची पराकाष्ठा करीत असतांनाहि त्यांना प्रकाश मिळाला नाही, तर काय करावयाचें ! "

बाबा:–" त्याचा अर्थ असा की, तुमच्यांत आनंद ज्या मानाने सुप्रतिष्ठित आहे, तितका त्यांच्यांत नाही. परंतु प्रत्येकाचें अखिल जीवनांतील एकच ध्येय आहे; व तें म्हणजे स्वत:ला दुःख प्राप्त झालें तरी इतरांना आनंद देत राहणें. "

प्रश्न:—" केव्हा केव्हा, परिस्थिति प्रतिकूल असल्यामुळे, मनाला विषाद वाटतो. "

बाबाः—“ पण आता हें सर्व बदलून जाईल. तुमची अंतःकरण-प्रवृत्ति उत्तम आहे. मला तुम्ही फार आवडता. प्रत्येक मनुष्यांतच कांही दोष असतात. पण खरें महत्त्व अंतःकरणाला आहे.”

प्रश्नः—“ स्वार्थाचें मूळ काय ? ”

बाबाः—“ स्वार्थाच्या मुळाशीं वासना असते. दोन कुत्र्यांनी हाडाचा एक तुकडा पाहिला तर ते भांडतात; कारण त्यांना दोघांनाहि तो हवा असतो. दोघांनाहि तो स्वतःलाच मिळावासा वाटतो. बरें, त्यांनी दोघांनी तो हाडाचा तुकडा पाहिला नाही व म्हणून त्यांचें भांडण झालें नाही, तरी त्यांच्यांत वासना शिल्लक असतेच···लोकांच्या भीतीचें मूळ काय आहे ? त्यांना हव्या त्या वस्तू निघून जातील, म्हणूनच त्यांना भीती वाटते··· अंतःकरणाचें आध्यात्मिक परिवर्तन हाच निर्भय होण्याकरता एक उपाय आहे. त्यानेच लोकांचें खरें समाधान होईल. लोक मद्यपान कां करतात ? दिवसभर काम करून थकलेल्या शेतकऱ्यांना कांही तरी उत्तेजक पदार्थ पाहिजे असतात. पण त्यांना त्याच्याऐवजीं दुसरें कांही मिळेल, तर ते समाधान पावून उत्तेजक पदार्थांची हाव सोडून देतील. तेव्हा, वासनेमुळे उत्पन्न होणारी भकभक शांत होण्याकरिता, आत्मा अनावृत झाला पाहिजे. ”

प्रश्नः—“ पण स्वार्थ व वासना दृढमूल असतील, तर आत्मा अनावृत कसा होईल ?...”

बाबाः—“ हें सर्व प्रेमानेच सुसाध्य आहे. प्रेमामध्ये भिन्न अंतःकरणांत ऐक्य उत्पन्न करण्याची शक्ति आहे. ”

# ११

बाबांच्या एका भक्ताचा मुलगा.

प्रश्नः—" मला सुख कसें प्राप्त होईल ? "

बाबाः—" प्रत्येकजण नकळत किंवा मुद्दाम, कोणत्या न कोणत्या रूपामध्ये सुखाचा शोध करीत असतो. तूं आपल्याच तऱ्हेने सुख शोधीत आहेस. खुनी मनुष्य देखील सुखच शोधीत असतो. प्रत्यक्ष खुनाच्या कृत्यांत तें मिळेल असें त्यास वाटतें, म्हणूनच तो खून करतो. एखादा मनुष्य खून कां करतो ? मत्सरामुळे अगर द्वेषामुळे. आणि खून केला तर सुख मिळेल असें त्यास वाटतें, म्हणून तो आपल्या द्वेषाने अगर मत्सराने प्रेरित होऊन सूड उगवितो. एखादा मनुष्य आत्महत्या कां करतो ? त्यास त्यांत सुख मिळेलसें वाटतें म्हणून. एखाद्या मनुष्यास मद्यप्राशनाने सुख मिळेल असें वाटतें, म्हणून तो मद्यप्राशन करूं लागतो. परंतु त्यास असें कोणतें सुख मिळतें ? आणि तें किती वेळ टिकतें ? केवळ जोंपर्यंत त्या मद्याची धुंदी त्यावर असते तोंपर्यंत. ती एकदा नाहीशी झाली, म्हणजे त्याला निराश, दीन व भग्नहृदय असें वाटतें. कामवासनेसंबंधीं ( विषय-सुखासंबंधीं ) देखील तसेंच आहे. केवळ त्या क्षणीं जें सुख मिळतें, तेवढ्याचसाठी मनुष्य उपभोग घेण्यास प्रवृत्त होतो. परंतु कोणत्याहि कृत्यापासून जें सुख मिळतें, तें केवळ तात्पुरतेंच असतें. जेव्हा तें भोगून संपतें, तेव्हा तो पुन्हा दीन होऊन बसतो. खरें सौख्य निराळेंच असतें; व त्यांत कधी बदल होत नाही अगर तें कधी खंडतहि नाही. तें अनन्त व चिरन्तन आहे. आणि तें तुझ्यांतच आहे.

तें सुप्त असून खुलें करावयास पाहिजे. एकदा तें खुलें झालें म्हणजे मग निरंतर आनंदच आहे.

" मी सौख्याचा उगम व आनंदाचा सूर्य आहे. परंतु तुझ्यांत व त्या सूर्यांत पडदा असल्यामुळे तो तुला दिसत नाही. पडद्यामुळे तो दिसत नाही, म्हणून तो नाहीच असें तूं म्हणूं शकत नाहीस. सर्व जगाला प्रकाशमान करणारा तेजस्वी सूर्य तेथें आहेच. पण त्याच्या किरणांस आपल्या अज्ञानरूपी पडद्याने प्रतिबंध करून, त्याचीं किरणें तूं तुझ्यापर्यंत येऊं देत नाहीस. तो पडदा तूं काढून टाक; म्हणजे तुला सूर्यदर्शन होईल. तो पडदा फाडून आनंदाची प्राप्ति होण्याकरितां मी तुला मदत करीन. मला तूं प्रिय आहेस. मी सर्वांवर प्रेम करतों. "

## १२

प्रश्नः—" ज्या समग्र पूर्णतेचा व्यक्ति हा एक भाग आहे त्या पूर्णतेशिवाय दुसरें असें कांही व्यक्तीचें ध्येय असूं शकतें काय ? व्यक्तीने स्वतःस एकट्यालाच मुक्ति मिळविण्याची इच्छा ठेवणें रास्त आहे काय ? त्या समग्र पूर्णतेंत मिसळून जाऊन, तिच्याकरिताच जगण्यामध्ये मनुष्याच्या जीवनाची परिपूर्ति आहे; व मनुष्य हा केव्हाहि त्या पूर्णतेचा अंशच राहील असें वाटतें. "

बाबाः—" व्यक्तीविषयीं विचार करतांना आपण एकदम एखाद्या मर्यादित वस्तूचीच कल्पना करतों. तेव्हा, ती व्यक्तीच अमर्याद समग्र पूर्णता असूं शकत नाही. व्यक्ति त्या समग्र पूर्णतेंत मिसळून गेली पाहिजे. हें तुमचें म्हणणें बरोबर आहे; परंतु इतक्याने सर्व भागत नाही. ती समग्र पूर्णता सागराप्रमाणें असून, व्यक्ति हा त्या सागरांतील

बिंदु आहे. हा बिंदु सागरापासून विलग्न होऊन पुन्हा त्यांत मिसळून जातो. परंतु हा बिंदु पूर्वी सागरांत मिळालेला होता, त्याचप्रमाणें जर तो पुन्हा मिसळून गेला, तर तो विलग्न होण्याचा हेतु काय? जेथून आपण निघालों तेथेच परत आलों, तर उत्क्रांति विफल होईल. तेव्हा व्यक्तीने आपलें व्यक्तित्व कायम ठेवून, समग्र पूर्णतेशीं असणाऱ्या आपल्या ऐक्याचा अनुभव जाणीवपूर्वक घ्यावयाला पाहिजे. ह्याप्रमाणें खाइस्टला ईश्वराचा अनुभव खाइस्ट म्हणूनच येतो. तुम्हालाही स्वतःच परमेश्वर असल्याचा अनुभव येईल. हा प्रत्यय प्रत्येकाकरता स्वतंत्र राहील."

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
६६६६
ग्रंथ शाखा (स्थळ)

REFBK-0006999